
शब्द

# रुची ४२




बीएमएम डेट्रॉईट विशेषांक जुलै २०१७

मूल्य १० रुपये

पृष्ठे १२४








सिडको
महत्त्वाकांक्षी
प्रकल्पांसह सज्ज
गृहनिर्माण
सिडको प्रदर्शन केंद्र, वाशी
नवी मुंबई मेट्रो
नवी मुंबई विमानतळ प्रभावित क्षेत्र (नैना)
नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (नमुंआवि)
सिडको महामंडळ सर्वांगीण विकास आणि प्रगतीच्या दिशेने निरंतर यशस्वी वाटचाल
नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ
नैना
गृहनिर्माण
सिडको प्रदर्शन केंद्र, वाशी
नवी मुंबई मेट्रो
खारघर व्हॅली गोल्फ कोर्स
नेरूळ-उरण रेल्वे मार्ग
सिडको
शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित
www.cidco.maharashtra.gov.in


सारस्वत
बँक
आधुनिकता आणि परंपरेचा
अनोखा संगम
टेक बँकिंग सर्व्हिसेस
डेबिट कार्ड
GO Mo
मोबाईल बँकिंग
सारस्वत बँक कनेक्ट
एम-पासबुक
नेट बँकिंग
सारस्वत बँक चिल्लर ॲपवर
मिस्ड कॉल
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि. (शेड्युल्ड बँक)
देशातील सर्वात मोठी सहकारी बँक
मिले यहाँ, दोनो जहाँ
www.saraswatbank.com | f |

# एकाच तिकीटात अख्खी मुंबई..

## मुंबई दर्शनाची सुवर्णसंधी

**१, ३ व ५ दिवसांकरीता**






सिध्दीविनायक मंदिर

गेटवे ऑफ इंडीया



छत्रपती शिवाजी टर्मिनस




| श्रेणी | तिकीटाची वैधता | तिकीटाची किंमत (रु.) | |
|---|---|---|---|
| | | प्रौढ | बालक |
| प्रथम | १ दिवस | २७५ | १७० |
| | ३ दिवस | ४४० | २५० |
| | ५ दिवस | ५१५ | २९० |
| द्वितीय | १ दिवस | ७५ | ५५ |
| | ३ दिवस | ११५ | ७५ |
| | ५ दिवस | १३५ | ८५ |

### टुरिस्ट तिकीटाची वैशिष्ट्ये :


- तिकीटाच्या वैधतेपर्यंत अमर्यादित प्रवास.
- मध्य व पश्चिम रेल्वेच्या उपनगरीय विभागातल्या कोणत्याही स्टेशन पासून कोणत्याही स्टेशन पर्यंत लागू.
- हे तिकिट वैध तारखेच्या मध्यरात्री पर्यंत वैध राहील.
- हे तिकिट वैधतेचा पहिला दिवस सोडून, जास्तीत जास्त तीन दिवस आधी वितरीत केले जातील

मध्य रेल्वे


www.cr.indianrailways.gov.in


Mahabharati - NRI Services
Traditional Values.....
Global Standard
Various Deposit Schemes For NRIs
Facility of Joint A/c with Resident or Non-Resident
Account with various currencies ($, A$, C$, S$, £, €)
Housing Loan Facility
Internet Banking, ATM Cards, MahaMobile Banking
Attractive Rate of interest
Nomination/ Repatriation facility available
Enjoy Banking with us through state-of-the-art technology
बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक
Terms & Conditions Apply
All India Toll-Free No.: 1800-233-4526 Website: www.bankofmaharashtra.in Net Banking: https://www.mahaconnect.in


५ चा दम
आमच्या पाच हेल्पलाईन्सचा लाभ घ्या
आणि तुमचा रेल्वे प्रवास आरामशीर आणि सुरक्षितपणे करा
पश्चिम रेल्वे
सुरक्षेच्या दृष्टीने संकटकालीन परिस्थिती मध्ये डायल-करा. अखिल भारतीय सुरक्षा हेल्पलाईन क्र.
१८२
वैद्यकीय संकटकालीन परिस्थिती, स्वच्छता, खादयपदार्थ आणि कॅटरिंग, कोच ची देखभाल, लिनन इ. च्या शंका/तक्रारी साठी-डायल करा. हेल्पलाईन क्र.
१३८
पी एन आर स्थिती, गाड्यांच्या आगमन/प्रस्थाना संबंधी माहिती, प्रवास भाडयाची चौकशी, डेबीट/क्रेडीट कार्डस्च्या द्वारे तिकीट बूकींग संबंधी, इमेल च्या माध्यमातून वितरण, आरक्षित तिकिटाचे रद्दीकरण, वेक-अप कॉल, एस एम एस द्वारे तिकिट, गाडी मध्ये भोजन, यासाठी-डायल करा. हेल्पलाईन क्र.
१३९
''क्लीन माय कोच'' करिता - एस एम एस क्लीन<स्पेस><पीएनआर क्र.> वर पाठवा.
५८८८८
पश्चिम रेल्वे
www.wr.indianrailways.gov.in
आपल्या सेवेत सदैव कार्यरत
आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly
आम्हाला फॉलो करा: twitter.com/WesternRly
सीओएमएस ॲन्ड्रॉइड ॲप क्यू आर कोड
सीओएमएस वेब/एसएमएस/ॲन्ड्रॉइड ॲप आधारीत तक्रार पोर्टल www.coms.indianrailways.gov.in तुमची तक्रार
+९१ ९७१७६३०९८२
वर एसएमएस करा.


महाराष्ट्र शासन
आता बदल दिसतोय
महाराष्ट्र
घडतोय
स्वच्छ आणि गतिमान कारभार
नव्या कल्पना नवे विचार
सुसंवादाचे आपले सरकार
जनसामान्यांचा बनले आधार
सुशासनाचं
सरकार
कामगिरी
दमदार

*With Best Compliments From*





Central Bank of India
"CENTRAL" TO YOU SINCE 1911
रांगेपासून मुक्ती मिळविण्यासाठी
डिजिटल बँकिंगची निवड करा.
डिजिटल व्हा, कॅशलेस व्हा.
https://www.facebook.com/CentralBankofIndiaMumbai
https://twitter.com/centralbank_in
www.centralbankofindia.co.in

# ॥ग्रंथाली॥

द्वारा बुलन मिल म्युनिसिपल स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग, माटुंगा (प.), मुंबई-४०००१६
दूरध्वनी : २४३०६६२४/२४२१६०५० • granthaliruchee@gmail.com • www.granthali.com • वेळ : सकाळी ११ ते ६

## 'ग्रंथाली'चे मानाचे पान




गर्जे मराठी (इंग्रजी)
आनंद गानू / सुनिता गानू
मूल्य : १२५०/- रुपये । सवलतीत ८००/- रुपये

प्रस्तावना : डॉ. रघुनाथ माशेलकर

पाने ३०० (आकार रॉयल डेमी), संपूर्ण रंगीत, हार्ड बाउंड

*आग्रहाचे निमंत्रण*

**'ग्रंथाली' आणि 'एल. एन. वेलींगकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट अॅण्ड रिसर्च यांच्या संयुक्त विद्यमाने**

पुस्तक प्रकाशन : मंगळवार १ ऑगस्ट २०१७
वेळ : सायंकाळी ६ वाजता
स्थळ : एल. एन. वेलींगकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट अॅण्ड रिसर्च, लखमसी नप्पू रोड, माटुंगा (सेंट्रल रेल्वे), मुंबई - ४०००१९

---

## 'इंद्रायणी साहित्य'चे मानाचे पान





नाना वळलं तर सूत...
संपादन आणि शब्दांकन : श्रीकांत गद्रे
मूल्य : ८००/- रुपये
सर्व पुस्तक विक्रेते व अॅमेझॉन आणि https://indrayani.ccavenue.com वर उपलब्ध

इंद्रायणी साहित्य
२७३ शनिवार पेठ, पुणे - ४११०३०
संपर्क : +९१२० २४४५८५९८ / +९१ ९३७१०४३७८१
ई-मेल : info@ indrayanisahitya.com

तीन वर्षांत इंकिंग इनोव्हेशन्सतर्फे रसिक वाचकांसाठी ३६हून अधिक पुस्तके प्रकाशित

## रुचीच्या वाचकांसाठी दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

एक दिवा तेजाचा, एक दिना उत्कर्षाचा, एक दिवा ज्ञानाचा, एक दिवा वाचनाचा!




खास सवलतीच्या दरात



इंकिंग इनोव्हेशन्सने सामाजिक बांधिलकी जपून आरोग्यविषयक, वैद्यकिय, राजकीय, वाईल्ड लाईफ तसेच मनोरंजक विषयांचे विविध पैलू उलघडणारी अनेक पुस्तके वाचकांसाठी प्रकाशित केली आहेत.

INKING INNOVATIONS

# इंकिंग इनोव्हेशन्स

India Printing House, Ground Floor, 42, G. D. Ambekar Marg, Wadala, Mumbai – 400 031
Tel: +91 22 2412 2755 • Email : anand@inkinginnovations.com • Website : www.inkinginnovations.com

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म जाण
आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची


**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# शब्द रुची

बीएमएम डेट्रॉईट अधिवेशन विशेषांक
जुलै २०१७, वर्ष पाचवे
अंक तिसरा, मूल्य १० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**

कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर**

अतिथी संपादक : **आल्हाद गोडबोले**

मुखपृष्ठ : **पुंडलिक वझे**

---

**कार्यालयीन संपर्क**

**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**

granthaliruchee@gmail.com

**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**

**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल**

---

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी २५० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

---

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता :
ग्रंथाली, बुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

---

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

---



**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे मासिक व्यासपीठासमान आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र, त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था वा तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**


## अनुक्रम


१४ मेळा मराठी मनांचा... जनांचा
– सुशांत खोपकर



२२ तुकोबांचा वारसा
– अशोक नायगावकर
(मुलाखत : किरण येले)




३० 'सामना' पडद्यामागचा
– रामदास फुटाणे
(शब्दांकन : कुमार नवाथे)



३८ एक भन्नाट माणूस... वसंत वसंत लिमये
– राधिका कुंटे

४५ शिदोरी... जशीच्या तशी
– आल्हाद गोडबोले



४६ माझा लाडका, बेहिशोबी माणूस
– सोनाली कुलकर्णी

५२ पडद्यावरचे खरे हिरो
– अपर्णा पाटील

५८ मराठी चित्रपटांच्या सुवर्णकाळाची संगीतमय सफर
– मुकेश माचकर



६६ 'नायक' मराठी सिनेमातले
– अरुण पुराणिक



७४ मनस्विनी (प्रतिमा कोळगे)
– डॉ. लतिका भानुशाली

८० ज्ञानातून जीवनानंदाकडे
– शशिकांत सावंत



८६ जावे पुस्तकांच्या गावा
– राहुल बोरसे

९० इंडियन रेल्वे टॉप गिअरमध्ये
– सुरेश प्रभू (मुलाखत : दीपक करंजीकर)
शब्दांकन : प्रसाद हावळे



९४ नवी मुंबई... समृद्धीच्या मार्गावरील सुपरसिटी
– डॉ. मोहन निनावे

९८ कॉम्प्युटरवाल्यांची कोंडी
– डॉ. अनंत लाभसेटवार

१०३ ग्रंथाली पुस्तकप्रकाशन वृत्तांत

११३ मेहता पब्लिशिंग हाऊस, साधना प्रकाशन ग्रंथपाने

११८ ग्रंथाली ग्रंथपाने

## संपादकीय

महाराष्ट्राबाहेरचा महाराष्ट्र म्हणजे बृहन्महाराष्ट्र. आपले घर–दार, मायबाप–आप्तेष्ट सारे काही सोडून नोकरी–व्यवसायासाठी आंध्र–कर्नाटक असो, बिहार–बंगाल असो वा इंग्लंड–अमेरिकेत... महाराष्ट्रातून बाहेर गेलेल्या मराठी माणसांनी सातासमुद्रापारही ऊरी बाळगलेला महाराष्ट्र म्हणजे बृहन्महाराष्ट्र!

अशा बृहन्महाराष्ट्र मंडळांमध्ये अमेरिकेची मंडळे आणि तिथली मंडळी केवळ संख्येने नव्हे, तर उपक्रमांबाबतीतही चार पावले इतरांच्या पुढे असतात. अमेरिकेत दर दोन वर्षांनी होणारे बृहन्महाराष्ट्र अधिवेशन ही अमेरिकेतील आणि त्यानिमित्त भारतातून अमेरिकेत जाणाऱ्या पाहुण्यांसाठी एक पर्वणी असते. डेट्रॉईट येथे ५ ते ७ जुलै या काळात आयोजित केलेला 'मराठी मनांचा हा मेळा' कसा विलोभनीय आहे, हे या बृहन्महाराष्ट्र विशेषांकातील पहिल्याच, सुशांत खोपकर यांच्या, लेखामुळे वाचकांना समजावे. डेट्रॉईटच्या अधिवेशनास येणारे सारेच पाहुणे इतके खास आहेत की, आपण यावेळी डेट्रॉईटला न जाऊन चूक केली, अशी रुखरुख 'स्वदेशी अमेरिकनां'ना (ऊर्फ रेसिडेन्ट नॉन–इंडियन्सना!) वाटावी, अशी ही यादी. त्या साऱ्यांना लिहिते अथवा बोलते करणे शक्य नव्हते. तरीपण अशोक नायगावकर, रामदास फुटाणे, वसंत वसंत लिमये, नाना पाटेकर अशा काही सेलिब्रिटींची अक्षरभेट या अंकात घालून दिली आहे. चित्रपटातून समोर आलेल्या सचिन तेंडुलकरबरोबरच मराठी चित्रपटसृष्टीतील नायकांच्या परंपरेचे दर्शन अपर्णा पाटील आणि अरुण पुराणिक यांनी घडविले आहे. मुकेश माचकर एखाद्या 'गाईड'प्रमाणे तुम्हा–आम्हाला मराठी चित्रपटांच्या सुवर्णकाळाच्या संगीतमय सफरीवर घेऊन गेले आहेत, तर महाराष्ट्राच्या पर्यटन–नकाशावर नव्यानेच आलेले, महाबळेश्वरच्या वाटेवरचे भिलार हे पुस्तकांचे गाव एकदा समक्ष पाहायलाच हवे, अशी ओढ राहुल बोरसे यांच्या लेखामुळे वाटल्याशिवाय राहात नाही. माहितीच्या पलीकडे जाऊन, प्रत्येक लहानसहान गोष्टीतून, अनुभवांतून ज्ञान आणि ज्ञानातून जीवनानंदाची वाटचाल कशी करता येते, हे शशिकांत सावंत यांनी साध्या–सोप्या शब्दांत मांडले आहे.

डॉ. अनंत लाभसेटवार यांचा लेख अमेरिकेतील 'एनआरआय' म्हणजे एका अर्थाने बृहन्महाराष्ट्रातील मराठी माणसाला भिडणाराच आहे.

असा हा 'शब्द रुची' मासिकाचा आणखी एक खास अंक. दर अधिवेशनागणिक अमेरिकेतील मराठी माणसाच्या वाढत्या उत्साहाला तेवढीच उत्स्फूर्त दाद देणारा!

**– आल्हाद गोडबोले**
**अतिथी संपादक**

खरं तर, हा अंक म्हणजे एक 'सेलिब्रेशन' आहे, 'बृहन्महाराष्ट्र आणि 'ग्रंथाली'च्या रौप्यमहोत्सवी नातेसंबंधांचं. इकडे महाराष्ट्रात 'मराठीपणा'चा आग्रह धरत सतत ४२ वर्ष कार्यरत असलेली 'ग्रंथाली' आणि सातासमुद्रापार 'मराठीपण' टिकवण्यासाठी गेल्या ३५ वर्षांहून अधिक काळ अधिवेशनाच्या माध्यमातून मराठी जनांचा सेतू बांधत असलेल्या 'बृहन्महाराष्ट्र मंडळा'चे हे स्नेहबंध आता अगदी अतूट झाले आहेत. बाल्टिमोर (१९९३), ह्यूस्टन (१९९५), बॉस्टन (१९९७), सॅन होजे (१९९९), कॅलगरी (२००१), न्यूयॉर्क (२००३), अटलांटा (२००५), सिॲटल (२००७), फिलाडेल्फिया (२००९), शिकागो (२०११), बॉस्टन (२०१३), लॉस एंजेलिस (२०१५)

**– सुदेश हिंगलासपूरकर**
विश्वस्त, ग्रंथाली

मंत्र श्रमाचा, ध्यास गतीचा
गर्व मराठी संस्कृतीचा

# मेळा मराठी मनाचा...जनांचा

**सुशांत खोपकर**
डेट्रॉइट, मिशिगन

**बृ**हन्महाराष्ट्र मंडळाचं (BMM$^2$) अधिवेशन म्हणजे दर दोन वर्षांनी उत्तर अमेरिकेत होणारा कला-संस्कृतीचा सोहळा! हजारोंच्या संख्येने मराठी माणसं या अधिवेशनासाठी ३ दिवसांकरिता एकत्र जमतात. गायन, वादन, नृत्य, नाट्य आणि इतर कलांचा आविष्कार या अधिवेशनांत अनुभवायला मिळतो. भारतातून आणि उत्तर अमेरिकेतल्या विविध राज्यांतून गुणी कलाकार येऊन त्यांची कला सादर करतात. एका वेळी ३-४ कार्यक्रम समांतर चालू असतात; तुम्हांला हवा तो कार्यक्रम बघा! असे ३ दिवसांत जवळपास ४०-५० कार्यक्रम सादर होत असतात आणि सोबत असतं, अस्सल महाराष्ट्रीय जेवण! मित्रांच्या गाठी-भेटी होतात, शाळा-कॉलेजातले दोस्त भेटतात. जुन्या आठवणींना उजाळा दिला जातो.. पंढरीच्या वारीला वारकरी ज्या भक्तिभावाने जातात, जणू त्याच भावनेने, त्याच उत्साहाने उत्तर अमेरिकेतली माणसं ह्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सोहळ्यासाठी एकत्र येत असतात. इथे मराठी भाषा, मराठी संस्कृती हाच त्यांचा विठुराया असतो आणि सातासमुद्रापलीकडे त्याचं दर्शन घेण्याची इच्छा मनात दाटून येत असते.

१९८४ साली शिकागो येथे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे पहिले अधिवेशन पार पडले. तेव्हा जेमतेम २५० लोकं जमली होती. आयोजकांनी, स्वयंसेवकांनी प्रचंड कष्ट घेऊन ह्या परक्या मुलखात लावलेलं ते एक लहानसं रोपटं होतं. अमेरिकन मराठी माणसाची सांस्कृतिक गरज भागवण्यासाठी घातलेला तो एक घाट होता. उत्तर अमेरिकेच्या कर्मभूमीत सांस्कृतिक सोहळ्याचं ते बीज रुजलं, बहरलं आणि मोठं झालं. आज २५०चा आकडा ३०००-४०००च्या घरात जाऊन पोहोचला आहे! त्या छोट्या रोपट्याचं आता एका डेरेदार वृक्षात रूपांतर झालं आहे.







बृहन्महाराष्ट्र मंडळाचं १८वं अधिवेशन ग्रँड रॅपिड्स, मिशिगन येथे ७ ते ९ जुलै, २०१७ रोजी होणार असून अमेरिकेन मराठी माणसांमध्ये उत्साह संचारला सुरुवात आहे.

भारतातून विविध कार्यक्रम सादर करायला अनेक दिग्गज कलाकारांची फौज येणार आहे! नाना पाटेकरांची मुलाखत असणार आहे, प्रशांत दामले आणि राहुल देशपांडे 'संगीत संशयकल्लोळ' हे नाटक घेऊन येणार आहेत. बेला शेंडे-स्वप्नील बांदोडकरचा म्युझिकल कॉन्सर्ट असणार आहे, शंकर अभ्यंकर ज्ञानेश्वरांवर निरूपण करणार आहेत. त्याचप्रमाणे ऋजुता दिवेकर सकस अन्नाचं शास्त्र सांगणार आहेत, अशोक नायगांवकर, रामदास फुटाणे यांच्या वात्रटिका, सामाजिक कविता आणि काव्यमय कोपरखळ्या ऐकायला मिळणार आहेत. पुष्कर श्रोत्रीसोबत 'झी मराठी सारेगमप'चा वाद्यवृंद, 'MuZeeCians' येणार आहे. उत्तर अमेरिकेतल्या कार्यक्रमांची देखील रेलचेल असणार आहे! सामान्यांनाही शास्त्रीय संगीत आवडायला लावणारं महेश काळेचं गाणं, ढोल-ताशांच्या गजरात होणारी भव्यदिव्य ग्रंथदिंडी, न्यू जर्सीच्या Theatrix ग्रुपचं 'अग्निदिव्य' हे रोमांचक नाटक, 'नमन नटवरा' हा सिएटलवरून येणारा नाट्यसंगीताचा कार्यक्रम, 'आम्हाला पन जमतं' हा आयोवातला हलका-फुलका नृत्य-संगीत-अभिनयाचा कार्यक्रम, शिकागोवरून येणारा ज्ञानेश्वरांच्या जीवनावर आधारित माऊली हा कार्यक्रम, नॉर्थ कॅरोलायनाचं 'घाशीराम कोतवाल', बे एरियातून येणारं 'गीतरामायण', 'BMM² सारेगमप' तारे-तारकांचा गाण्याचा सुरेल कार्यक्रम आणि अजून बरेच छान छान कार्यक्रम BMM² २०१७ मध्ये असणार आहेत. थोडक्यात काय, तर रसिकांसाठी ही निश्चितच एक पर्वणी ठरणार आहे!

हे अधिवेशन फक्त मनोरंजनापुरतं मर्यादित नसतं. 'BizCon' म्हणजे बिझनेस कॉन्फरन्स, CME म्हणजे मेडिकल कॉन्फरन्स आणि 'उत्तररंग' ही खास ज्येष्ठांसाठी असलेली परिषद, हा अधिवेशनाचाच एक महत्त्वाचा भाग असतो. तसेच भारतातून उत्तर अमेरिकेला










गेलेली पहिली पिढी आणि तिथे अमेरिकेत जन्मलेली दुसरी पिढी, ह्यांच्यातील सांस्कृतिक अंतर कमी करायला बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनांची खूप मदत होते. इतर कार्यक्रमांबरोबर लहान मुलांना रूचतील असे कार्यक्रम ठेवण्यावर या अधिवेशनांत भर दिला जातो. त्यामुळे दुसऱ्या पिढीतल्या मुलांना तिथे यावंसं वाटतं आणि आपल्या संपन्न मराठी संस्कृतीचं त्यांना ३ दिवसांकरिता का होईना, पण अगदी जवळून दर्शन मिळतं..

आपण अधिवेशनाला का जावं? सांस्कृतिक कार्यक्रमांचा आस्वाद घेताना, 'आपण एकमेकांसाठी आहोत' ही जाणीव आपल्याला नकळत येत जाते. ऋणानुबंध तयार व्हायला लागतात. सगळ्या गोष्टींचं मोजमाप करता येत नाही, कारण काही गोष्टी नेणिवेच्या पातळीवर रूजत असतात. आपण झाड नाही लावलं तरी इतर झाडं आपल्याला प्राणवायू द्यायचं थांबवत नाहीत. आपल्या भाषेचं, संस्कृतीचंपण तसंच आहे. आपण तिचं संवर्धन करायचा प्रयत्न जरी नाही केला, तरी ती आपल्याला 'कोहम्'चं आपल्यापुरतं उत्तर देतच राहील.

ही परोपकाराची प्रक्रिया सतत चालू राहील. अगदी शेवटचं झाड उरेपर्यंत.. ती वेळ येऊ नये, म्हणून आपल्यापुरतं झाड लावायला आपण अधिवेशनाला जावं.. त्यामुळे ग्रँड रॅपिड्स, मिशिगन येथे होणाऱ्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या १८ व्या अधिवेशनासाठी म्हणूयात, आषाढ घनांसम खुली दाद रसिकांची, उधळण व्हावी अविरत उन्मेषांची..!

(अधिक माहितीसाठी भेट द्या www.bmm2017.org)





# मेहता पब्लिशिंग हाऊस


## आमची नवीन प्रकाशित पुस्तके




**आखाडा**
लेखक : सौरभ दुग्गल
अनुवाद : लीना सोहोनी




**अशी मने असे नमुने**
शिवाजी सावंत




**काहूर**
मूळ लेखक : वेन्डी लॉ-योन
अनुवाद : चित्रा वाळिंबे




**अंगतपंगत**
द.मा.मिरासदार





**फुकट**
द.मा.मिरासदार





**पुल**
**एक आनंदयात्रा**
श्याम भुर्के





**पुणं**
**एक साठवण**
श्याम भुर्के





**कालपुरुष**
मूळ लेखक : दिनकर जोषी
अनुवाद : सुषमा शाळिग्राम




**एकवचनी**
**भाग १**
संजय राऊत



**एकवचनी**
**भाग २**
संजय राऊत





**साधी यंत्रे**
डी.एस.इटोकर




**प्रयोग**
**वनस्पती विज्ञानाचे**
डी.एस.इटोकर




**विज्ञानातील**
**गमतीजमती**
डी.एस.इटोकर




**विज्ञानातील**
**रंजकता**
डी.एस.इटोकर



**नि:शब्दाचे मौन**
दीप्ती जोशी

मेहता पब्लिशिंग हाऊस

www.mehtapublishinghouse.com
Email: sales@mehtapublishinghouse.com
Follow us on
http://www.facebook.com/mehta.publishinghouse

Mehta eBooks
500 Marathi books
Available as e-Book

WhatsApp us on 9420594665

E-book available : play.google.com/store/books | m.dailyhunt.in/Ebooks/marathi | www.amazon.in



# तुकोबांचा वारसा

## अशोक नायगावकर

**मुलाखतकार : किरण येले**

**अशोक नायगांवकर हे आजच्या मराठी कवितेतील एक महत्त्वाचं नाव. मराठी कवितेतील महत्त्वाचा टप्पा असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. आचार्य अत्रेंनंतर मराठी कवितेत उपहास आणि विनोदाची सांगड घालून सामाजिक परिस्थिती आणि समाज मानसातील अवगुणांवर नेमकेपणानं बोट ठेवणाऱ्या त्यांच्या कलाकृतींमुळे त्यांच्या एकाच कवितासंग्रहानंतरही ते सर्वदूर परिचित झाले. परदेशातही त्यांच्या 'टिळक', 'संपत गायकवाड', 'ज्योतिबा आभार'! अशा अनेक कविता लोकांना तोंडपाठ झाल्या. 'माझा तुकोबांचा वारसा' म्हणणाऱ्या या अवलिया कवीच्या अंतरंगात डोकावण्याचा हा एक प्रयत्न.**

**१९९०** साली 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेल्या अशोक नायगावकर यांच्या 'वाटेवरच्या कविता' आज २७ वर्षांनंतरही म्हणजेच जवळपास दोन तपे उलटून गेल्यानंतरही लोकांच्या स्मरणातच नाही तर तोंडपाठ आहेत. काळाच्या कसोटीवर कविता टिकणं हेच अस्सल कवीचं लक्षण. कवी शंकर वैद्य सर एकदा म्हणाले, ''तुमची कविता किमान दहा वर्षे तरी लोकांच्या ओठी असेल, त्यांच्या लक्षात असेल, तरच ती कविता.'' या कसोटीवर तपासून घ्यायचं झालं तर कवी अशोक नायगांवकरांच्या कवितेवरील लोकांचं प्रेम गेली २५ वर्षे कायम आहे. (वाटेवरच्या कविता-ग्रंथाली प्रकाशन,

पहिली आवृत्ती, १९९२).

सांप्रत काळात कवी अशोक नायगांवकर हे मराठीतील एकमेव 'सेलिब्रिटी' कवी आहेत, असे म्हटले जाते. महाराष्ट्रात त्यांच्या कवितांच्या कार्यक्रमांना गर्दी होतेच पण परदेशातही गेली अनेक वर्षे त्यांच्या कवितेचे कार्यक्रम सातत्याने होत आहेत. 'कवितावाचन हा परफॉर्मन्सचा प्रकार असला तरी नाटकाप्रमाणे त्याला 'रिपीट ऑडियन्स' म्हणजेच 'पुन:प्रेक्षण रसिकमूल्य' कमी असतं म्हणूनच अनेकदा रसिकांकडून 'कवी त्याच कविता ऐकवतात' असा आरोप लावला जातो. पण कवी अशोक नायगांवकरांच्या बाबतीत हे घडत नाही. त्यांच्या कवितांना नाटक-चित्रपटाला असावे लागते तसे 'रिपीट व्हॅल्यू' आहे, याचे कारण कदाचित त्यांच्या कवितांचा वेगळा आयाम हे असू शकेल. त्यांची कविता उपहासात्मक भाष्य करीत, समकालीन संदर्भ देत, व्यवस्थेवर प्रहार करते, म्हणूनच गेली कित्येक वर्षे कवी अशोक नायगांवकर कवितांचे कार्यक्रम करत असूनही त्यांच्या चाहत्यांना ओहोटी लागली नाही.

परंतू या रसिकमान्य कवीवर असेही आक्षेप आहेत की त्यांनी कवितेला अनुनयी बनवलं, रसिक त्यांची कविता नाही तर विनोद ऐकण्यासाठी येत असतात, वगैरे वगैरे. कवी अशोक नायगांवकर नेहमी असे आक्षेप खेळकरपणे घेत आले आहेत. एकदा तर एका नवोदित कवी, कवी अशोक नायगांवकरांनी कोणत्या कविता मंचावरुन वाचाव्यात हे सांगताना मी पाहिलं आहे. पण थक्क करणारी बाब म्हणजे कवी अशोक नायगांवकर त्याचं म्हणणं शांतपणे ऐकून घेत होते. त्यावर त्यांनी टिपण्णी केली नाही, कुत्सित वा मिश्कील हास्य दिलं नाही, की 'मला तू काय सांगतोस' असा मानभावीपणाही दाखवला नाही. कवी अशोक नायगांवकर कधीही 'उथळ खाजगी चर्चा' करताना दिसत नाहीत, कार्यक्रम संपल्यानंतरच्या कार्यक्रमातही दिसत नाहीत. त्यांच्यावर टीका करणाऱ्यांवर तर टीका करताना अजिबात दिसत नाहीत. किंबहुना ते कधीच कुणाविरुद्ध नकारात्मक भाष्य करताना दिसत नाहीत. कविता हाच त्यांच्या चर्चेचा विषय असतो, जगण्याचा आधार असतो. त्यांच्याशी बोलताना विषयाच्या अनुषंगाने इतर कवींच्या अनेक कविता ते दाखल्यासाठी म्हणत तुम्हाला त्यांचा मुद्दा स्पष्ट करू पाहतात आणि एखादी ओळ विसरले तर 'आता स्मरणशक्ती कधी कधी दगा देते' म्हणत चक्क दिलगिरी व्यक्त करतात. अतिशय





नम्र, जमिनीवर पाय असणारा, मराठी कवितेचा संपूर्ण इतिहास मुखोद्गत असणारा, दिवसाचे चोवीस तास कविता जगणारा आणि कवितेवर निस्सीम प्रेम करणाऱ्या या रसिकामान्य कवीची एकही कविता दुर्दैवानं आजवर कोणत्याही विद्यापीठात अभ्यासक्रमात नाही. या विषयांवर त्यांनी कधीच खाजगीतही खंत व्यक्त केली नाही.

**दिवसाचे चोवीस तास कविता जगणारा आणि कवितेवर निस्सीम प्रेम करणाऱ्या या रसिकामान्य कवीची एकही कविता दुर्दैवानं आजवर कोणत्याही विद्यापीठात अभ्यासक्रमात नाही. या विषयांवर त्यांनी कधीच खाजगीतही खंत व्यक्त केली नाही.**

परंतू चांगल्या आणि प्रामाणिक कवीचं भाष्य हे त्या त्या काळावर केलेलं भाष्य असतं आणि म्हणूनच 'ग्रंथाली'च्या सुदेश हिंगलासपूरकर यांनी अशोक नायगांवकरांची मुलाखत घेऊन त्यांना बोलतं करण्याचं ठरवलं आणि या कवीचा मोठेपणा असा की मी 'तुमची मुलाखत घ्यायची आहे, असं सांगितल्यावर, कसलेही आढेवेढे न घेता ते म्हणाले, 'बोल कुठे येऊ? कुठे भेटूया?' मी मनातल्या मनात खजिलपणा अनुभवत चाचरत म्हटलं, 'तुम्ही ग्रंथालीत येऊ शकाल?' तर ते म्हणाले, 'हो येतो की' आणि ठरलेल्या वेळेच्या आधीच पोहोचले. कुठल्याही सेलिब्रिटीने खरंतर स्वत:च्या सोयीनुसार जागा व वेळ ठरवण्याचा हा काळ. अंकासाठी कविता देतानाही अनेक नव्या कवींचे विचित्र अनुभव घेतलेल्या मला नायगांवकर परिचित असूनही नायगांवकरांचं स्थान आणखी मोठं करून गेला. अशा या मराठी साहित्यातील एक महत्त्वाच्या कवीशी झालेला हा संवाद.

**मी :** सर, तुमचं 'ग्रंथाली'त स्वागत आहे.

**नायगांवकर :** अरे, 'ग्रंथाली'त तू माझं स्वागत काय करतोस? मी आधीपासूनच 'ग्रंथाली'त आहे. तुम्हाला



**पण मी विचारतो जत्रा वाईट आहे का? हजारो वर्षांच्या लोक संस्कृतीचा, लोक जीवनाचा ज्याचा तुम्ही गौरव करता त्या संस्कृतीचा तो अविभाज्य भाग आहे. आणि तुम्ही त्याला शिवी दिल्यासारखा तो शब्द वापरता.**

सांगतो एक काळ होता मी खूप रमलोय 'ग्रंथाली'त. फिरलो आहे 'ग्रंथाली'सोबत. मी दिल्लीला होतो दहा दिवस सुदेशसोबत! मी इतका परिचित नव्हतो तेव्हा आणि खूप इन्व्हॉल्व्हड होतो.

**मी :** किती साल असेल ते?
**नायगांवकर :** १९७० चा काळ असेल. आणि ग्रंथालीतच नाही तर इतरही. महाराष्ट्र फाउंडेशनच्या पुरस्कार वितरण सोहळ्याचं पाच वर्ष निवेदन माझं आहे हो! त्यांच्या सुरुवातीच्या स्मरणिका काढून बघा तुम्ही. 'निवेदक : अशोक नायगांवकर' असेल.

**मी :** संवादिनी नं?
**नायगांवकर :** हो. महिना महिना मी त्यावर काम करत असायचो आणि ते पैशासाठी नाही. मानधन ते द्यायचे नाहीत. पण तो आनंद होता वेगळाच. पहिल्या वर्षी तुम्हाला सांगतो, तेंडुलकरांनी हरकत घेतली होती की नायगांवकर म्हणजे हास्यविनोद करणार. (नायगांवकर त्यांच्यावर घेतला गेलेला आक्षेप टीकाही स्पष्टपणे मुलाखतभर सांगत राहतात) तर 'नाही म्हणे, तसं नाहीय.' नंतर एकदा डहाक्यांनी सांगितलं की परवा एकदा असाच विषय निघाला होता, की पूर्वीचे कार्यक्रम किती छान व्हायचे, नायगांवकरांचं निवेदन असताना. अगदी, १९७०-७१ साली मुंबई मराठी साहित्य संघ आणि ॲस्थेटिक सोसायटी अनेक लोकांच्या कविता सायक्लोस्टाईल करून, बरं का, त्यावेळी आतासारख्या सोयी सुविधा नव्हत्या, अगदी झेरॉक्सही नव्हतं, तेव्हा अनेकांच्या कविता सायक्लोस्टाईल करून, चक्रमुद्रित करून, त्यावर साहित्य संघात चर्चा घ्यायचो. त्याला सायक्लोस्टाईलसाठी खर्च मीच करायचो. आता आमोणकरांकडून कुठे पैसे मागायचे? पण धोपटी घेऊन फिरण्यात आनंद असायचा. मी आणि नामदेव (ढसाळ) मुंबईच्या अनेक झोपडपट्ट्या फिरलोय. तुम्हाला सांगतो. म्हणजे नामदेव माझ्या घरात माझ्या आईच्या हातचं जेवलाय आणि मी त्याच्या घरात त्याच्या आईच्या हातचं जेवण जेवलो आहे, नबाब चाळीमध्ये. गोलपिठा म्हणतात नं, त्या नबाब चाळीमध्ये. ते असे खांब आणि मधनं बोळ आणि तिथे मशेरी लावणारी माणसे अजून माझ्या लक्षात आहेत. अहो, माझं सॅंडहर्स्ट रोडच्या बँकेचं गोडाऊन हा अड्डा होता सगळ्या कवींचा. रोज कुणी न कुणी यायचा. मी आणि नाम्या तर नुसते फिरायचो. नाम्याच्या 'गोलपीठा'च्या प्रकाशनासाठी जनता केंद्राचा तो हॉल (आठवण्याच्या प्रयत्न करतात) मी बुक केला होता. आणि प्रकाशनाच्या वेळी व्यासपीठावर दुर्गाबाई भागवत, नारायण आठवले म्हणजे अनिरुद्ध पुनर्वसू, नंतर भाऊ पाध्ये आणि मी. समोर राजा बसलेला. राजा (ढाले) म्हणाला, ''हे चार ब्राह्मण व्यासपीठावर बसलेले आहेत.'' (मी हसतो). आणि तिथून जी काही धमाल झाली त्या प्रकाशन समारंभात, तुला सांगतो, खूप मजा आली. खूप आनंदाचा काळ होता तो धोपटी घेऊन फिरण्याचा.

**मी :** आपण नेहमी म्हणता धोपटी घेऊन फिरण्यात, झोपडपट्ट्यात फिरण्यात, त्यांच्यासाठी काम करण्यात एक आनंद मिळतो. हा कसला आनंद असतो नेमका? (हा प्रश्न नायगांवकरांना पेचात पकडण्यासाठी मी विचारतो आणि क्षणाचाही विलंब न करता उत्तर येतं.)
**नायगांवकर :** डिक्लास होण्याचा.

**मी :** क्या बात!!

**नायगांवकर :** ही जी परंपरा आहे नं, डिक्लास होणं. म्हणजे अत्र्यांच्या 'मी कसा झालो'मध्ये जे डिक्लास होणं आहे नं, ते सगळं मी या सगळ्यात शिकलो. अत्र्यांचं ते कँप एज्युकेशन सोसायटीचा भाग आहे नं, म्हणजे सदाशिव पेठ, एसपी कॉलेज, रमणबाग ते सोडून कॅम्पमधल्या अठरापगड जातीचा विशेषत: दलित, तो जो भाग आहे नं त्याबद्दल म्हणतोय. असा पाय टाकला ना की फस्सकन पोटरीपर्यंत पाय चिखलात जाईल, अशा झोपडपट्ट्यात मी फिरलोय नामदेवसोबत, दलित पँथरच्या स्थापनेच्या काळात. हे सगळं 'ऑफ द रेकॉर्ड' हं! कारण तो आत्मश्लाघेचा प्रकार होईल.

**मी :** नाही नाही, हे सगळं येऊ द्यावं असं मला वाटतं कारण तुम्ही म्हणता तसं डिक्लास होण्याची एक प्रोसेस आहे, समाजाभिमुख होण्याची एक प्रोसेस आहे आणि त्यातूनच तुमची मानसिक जडणघडण होत, तुमची कविता बनत जाते.

**नायगांवकर :** म्हणजे मी काही 'फाऊंडर मेंबर' आहे, असं नाही म्हणायचं मला. उलट मी त्याच्या छायेत होतो. त्याच्या सहवासाचा जो भाग आहे, तो अर्जुनला माहीत आहे. नंतर मग नामदेवचा व्याप वाढला. आमचं भेटणं कमी झालं. पण कामानिमित्तानं चेंबूरला आला की हमखास भेटायचा. त्याच्यासोबत फिरलो खूप आणि तो काळ आनंदाचा होता, कविता रुजण्याचा होता असं म्हणता येईल. आणि नामदेव ग्रेटच होता. 'आम्हाला वगळा गतप्रभ झणी' हे जे आहे ते नामदेवात होतं. त्यानंतर मला कुणी त्या स्तराचं भेटलं नाही. मी हसवतो वगैरे त्याचा, त्याला खूप राग यायचा. डोंबिवलीला एक मसापाचं संमेलन झालं, त्यात त्याची मुलाखत प्रज्ञा (पवार) घेत होती. तर म्हणाला, 'समोर अशोक बसलाय. अशोक आमच्यासोबतचा माणूस. आता काय असं लिहायला लागलाय?' (नायगांवकर हे सहज सांगतात). म्हणजे–

> **प्रकाशाची दारे आता बंद करा, म्हणजे**
> **कित्येक सूर्यांचे जन्मस्थ गर्भपात टळतील**

अशा कवितांचा तो चाहता होता. ही सत्यकथेत १९६९-७० मध्ये आलेली कविता.

**मी :** पण मग पुढे तुमच्या कवितेची शैली का बदलली? ती मंचाभिमुख का झाली?




**नायगांवकर :** मंचाभिमुख नाही, लोकाभिमुख असं म्हणा. म्हणजे तुम्ही ती कविता ऐकली का? मी दोनचार वर्षांपूर्वी मुलीकडे गेलो लंडनला टेन, किंग हेन्री स्ट्रीटवर. ती आर्किटेक्ट आहे लंडनला. मी विचारलं, ''बाबासाहेबांचं घर कुठे आहे गं इथे?'' तर ती म्हणाली, ''अहो बाबा, आमच्या ऑफिसच्या मागच्याच गल्ली ती.'' तर त्या पायरीवर उभा राहिलो. मागे निळं दार. (या 'निळं दार' शब्दावर मी नकळत 'क्या बात' म्हणून जातो) त्या पायरीवर बसलो, घरी आलो आणि तीनच ओळी लिहिल्या.


**प्रिय भीमा,**

> **तुझी सावली**
> **अंगावर पडली**
> **उजेड झाली**

(ही कविता माझ्या आवडत्या कवितांतली एक असल्याने नायगांवकरांसोबत मीही ती म्हणतो.)

तर आजही मी हे असं लिहितो आहेच की! याच वर्षी झालेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात

**प्रिय भीमा,**
**तुझी सावली**
**अंगावर पडली**
**उजेड झाली...**



(मनगटाची नाडी पकडत) असं नाडी पकडून तपासतात आणि 'कफ-वात-पित्त आहे तुम्हाला', सांगतात. हे स्कूलच आहे हो! हाही इतिहास आहे. परंपरा आहे. ती नाकारू शकत नाही तुम्ही. म्हणजे युनेस्कोचा माणूस वेरुळचं लेणं पाहून देगलूरकरांना म्हणाला, ''हे एका दगडात कोरलेलं वेरुळचं लेणं म्हणजे आश्चर्य आहे.'' तर गोरक्ष देगलूरकर म्हणाले, ''आश्चर्य हे लेणं एका दगडात कोरलं हे नाही, तर जगातल्या सात आश्चर्यात या लेण्याचा समावेश नाही, हे आश्चर्य आहे.'' (दोघेही हसतो). तर परंपरा, संस्कृती, इतिहास तुम्हाला माहीत हवा, माणूस म्हणून जगताना आणि कवी म्हणून लिहिताना. निरुपण, कीर्तन, प्रवचन ही सगळी आपली परंपरा आहे, इतिहास आहे, ते विसरून किंवा नाकारून कसं चालेल? माझा मूळचा पिंड अध्यात्मिक आहे. मी गुरुशिष्य परंपरेतून आलेला.

**देवाची तो खूण**
**आला ज्याच्या घरा,**
**त्याच्या पडे चिरा**
**मनुष्यपणा**

असं म्हणणाऱ्या तुकोबांचा वारसा आहे माझा. ही 'मनुष्यपणाला चिरा' पडण्याची जी अनुभूती आहे, ती मी लिहितो. ही परंपरा प्रॉफेट महंमदापासून, ख्राईस्टपासून इथल्या अनेक संतांना आलेली आहे. इट इज युनिव्हर्सल. त्यामुळे मी 'मनुष्यपणाची कविता' लिहितो, त्याच्या भाषेतली कविता लिहितो, त्याच्या जाणिवांची कविता लिहितो, त्याला समजेल अशी कविता लिहितो.

**देवाची तो खूण आला ज्याच्या घरा, त्याच्या पडे चिरा मनुष्यपणा असं म्हणणाऱ्या तुकोबांचा वारसा आहे माझा. ही 'मनुष्यपणाला चिरा' पडण्याची जी अनुभूती आहे, ती मी लिहितो.**

प्रभाताई गणोरकर म्हणाल्या, की तुमच्या कवितेतला उपहास लोकांनी समजून घ्यायला हवा. तूच होतास की त्या कार्यक्रमाचं सूत्रसंचालन करत! माझी कविता पूर्वी जी होती, ती आहेच! पण आता ती कधी कधी उपहासाच्या अंगाने येते, असं मला वाटतं.

**मी :** मला तुमच्या त्या ओळी आवडतात ज्यात तुम्ही लिहिलं आहे.

**डॉक्टर म्हणाला,**
**तुम्हाला मागचं दिसतं का?**
**मी नाही म्हटलं,**
**तर तो म्हणाला**
**तुम्ही खांद्यावर दोन मिरर बसवून घ्या.**

**नायगांवकर :** हो हो. इतिहास काय आहे तुम्हाला माहीत नाही. इथवर कसे आलो हेच ज्यांना माहीत नाही. म्हणजे तुला सांगतो, ब्राह्मण आणि सीकेपी यांच्यात काय वाद होता हेच माहीत आहे? ब्राह्मणांच्या मते इतरांनी सकच्छ नेसायचं नाही, म्हणजे काष्टा नेसायचा नाही. यावरनं कोर्टात केस चालू होती दोघात. सीकेपी समाज ब्राह्मणांच्या प्रचंड विरोधात. याची कारणं तुम्हाला माहीत नाहीत. पण सगळंच टाकाऊ नाही. तुम्हाला सांगतो,

**मी :** पण हेच मनुष्यपण आताच्या काळात कमी होत चाललंय असं वाटतं का?

**नायगांवकर :** पूर्वीही होतीच अशी परिस्थिती. म्हणजे सरोजिनी वैद्यबाई म्हणाल्या, की पूर्वी आम्ही शंकरराव खरातांना आडव्या पंक्तीत बसवत असू. नंतर जेव्हा ते मोठे झाले, तेव्हा त्यांना आम्ही उभ्या पंक्तीत जेवायला बसवलं आणि खरात म्हणाले, आज आमची पंगत बदलली.

**मी :** पण आता ही जातीयता वाढतेय असं वाटतंय?

**नायगांवकर :** हो. हे आहेच पण आता मला वाटतं त्यामागे राजकीय कारणे जास्त आहेत. पूर्वीची जातीयता आणि आजची जातीयता यामधला फरक नीट पाहणाऱ्या माणसाला लगेच दिसेल. हे सगळं माझ्या कवितेत

# मॅजेस्टिकची नवी प्रकाशने





'महाराजा' म्हणजेच एअर इंडियामध्ये फ्लाइट पर्सर म्हणून काम करीत असताना, मुळात कवी असलेल्या लेखकाने संवेदनशील मनाने, मोकळेपणाने, आत्मनिर्भरतेने केलेले त्याच्या व जगाच्या प्रवासाचे प्रांजळ आत्मकथन!

## प्रवास महाराजा सोबतचा

**नितीन तेंडुलकर**

**पृष्ठे २७२ + ८ रंगीत पाने**

**मूल्य : रु. ३००/-**




महाभारतातील शकुंतला, दमयंती, देवयानी, गांधारी, कुंती, तसेच सीता, मंदोदरी, शबरी इत्यादी स्त्रियांच्या आयुष्यातील घटनांचा सविस्तर परामर्श घेऊन डॉ. नाईक असे प्रतिपादन करतात की या सर्व कथांतून स्त्रियांच्या, वात्सल्य, मातृत्व, कोमलता या नैसर्गिक गुणांचे उदात्तीकरण करून स्त्रियांना शिक्षणापासून आणि समाजाधिकारांपासून दूर ठेवण्यात आले. कदाचित स्त्रिया शिकल्या तर त्यामुळे उद्‌भवणाऱ्या गैरसोईची भीती पुरुषप्रधान समाजव्यवस्थेच्या पुरस्कर्त्यांना वाटली असावी... महाभारतावरील लक्षवेधक कादंबरी

## यक्षप्रश्न

**डॉ. शांता नाईक**

**मूल्य : रु. ५००/-**

मॅजेस्टिक

प्रमुख विक्रेते : **मॅजेस्टिक बुक स्टॉल**। गिरगाव। पुणे । मो. ९९२२३४४०८१ **मॅजेस्टिक बुक डेपो**। ठाणे (प.), दूरध्वनी : २५३७६८६५ **मॅजेस्टिक ग्रंथदालन**। शिवाजी मंदिर, भ्रमणध्वनी : ९८९२२२०२३९ **मॅजेस्टिक बुक गॅलरी** । म्हात्रे पुलाजवळ, १०० फूट डीपी रोड, पुणे । दूरध्वनी : (०२०) ६८८८८९०८

Website : www.majesticprakashan.com I E-mail : majesticph@gmail.com

आपली आवडती पुस्तके मागविण्यासाठी Click करा- www.majesticonthenet.com या साईटवर



**'जनवादी' म्हणून स्वत:ला मिरवता पण तुमच्या कवितेत तर ते येतच नाही हे वास्तव आहे.**

उपहासाच्या शैलीतून येत असतं आणि त्याचवेळी मी माझ्या जुन्या वाटेच्या कविताही लिहीत असतो.

**मी :** तुमचं 'वाटेवरच्या कविता' (कवितासंग्रह) कसं आलं?

**नायगांवकर :** तुम्हाला सांगतो, माझा मित्र सुहास बापट माझ्या सगळ्या कविता त्याच्या डायरीत उतरवून ठेवायचा. त्याचमुळे हा संग्रह आला. हा संग्रह मी आधी एका मोठ्या प्रकाशन संस्थेला दिला होता. पण त्यांनी तो नाकारला. मग दिनकर गांगलांनी पुढाकार घेऊन तो संग्रह काढला. आणि प्रकाशनही तुम्हाला सांगतो ऐन दंगलीत राधाबाई चाळ जाळली, बहुतेक त्याच दिवशी, मॅजेस्टिक गप्पांमध्ये झालं आणि मग तो संग्रह पसरत गेला.

**आता जागतिकीकरण, अमुकतमुक, वगैरे, हे जे मल्टिनॅशनल, ग्लोबलायझेशन वगैरे शब्द येतात, तर तो काही अनुभव नाही. तो 'इन्फरमेटिव्ह' आल्यासारखा वाटतो. 'इट इज ॲन इन्फरमेशन'. आणि सगळ्या लोकांना एकच अनुभव कसा काय येतो हो?**

**मी :** पण त्याआधी लोकांना अशोक नायगांवकर नाव माहीत होतं का?

**नायगांवकर :** हो तर! मी म्हणतो, कवी आधी लोकांना माहीत हवा. मी आरोप करत नाही पण काहीजण कमिटमेंट, जनवाद याचा डांगोरा पिटतात, पण मग ते जी कविता लिहितात त्याचा आणि जनमानसाचं काही नातं दिसतं का? गेली २०-२५ पंचवीस वर्षे मी वेगवेगळ्या स्तरावर, अगदी युनिव्हर्सिटीपासून झोपडपट्ट्यात, एनसीपीएपासून आर्थर रोडजवळ कविता वाचल्या आणि लोकांनी ऐकल्या. लोकांना त्यात त्यांच्या प्रश्नांवर, त्यांच्या दु:खांवर काहीतरी भाष्य दिसलं म्हणून त्यांनी मला पुन्हा बोलवलं, पुन्हा बोलवलं, पुन्हा बोलवलं. तुम्ही स्वत:ला जनवादी म्हणवता, तुमच्या कवितेत कणव आहे असं विधान करता मग ती लोकांपर्यंत का पोहोचत नाही? ते तुम्हाला का ऐकू इच्छित नाहीत?

**मी :** म्हणजे 'जनवादी' असूनही लोकांना त्यांची कविता आपली वाटत नाही, असं का?

**नायगांवकर :** मला माहीत नाही पण 'जनवादी' म्हणून स्वत:ला मिरवता पण तुमच्या कवितेत तर ते येतच नाही हे वास्तव आहे. कविता ही आतल्या विचारांचं एक प्रतिबिंब मानायचं तर मग तुमच्या विचारात जनवाद कुठेच नसतो तर मग तुम्ही 'जनवादी' म्हणून कसं मिरवू शकता? आणि तुम्ही जे कणव असल्याचं विधान करता आणि लिहिता, तर कुठेतरी लोक त्यात खिळून राहतील की नाही? का नाही होत असं? दुसरा मुद्दा असा की कविता वाचताना आपल्याला कवितेखालचं नाव न वाचता कवी कळतो. काही ओळी वाचताच कळतं की हा ग्रेस आहे, हे आरती प्रभू, सुर्वे तर कळतातच, विंदाही कळतात तर कवी म्हणून एक छाप नावाची जी गोष्ट असते की नाही? 'नव्वदीनंतरचे कवि' म्हणून कविता जो तुम्ही झेंडा मिरवत आहात त्याची एक छाप असायला हवी की नाही? मी त्यांना कमी लेखतोय अशातला भाग नाही, पण कवितेची एक मागणी असते नं. तिची स्वत:ची एक ओळख असते की नाही? अगदी संतांचे अभंग घेतलेत तरी ओळखता येतं की हे तुकोबांचं आहे, हे ज्ञानेश्वरांचं आहे. तुमचं असं का नाही ओळखता येत? सगळ्यांचं एकच वाटतं. आणि ठीक आहे, आता जागतिकीकरण, अमुकतमुक, वगैरे, हे जे मल्टिनॅशनल, ग्लोबलायझेशन वगैरे शब्द येतात, तर तो काही अनुभव नाही. तो 'इन्फरमेटिव्ह' आल्यासारखा वाटतो. 'इट इज ॲन इन्फरमेशन'. आणि सगळ्या लोकांना एकच अनुभव कसा काय येतो हो? त्यात वेगळेपण हवं की नाही? तुम्ही लिहिलं तेच मीही लिहिलं तर मग त्या लिहिण्याला अर्थ तो काय? मीही लिहिलं की जागतिकीककरणाच्या रेट्यात गरिबांचं दु:ख, त्यांना नाकारलं जाण्याचं दु:ख.

**स्टॅंडर्ड ॲंड पुअरच्या उत्तुंग इमारतीसमोर**
**उभं राहताना**
**मी धूम ठोकत्त पळालो लिबर्टी मायच्या**
**पोपटी कुशीत**
**लुचलो स्तनांना**
**तर हिरवा-निळा पडलो मोरचुदासारखा**

म्हणजे दारिद्र्य तपासून घेताना अमेरिकेतल्या मॅनहॅटनमधल्या त्या पुतळ्याच्या कुशीत आधारासाठी, माया मिळावी म्हणून लुचलो पोपटी कुशीत म्हणजे कॉपरला जो हिरवा थर येतो, त्याला तर विषच पसरलं

अंगात. कॉपरचा तो थर 'सीयू एसओफोर' म्हणजे विष आहे हो!! समाजजीवनाशी निगडित ग्लोबलायझेशनचे परिणाम कवितेत यायला हवेत, माहिती नाही. कॉपर सल्फेट, तांब्याचं असं हिरवं-निळं होणं, विषारी होणं हा परिणाम आहे या बदलत्या काळाचा. तुम्ही लिहा, माझा काही आक्षेप नाही. तुमच्या एकसारखं, एकशैली, इन्फरमेटिव्ह लिहिण्याला माझा आक्षेप नाही पण त्याला ज्या पद्धतीने तुम्ही डोक्यावर घेता नं, त्याला माझा आक्षेप आहे. तो सगळा भास आहे. आज पंधरा वेळा मी लंडनवारी केलेला माणूस, मला ती बाई विचारते, 'व्हाय यू हॅव कम?' 'अविश्वास'. हे जागतिकीकरण आहे, हे आधुनिकीकरण आहे, जागतिकीकरणातून आलेलं आहे. माणसामाणसातली आपुलकी संपणं हे जागतिकीकरण तुम्ही लक्षातच घेतलं नाही आणि फक्त वस्तूंशी आपली तुलना करतोय.

**मी :** पण तरीही खूप विद्यापीठीय अभ्यासक्रमात त्यांच्याच कविता आहेत. तुमच्या कविता शालेय किंवा विद्यापीठीय अभ्यासक्रमाला आहेत का?
**नायगांवकर :** नसेल. नाही बहुतेक.

**मी :** याचं कारण काय असावं असं तुम्हाला वाटतं? नव्या कवींच्या कविता अगदी शालेय अभ्यासक्रमापासून विद्यापीठात लागल्या आहेत आणि माझ्या निरिक्षणानुसार तुमची एकही कविता ना शालेय अभ्यासक्रमात आहे ना विद्यापीठात असं का?
**नायगांवकर :** माहीत नाही. 'ज्योतिबा आभार', ही कविता नसेल त्यांना वाटली मुला-मुलींसाठी जरुरीची.

**मी :** ही एकच नाही. तर 'भोपाळ चिकित्सा'सारख्या, 'भ्रमण करता करता'सारख्या अनेक कविता आहेत ज्या समाजाच्या अनिष्ट रुढींवर प्रहार करतात. थोतांडावर प्रहार करतात आणि तुम्हीच नाही तर नलेश पाटील, अरुण म्हात्रे, अशा अनेकांच्या कविता वेगवेगळ्या कारणांसाठी विद्यार्थ्यांसाठी जरुरीच्या आहेत पण अभ्यासक्रम आखणाऱ्या कोणत्याही समितीला त्या कविता जरुरी का वाटल्या नसाव्यात?
**नायगांवकर :** ते जाऊ दे. आय डोन्ट वॉंट टू कॉमेंट ऑन दॅट. आणि मला वाटतं की कविता आपण लिहावी. ती कुठे जाते, कशी जाते, ते अलाहिदा. पण वाचणाऱ्याला-ऐकणाऱ्याला ती तुमच्यासाठी लिहिली



आहे, असं वाटायला हवं. तुला सांगतो, मी पस्तीस वर्षे संगीत ऐकलेला माणूस आहे. पण संगीतातलं मला काही कळत नाही. (दोघेही हसतो) काय ते एकदा रात्री, भास्करबुवा जोशी ऐकलेत तुम्हाला सांगतो. त्यावर रामकृष्ण बाक्रे मला म्हणाले, 'नायगांवकर हे शेवटचं गाणं हो! यापुढे असं ऐकायला नाही मिळणार.' अशा मैफिली ऐकल्यात. मोगुबाई (कुर्डीकर) बाहेर बसलेल्या. त्यांच्या बाजूला अंजलीबाई लोलेकर आणि समोर अशी खिडकी. त्यातनं वीस फुटांवर किशोरी (आमोणकर) गात आहे. वाटलं, माझ्यासाठीच गात आहेत. तसंच एकदा भीमसेन (जोशी). त्या बोरीवलीच्या (आठवण्याचा प्रयत्न करत) तो हॉल होता, पाडला आता तो, तिथे. वाटलं, माझ्यासाठीच गात आहेत. तसं कवितेचं व्हायला हवं. ही कविता माझ्यासाठीच लिहिलीय की काय, असं वाटायला हवं.

**कविता माझ्यासाठीच लिहीलीय की काय, असं वाटायला हवं.**

**मी :** उर्दूतून लिहिणारे फिराख गोरखपुरींना एकदा एका अनौपचारिक मैफलीत विचारलं, ''व्हॉट इज ब्रिलियंट लिटरेचर?'' (ही चर्चा युट्यूबवर पहायला मिळते.) तर त्यावेळी फिराख गोरखपुरी यांनी फार सुंदर उत्तर दिलं. ते म्हणाले, ''ब्रिलियंट लिटरेचर इज दॅट लिटरेचर, विच ब्रिलियंट इलिटरेट कॅन अंडरस्टॅंड. 'बडा साहित्य' वही है जो तरकारी खरिदने की भाषा में लिखा जाए.'' तुमचं मत काय आहे?
**नायगांवकर :** मला आठवतंय मागे घोटीला एक कार्यक्रम झाला. खूप रंगला. आणि दुसऱ्या दिवशी सकाळी अरुणला (म्हात्रे) दाढी करायची होती म्हणून आम्ही न्हाव्याच्या दुकानात गेलो तर तो म्हणे, 'साहेब छान

**नाशिकला त्या खेडगावला, एवढसं ते आठ वर्षाचं डोकं भादरलेलं पोरगं, तिथेच त्या शेतकऱ्याने ज्या झाडाला फास घेतला ते झाड, आणि त्याची मलूल चेहऱ्याची तरुण बायको. विदारक चित्र होतं ते. त्या संमेलनाचं फलित काय तर गेले दीड महिना उदास असणारी आणि राहून राहून रडणारी ती बाई त्या दिवशी पहिल्यांदा हसली.. जगण्यातला आनंद दीड महिन्यानंतर तिनं घेतला. मला या गोष्टीनं समाधान दिलं.**



होत्या तुमच्या कविता.' कोथरुडला गांधी हॉलमध्ये एक कार्यक्रम होता. कार्यक्रमाआधी मी काही खात नाही कारण काही खाल्लं की कार्यक्रम ढेपाळतो हा माझा अनुभव. तर मी यजमानबाईंना म्हटलं, तुम्ही दोन पोळ्या आणि एक भाजी एवढं काढून ठेवून ठेवा बाजूला. गरमच हवं, असं काही नाही. मी आल्यावर खाईन. तर कार्यक्रम संपल्यावर रात्री दोन वाजता त्या बाईनं कणिक भिजवली. मी म्हटलं, 'कशाला?' तर म्हणे, 'तुम्ही अनेकांना पोट भरून आनंद दिलात. तुम्हाला दोन गरम पोळ्या का देऊ नये.' मला वाटतं, साध्या माणसांसाठी साहित्याची भाषा साधीच असायला हवी, पण इतर प्रवाहसुद्धा असायला हवे आहे. समग्रता नावाची जी गोष्ट आहे, त्यात सगळं असायला हवं. तर एकदा नाशिकला जाताना बोर्ड दिसला की 'सर्व भाविकांचे नाशिक शहरात स्वागत' तर मी म्हटलं, 'नुसतं भाविकांचंच का? ज्यांचा देवावर विश्वास नाही, त्यांचंही स्वागत असं असायला हवं. समजा दि. य. देशपांडे येत आहेत, 'आधुनिक सुधारक. तर त्यांचंही तुम्ही स्वागतच करायला हवं ना?' (दोघेही हसतो) वसंत पवार सोबत होते त्यांना ते खूप आवडलं.

**मी :** खूप जणांचा असा आक्षेप आहे की तुम्ही कवी नैराश्यवादी आहात. पूर्वीचे कवी अनिल, पाडगांवकर, बोरकर वाचले तर त्यांच्यात सौंदर्यवाद तर होताच पण आशावादही होता. आजची कविता ही निराशावादी आहे. तुमचं काय मत आहे?

**नायगांवकर :** हो हे खरंच आहे. हे मान्य करावंच लागेल की आजची कविता निराशावादी आहे. पण वेदना ही जगातली मोठी गोष्ट आहे. प्रेम झालं नसलं तरी एखाद्याला वाटतं ना की प्रेमभंग झाला असता तर किती छान झालं असतं. गाणं ऐकून वाटतं की नाही आपल्या आयुष्यात असा योग यायला हवा. पण गंमत सोड, अहमदपूरला मी गेलो तर दोन-तीन फर्लांग रांग पाण्यासाठी आणि तीही गोल-गोल वळवून केलेली. अभिनेता संदीप पाठकच्या गावी गेलो माजलगावला. त्याच्या आईने घरी बोलवल होतं भोजनासाठी. त्या प्राध्यापिका आहेत. तर मी गेलो, तर त्या नुसतं पाणीच भरत होत्या. म्हणाल्या, 'अहो, सात दिवसात एकदा पाणी येतं.' आता मला हे सगळं दिसतं आणि ते मी कवितेत लिहितो. 'कविता सुचणं', ही जी गोष्ट आहे ती तुम्ही ठरवून नाही येत. तसंच ती कशी यावी, हेही तुम्ही नाही ठरवू शकत. माझी नात ज्या शाळेत आहे त्यात एकोणीस-वीस मुलं असतात शिकवणीसाठी आणि माझी बायको ज्या शाळेत शिकवायची त्यात एका वर्गात ८०-९० मुलं असायची. हा फारक आहे पूर्वीच्या काळात आणि आताच्या. त्यामुळे कवितात तो फरक असणारच.

**मी :** तुम्ही नुकतंच शेतकऱ्यांसाठी काही कार्यक्रम केल्याची बातमी वाचली.

**नायगांवकर :** फार मोठं काम नाही फक्त उद्देश हाच की शेतकऱ्यांनी आत्महत्या करू नयेत यासाठी त्यांना मानसिक बळ देण्याचा आम्ही एक प्रयत्न केला. तुम्हाला सांगतो नाशिकला त्या खेडगावला, एवढसं ते आठ वर्षाचं डोकं भादरलेलं पोरगं, तिथेच त्या शेतकऱ्याने ज्या झाडाला फास घेतला ते झाड, आणि त्याची मलूल चेहऱ्याची तरुण बायको. विदारक चित्र होतं ते. त्या संमेलनाचं फलित काय तर गेले दीड महिना उदास असणारी आणि राहून राहून रडणारी ती बाई त्या दिवशी पहिल्यांदा हसली.. जगण्यातला आनंद दीड महिन्यानंतर तिनं घेतला. मला या गोष्टीनं समाधान दिलं.

**मी :** मी नेहमी म्हणतो की तुम्ही समाज वाचत नसाल तर समाजानं तुम्हाला का वाचावं? इतर भाषेत खूप

साहित्यिक समाजात आणि चळवळीत उतरून कार्य करताना दिसतात. म्हणजे हिंदीत बाबा नागार्जुन होते, इप्टाची चळवळ होती, तिथे मल्याळममध्ये अयप्पा पणीक्कर होते, बंगालीत महाश्वेता देवी होत्या, मराठीत दुर्गाबाई, गोनिदा, विनोबांनंतर, राजन गवस, मिलिंद बोकील अशी मोजकी मंडळी कार्य करताना दिसतात. तुम्हाला साहित्यिकाचं समाजात काम करणं जरुरीचं वाटतं का?

**नायगांवकर :** आपण समाजाचं देणं लागतो असं ज्याला वाटतं तो समाजात उतरतो. आणि मग त्याचं लेखन तू म्हणतोस तसं तळागाळापर्यंत पोहोचत जातं कारण त्यात त्या तळागाळातील वर्गाच्या जाणिवा असतात. आणि सामाजिक लिहित असाल तर तुम्हाला त्याशिवाय पर्याय नाही. तुला सांगतो, गोवंडीला त्या झोपडपट्टीत आमची बँक. सकाळी ते ग्राहक लोक पिऊन यायचे रे! काऊंटर टोकन देताना असा वास यायचा. हजार-बाराशे पेन्शन. ही गर्दी आणि हे टाकीवर उभं राहून आम्ही पेन्शन द्यायचो.

**मी :** टाकीवर उभं राहून म्हणजे?

**नायगांवकर :** अरे ते खाली जमलेले असायचे. एवढी ही गर्दी. मग त्यांना बसवायचो लायनीत. आमचे मॅनेजर तिकडे बसायचे खुर्चीत. आम्ही मग प्यायलेल्या ग्राहकांना उचलून घरी पोहोचवायचो. खूप प्यायलेले असायचे ना ते. कधी कधी कुणाच्या घरी जाऊन अंगठे देणं, वगैरे व्हायचं. विचार हा, की आपण जर यांना सर्व्हिस देत नसू, तर आपली कविता खोटी आहे. ज्याला दोन करोडची फॅसिलिटी आहे, त्याला कस्टमर सर्व्हिस द्यायला आहेत की दुसरे! पण हजार रुपये पेन्शन घेणारा माणूस माझ्या कवितेतला माणूस आहे आणि त्याला, मला सांभाळायला हवं. नाहीतर पोकळ आहे सगळं.

**मी :** क्या बात!


**नायगांवकर :** कोकणपट्ट्यात तुंबाड, मंडणगड अशा गावोगावात मी अनेक कार्यक्रम मानधन न घेता केले. हे पण एक प्रकारचं जागरणच आहे नं?

**मी :** तुम्ही याला जागरण म्हणता, पण काहींना हे कार्यक्रम म्हणजे कवितेचा स्तर खाली आणणारे कार्यक्रम आहेत असं वाटतं, त्याबद्दल काय सांगाल?

**नायगांवकर :** अच्छा! आता हा जो मुद्दा आहे. (थोडा विचार करतात) त्यात (ते प्रश्न विचारतात) आमच्या कार्यक्रमात प्रकाश होळकर, अरुण म्हात्रे, प्रकाश घोडके, कल्पना दुधाळ ही मंडळीही कविता म्हणतात. (स्वरात थोडा दुरुस्तपणा येतो) ही मंडळी कवितेचा दर्जा खाली आणतात, असं वाटतं तुम्हाला? अरुण म्हात्रे? प्रकाश होळकर? कल्पना दुधाळ?

**मी :** हे सगळे चांगलेच कवी आहेत पण एका गटाचं म्हणणं आहे की वाचकांचं किंवा रसिकांचं उन्नयन होणं गरजेचं आहे. त्यांना कविता समजावी म्हणून तुम्ही एक पायरी खाली उतरणं चूक आहे.

**नायगांवकर :** हा भाबडेपणा आहे एवढंच मी म्हणू शकतो. आता नेमाडे काय म्हणतात. हे सगळं बोगस आहे. साहित्य संमेलन ही जत्रा आहे. पण त्याच साहित्य संमेलनात कधीही न भेटलेला लातूरकडचा एखादा कवी भेटतो, गप्पा मारतो. तुमच्यासाठी मोठं नसेल हो ते. त्याच्यासाठी ती खूप मोठी गोष्ट असते कारण त्याला तुमच्यासारखी कविता लिहायची असते. संमेलनाच्या निमित्ताने तुम्हाला किती माणसांना भेटायला मिळतं, त्यांच्याशी संवाद साधायला मिळतो. ग्रंथांचा उत्सव पहायला मिळतो. तिथं त्या हैद्राबादच्या पंचधाराचा काऊंटर असेल तर तिथे काही वेगळे अंक पहायला मिळतात नाहीतर मी कुठे जाणार असतो हैद्राबादेला. नरहर कुरुंदकरांचा विशेषांक मला साहित्य संमेलनात मिळाला हो. ही दुसरी बाजू आहेच की. तुम्ही त्याला जत्रा म्हणता. जत्राच आहे ती. पण मी विचारतो जत्रा वाईट आहे का? हजारो वर्षांच्या लोक संस्कृतीचा, लोक जीवनाचा ज्याचा तुम्ही गौरव करता त्या संस्कृतीचा तो अविभाज्य भाग आहे. आणि तुम्ही त्याला शिवी दिल्यासारखा तो शब्द वापरता. हीन लेखणारं म्हणता. गावची जत्रा म्हटल्यावर मुंबईच्या माणसाला भरून येतं हो. तुम्ही अशा माणसांच्या एकत्रीकरण सोहळ्याला जर जत्रा म्हणून हीन लेखणार असाल तर तो मराठी संस्कृतीचा अपमान आहे तुमचा स्तर भले उच्च असेल हो, तुमच्या स्तराबद्दल आमचं काहीच म्हणणं नाही. मी म्हटलं तसं सगळंच सरसकट नाकारता नाही येतं. सगळ्यात बरं वाईट काही असतंच तेही लक्षात घ्यायला हवं. डोंबिवलीच्या साहित्य संमेलनाचं फलीत मला विचाराल तर विष्णू खरेंचं भाषण. ते म्हणाले, तुम्ही सगळीकडे जायला हवं, तुम्हाला मान्य असलेल्या व्यासपीठावर आणि मान्य नसलेल्या व्यासपीठावरही.




**आता नेमाडे काय म्हणतात. हे सगळं बोगस आहे. साहित्य संमेलन ही जत्रा आहे. पण मी विचारतो जत्रा वाईट आहे का? हजारो वर्षांच्या लोक संस्कृतीचा, लोक जीवनाचा ज्याचा तुम्ही गौरव करता त्या संस्कृतीचा तो अविभाज्य भाग आहे. आणि तुम्ही त्याला शिवी दिल्यासारखा तो शब्द वापरता.**



'सुचणं' नावाची गोष्ट 'अतिथी' आहे. 'तिथी' नाही त्याची. ते जोवर होतंय त्यावर गंमत आहे. आता लोकांना काय वाटतं, त्याला मी काय करणार? समजणाऱ्यांना समजतं आणि ते घरी जाताना म्हणतात, ''काय हो नायगांवकर, तुम्ही हसवलंत पण अशी काही थप्पड मारलीत की कायम लक्षात राहील.''

**मी :** मला तर वाटतं की मान्य नसलेल्या आणि विरोधकांच्या व्यासपीठावरच जायलाच हवं. कारण आता आदेशांचा आणि फतव्यांचा काळ आहे. पण मी पाहतोय की खूप वेळा बोलणारे आणि ऐकणारेही तेच असतात आपल्याच विचारांच्या लोकांना बोलवायचं आणि आपल्याच विचारांचं संप्रेषण करायचं अशा काळात सर्व विचारांच्या वक्त्यांना आणि विविध स्तरांतून येणाऱ्या माणसांना एकत्र आणणाऱ्या कार्यक्रमांची गरज आहे. आता एक प्रश्न असा आहे की काही लोक तुम्हाला अत्यंत गंभीर आणि सटीक भाष्य करणारा कवी म्हणतात. तर काही जण तुम्हाला हास्यकवी म्हणतात. तुम्ही स्वतःकडे काय म्हणून पाहता?
**नायगांवकर :** (दिलखुलास हसतात.. मग काही वेळाने) मला वाटतं कळत-नकळत एक तिरकस शैली विकसित झाली ती मला गंमतीदार वाटते. 'सुचणं' नावाची गोष्ट 'अतिथी' आहे. 'तिथी' नाही त्याची. ते जोवर होतंय त्यावर गंमत आहे. आता लोकांना काय वाटतं, त्याला मी काय करणार? समजणाऱ्यांना समजतं आणि ते घरी जाताना म्हणतात, ''काय हो नायगांवकर, तुम्ही हसवलंत पण अशी काही थप्पड मारलीत की कायम लक्षात राहील.''

**मी :** तुम्ही महाराष्ट्रात आणि अमेरिकेत किंबहुना परदेशात अनेक ठिकाणी कार्यक्रम केले आहेत. तुम्हाला इथल्या रसिकांत आणि तिथल्या रसिकांत काय फरक वाटतो?
**नायगांवकर :** काहीच नाही.

**मी :** लक्षात घ्या तुम्ही इथे गावागावात कार्यक्रम करता आणि परदेशात अत्यंत उच्चशिक्षित माणसांसमोर. म्हणजे तिथल्या माणसांचा कान आणि इथल्यांची अभिरुची.
**नायगांवकर :** काहीही फरक वाटलेला नाही, जगणं नावाची जी गोष्ट आहे, ती शेवटी तेही इथे जगले आहेत नं. शिकागो काय, डेट्रॉईट काय, फिलाडेल्फिया काय किंवा लंडनच्या महाराष्ट्र मंडळात काय. कधी कधी उलट तिथे जास्त दाद मिळते कारण त्यात आपल्या माणसाचं अप्रूप जास्त असतं. महाराष्ट्रात मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र हा जो भाग आहे, तो सांस्कृतिकता आणि ऐकण्याच्या बाबतीत खूप तयार आहे. त्यामानानं कोकणपट्टी भरभरून दाद देण्यात कमी दिसते. म्हणजे त्यांच्या आकलनात कुठेतरी कमीपणा आहे, असं मुळीच नाही. पण आनंद घेण्याच्या पद्धतीत दोन्हींकडे फरक आहे.

**मी :** तुम्ही एवढे सगळे कार्यक्रम केले. तुमच्या लक्षात राहिलेत असे प्रसंग कोणते?
**नायगांवकर :** तीन ठिकाणी माझ्या कार्यक्रमात हसताना लोक खुर्चीतून खाली पडले. (मी हसतो) गंम्त सोडून द्या. पण खूप कार्यक्रम आहेत. शरद पवार कृषिमंत्री असताना दिल्लीच्या महाराष्ट्र मंडळात केलेला कार्यक्रम, बाळासाहेब ठाकरे खूप चांगलं ऐकणारे होते. त्यांच्यासमोर केलेले कार्यक्रम. पुण्याचे गिरीश बापट. त्यांच्याकडे केलेले कार्यक्रम. खूप कार्यक्रमांच्या आठवणी आहेत.

**मी :** जाता जाता एक महत्त्वाचा प्रश्न विचारतो. सद्यपरिस्थितीत लेखक-कवी यांच्यावर होणाऱ्या हल्ल्याबाबत हिंदी आणि इतर भाषांत अनेकजण लिहित आहेत. हिंदी कवी राजेश जोशी लिहितात-

जो सच बोलेंगे मारे जाएंगे
कटघरेमें खडे कर दिये जाएंगे
जो विरोध मे बोलेंगे
बरदाश्त नही कि या जाएगा
किसीकी भी क मीज हो
उनकी क मीजसे ज्यादा सफेद
जिनकी कमीजपर दाग नही होंगे मारे जाएंगे

तर निरंजन श्रोत्री लिहितात-
दिसंबर की रात मे
जलते अलावको देखकर डरे नही राजन
लोग ठंड भगा रहे है
अंधेरा नही.
नुकतेच पुरोगामी म्हणवल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात

पानसरे, दाभोळकरांना भररस्त्यात गोळ्या घातल्या गेल्या पण त्याचे पडसाद मराठी साहित्यात अभावानं दिसले. अगदी तुम्ही मघाशी उल्लेख केला त्या जनवादी कवी म्हणवून घेणाऱ्यांच्या कवितेतही त्याचे पडसाद दिसत नाही. कविता हे त्या त्या काळावर केलेलं भाष्य असतं असं म्हणतात पण मराठी कवितेत पूर्वीपासूनच असं भाष्य दिसत नाही. तुम्हाला काय वाटतं मराठी साहित्य गप्प का आहे?

**नायगांवकर :** वेट अँड वॉच नावाची जी प्रोसेस असते ती मराठी साहित्यात चालू आहे की काय, असं माझं रिडिंग आहे. पण हे सांगता येईल की आता कुणातही सहनशीलता दिसत नाही. पूर्वी अशी परिस्थिती नव्हती.

**मी :** मराठी साहित्य आत्ममग्न आहे, असं कुणीतरी मागे म्हणालं होतं. स्पष्टच विचारायचं तर मराठी साहित्यिक भूमिका घेत नाहीत का?

**नायगांवकर :** मला वाटतं, त्याला कारण ते वॉच करतायत, ते घाबरत आहेत असं मला नाही वाटत. वेट अँड वॉचची ही प्रक्रिया असू शकेल असं मला वाटतं. काही वेळेला अंधारसुद्धा सकारात्मक असू शकतो. एखाद्या वेळेस हा अंधार रचनात्मक असू शकेल की काय, याचासुद्धा अंदाज घेण्याचा प्रयत्न चालू असावा. घुसळणच आहे नं ही? मी लिहिलंय-

**कालनिर्णय घेऊन साळगांवकर कसे**
**पुढे पुढे चालले आहेत आणि**
**आम्ही शतकाच्या मागे मागे**
**कधी कधी मला अभिमानही वाटतो आणि**
**सतत अभिमान वाटल्याची लाज वाटत राहते.**

पण सगळंच टाकाऊ आहे असं नाही.

**मी :** या परिस्थितीवर मला बर्टोल्ड ब्रेश्तच्या दोन ओळी अशा आहेत. तो म्हणतो,

**ते म्हणणार नाहीत**
**की त्या वेळी अंधःकार होता**
**ते विचारतील**
**की त्यावेळी कवी गप्प का होता?**

माझं निरिक्षण आहे की मराठी कवितेत प्रखर सामाजिकता असणारी जी काही मोजकी नावे आहेत त्यात एक नाव अशोक नायगांवकर हे आहे. तुमच्या कवितांतून खूप वेळा तुम्ही सामाजिक प्रश्नांवर, कुप्रथांवर, रुढींवर, सत्ताव्यवस्थेवर बोलताना दिसता पण तशी खूप कमी नावं मराठीत आहेत थेट भाष्य करणारी तुम्ही धरणात पाणी नाही तर मुतायचं काय, यावर लिहिलं.

**'शहाणपटीने धरण बांधले**
**अभियंत्यांना मुता म्हणालो'**

मी एका कवितेत लिहिलंय-

**उजव्यानं गिळत रहावं एक एक घास**
**आणि डाव्यानं नुसतंच पाहत रहावं**
**पण हृदय तर आहेच नं डाव्या बाजूस**
**कधीतरी एक दिवस येईल की आडवून धरू**
**त्यांच्या रक्तवाहिन्या**

हे काव्य म्हणून ती ग्रेट असेल माहित नाही पण कवीने समाजाचं प्रतिनिधित्व केल्याचा तो सूर आहे आणि कधीतरी तो एक दिवस नक्की येईल ही मला आशा आहे.

**मी :** तुम्हाला आवडणारी तुमची कविता कोणती?

**नायगांवकर :** **भ्रमण करता करता**
**राजज्योतिषी**
**एका विशिष्ट**
**भूमीशी येऊन थबकले**
**जिथे**
**सर्प आणि**
**मुंगूस**
**सहकार्याने**
**सावज पकडताना दिसले.**

**राजज्योतिषी**
**सुलतानाला म्हणाला,**
**'ही भूमी राज्य करणेस सोयीची ठरेल.'**

**मी :** आमेन. या शुभ ओळींवर आपण ही मुलाखत संपवू. तुम्ही वेळ दिलात त्याबद्दल खूप आभार आणि चुकून काही कमी जास्त शब्द गेला असेल तर माफी.

**नायगांवकर :** अरे काहीतरी काय. इतक्या वर्षांत मला वाटतं आपण पहिल्यांदाच इतकं मोकळं आणि थेट बोललो मलाही खूप मजा आली. 'ग्रंथाली'चे आभार.

**वेट अँड वॉच नावाची जी प्रोसेस असते ती मराठी साहित्यात चालू आहे की काय, असं माझं रिडिंग आहे. पण हे सांगता येईल की आता कुणातही सहनशीलता दिसत नाही. पूर्वी अशी परिस्थिती नव्हती.**

**- किरण येले**
भ्रमणध्वनी : ९८६९२६०७८०
kiran.yele@gmail.com



# 'सामना' पडद्यामागचा...

शब्दांकन : कुमार नवाथे

**रामदास फुटाणे-वात्रटिकाकार, कवी, लेखक, राजकारणी, सिने-निर्माता, सिने-दिग्दर्शक, नाट्य-कलाकार, संमेलन सूत्रधार... साऱ्या साऱ्या भूमिका मी वठविल्या. कळत नकळत त्या माझ्या भाग्य रेषेत अडकत गेल्या, माझ्या परीनं मी त्याचं सोनं करण्याचा मनोमन प्रयत्न करत गेलो. यशापयश इतरांनी वाटल्यास मोजावं... माझं यश मी एकच मोजतो मी फक्त आणि फक्त रामदास फुटाणेच राहिलो.**

**आ**ज पंचाहत्तरीच्या उंबरठ्यावर आल्यावर मन मागे भिरभिरून बघू लागतं. एवढा मोठा टप्पा आपण पार करून आलो. आठवणींचा कल्लोळ एक वेगळाच आनंद मनाला देऊन जातो.

रामदास फुटाणे-वात्रटिकाकार, कवी, लेखक, राजकारणी, सिने-निर्माता, सिने-दिग्दर्शक, नाट्य-कलाकार, संमेलन सूत्रधार... साऱ्या साऱ्या भूमिका मी

वठविल्या. कळत नकळत त्या माझ्या भाग्य रेषेत अडकत गेल्या, माझ्या परीनं मी त्यांचं सोनं करण्याचा मनोमन प्रयत्न करत गेलो. यशापयश इतरांनी वाटल्यास मोजावं... माझं यश मी एकच मोजतो मी फक्त आणि फक्त रामदास फुटाणेच राहिलो.

जामखेडसारख्या खेड्यागावातून आलेला मी वयाच्या आठव्या वर्षी पहिली चप्पल पायात घातली. ग्रामीण भाग पण तिथं वर्तमानपत्र नियमित यायची, मिळायची. त्यावेळी आचार्य अत्रेंचा 'नवयुग' एकदा-दोनदा वाचला आणि त्या वाचनाची गोडीच लागली, अगदी वयाच्या अकराव्या वर्षीच. दत्तू बांदेकरांचं गंभीर हलकंफुलकं विनोदी प्रहसनात्मक लिखाण आणि आचार्य अत्रे या भारदस्त व्यक्तिमत्त्वाचा परिणाम मनावर रुजू लागला. सासवडचा हा तरुण म्हणता म्हणता आचार्य विद्वान राजकारणी म्हणून देशभर गर्जू लागतो. आव्हाने देऊ लागतो. कोणाला लाळवतो. कोणाला हसवतो तर 'शामच्या आई'मुळे अंतःर्मुख करायला लावतो. त्या चित्रपटांनी राष्ट्रपती सुवर्णकमळ मिळविले आणि माझ्या विचारांनाही दिशा दिली. 'मी कसा झालो'ने एक ध्येय डोळ्यांसमोर ठेवले. वाचन हा माझा छंद झाला. प्रबोधनकार म्हणायचे 'जो वाचेल तो वाचेल', मी वाचता झालो. शाळेत चित्रकला, गणित या विषयांत मला चांगली गती होती, पण मराठी-इंग्रजी वा इतर विषयामध्ये फारसा रस नव्हता.

आमचं एकच कुटुंब होतं. 'एकत्र कुटुंबाची महती शब्दातून व्यक्त न होणारीच आहे. मला ते भाग्य अखंड लाभत गेलं. ...तेच मला घडवत गेले... ऋणात अखंड बांधत गेलं. मी काहीही करत असलो तरी त्याच्या यशामागचं श्रेय नेहमीच माझ्या एकत्र कुटुंबाचं असतं हे मला नेहमीच पदोपदी जाणवत राहील.

माझी पहिली नोकरी चित्रकला शिक्षक म्हणून वयाच्या अठराव्या वर्षीच सुरू झाली. मी गावातच होतो. रयत शिक्षण संस्थेच्या शाळेत शिकवायला सुरुवात केली होती. काही विद्यार्थी माझ्यापेक्षा वयाने मोठे होते. पगार एकशेपंधरा रुपये होता. घर कुटुंब छान होतं, पण माझं मन आता इथे रमेना. दुसऱ्याच वर्षी मी मुंबईचा रस्ता धरला. नेरळला पुन्हा शिक्षकी नोकरी. गावचा पत्ता दिला की मुंबईत नोकरी मिळायची नाही, म्हणून फणसवाडीतील एका नातेवाईकाचा पत्ता दिला आणि आश्चर्य म्हणजे गिरगाव-लॅमिंग्टन रोडवरच्या नाक्यावरील मारवाडी विद्यालयात मी शिक्षक म्हणून लगेचच रुजू झालो. ऐतिहासिक वारसा असलेली ही शाळा. महात्मा गांधी, राममनोहर लोहिया यांच्या पदस्पर्शाने भारलेली ही शाळा. मला ही मुंबई नवनवीन स्वप्ने दाखवू लागली.




**आमचं एकच कुटुंब होतं. 'एकत्र कुटुंबाची महती शब्दातून व्यक्त न होणारीच आहे. मला ते भाग्य अखंड लाभत गेलं. ...तेच मला घडवत गेले... ऋणात अखंड बांधत गेलं. मी काहीही करत असलो तरी त्याच्या यशामागचं श्रेय नेहमीच माझ्या एकत्र कुटुंबाचं असतं हे मला नेहमीच पदोपदी जाणवत राहील.**





**मुंबई हजारोंचे आशास्थान... मलाही मनाची उभारी येऊ लागली. जगात झेपावण्याची स्फूर्ती स्फुरण देऊ लागली. साहित्य संघ जवळच होता. माझ्या व्यसनाचं वेड पुरवायला वाचनालय होते. रोज नवीन नाटकांचे प्रयोग होते. प्रत्येक शुक्रवारी नवीन हिंदी चित्रपट यायचे त्याचे वेडही मनात घर करू लागले होते – मुंबईला मला घडवत होती.**

मुंबई हजारोंचे आशास्थान... मलाही मनाची उभारी येऊ लागली. जगात झेपावण्याची स्फूर्ती स्फुरण देऊ लागली. साहित्य संघ जवळच होता. माझ्या व्यसनाचं वेड पुरवायला वाचनालय होते. रोज नवीन नाटकांचे प्रयोग होते. इम्पिरियल, स्वस्तिक, नाझ, मराठा मंदिर, ऑपेरा हाऊस एक ना अनेक चित्रपटगृहांनी सारा परिसर बाराही महिने हाऊसफुल्ल असायचा. प्रत्येक शुक्रवारी नवीन हिंदी चित्रपट यायचे त्याचे वेडही मनात घर करू लागले होते – मुंबईला मला घडवत होती.


फणसवाडीत एका नातलगाचे दुकान होते. मी तेथे बऱ्याच वेळी जायचो. कवितेने माझ्या मनाच्या एका कोपऱ्यात प्रवेश केला होता. मीही छोट्या मोठ्या कविता प्रसवू लागलो होतो. या दुकानात येणाऱ्यांना त्याची थोडीफार माहिती होऊ लागली होती. नियमित येणाऱ्या ग्राहकांत दादा कोंडके होते. तिथंच त्यांचा माझा पहिला परिचय झाला. माझ्या स्फुट कवितांमुळे दोघांच्या गप्पिष्ट स्वभावामुळे तो वाढत गेला. वसंत सबनीसांनी लिहिलेला, 'छपरी पलंगाचा वग' दादा सादर करत होते. 'विच्छा माझी पुरी करा' या नावाने पुढे तो धमाल गर्दी खेचू लागला. दादांच्या बरोबरीने वसंत सबनीसांची व माझी दोस्तीही वाढू लागली. विच्छाने अख्ख्या मराठी मनावर राज्य प्रस्थापित केल्यावर दादा कोंडके चित्रपटाकडे वळले. 'सोंगाड्या' हा त्यांचा पहिला चित्रपट, त्यात सहदिग्दर्शन करा म्हणून जेव्हा दादा म्हणाले तेव्हा मी आनंदूनच गेलो. लमिंग्टन रोडमुळे चित्रपट पाहाण्याचा, समजावून घेण्याचा त्याच्या अंतरंगात शिरण्याचा माझा स्वप्नवत प्रवास या पहिल्या पायरीने सुरू होत होता. माझ्या अंगभूत झाकलेल्या गुणांना विस्तीर्ण पडद्यावर अवतरण्याची ही सुवर्णसंधी... मी चित्रपटक्षेत्रात आलो. त्या आधी दादांनी भालजी पेंढारकरांच्या 'तांबडी माती'मध्ये काम केले होते, तो चित्रपट फार चालला नाही. पण त्यामुळेच की काय दादांनी स्वत: चित्रपटनिर्मितीचा हा निर्णय घेतला होता. दादांमुळेच मी कोल्हापूरचा जयप्रभा स्टुडिओ पाहू शकलो. भालजींसारख्या चित्रमहर्षींचे दर्शन घेऊ शकलो. चित्रपटाच्या निर्मितीची त्या क्षेत्रात जाण्याची उर्मी मनात बाळगू शकलो. 'सोंगाड्या'नंतर 'एकटा जीव सदाशिव' या चित्रपटातही मी सहदिग्दर्शक होतो. पुढे पुढे दादांचे सगळेच चित्रपट म्हणजे 'हाऊसफुल्ल' समीकरणाचे झाले. त्यांचा पसारा वाढत वाढत गेला. मी त्यातून बाहेर पडलो.

पण सिनेमा काही डोक्यातून बाहेर जायला तयार नव्हता. माझ्याकडे काय होते. काहीही नव्हते. जागा नव्हती, टेलिफोन नव्हता, पैसा तर दमडाही नव्हता, पण 'सोंगाड्या'चे अथपासून इतिपर्यंतचे सारे संस्कार केलेले असल्याने माझ्याकडे काहीच नाही याचा जराही गंड आला नाही. म्हणून मग सार्वजनिक फोनवरून मी माझ्या मित्रांना नातेवाईक स्नेह्यांना संपर्क करू लागलो. दोन हजाराची मागणी करू लागलो. डोक्यात कथेचा विषय नव्हता. नटनटीच्या नावाचा, संगीताचा कशाकशाचाही ठोकताळा नव्हता. तरीही चित्रपट काढायचाच यावर ठामपणा होता. पैसे हळूहळू जमत होते. बिनव्याजी जमत होते. कुणी दोन तर कुणी पाच हजार देत होते. पूंजी हळूहळू भरत होती.

एक मात्र मनात नक्की होते. जर चित्रपटाचा लेखक चांगला असेल, तर चित्रपटकथा चांगली तर चित्रपटाही चांगला. मागे मी ऋतुराज म्हणून हिंदी कवितांचे एक मासिक काढले होते. माझी स्वत:ची 'कटपीस' म्हणून एक कविता त्यात प्रसिद्ध झाली होती. या कवितेमुळे–मासिकामुळे मला अनेक हिंदी भाषक कवींचा चांगला परिचय झाला. विजय तेंडुलकरांनाही माझी ही कविता फार भावली. त्यामुळे ते माझे उत्तम मित्र झाले.

विजय तेंडुलकर हे मराठी साहित्यातील मोठे नाव. अनेक नाटके लिहिलेले– बस्स. माझ्या मनात चित्रपटाचे लेखक म्हणून ते नाव पक्के झाले. आणि मग माझ्या तेंडुलकरांकडे वाऱ्या सुरू झाल्या. कधी नरिमन पॉईंटला त्यांच्या कार्यालयात तर कधी पार्ल्याला त्यांच्या घरी. माझे वडील स्वातंत्र्यसैनिक होते. यशवंतराव चव्हाणांच्या भावाबरोबर तुरुंगात एकत्र होते. त्यामुळे जामखेडला आमच्या घरी नेहमी राजकारणावर बोलणी व्हायची, चर्चा व्हायच्या. ते राजकारण मी जवळून पाहिले होते–ऐकले होते.

# साधना प्रकाशनाची दोन नवी पुस्तके





पृष्ठे : ६४
किंमत : ५० रुपये

## कानोसा : भारतातील मुस्लिम मनाचा
### हमीद दलवाई

हमीद दलवाई यांनी वय वर्ष २२ ते ३५ या काळात,
म्हणजे १९५४ ते ६७ या दशकात लिहिलेले पाच लेख
या पुस्तकात आहेत. म्हणजे हे सर्व लेखन
५० वर्षांपूर्वीचे आहे. मग आता हे लेखन का वाचायचे?
तर भारताच्या फाळणीनंतरच्या दोन दशकांतील
भारतीय मुस्लिम मानस दलवाईंना कसे दिसत होते,
हे समजून घेण्यासाठी!
त्यांना दिसले ते किती बरोबर वा चूक होते,
याची चर्चा-चिकित्सा करण्यासाठी!
आणि त्यानंतरच्या अर्धशतकात
ते मानस कसे व किती बदलले आहे,
याचे नव्याने आकलन करून घेण्यासाठी!

(महाराष्ट्रातील मुस्लिम, मुंबईकर मुसलमान, भारतीय मुस्लिमांचे अंतरंग, हिंदू-मुस्लिम संबंध, भारतीय मुस्लिम : एक कानोसा, हेच ते पाच लेख.)




पृष्ठे : १३०
किंमत : १२५ रुपये

## अँग्री यंग सेक्युलॅरिस्ट
### संकलन : मेहरुन्निसा दलवाई

महाराष्ट्राच्या व भारताच्याही संदर्भात,
१९७० चे दशक संतप्त तरुणाईचे होते.
त्या दशकात समतेच्या बाजूने व शोषणाच्या विरोधात
अनेक चळवळी झाल्या, त्यात तरुणाईच आघाडीवर होती.
१९६५ ते ७५ या काळात, मुस्लिम समाजातील सुधारणांसाठी
महाराष्ट्रातील एक तरुण झंझावातासारखा कार्यरत होता,
त्याचे नाव हमीद दलवाई. दिलीप चित्रे या मित्राने त्याचे वर्णन,
'अँग्री यंग सेक्युलॅरिस्ट' असे केले होते.
त्याच्या ध्येयवादाचा व दूरदृष्टीचा ट्रेलर पहायचा असेल
तर हे पुस्तक वाचायलाच हवे.

(हुसेन दलवाई, अ.भि.शहा, वसंत नगरकर, विजय तेंडुलकर, भाऊ पाध्ये, गोविंद तळवलकर, असगर अली इंजिनियर, बशिर पटेल इत्यादी १२ मान्यवरांचे लेख. आणि हमीदभाईंची मुलाखत व त्यांनी वसंत नगरकरांना लिहिलेली काही पत्रे)

संपर्क : साधना प्रकाशन
४३१ शनिवार पेठ, पुणे ३० फोन ०२० २४४५१७२४
sadhana.prakashan@gmail.com



**१९७४ मध्ये चित्रीकरण झालेला हा चित्रपट पुढील वर्षी प्रदर्शित व्हायची वेळ आली. पण कुणीही वितरक मिळेना म्हणून आपणच वितरक होऊ असं ठरवून प्रदर्शित तर तो झाला पण मुंबईत तो सपशेल पडला. प्रचंड नुकसानीचा आता 'सामना' करणं भाग होतं. कर्जाचा डोक्यावरील भार वाढला होता. त्याचवेळी फिल्म फेस्टिव्हल या चित्रपटाची शिफारस केली गेली.**

तेंडुलकरांना मी तोच कथेचा विषय सुचवला. त्याकरता गावागावातले साखर कारखाने पालथे घातले. प्रत्यक्ष डोळ्यांनी अनुभविण्याकरिता. पण तेंडुलकर दाद देत नव्हते. सहा महिने मी त्यांचा पिच्छा पुरवत होतो पण हाती काही लागत नव्हते. आणि अचानक काय झाले कोण जाणे... ते पन्हाळ्याला गेले आणि तीन दिवसात कथा पूर्ण करून आले. 'सामना' त्याचा जन्मविधी उरकून आले.

दिग्दर्शक म्हणून त्यांनी गोविंद निहलानींचं नाव सुचवलं. मला काही त्यांच्याबद्दल फारशी माहिती नव्हती. मी काहीच बोललो नाही. डॉ. लागू आणि निळू फुले दोन्ही अगदी तेजीतली नावं होती. उत्तम कसलेले कलाकार त्यांना घ्या म्हणून तेंडुलकर म्हणाले. नकाराचा प्रश्नच नव्हता. माझी गाडी रुळावर येण्याच्या दिशेने धावू लागली. माझं सारं लक्ष-एकच लक्ष मराठी सिनेमा हेच होते. घाशीराम कोतवाल, अशी पाखरे येती ही नाटके तेव्हा गाजत होती. मी तर घाशीरामचा फॅनच होतो. त्याचा दिग्दर्शक होता जब्बार पटेल. त्यांचंच नाव मी दिग्दर्शक म्हणून तेंडुलकरांना सुचवलं. त्यांना आश्चर्य वाटलं पण त्यांनी संमती दिली. या वेळेपर्यंत जब्बारांनी एकाही चित्रपटाचे दिग्दर्शन केले नव्हते. 'सामना' ही त्यांची पहिली पायरी होती.

सत्ता आणि सत्तेबाहेरचा या चौकटीतील राजकारण, हा चित्रपटाचा केंद्रबिंदू होता. साधारण एक लाख रुपयांत हा सिनेमा तयार व्हावा अशी अपेक्षा होती, पण सारंच प्रमाणाबाहेर खर्चिक होऊन तीन लाख सतरा हजारपर्यंत तो गेला. १९७४ मध्ये चित्रीकरण झालेला हा चित्रपट पुढील वर्षी प्रदर्शित व्हायची वेळ आली. पण कुणीही वितरक मिळेना म्हणून आपणच वितरक होऊ असं ठरवून प्रदर्शित तर तो झाला पण मुंबईत तो सपशेल पडला. खेड्यापाड्यातूनही फारसा पुढे सरकला नाही. प्रचंड नुकसानीचा आता 'सामना' करणं भाग होतं. कर्जाचा डोक्यावरील भार वाढला होता. त्याचवेळी फिल्म फेस्टिव्हल या चित्रपटाची शिफारस केली गेली. प्रथम मुंबईतून. हा चित्रपट त्यावेळी एका जर्मन स्त्रीने पाहिला आणि जोरदारपणे तिने हा चित्रपट इंटरनॅशनल फेस्टिव्हलमध्ये नाव काढेल म्हणून दिल्लीला जोरदार शिफारस केली. तिथेही तो पास झाला पण एका काँग्रेसी मराठी खासदार महिलेने त्याला फेस्टिव्हलला पाठवू नये म्हणून जोरदार विरोध केला. खासदार महिला वजनदार/पतीने मुख्यमंत्रीपद भूषविलेले अशी होती. पण त्या कशाचा काही उपयोग झाला नाही. नर्गिस आणि सुनील दत्तने भरभरून पुरस्कार केला, पाठवला गेलाच पाहिजे असा चित्रपट म्हणून आग्रह धरला. पण मी पूर्ण कर्जबाजारी झालो होतो. पुण्या-मुंबईत न राहता मी जामखेडला जाऊन राहिलो. घेणेकऱ्यांपासून जरा दूर पण काही दिवस गेले आणि तिथे आपला चित्रपट बर्लिन फिल्म फेस्टिव्हलला निवडला गेल्याची बातमी मिळाली. मी पैशाने शून्य झालेलो पण या बातमीने माझा गावात सत्कार झाला. पण हे सारे घडायला सुशीलकुमार शिंदे आणि मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी फार मोलाची आर्थिक मदत केली. जर सरकारने पैसे दिले नसते तर काहीच घडू शकलं नसतं. चित्रपटाची रीळ जर्मनीत पोहोचूच शकली नसती. चित्रपटाची निवड तर झाली तो पुढे गेला पण आमचं काय? मी एस.टी.च्या लाल डब्यातून प्रवास करणारा, किमान पाच जणांना जर्मनीला कसा घेऊन जाणार... पुन्हा पैशाची जमवाजमव. पण फक्त पंचवीस हजार जमले. मी निळू फुले, श्रीराम लागू, जब्बार... एअर इंडियाच्या तिकिटाचेच पासष्ट हजार होते. वेळ कमी होता. कुणाचेही पासपोर्टसुद्धा नव्हते... होते फक्त दैव माझ्या पाठीशी- केळकर म्हणून मराठी पासपोर्ट ऑफिसर होते. त्यांना सारी परिस्थिती सांगितली. या भल्या माणसाने सांगितले फक्त तुमचे फोटो, घरच्या पत्त्यांसंदर्भातील काही कागदपत्रं आणि जन्मतारखा द्या. आणि निश्चिंत व्हा. खरंच त्यांनी पुढाकार घेऊन अशी काही चक्र फिरविली की तिसऱ्या दिवशी पासपोर्ट आमच्या सर्वांच्या हातात पडले. पण एअर इंडिया तिकिटाचा तिढा काही सुटत नव्हता. २४ जून १९७५ रात्रीची फ्लाईट होती म्हणजे

आजचीच. काहीच घडत नव्हते. आम्ही गेले दोन दिवस दादरच्या रामनिवास हॉटेलमध्ये सारे तळ ठोकून होतो. आशेचा काही किरण नव्हता. निळू भाऊ म्हणाला, 'च्यायला! जाऊ द्या मरू द्या सारं. आपण गोव्याला जाऊ. चार दिवस मजा करू. येताना काहीतरी इम्पोर्टेड गोष्टी आणू. इकडच्या लोकांना सांगायला की जर्मनीहून आणल्या म्हणून...' विनोदाचा भाग वेळा पण माझी धडपड संपत नव्हती. माझं नशिब माझ्याबरोबर होते. मी म्युनिसिपल कमिशनर एम.डब्ल्यू. देसाईना भेटलो. नेहमीप्रमाणे सारा पाढा वाचला. एअर इंडिया तिकिटाबद्दल सांगितलं आणि रात्रीचं फ्लाईट आहे पण अजून काहीही होत नसल्याची काळजीही व्यक्त केली. देसाई म्हणजे वाघमाणूस होता. त्यांनी एअर इंडियाला फोन जोडला आणि जणू ऑर्डरच दिली. 'फुटाणे आणि मंडळींकडे जेवढे पैसे आहे तेवढे घ्या आणि लगेच त्यांना तिकिटे द्या. जास्तीचा उरलेल्या पैशांचा जराही आग्रह धरू नका. जर तिकीट त्यांना मिळाली नाही तर तुमचा पाणीपुरवठा मी तोडून टाकीन...' आम्ही पुन्हा एकदा निर्धास्त झालो. तरीही तिकिटे हातात मिळायला संध्याकाळचे सहा वाजले. नऊची फ्लाईट. ही धावाधाव. उशिरा पोहोचलो. कसेबसे सगळ्यात शेवटी. तेही उशिराने साऱ्यांचा क्रुद्ध नजरा पाहत आत शिरलो.

पुढील सारा प्रवास म्हणजे अजून एक मोठी कहाणीच आहे. दिल्लीला पोहोचलो त्यावेळी विमानात बिघाड झालेला. बाहेर आलो तोपर्यंत आणीबाणी जाहीर झालेली. हॉटेलात दिवसभर बंदिस्त. दुसरं विमान येऊन जर्मनीला पोहोचेपर्यंत उशीर... पण पुढील बारा दिवस फार छान गेले. नर्गीस आणि सुनील दत्त यांनी फार प्रेमाने आमचं स्वागत केलं. स्वहाताने जेवण बनविलेल्या पार्टीला नर्गिसनी आम्हाला बोलाविले. हिल्टनसारख्या पंचतारांकितमध्ये आमचे दिवस फारच छान व्यतित होत होते. लंडन मार्गे पुन्हा मुंबई-रेल्वेने पुणे आणि एसटीने पुन्हा जामखेडला.

आयुष्यातील एक अनोखी संधी मी अनुभवली. सांस्कृतिक विश्व भरपूर विस्तारलं. जगाकडे-सिनेमाकडे बघण्याची दृष्टीच बदलली.

आतापर्यंत डब्यात गेलेला पूर्ण फ्लॉप झालेला सामना आता बर्लिन फेस्टिव्हलमुळे बराच प्रकाशात आला. तीन नॅशनल अॅवॉर्डस, तीन फिल्मफेअर पुरस्कार, सात राज्य पुरस्कार आता गाठी होते. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. प्लाझाला अठ्ठावीस आठवडे



हाऊसफुल्ल! मग इतर थिएटरवाल्यांचे फोन... मी कर्जमुक्त झालो.

आणि जिवलग मैत्र जुळत गेल्याने श्रीमंतही होऊ लागलो. कुसुमाग्रज, पु.ल., धर्मवीर कमलेश्वर, महावीर आणि अनेकानेक साहित्यिकांचा संवाद वारंवार घडू लागला. मी कवितांपेक्षा 'भाष्यकविता' लिहीत गेल्यामुळे एका मोठ्या अग्रलेखाचे सार माझ्या चार ओळीत चपखल वाचून अनेक राजकारणीही माझे मित्रच नाही तर त्या भाष्यकवितेचे - काही त्याला वात्रटिका म्हणू लागले - आतुर वाचकही झाले.

१९९६ मध्ये मी यशवंतराव गडाखांच्या निवडणूक प्रचारात हिरीरिने भाग घेतला. भाषण, कोपरखळ्या, वात्रटिका सारं जोमदार चालू होतं. ती निवडणूक संपली आणि शरदराव पवारांकडून बोलावा आला. विधानपरिषद सदस्य-सभासद निवडणूक लढविण्याकरिता आणि तेही माझे मित्र विलासराव देशमुखांच्या विरोधात. राजकारण हा माझा प्रांत नव्हता, पण शरदराव, सुशीलकुमार यांच्या पाठिंब्याने मी निवडणूक लढविली. एक रुपयाही खर्च न करता आणि निवडूनही आलो. सहा वर्षे मी सक्रिय राजकारणात होतो.

'भारत कधी कधी माझा देश आहे' हे प्रहसनात्मक भाषण मी प्रथम सोलापूरला केले आणि हळूहळू त्यात सद्य परिस्थितीच्या घटनांची भर घालत तो दीड तासाचा एक कार्यक्रमच झाला. रत्नागिरीच्या साहित्य संमेलनात तो खूप गाजला. उठावदार झाला. तिथे अमेरिकेच्या सुभाष दामलेंनी तो कार्यक्रम पाहिला आणि मला अमेरिकाभेटीचे निमंत्रणच दिले. त्यांनी माझे अमेरिकेत

**आतापर्यंत डब्यात गेलेला पूर्ण फ्लॉप झालेला सामना आता बर्लिन फेस्टिव्हलमुळे बराच प्रकाशात आला. तीन नॅशनल अॅवॉर्डस, तीन फिल्मफेअर पुरस्कार, सात राज्य पुरस्कार आता गाठी होते. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. प्लाझाला अठ्ठावीस आठवडे हाऊसफुल्ल - मग इतर थिएटरवाल्यांचे फोन... मी कर्जमुक्त झालो. आणि जिवलग मैत्र जुळत गेल्याने श्रीमंतही होऊ लागलो.**



'आडनाव' खायला पैसे नसताना मी सारं करू शकलो. देश-विदेश भ्रमंती करू शकलो. मानसन्मान मिळवू शकलो. माझी माझ्या कवितेवरील भक्ती अढळ आहे. तिनेच मला जगंवलं-वाढवलं-समृद्ध केलं. मी लोकांच्या लक्षात राहीन की नाही काळच ठरवील. माझ्या काव्याचा कस पुढील पिढीच ठरवील. एक मात्र आहे. माझ्या वृत्तीशी मी सदैव प्रामाणिकच राहिलो.

बऱ्याच ठिकाणी कार्यक्रम ठरविले. आणि तेव्हापासून मग माझ्या पायाला जगप्रवासाची भिंगरीच लागली. माझ्या परदेशवाऱ्या जोरात सुरू झाल्या. अमेरिकेतच सगळ्यात जास्त झाल्या. दोहा, मस्कत, दुबई, सिंगापूर, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, मॉरिशस येथे एकामागून एक कार्यक्रम होत गेले - आजतागायत अजूनही चालूच आहेत. कविता प्रहसन, भाष्यकविता हे माझ्या केंद्रस्थानी आहे. तीच माझी ओळख आहे. मी मराठी चित्रपट महामंडळाचा अध्यक्ष होतो, महाराष्ट्र साहित्य परिषदेचा उपाध्यक्ष, विधान परिषदेचा सदस्य होतो आणि त्यातून निवृत्त होईपर्यंत माधवराव गडकरींनी माझ्यावर जागतिक मराठी अकादमीच्या अध्यक्षपदाची धुरा हाती दिली. गेली चौदा वर्षे महाराष्ट्रातील साऱ्या भागात 'शोध मराठी मनाचा' हे सूत्र ठेवून अनेकानेक देशी-परदेशी गुणवंतांना हजारोंच्या पुढे आणले - त्यात जास्त करून शालेय कॉलेज विद्यार्थ्यांची लक्षणीय उपस्थिती हे कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले.

'आडनाव' खायला पैसे नसताना मी सारं करू शकलो. देश-विदेश भ्रमंती करू शकलो. मानसन्मान मिळवू शकलो. माझी माझ्या कवितेवरील भक्ती अढळ आहे. तिनेच मला जगंवलं-वाढवलं-समृद्ध केलं. मी लोकांच्या लक्षात राहीन की नाही काळच ठरवील. आज शतकानंतरही ज्ञानेश्वरांना लोक विसरले नाहीत. केशवसुत, तांबे, बालकवी आजही घरोघरी स्मरले जातात. माझ्या काव्याचा कस पुढील पिढीच ठरवील.

एक मात्र आहे. माझ्या वृत्तीशी मी सदैव प्रामाणिकच राहिलो. आजची भाष्यकविता मला स्फुरायची ते समोरचं वास्तव पाहूनच. ते सत्य मांडताना मला जरी गोळी चालवावी लागली तरी मैत्री बाजूस सारून मी लिहित गेलो - त्यांना घायाळ करत गेलो पण ते सत्य होते म्हणूनच आणि म्हणूनच आपल्या मैत्रीत या कुणी खंड पडू दिला नाही, माझ्याबद्दल दुराग्रह करून घेतला नाही.

बाळासाहेब ठाकरे, शरद पवार, सुशीलकुमार, विलासराव, मनोहर जोशी, गोपीनाथ मुंडे साऱ्यांवर भरपूर टीकाबाण सोडूनही त्यांनी ते खिलाडी वृत्तीने स्वीकारले. दोस्तीआड येऊ दिले नाहीत.

दोनच गमतीशीर उदाहरणे देतो. राज्यसभेच्या उमेदवारीकरिता शिवसेनेकडून रथी-महारथी आणि पक्षातील अनेक जुने कार्यकर्ते तिकीट आपणास मिळावे म्हणून प्रचंड उत्सुक आशावादी होते. पण बाळासाहेब ठाकरेंनी ते व्हिडिओकॉनच्या धूत यांना बहाल केले आणि म्हणून माझी भाष्यकविता लगेचच दुसऱ्या दिवशी प्रसिद्ध झाली. तुफान वाचली गेली. ती अशी होती-

वॉऽऽशिंग मशीन
पक्ष कार्याची गरज नाही
हायकमांडशी जमलं सूत
व्हिडिओकॉनचं मशीन येताच
कार्यकर्ते बसले... 'धूत'

या चार ओळींबरोबर स्वत: बाळासाहेब भरभरून हसले - हा थेट त्यांच्यावर टोला होता तरीही उद्धवने मला फोन केला की बाळासाहेबांनी तुम्हाला बोलावले आहे. म्हणाले की, त्या फुटाण्याला इकडे घरी बोलवा - त्या वॉशिंग मशीनमध्येच त्यांची चांगली धुलाई करतो... बाळासाहेब भेटले. माझ्या हजरजबाबी लिखाणाचे भरभरून कौतुक करू लागले.

असंच विधानसभा निवडणूकीपूर्व भाषणात पवारसाहेब शिवसेनेबद्दल बोलत होते. ते म्हणाले की, 'भुईमुगाच्या शेंगा जमिनीखाली येतात की वर हे यांना माहीत नाही, हे काय राज्य करणार? पण प्रत्यक्षात शिवसेना-भाजप युतीचे सरकार राज्यात स्थापन झाले - शिवसेनेचा मुख्यमंत्री झाला... आणि अरुण टिकेकरांचा लगेच फोन- चार ओळी पाठव. त्यावरील माझी टिप्पणी होती.


द्राक्षाच्या राजकारणाला
'रुद्राक्षांनी' दणका दिला
भुईमुगाच्या शेंगा दाखवत
भाकरी बरोबर झुणका दिला....

**शब्दांकन : कुमार नवाथे**
भ्रमणध्वनी : ९९७०२१७२६१ /९८६९०१४४८६
kumar.nawathe@gmail.com

**पॉप्युलर प्रकाशन** ३०१, महालक्ष्मी चेंबर्स, २२, भुलाभाई देसाई रोड, मुंबई ४०० ०२६
www.popularprakashan.com फोन नं. २३५३०३०३ • email : info@popularprakashan.com

# विंदा करंदीकरांच्या बालकवितांचा खजिना












विंदा करंदीकर यांनी मराठी कविता, लघुनिबंध, समीक्षा, अनुवाद या प्रत्येक क्षेत्रात आदर्श निर्माण केले. बालकवितांच्या क्षेत्रात ते काहीसे योगायोगाने शिरले असले तरी 'राणीची बाग'सारख्या बालकवितांनी मराठी बालकवितांचे रूपच बदलले. मुलांवर संस्कार घडवण्याचा अट्टाहास न धरता त्यांना गंमत वाटेल अशा गोष्टींबद्दल लिहिता लिहिता त्यांना चांगल्या गोष्टींची जाणीव करून देणे हा विंदांच्या लेखनातील मोठेपणा. त्यांची शब्दशक्ती, ताल आणि लय यांवरील प्रभुत्व आणि प्रतिमा यांमुळे प्रगल्भ वाचकांनाही या कवितांचे आकर्षण वाटत राहिले. गेली पन्नास वर्षे 'स्वप्नात पाहिली राणीची बाग' अनेक पिढ्यांवर गारुड करत राहिले आहे.

या प्रकारची कविता वाचकांपर्यंत पोचवताना त्यांना त्याच तोलामोलाच्या चित्रकार कलावंतांची साथ लागते. वसंत सरवटे, पद्मा सहस्रबुद्धे, सुभाष अवचट, दत्तात्रेय पाडेकर, रत्नाकर मतकरी, अनिल दाभाडे, पुंडलिक वझे या दिग्गज चित्रकारांनी या संग्रहाची सजावट केली आहे. पन्नास वर्षांपूर्वीही अत्यंत चोखंदळपणे यातील काही पुस्तकांची निर्मिती झाली होती. आता उपलब्ध तंत्राच्या मदतीने पुन्हा ही सर्व पुस्तके नव्याने छापली आहेत. कवी आणि चित्रकार यांनी मुलांच्या भावविश्वाशी एकरूप होऊन केलेली कलाकृती आणि त्याची दर्जेदार निर्मिती यांमुळे 'बालकवितांचा खजिना' मराठी बालसाहित्यातील सर्वोच्च पातळीचा निदर्शक ठरेल.

या संचातील 'राणीची बाग' आणि 'ससाचे कान' या पहिल्या दोन पुस्तकांना भारत सरकारचे उत्कृष्ट बालसाहित्याचे पारितोषिक मिळाले आहे. 'परी ग परी' हे तत्कालीन आधुनिक ऑफसेट पद्धतीने छापलेले पहिले मराठी पुस्तक असावे. 'एकदा काय झाले', 'एटू लोकांचा देश', 'पिशी मावशी आणि तिची भुतावळ', 'टॉप', 'सर्कसवाला', 'बागुलबोवा', 'सात एके सात', 'अडम् तडम्' या प्रत्येक पुस्तकाला स्वत:चे असे आकर्षक रूप आहे.

विंदा करंदीकर यांच्या काव्याचा समग्र परिचय 'विंदा' या श्रेयस आवृत्तीसोबत या अकरा भागांतील खजिन्याने होईल. 'विंदा' या ८२० पृष्ठांच्या संग्रहास प्रा. वसंत पाटणकर यांची विस्तृत प्रस्तावना आहे. विंदा करंदीकर यांच्या कवितेचे चाहते, अभ्यासक यांच्यासाठी हा समग्र कवितांचा खजिना पर्वणीच ठरणारा आहे.

**विंदा : विंदा करंदीकर : यांची समग्र कविता :** किंमत : रु. १०००/-
'ग्रंथाली'च्या सभासदांना विशेष सवलतीत रु. ८००/-

**विंदा करंदीकर : बालकवितांचा खजिना**
(अकरा पुस्तकांचा संच)
किंमत : रु. ११००/-
'ग्रंथाली'च्या सभासदांना विशेष सवलतीत रु. ८५०/-












# एक भन्नाट माणूस

**राधिका कुंटे**

**ज्येष्ठ गिर्यारोहक आणि साहित्यिक, व्यवस्थापन क्षेत्रातील दांडगा अनुभव, इतिहासाच्या पाऊलखुणा जपतानाच वर्तमानाचं भान ठेवून भविष्याचा अंदाज बांधणारं एक भन्नाट व्यक्तिमत्त्व म्हणजे वसंत वसंत लिमये...**

''**को**ण आहेत हे वसंत वसंत लिमये?'' एका ज्युनिअर फेसबुकी मैत्रिणीनं प्रश्न विचारला. तत्क्षणी जाणवली इतिहासाची पुनरावृत्ती... तो अनुभव गाठीशी असल्यानं किंचितशी ताईगिरी करत मला मिळालेल्या उत्तराचीही पुनरावृत्ती केली. म्हटलं की, 'एक भन्नाट माणूस...' तिच्या भुवया अधिकच उंचावल्या आणि ती अधिक 'सर्चा'च्या कामाला लागली... आणि मी काळाचा प्रवास ओलांडू लागले...

साधारण बाराएक वर्षांपूर्वी 'वसंत वसंत लिमये' हे नाव पहिल्यांदा कानावर पडलं. कोण आहेत हे वसंत वसंत लिमये? हाच प्रश्न मी विचारला होता आणि माझ्या सिनिअरनं उत्तर दिलं होतं की, ''एक भन्नाट माणूस...'' माझ्याही भुवया उंचावल्या होत्या. फरक इतकाच की, लगोलग दोन दिवसांत लिमये यांचं पुस्तक 'धुंद स्वच्छंद' त्या सिनिअरनं माझ्या हाती दिलं होतं. ते वाचून जेमतेम एखादं टेपाड चढलेल्या माणसाला गिरीभ्रमणाच्या छंदातला आनंद कसा असतो, त्याचे विविध पैलू कोणते वगैरे गोष्टी कळल्या होत्या. निसर्गाबद्दल मुळात ओढ होतीच, ती या वर्णनांमुळं थोडी

वाढीसच लागली...


त्यानंतर गप्पांमधून, लेखांमधून लिमये यांच्याविषयी कळत राहिलं. मुळात एक मोठं कुतुहल होतं त्यांच्या नावाविषयी. 'वसंत वसंत लिमये हे नाव कसं अस्तित्वात आलं?' असं नाव आपल्याकडं सहसा कुठं बघायला मिळत नाही. फार तर आजोबांचं नाव नातवाला ठेवलं जातं किंवा परदेशातली अमूक दुसरा, किंवा अमूक चौथा अशी लक्षात ठेवायला कठीण भासणारी नावं इतिहासाच्या पुस्तकांत वाचलेली असतात. तर मग हे नाव कसं काय?... लिमयेंच्या बारशाची गोष्ट भारीच आहेच. लिमये यांच्या बारशाच्या दिवसापर्यंत त्यांचं नाव ठरलेलंच नव्हतं. ऐन वेळी नाव ठेवायचं, असा प्रश्न पडला. आत्यानं नाव ठेवण्याचा प्रघात असतानाही आईनंच बाळाचं नाव ठेवावं असा आग्रह झाला आणि कुठलीच तयारी न केल्यानं बाळाच्या आईनं बाळाच्या वडिलांना विचारलं, तेव्हा सिनियर वसंत लिमये यांनी 'तुला आवडेल ते नाव ठेव.' असं म्हटलं आणि काही न सुचल्यामुळं बाळाच्या आईच्या तोंडून नवऱ्याचंच नाव बाहेर पडलं आणि तेच नाव पुढं कायम झालं. गेल्या वर्षी लिमये यांच्या वडिलांचं निधन झालं. त्यानंतर लिहिलेल्या एका लेखात लिमये यांनी लिहिलं होतं की, ''त्यांनी मला खूप स्वातंत्र्य दिलं. आपले विचार कधी लादले नाहीत. त्यांना काळजी वाटत असेल तर सल्ला दिला, पण कधीही आडकाठी आणली नाही. मळलेल्या वाटा सोडून नव्या वाटांवर जाण्यासाठी उदंड प्रोत्साहन दिलं.''

लिमये एक उत्तम स्टोरीटेलर आहेत, हा साक्षात्कार आपल्याला त्यांच्या पहिल्याच पुस्तकात होतो आणि त्यांचं अधिकाधिक लिखाण वाचावंसं वाटतं. चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाच्या 'वसंत वसंत लिमये' यांनी स्तंभलेखनासह विविध लेख लिहिले आहेत. त्यातलं काही वाचलं जातं. मग हाती येते 'लॉक ग्रिफिन' ही कादंबरी. तिचं सरस मुखपृष्ठ आणि शीर्षक उत्कंठा वाढवतं आणि ती लगेचच वाचायचा मोह आवरत नाही. कादंबरीच्या शीर्षकातल्या 'लॉक' या शब्दाचा स्कॉटलंडमधल्या पौराणिक 'गेलिक' भाषेतला अर्थ आहे 'तलाव'. 'ग्रिफिन' हे गरूडाचं डोकं आणि सिंहाचं शरीर असलेल्या एका पौराणिक प्राण्याचं नाव. 'ग्रिफिन'ला सामर्थ्य, साहस आणि शहाणपणाचं प्रतीक मानलं जातं. 'लॉक' आणि 'ग्रिफिन' हे शब्द पौराणिक असले तरी कादंबरीतल्या घटना २००० सालाच्या दहाएक वर्षं अलीकडं-पलीकडं घडणाऱ्या आहेत. कादंबरी वाचतावाचता 'लॉक ग्रिफिन' या दोन शब्दांचं कादंबरीतलं महत्त्व समजतं.




मराठीत कादंबरीलेखनात फारसे प्रयत्न होत नाहीत, मराठी लेखक संशोधन करत नाहीत, कष्ट घेत नाहीत, असे आरोप अनेकदा करण्यात येतात. मात्र गेल्या काही वर्षांत मराठी लेखकांनी हे आरोप पुसून टाकायचा प्रयत्न केला आहे. यात 'लिमये' यांच्या नावाचा समावेश होतो. दणदणीत पृष्ठसंख्येच्या या कादंबरीत त्यांनी तीन पिढ्यांची वाटचाल मांडताना, कौटुंबिक संबंध, राजकारण, आंतरराष्ट्रीय पातळीवरील बदल या साऱ्यांची गुंफण केली आहे. त्यांनी या कादंबरीसाठी पाच वर्षं मेहनत घेतली. कादंबरीतील वर्णनं आणि तपशीलात चूक होऊ नये, यासाठी त्यांनी दोन वेळा अमेरिकेचा प्रवास केला. भारतात अनेक ठिकाणी फिरले. अनेकांच्या भेटीगाठी घेतल्या. कल्पित आणि सत्य घटनांची सांगड घालत एक अद्भुत जग उभं केलं आहे. सामान्य माणसाच्या घरात सुरू होणारं हे कथानक आंतरराष्ट्रीय पातळीवर कसं जातं ते मुळातूनच वाचायला हवं. अमेरिका, ब्रिटन आणि भारत या तीन देशांत उलगडणाऱ्या या कादंबरीमधील घटना, जागा आणि माणसांचं वर्णन अत्यंत बारकाव्यांसह केलं आहे. अगदी शेवटच्या पानापर्यंत खुर्चीला खिळवून ठेवणारी कादंबरी!

**मराठीत कादंबरीलेखनात फारसे प्रयत्न होत नाहीत, मराठी लेखक संशोधन करत नाहीत, कष्ट घेत नाहीत, असे आरोप अनेकदा करण्यात येतात. मात्र गेल्या काही वर्षांत मराठी लेखकांनी हे आरोप पुसून टाकायचा प्रयत्न केला आहे. यात 'लिमये' यांच्या नावाचा समावेश होतो.**










**'लॉक ग्रिफिन'नंतर आलं ते 'कॅम्प फायर'. त्यालाही वाचकांनी उदंड प्रतिसाद दिला. हे पुस्तक गिर्यारोहणाची आवड कशी लागली इथंपासून ते या वेड लागलेल्या प्रवासाचं वर्णन या 'कॅम्प फायर'मध्ये येतं. वरवर बेफिकीर वाटणारे लिमये आतून किती संवेदनशील आणि कवीमनाचे आहेत, ते अनुभवास येतं.**

रहस्यमय इंग्रजी कथांना लाजवेल असा 'थ्रिलर सस्पेन्स' या कादंबरीत आहे.

'कवी कसा तो दिसतो अननी' या चालीवर नाही, तरीही लिमये यांना पाहण्याची उत्सुकता होतीच. तिची पूर्ती महाविद्यालयाच्या कार्यक्रमात आणि 'ग्रंथाली'च्या 'वाचकदिनी' झाली. त्यांचं जॅकेट हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग असावं असं वाटलं. त्यामुळं त्यांचं गिर्यारोहणाविषयीचं अतूट प्रेम आणि व्यवस्थापन क्षेत्रातलं ज्येष्ठत्व आपसूक अधोरेखित होत असावं. एका मित्राकडून कळलं की, 'ते थोडेसे पटकन चिडतात, पण नंतर त्यांच्या मनात काही राहात नाही. ते शिस्तीचे भोक्ते आहेत. शक्यतो त्यांचं टाईमटेबल हललेलं त्यांना चालत नाही. ह्युमन मॅनेजमेंटचं ज्ञान आहे..' वगैरे वगैरे. मग त्यांच्याविषयी मिळत तसं काहीकाही वाचत गेले. तेव्हा त्यांच्या घराविषयी कळलं... 'इतिहासाच्या वैभवी खुणा जपणारं घर', 'मराठेशाहीतील वाडा' वगैरे वर्णनं वाचली. मात्र इतिहासाचा खुणा मिरवत असूनही हे घर उबदार आहे. गिर्यारोहण करताना विविध वस्तू इथं आहेत. मेहनत, चिकाटी आणि ध्यासाच्या पायावर उभं राहिलेल्या या घरातील वस्तूंचं निगुतीनं जतन करावं लागतं. अभ्यागतांचं स्वागत करणाऱ्या लाकडी दरवाज्यापासून ते ताशीव कमानी-खांबांपर्यंत आणि मनोभावे जपलेल्या हिरवाईपर्यंत हे घर आपलंसं वाटू लागतं. अर्थात हे 'इप्सित' अजून साध्य करायचं आहे. कारण 'बलवंतपुरम'मध्ये भावाच्या घरी येता-जाता 'इथंच आहे लिमयेंचं घर...' इतकीच घोकंपट्टी झाली आहे अद्याप...

'लॉक ग्रिफिन'नंतर आलं ते 'कॅम्प फायर'. त्यालाही वाचकांनी उदंड प्रतिसाद दिला. हे पुस्तक बघताक्षणीच कुठलाही माणूस या पुस्तकाच्या प्रेमात पडेल असं मुखपृष्ठ निलेश जाधव यांनी केलंय. 'शिखरावर उभा असलेला तो कोणी, आता सूर्याच्या सोनसावळी प्रकाशाच्या साक्षीनं तुमच्या-आमच्याबरोबर हितगुज करू इच्छितोय! मी शिखर सर केलंय, तुम्हीही करू शकता असं काहीसं सांगतोय...' असं वाटून जातं. मुखपृष्ठावरील डोंगराच्या चित्राचा हाताला जाणवणारा खरखरीतपणा उत्सुकता चाळवतो. लेखानुरूप छायाचित्रं सुरेख उतरली आहेत. संजय भास्कर जोशी यांनी 'अत्यंत वाचनीय + थरारक + भन्नाट + अतिशय माहितीपूर्ण + निसर्गाविषयी निराळीच जाण देणारे आणि मुख्य म्हणजे दुर्गभ्रमण, गिर्यारोहण, प्रस्तरारोहण वगैरे संकल्पना आणि त्यात आपल्याकडं आढळणारे गैरसमज आणि मूर्ख निष्काळजीपणा या सगळ्यावर अतिशय मौलिक भाष्य करणारं मस्त पुस्तक... कॅम्प फायर!' असा अभिप्राय नोंदवला आहे.

गिर्यारोहणाची आवड कशी लागली इथंपासून ते या वेड लागलेल्या प्रवासाचं वर्णन या 'कॅम्प फायर'मध्ये येतं. वरवर बेफिकीर वाटणारे लिमये आतून किती संवेदनशील आणि कवीमनाचे आहेत, ते अनुभवास येतं. हिमालयाच्या दर्शनानं लेखक स्तिमित होत गिर्यारोहक आणि हिमालयाचं नातं शब्दांपलीकडलं असल्याचं ते मानतात. एकीकडं आयुष्याची क्षणभंगुरता लेखकाला

## ॥ग्रंथाली॥✲॥

# डॉ. प्रकाश लोथे यांची दर्जेदार पुस्तके

## धर्मधुरीण





वऱ्हाडातील कर्मठ सनातनी कुटुंबातील धर्मपरायण आबासाहेबांचा मुलगा श्याम ख्रिश्चन मिशनऱ्याच्या प्रभावाखाली येऊन वडिलांशी टक्कर घेऊ पाहतो, तेव्हा त्यांच्यात निर्माण होणारा जीवघेणा संघर्ष चितारणारी ही कादंबरी एकदा वाचावयास घेतली तर खाली ठेववत नाही. भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली ही हृदयद्रावक कहाणी बंगाली लेखक शरदचंद्रांच्या कादंबऱ्यांची आठवण करून देते. स्त्री शिक्षण, विधवा विवाह, स्वातंत्र्यपूर्व राजकारण व देशाची फाळणी असल्या अनेक तत्कालीन समस्यांमुळे निर्माण झालेला प्रखर वैचारिक लढा चितारत, अनेक कौटुंबिक समस्यांचे पदर सहज उलगडत जाणारी संयत भाषाशैलीतली ही कादंबरी मनाला चटका लावून जाते.

**– दिनकर गांगल**

**मूल्य ६०० रुपये**
**सवलतीत ३६० रुपये**

## हास्यरेखा




**मूल्य १२५ रुपये**
**सवलतीत ७५ रुपये**

मराठीतील विनोदी साहित्य त्याच त्या विषयांच्या चरकातून आरपार जात असतं. वेंधळ्या बायका, गोंधळलेले नवरे, अती तिथे फजिती अशा कच्च्या मालावर विनोदी साहित्य साधारणतः पोसलेलं असतं. चिं. वि. जोशी, पु.ल. देशपांडे हे टवटवीत; बाकी बहुतेक बटबटीत असा एकूण मामला. अशा दुष्काळी परिस्थितीत हास्याचा एखादा निर्मळ नायगारा सापडला, तर श्रीखंडात केशरच! (किंवा दुष्काळात रोजगारहमीच!) अमेरिकेतील अनिवासी भारतीय डॉक्टर प्रकाश लोथे यांचं 'हास्यरेखा' हे अवघं १०६ पानी पुस्तक (वितरण ग्रंथाली) म्हणजे कम्माल धमधम्माल आहे. लोथे यांच्या लिखाणात पु.ल. 'टच्' जाणवतो. त्यांची शैली खेळकर, निरीक्षणं खोडकर आणि मल्लिनाथी उससे भी बढकर! अमेरिकेतील अनेक गोष्टींची त्यांनी खुसखुशीत खिल्ली उडवली आहे.

**– कलंदर** ('कानोकानी', महाराष्ट्र टाइम्स)

## ऊनपाऊस



डॉ. प्रकाश लोथे ह्यांच्या पहिला विनोदी कथासंग्रह वाचून 'अमेरिकेतील पुल' म्हणून राम शेवाळकर, श्रीधर शनवारे, 'महाराष्ट्र टाइम्स'चे 'कलंदर' वगैरेंनी त्यांचा गौरव केला. पण लोथे ह्यांना हा 'ब्रँड' नको होता, त्यांनी गंभीर कथालेखन, ललित लेखन केले होते; पुढेही त्यांना ते करायचे होते. त्यातून साकार झाला 'ऊनपाऊस' हा संमिश्र संग्रह. ह्यातील विनोदी कथा लेखकाची सामाजिक व्यंग टिपण्याची हातोटी प्रकट करतात तर गंभीर कथा व ललित लेख लेखकाची उत्कट संवेदनशीलता व सखोल चिंतनवृत्ती दाखवून देतात. ऊनपावसाचा हा खेळ मनोरम तर आहेच, पण तो एक जीवनदृष्टी व्यक्त करतो....

**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत ९० रुपये**



**हिमालयाचं नातं शब्दांपलीकडलं असल्याचं ते मानतात. एकीकडं आयुष्याची क्षणभंगुरता लेखकाला कळते, तर दुसरीकडं त्याच आयुष्याची व्यापकता आणि विशालताही जाणवते. शहरीकरणानं यंत्रवत, स्वार्थी, फसवी झालेली माणसं दिसतात, तर दुसरीकडं अनोळखी वाटेवरती भेटलेले, प्रेमानं विचारपूस करणारे भेटतात. हे सगळे अनुभव रसरशीतपणं व्यक्त होतात.**

कळते, तर दुसरीकडं त्याच आयुष्याची व्यापकता आणि विशालताही जाणवते. शहरीकरणानं यंत्रवत, स्वार्थी, फसवी झालेली माणसं दिसतात, तर दुसरीकडं अनोळखी वाटेवरती भेटलेले, प्रेमानं विचारपूस करणारे भेटतात. हे सगळे अनुभव रसरशीतपणं व्यक्त होतात. स्वतः लिमये त्यांच्या मनोगतात म्हणतात की, ''कॉलेजच्या दिवसांत हायकिंगचं वेड लागलं. त्याच काळात माझी घसट ग्रुपमधील माझ्यापेक्षा पाच-सहा वर्षांनी मोठ्या असलेल्या मंडळींशी होती. साहजिकच त्यांचे पूर्वानुभव हा माझ्यासाठी एक मोठा खजिना ठरला. शिकारीच्या कथा, आकाशस्थ तारे, झाडा-फुलांची माहिती अशा असंख्य गोष्टींची गोडी या मंडळींमुळं लागली. आयआयटीमधील सहा वर्ष हा माझ्या दृष्टीनं पर्वणीचा काळ! समवयस्क, समविचारी मंडळी सोबत असल्यानं, गिरीभ्रमणाचा छंद मुक्तपणं, मनस्वीपणं जोपासता आला. त्यातून माझं आणि डोंगरवाटाचं एक अतूट नातं निर्माण झालं, वाढलं आणि जित्याची खोड झालं. भटकंतीबरोबर प्रस्तरारोहणाची आवड निर्माण झाली. सुरुवातीचं प्रशिक्षण, सराव यानंतर डोंगरांच्या अवघड वाटा, उभे कडे खुणावू लागले. या चढायांमध्ये एक जबरदस्त आव्हान होतं. सह्याद्रीच्या दुर्दम्य, दुर्गम रूपाशी एक वेगळी जवळीक निर्माण झाली. या साहसी चढायांत एक विशेष उन्माद होता. काही वेळा हारही पत्करावी लागली. क्वचित खरचटण्याइतपत धडपडलोही. पण खरा आनंद जिद्दीनं-चिकाटीनं प्रयत्न करण्यात असतो. हा सूर गवसल्यावर या साऱ्याच बिकट वाटा अपरंपार सुखाच्या-वहिवाटीच्या झाल्या...''

कोकण कड्याच्या पहिल्या यशस्वी चढाईपासून ते हिमालयातील तब्बल सोळा हिमशिखरांच्या मोहिमांचा अनुभव असलेला या 'भन्नाट माणसा'नं 'माणूस' घडवायचं काम केलं आणि करत आहेत. हे कळलं तिथं जाऊन आलेल्या एका मैत्रिणीकडून. ती सांगत होती की, १९८९मध्ये साली 'हाय प्लेसेस' या कंपनीची उभारणी झाली. डोंगराळ भागातल्या परिसरात जंगलाला हानी न पोहोचवता तिथं 'हाय प्लेसेस'साठी लागणारी व्यवस्था निर्माण करण्यात आली. 'हाय प्लेसेस' या मॅनेजमेंट ट्रेनिंग कंपनीत कॉर्पोरेट्ससाठीची प्रशिक्षणं होतात. फक्त कॉर्पोरेट्सच नाही तर विद्यार्थी, साहसी ग्रुप्स, शिक्षक, पालक, अधिकारी, व्यावसायिक कोणासाठीही हे प्रशिक्षण अत्यंत आवश्यक आहे. 'गरुडमाची' या आऊटडोअर मॅनेजमेन्ट डेव्हलपमेन्ट सेंटरच्या जागेवर प्रशिक्षण उपक्रमांसोबत पदभ्रमण, प्रस्तरारोहण, राफ्टिंगसोबत विविध साहसी उपक्रम आयोजित केले जातात. इथं अद्ययावत सोयीसुविधांनी-युक्त तंबू उभारण्यात आले आहेत. हिमालयीन ट्रेक्ससोबत सह्याद्रीतील गिर्यारोहणही ते आयोजित करतात. निसर्गाशी बांधिलकी जपणारे अत्यंत साधंसोपं व सौंदर्यदृष्टी जपणारं इथलं आर्किटेक्चर म्हणजे 'हाय प्लेसेस'ची जमेची बाजू. 'हाय प्लेसेस'नं केवळ गरूडमाचीच नाही, तर लेह, लडाखपासून अनेक ठिकाणी प्रशिक्षणं आयोजित केली आणि यशस्वी केली. या प्रशिक्षणामागचा हेतू शारीरिक आणि मानसिक स्तरावर किती आवश्यक आहे हे गरूडमाचीला गेल्यावर लक्षात येतं.

आता खरी कथानकात रंगत येत होती. लिमये यांचं 'भन्नाट'पण 'फेसबुक'वर अनुभवास येत होतं आणि एक दिवस त्यांनी घोषणा केली नव्या पुस्तकाची. हळूहळू एकेएक तपशील अपडेट होत राहिले. आणि मग अवतरला बुक ट्रेलर! 'विश्वस्त'चा बुक ट्रेलर! एका संचिताच्या शोधप्रयत्नातून अस्मिता, सांस्कृतिक आदिबंध यांची आठवण करून देणाऱ्या त्यांच्या 'विश्वस्त' या कादंबरीचा चित्तथरारक प्रवास 'बुक ट्रेलर' या अभिनव प्रयोगातून घडला. आणि त्याच ताकदीनं केलं गेलं पुस्तकाचं प्रकाशनही. त्याविषयी स्वतः लिमये यांनी एके ठिकाणी बोलताना सांगितलं की, ''पुस्तकविक्री, प्रकाशन, वाचन, अभिरुची अशा पुस्तकाशी संबंधित सर्वच घटनांबद्दल हल्ली फार निराशजनक बोललं जातं. उगाचच उदासवाणे सुस्कारे सोडण्याच्या प्रवृत्तीला छोटासा सुखद धक्का देऊन, हे

वातावरण बदलून पुस्तकाविषयी कुतूहल, उत्सुकता, आपुलकी आणि ओढा वाढावा, यासाठी अभिनव प्रकाशन सोहळ्याची कल्पना माझ्या डोक्यात आली. सध्याचा जमाना टेक्नॉलॉजीचा आहे. तरुणाईशी नातं जोडायचं असेल तर त्यांना जवळच्या वाटणाऱ्या, यूजरफ्रेंडली माध्यमाकडं वळणं अपरिहार्यच होतं. सोशल मिडियाद्वारे 'विश्वस्त' अधिकाधिक तरुणाईपर्यंत पोहोचते आहे, याची कल्पना ट्रेलरला मिळणाऱ्या लाइक्सवरून येते आहे.''

मग संधी मिळाली 'विश्वस्त'च्या प्रकाशन सोहळ्याला हजर राहायची. व्यवस्थापनशास्त्र आणि पुस्तकप्रकाशन यांची सुयोग्य सांगड घातलेला तो एक 'भारी इव्हेंट' होता. पुस्तकाचं अभिवाचन, पुस्तकाच्या संपादकांची मुलाखत, लिमये यांची मुलाखत आणि प्रकाशन असा भरगच्च कार्यक्रम होता. 'विश्वस्त'च्या घडणीच्या कहाणीविषयी लिमये यांनी एका मुलाखती सांगितलं की, ''लेखन करण्यापूर्वी आवश्यक ते संशोधन करून, संदर्भ जमवून, पारिभाषिक गोष्टींची संगती लावून, त्यांचा व्यवस्थित अभ्यास करून काम करण्याची माझी पद्धत आहे. त्यामुळे माझ्या लेखनप्रक्रिया वेळखाऊ होतात. 'विश्वस्त'चा लेखनकाळ सुमारे साडेचार वर्षांचा आहे. प्रत्यक्ष लेखनापूर्वी प्रचंड प्रवास करून, संदर्भ शोधून, तज्ज्ञांशी बोलून मगच लेखन केलं आहे. एक गोष्ट आवर्जून सांगायला हवी, माझ्या पहिल्या कादंबरीला उत्तम प्रतिसाद मिळाल्यानं हुरूप आला होता. आत्मविश्वास वाढला होता. माझा प्रत्यक्ष दर्शन, अनुभवावार विश्वास अधिक असल्यानं प्रत्येक ठिकाणी स्वत: फिरून, पाहून, लोकांना भेटून मगच वर्णन केलं आहे... पुढील अनंत पिढ्यांसाठी आपल्याकडं असलेल्या नितांत सुंदर, समृद्ध 'निसर्ग' या ठेवीचे आपण विश्वस्त आहोत, हे भान ठेवणं गरजेचं आहे.'' ते पुढं म्हणाले की, ''मी इंग्रजी साहित्याचा चाहता आहे. तिथं या प्रकाराचं वैपुल्य आहे. अर्थात, तिथं अशा प्रकारच्या लेखनासाठी प्रचंड पूर्वतयारीची परंपराही आहे. मला ती पद्धत आवडते, म्हणून मी ती स्वीकारली आहे. अर्थात मारूनमुटकून थरार असं अजिबात नाही. जे कथाबीज मला सुचलं, ते फुलवताना, विस्तार करताना थरार, रहस्यमयता आपोआप येत गेली.''

आता हातात होती 'विश्वस्त'. वाचत गेले... विचार करत गेले... आजवर महानायक श्रीकृष्णाला वृद्ध रूपात



रेखाटल्याचं वाचलं नव्हतं. कादंबरीच्या सुरुवातीच्या भागातच 'खास लिमयेस्टाईल धक्के' बसायला सुरुवात होते. यातली पात्रं, इतिहासाचे एकेक धागे जोडणाऱ्या JFK टीमविषयी आपुलकी वाटायला लागते. विशेषतः कादंबरी वाचणारे गिर्यारोहक या शोधमोहिमेशी स्वतःला रिलेट करतील हे जाणवलं. टीम JFKचं काय होईल? अपेक्षित यश मिळेल का? असे प्रश्न पडून कथेत अधिकच गुंतायला होतं. विश्वस्तची कथा काल्पनिक असूनही त्यातील इतिहासाचे चित्रांसोबत संदर्भ, नकाशे, ठिकाणांची तपशीलवार माहिती यामुळं सत्य आणि आभासातील रेखा पुसट होऊन जाते नि आपण विश्वस्तच्या राज्यात नांदू लागतो. मात्र त्याच वेळी आठवतं की, प्रकाशन समारंभात डॉ. गो. बं. देगलुरकर यांनी काय सांगितलं होतं... ते म्हणाले होते की, ''ही कादंबरी मला खूप आवडली. कादंबरीत कल्पनेची भरारी आणि प्रतिभेची उत्तुंगता या गोष्टी आहेत, तसंच इतिहासातलं वर्णनही आहे. इतिहास आणि कादंबरीची खरी गोष्ट यांची सरमिसळ फार प्रभावी झाली आहे. मात्र एक धोका वाटतो की, इतिहासाचे अभ्यासक अशा कादंबरीतल्या साऱ्या घटना खऱ्या समजून त्याचे दाखले देतात आणि मग इतिहास बदलण्याचा धोका निर्माण होतो.''

इतिहास ते वर्तमान, भूगोल, उत्खनन, माऊंटेनिअरिंग, गुप्त खजिना, राजकारणातले अंडर करन्ट्स आणि थ्रिल यांचा चपखल वापर करून 'perfectly connecting the dots' असं म्हणता येईल असा या कादंबरीचा आवाका आहे. कादंबरी वाचताना

**विश्वस्तची कथा काल्पनिक असूनही त्यातील इतिहासाचे चित्रांसोबत संदर्भ, नकाशे, ठिकाणांची तपशीलवार माहिती यामुळं सत्य आणि आभासातील रेखा पुसट होऊन जाते नि आपण विश्वस्तच्या राज्यात नांदू लागतो.**



त्रिकोणी कुटुंब – बाळ्या, रेवती, मृणाल

**''मी माझ्यापुरती एक पद्धत ठरवली आहे. जो इतिहास नक्की आहे, त्याचा स्वीकार करूनच तो संदर्भ वापरायचा. जिथं साशंकता आहे, वदंता आहेत, तिथं लेखनस्वातंत्र्य घ्यायचं. जिथं संदिग्धता असते, तिथं कादंबरीकार म्हणून असणारं स्वातंत्र्य मी उपभोगतो. मात्र या साऱ्यामागं शोध घेण्याची प्रेरणाच मूलस्थानी असते.''**

लिमये यांची नुसतीच कल्पनाशक्तीच नव्हे तर सखोल अभ्यासाची जोड, विविक्षित निरीक्षणं आणि वापरलेली अफलातून तर्कबुद्धी पानोपानी जाणवते. त्यामुळं काही तज्ज्ञांच्या मते, यातील भव्य दृश्यांची अभ्यासपूर्ण कथामांडणी असे सिनेमासाठीचे पोषक बीज यात असल्याचे जाणवल्यामुळे चित्रपट होऊ शकेल. प्रकाशन सोहळ्यातली संजय भास्कर जोशी यांची प्रतिक्रिया मार्मिक होती. ते म्हणतात की, ''वसंत वसंत लिमये या अचाट स्वप्नं पाहणाऱ्या आणि त्यासाठी अफाट कष्ट घेणाऱ्या अवलियाबरोबर कोणतेही काम करणं म्हणजे, एक रोलरकोस्टरची राइड असते. कारण झपाटल्यासारखा तो त्या प्रकल्पात झोकून देणारा प्राणी आहे. 'विश्वस्त'नं 'फिलॉसॉफिकल थ्रिलर' हा नवाच प्रकार साहित्यात आणला आहे. कारण या कादंबरीचा गाभा तत्त्वज्ञानात्मक आहे, पण रचना अत्यंत गतिमान अशा थ्रिलरची आहे. मला विचाराल तर यातली पात्रंदेखील निमित्तमात्र आणि प्रातिनिधिक आहेत. महत्त्वाचं आहे ते संस्कृतीच्या निर्मितीतलं विश्वस्त आणि वारसदार यांचं संकल्पनात्मक स्थान.''

खरंतर हे सांगण्याचा माझा अधिकार नाही. पण तरीही सांगावसं वाटतं की, लिमये यांच्या लेखनातली मग ते ललित असो किंवा कादंबऱ्या एक किंचितशी उणी बाजू मात्र जाणवते. ती म्हणजे त्यांनी केलेली तपशीलवार वर्णनं. काही पानांवरचं एखाद्या ठिकाणाचं किंवा एखाद्या पात्राच्या आयुष्यातल्या भूतकाळाचं तपशीलवार लेखन अनेकांना अनावश्यक आणि कंटाळवाणं वाटू शकतं. अधूनमधून येणारी तेवढी पानं चिकाटीनं वाचली तर एकंदर त्यांचं लेखन वाचत राहावंसं वाटतं. पुढच्या आवृत्तींत थोडीशी काटछाट करता आली तर... असो. त्यांच्या कादंबऱ्यांचे नायक चित्रपटांतील नायकांसारखे सर्वगुणसंपन्न नाहीत. ते सामान्य माणसं आहेत. ते चुकतात. त्यांना अपघात होतात, ते जातातही... त्यांच्या ललित लेखनातल्या काही प्रसंगांचा उल्लेख किंवा त्यांचं रेखाटन आपसूक आणि अलगदपणं त्यांच्या कादंबऱ्यांत उतरलेलं दिसतं. हुकुमी शब्दकळा, भावोत्कटता, चित्रमयता, सचित्रता, फ्रेमलाईन ठरवून केलेला कथाविस्तार, योग्य व्यक्तीकडं संदर्भ शोधण्याची हातोटी, जिद्द, चिकाटी, मेहनत, अफाट लोकसंग्रह आदी अनेक गुण या भन्नाट व्यक्तीचे आहेत. लेखक प्रत्यक्षात भेटो अथवा नाही, तो त्याच्या लिखाणातून, विचारांतून कायमच गवसत राहातो. लिमये यांनी एका मुलाखतीत म्हटलं आहे की, ''मी माझ्यापुरती एक पद्धत ठरवली आहे. जो इतिहास नक्की आहे, त्याचा स्वीकार करूनच तो संदर्भ वापरायचा. जिथं साशंकता आहे, वदंता आहेत, तिथं लेखनस्वातंत्र्य घ्यायचं. जिथं संदिग्धता असते, तिथं कादंबरीकार म्हणून असणारं स्वातंत्र्य मी उपभोगतो. मात्र या साऱ्यामागं शोध घेण्याची प्रेरणाच मूलस्थानी असते. विशिष्ट घटना का, कशी, कुठं, कोणत्या संदर्भात घडली असावी, त्यासाठी कोणती परिस्थिती, व्यक्ती कारणीभूत ठरल्या असाव्यात, त्या विशिष्ट घटनाप्रसंगी भोवताल कसा होता, वातावरण कसं होतं, असे प्रश्न मला पडत जातात आणि लेखक म्हणून या प्रश्नांची उत्तरं शोधण्याचाही प्रवास सुरू होतो. शोध चालूच राहतो...'' वसंत वसंत लिमये यांचं 'भन्नाटपण' खरंतर असं शब्दांच्या चिमटीत पकडता येणं कठीण आहे. त्यासाठी आपणही भन्नाट व्हावं लागेल बहुधा... तूर्तास लिमये यांचं 'भन्नाटपण' अनुभवायला हवं. त्यांचा प्रश्नांची उत्तरं शोधायच्या प्रवासात अधिकाधिक 'माणसं घडवली' जावोत, आणखी काही कादंबऱ्यांचा टप्पा येवो आणि त्या आपल्याला लवकरच वाचायला मिळो, या सदिच्छा. आमेन...

**– राधिका कुंटे**
भ्रमणध्वनी : ९८२००८९३७६
kunte.radhika@gmail.com



नाना

वळलं तर सूत...

संपादन आणि शब्दांकन

श्रीकांत गद्रे

# शिदोरी... जशीच्या तशी

**पु**रुषोत्तम करंडक स्पर्धेत अभिनयाचे पारितोषिक पटकावणाऱ्या महाविद्यालयीन युवक-युवतींची बातमी छायाचित्रासह प्रसिद्ध करण्याचा पायंडा वृत्तपत्रांत नवीन नाही. सोनाली कुलकर्णी अशीच 'केसरी'त प्रथम झळकली होती. त्यावर्षी केसरी दिवाळी अंकाच्या मुखपृष्ठासाठी नवीन चेहरा शोधत असताना सोनालीने लक्ष वेधून घेतले. ते त्यावेळी काही कारणाने राहून गेले, पण पुढे महाराष्ट्र टाइम्स आणि लोकसत्तात असताना या दोन्ही दिवाळी अंकांच्या मुखपृष्ठांवर सोनालीच्या मुद्रा उमटवल्या जाऊन कसर भरून काढली गेली. असो, मुद्दा तो नाही, तर त्यावेळी म्हणजे पंचवीसेक वर्षांपूर्वी पोर्टफोलिओ वगैरेची फॅशन एवढी नव्हती. म्हणून एका मित्रामार्फत सोनालीपर्यंत निरोप दिला. एक दिवस भिरभिरत्या नजरेने गायकवाड-वाड्यात जिना चढून वर आलेली सोनाली थेट टेबलासमोर येऊन उभी राहिली आणि स्वतःचे फोटो हातावर ठेवून गेली.

सोनालीची ही पहिली भेट. त्यानंतर महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, प्रहारचे दिवाळी अंक आणि आता रुची मासिक संपादित करीत असताना एक संवेदनशील लेखिका या नात्याने तिची मैत्री अधिकाधिक दृढ होत गेली. लोकसत्ताची व्हिवा पुरवणी तर तिच्या अतिथी संपादकीय कारकिर्दीमुळे आणि सलग तीन वर्षे कसदार लिखाण केलेल्या सो-कुल या तिच्या साप्ताहिक सदरामुळे लोकप्रिय झाली होती. व्हिवाच फक्त नव्हे, इतरत्रही या दोन तपांच्या काळात आपले बहुतांश लिखाण सोनाली विश्वासाने सोपवत राहिली आणि ते



तिच्याच शब्दांत प्रसिद्ध होईल याची खबरदारी घेत गेलो. हे प्रास्ताविक करण्याचे कारण या अंकातील सोबतचा लेख!

रुचीच्या बीएमएम विशेषांकाची आखणी करीत असताना तो डेट्रॉईटच्या तारांकित अतिथींवर केंद्रित झाला. त्यात नाना पाटेकरांवर एक लेख किंवा मुलाखत असावी, असा प्रस्ताव सुदेशने मांडला. अर्थात पहिले नाव आठवले ते सोनालीचे. विशेष म्हणजे वर्ष–दीड वर्षांपूर्वी सोनालीच्या एका नियोजित पुस्तकाच्या संदर्भात तिच्याशी बोलणे झाले होते. तेव्हा नाना (म्हणजे तिचे नाना सर) एखाद्या लेखात मावणारा माणूस नाही, पुस्तकापेक्षा तो ग्रंथाचा विषय आहे, असे ती म्हणाली होती, ते आठवले. तरीसुद्धा तिला विचारणा केलीच. त्यावर अलीकडेच नाना सरांवरच्या एका पुस्तकासाठी आपण एक लेख दिल्याचे तिने सांगितले. वेळ कमी असल्याने तुझी परवानगी असेल, तर तो पुनर्मुद्रित

# माझा लाडका, बेहिशोबी माणूस

**सोनाली कुलकर्णी**

आपल्याला एखाद्या माणसाचं काय काय माहिती असणं आवश्यक असतं? नाव, गाव, जात, परिवार, शिक्षण, पैसा की आख्खा भूतकाळच...? असं मोजायला गेलं तर नाना सरांची फारच जुजबी ओळख आहे माझी. ''ये ना घरी'' ते गोव्यात फिल्म फेस्टिव्हलच्या वेळी एकदा म्हणाले होते. सात-आठ वर्षं झाली... मला फारच स्पेशल वाटलं होतं! ''जेवायलाच ये. घरी जे असेल ते खा...'' त्यांनी तिथल्या स्थानिक ड्रायव्हरला अस्खलित कोकणी बोलीमध्ये पत्ता समजावून सांगितला. दुसऱ्या दिवशी घरी जाताना ड्रायव्हर अरे-तुरे करत म्हणाला, ''इथं राहतो व्हय नाना.. मला वाटलं होतं अमुक अमुक ठिकाणी.''

पोहोचल्यावर आठदहा माणसांनी तोंडभर हसून स्वागत केलं. कुणाचाच चेहरा नाना सरांशी मिळताजुळता नव्हता. एका तरुण मुलाचा मोठा हसरा फोटो भिंतीवर लावलेला होता. तो काही वर्षांपूर्वी अनाकलनीय सहजशा झालेल्या मोटरसायकलच्या अपघातात गेला. उरलेले हे सगळे नाना सरांचे स्नेही... कुटुंबच म्हणा ना! त्यांच्या घरात सर परकेपणा न ठेवता वावरत होते. त्या मुलाबद्दल बोलताना, स्वर ओला होत होता आणि चेहरा विदीर्ण. इतकी वर्षं झाली तरी ते सगळे अजून एकमेकांचं सांत्वन करीत आहेत असं मला वाटलं.



मला आता नाना सरांची भीती वाटत नाही, पण हक्क जरूर वाटतो. त्यांच्यापासून पळून जावंसं वाटत नाही – आणि त्यांच्या दिनक्रमात डोकवावंसंही वाटत नाही. जवळीक मिरवावीशी वाटत नाही – पण भेट झालीच चुकून तर त्या क्षणभंगुर वाटणाऱ्या भावना मात्र साजऱ्या कराव्याशा वाटतात – त्या कृतज्ञतेच्या, आपुलकीच्या असतात.

स्वत:ला खूप रफ अ‍ॅण्ड टफ मानतात ते... त्यांची प्रतिमा पण तशी रांगडीच वाटते आपल्याला. एक बेदरकार... मनस्वी माणूस... पण जरा आत डोकावून पाहिलं तर लक्षात येतं की मऊ... भुसभुशीत... गारवा जपणारी... जराही प्रयत्न न करता फळणारी कूस असलेली – काळी माती आहे इथे. ह्या-त्या कारणावरून वाघोबासारखी डरकाळी फोडतात, रुसून बसतात... पण मूळ मुद्दा अपार माया जमेल तिथे सांडत बसण्याची इच्छा – हाच आहे.

करू का, असे विचारले आणि तिनेही लगेच सूत्रे हलविली. पुस्तक, त्याचा संपादक, प्रकाशक वगैरेबाबत त्यावेळी काहीच बोलणे झाले नाही. पण दोन-चार दिवसांत एक फोन आला.

'मी श्रीकांत गद्रे... (थोडं थांबून) ओळखलं का? टीएचा...' थिएटर अॅकॅडमी म्हटल्याबरोबर भगतचा चेहराच डोळ्यांसमोर आला. बोलणे झाले. थोड्याच वेळात तो स्वतःच भेटायला आला. हातात एक देखणे कॉफी टेबल पुस्तक. त्यावर नानाचे रेखाचित्र. पाने उलगडताना एक जबरदस्त नाना पाटेकर डोळ्यांपुढे येत गेला. एक हत्ती सात आंधळ्यांना वेगवेगळ्या रूपांत दिसावा, तसा... अनेकांनी चाचपून, अनुभवून पाहिलेला.

थोडे मागे येऊन, पहिल्या डावीकडच्या पानावर नजर टाकली.



ज्या क्षेत्रात आम्ही आहोत तिथे छक्के-पंजे, घराणेशाही, पैसा, गुडबुक्समध्ये राहणे, मर्जी राखणे, व्यवहारचातुर्य, नजाकतदार अफेअर्स, एखादा फुसका बार पण दिमाखात मिरवण्याची अहमहमिका - ह्या सगळ्याची रेलचेल आहे. कित्येकांची कारकीर्द ह्या मुद्द्यांवर तगली आहे, यशस्वीसुद्धा झाली आहे. अशा वातावरणात अस्सल मराठमोळं नाव आणि व्यक्तिमत्त्व असलेला हा मध्यमवर्गीय माणूस आला कसा, टिकला कसा, झळकला कसा आणि गेली अनेक वर्षं ध्रुवताऱ्यासारखा दीप्तिमान स्थान कसा जपत राहिला, ह्याचं मला कायम अतिशय कुतूहल वाटतं.

'टॅक्सी नं. ९२११', 'देऊळ' आणि 'डॉ. प्रकाश बाबा आमटे' असे एकाहून एक अविस्मरणीय चित्रपट आम्ही एकत्र केले. 'टॅक्सी'च्या वेळी माझी तेवढी ओळख नव्हती - धाकच होता त्यांचा जास्त. पण त्यांची जात फार दुर्मीळ कलावंताची आहे. ज्यात सहकलाकारांना 'अरे'ला कारे म्हणण्याची मुभा ते देतात किंवा त्याचं ट्रेनिंगसुद्धा देतात असं म्हटलं तर वावगं ठरू नये. त्यांना मिळमिळीत, मतं नसलेले, लाळ घोटणारे मित्र आवडत नाहीत. गेल्या बारा-तेरा वर्षांत मी तरी त्यांची ठरावीक चौकडी पाहिलेली नाही - त्यांना टाळी देणारी किंवा त्यांच्या सामान्य वाक्यांना वाहवा म्हणणारी, फेकिलवाण्या विनोदांना फिदीफिदी हसण्याचा अभिनय करणाऱ्या पित्त्यांची! अनेक स्टार असं कोंडाळं चक्क पोसतात. कारण स्वतःच्या सर्व्हाइव्हलसाठी, आत्मविश्वास कायम ठेवण्यासाठी तो त्यांच्या जगण्याचा एक अविभाज्य घटक होऊन बसतो.



नाना सर अविरतपणे नवा गडी नवा राज खेळतात. हिंदी भाषिकांचा प्रभाव असलेल्या ह्या चित्रपटसृष्टीत ते पाय रोवून उभे आहेत. सह्याद्रीच्या रांगांसारखे. त्यांनी कोणाचेही अनुकरण कधीच केलं नाही तर ते आवर्जून उद्दामपणे नाकारलं. इतर कुठल्याही आभूषणांपेक्षा अभिनय हा एकमेव दागिना त्यांनी कवचकुंडलांसारखा अंगीकारला. त्याच्या फाइन ट्युनिंगसाठी ते न लाजता स्वार्थी होतात. आधाशासारखे स्वतःचं काम अधिकाधिक चांगलं करतात. पण ते सहकलाकारांकडून वेड्यासारख्या अपेक्षा करतात. प्रत्येकानं चांगलं काम करावं - ह्याचा हट्ट धरतात.



नाना.. वळलं तर सूत...
संपादन आणि शब्दांकन : श्रीकांत गद्रे,
प्रकाशक : सौ. मुग्धा सागर कोपर्डेकर,
इंद्रायणी साहित्य,
मुखपृष्ठ : यशवंत देशमुख,
मांडणी-सजावट : शेखर डेरे
मूल्य : ८०० रुपये वगैरे...

श्रीकांत एकीकडे बोलत होता. 'प्रकाशन होईल काही दिवसांत...'

'नाना अमेरिकेतून आल्यावर की आधी?' या प्रश्नावर-

'छे, छे, नाना या पुस्तकाच्या प्रकाशनाला येणारच नाहीये. ती जाहिरातबाजी वाटते त्याला...'

हे उत्तर ऐकल्यावर खाड्कन जाणीव झाली की, हा

स्वतःच्या स्टारपणाच्या भूमिकेत कधी नसतानाच काम करताना, तुमच्या कामाबद्दल स्वतःचं मत फार मृदूपणे मांडतात. तेही तुमच्याकडेच! कुणाच्या पाठीमागे कुचुकुचु बोलत गॉसिपिंग करण्यापेक्षा एक निर्मळ स्मित हासडून विषय संपवतात. मला आमच्या सिनेमांमधले कितीतरी सीन आठवतात, जेव्हा ते माझा शॉट चांगला व्हावा म्हणून ताटकळत उभे राहिले आहेत. ह्या वागण्यातली सुंदरता ही की – मला कधीच, नाना पाटेकर मला क्यू देत उभे आहेत – ह्याचं प्रेशर आलेलं नाही. असं प्रेशर इतरांना कधीही न देऊ करणं – हा माझ्या लाडक्या माणसाचा लाखमोलाचा गुण.

विविध सामाजिक कारणांसाठी मॅरेथॉन धावणारे हजारो लोक आहेत – पण नाना सर मला खऱ्या अर्थानं बाबा आमटेंचा सुपुत्र वाटतात. त्यांनी तो वसा घेतलाय... किती मूक पद्धतीनं त्यांच्या सिनेमांचे चेक आनंदवनात गेलेत. नेमबाजीत करिअर करू पाहणाऱ्या खेळाडूंच्या प्रशिक्षणात गेलेत. अचानक भलत्याच ठिकाणी एखाद्या माणसाची भेट होते... तो म्हणतो, नानासाहेबांनी पैसे दिले त्यावेळी म्हणून वाचलो. सिनेमाच्या सेटवर तर कितीजणांची शिक्षणं-लग्नं, आजारपणं ह्यांनी केली असतील त्याला सीमाच नाही. द्रौपदीच्या थाळीसारखा आहे त्यांचा खिसा... आणि त्या खिशाला कायमस्वरूपी चांगलं भलंमोठं भोक पडलंय.

एकदा डोनेशन देऊन मोठं होऊ पाहणारे अनेक आहेत. स्वतःची सामाजिक कळकळ कॅमेऱ्यात टिपणारेही अनेकजण आहेत – मला वाटतं, नाना सरांना लोकसेवेचं व्यसन आहे! त्यांना मातीची आस आहे. त्यांना तीव्र देशाभिमान आहे. दहा वर्षांपूर्वी ते सैन्याच्या छावणीत भरती झाले होते. म्हणजे खरे खरे. त्यासाठी त्यांचा राष्ट्रपतींच्या हस्ते गौरव झालाय. त्यांना मानचिन्ह मिळालंय सरकारचं. हे कितीजणांना माहिती असेल? मला तर अनेकदा त्यांची पीआर आणि सोशल मीडिया मॅनेजर व्हावंसं वाटतं. त्यांचं काम जगभर पोहोचवावंसं वाटतं. कारण त्यांचं काम आणि मन ह्याचं अद्वैत आहे. काम पोहोचलं तर मन पोहोचणारच.

मी कितीतरी आख्यायिका ऐकते त्यांच्या विक्षिप्तपणाच्या, वागण्याच्या. काही माणसांना त्यांचे किस्से सांगून हिरोपणा मिळवायचा असतो. पण नाना सर



नाना !... इतरांपेक्षा वेगळा.

त्याचवेळी 'गुंड नाना' या शीर्षकाच्या लेखावर नजर गेली. नाव होते, किशोरी आमोणकर! वडिलांच्या प्रेमाला पारखे असलेली ही महान कलावंत रांगड्या नानामध्ये आपला बाप शोधते आणि दृष्टी चित्रपट पाहताना किशोरींची आलापी ऐकून ढसढसा रडणारा नाना त्याच अवस्थेत 'ताई'शी फोनवर बोलत राहतो...

अशी एकसे एक सरस शब्दचित्रे आणि अशी दोन-अडीचशे पाने...

श्रीकांतच्या शब्दांत म्हणजे, आठवणींची शिदोरी!

त्यात सोनालीची शिदोरी पाच पानांची आणि श्रीकांतच्या कवितावजा शिदोरीनंतर येणारे शेवटचे पान अवघ्या चारच ओळींचे... नीलकांतीचे. हीपण एक कविताच.

यापैकी सोनालीने तिच्या लेखाच्या पुनर्मुद्रणाची



त्या वळणाला कधीच ओलांडून आले आहेत. ते रोज नव्याने फिनिक्स पक्षी होतात. 'प्रकाश आमटे' सिनेमाच्या प्रमोशनला त्यांच्याभोवती उडालेली झुंबड पाहताना मला आठवायचे अनेक वेदनादायी प्रसंग – जे त्यांनी आंजारून गोंजारून काळजाच्या मखरात बसवले आहेत. त्याबद्दल कटुता नाही – अपार दुःख आहे. आमच्या हेमलकसाच्या शूटिंगच्या वेळी त्यांचा जवळचा भाऊ गेला. आम्ही युनिटमधले सगळे – बिचकत-बाचकत भेटावं की नाही – काय बोलावं – ह्या धाकधुकीत होतो. प्रॉडक्शनला वाटलं, आता शेड्युल रद्द होणार. सर तंद्री लागल्यासारखे त्या भावाबद्दल स्वगत म्हणत राहिले. बालपण, आठवणी, सोबत, कष्ट, कशाकशाबद्दल डोळ्यांतून पाणी झरत होतं... तेही त्यांच्या डोळ्यांनाही माहिती नसावं अशा पद्धतीनं. बराच वेळ बोलत राहिले. मी विचारलं, ''तुम्ही जाता ना मुंबईला?'' ते म्हणाले, ''काय करू जाऊन? माझा भाऊ तर नसणारच. त्या क्रियाकर्माचं काय करू? झालं संपलं...''

ही विरक्ती फार तीव्रतेनं भरली आहे त्यांच्यात – आणि तितकीच जगण्याची आसक्ती. हा विरोधाभास फार खोल आहे. गंभीर आहे. ते अतिशय तरल कवी आहेत. वन फाईन डे फोन करतात – आहेत का दोन मिनिटं विचारतात... आणि स्वतः लिहिलेलं काहीतरी वाचून दाखवतात. त्यात मी न पाहिलेलं त्यांचं शेतावरचं घर असतं, त्याच्याजवळचं झाड असतं. त्याचं एक वाळलेलं पान सरांशी हितगूज करायला आलेलं असतं... अशा क्षणांना शरणच जावंसं वाटतं. भाग्यवान वाटतं – की आपली ह्या दिमाखदार, भोळसट, अरेरावीचा शुद्ध आव आणणाऱ्या, ढसाढसा रडताना मरून जाईल की काय असं वाटणाऱ्या, चिंतनशील, उदात्त, मजेदार माणसाशी ओळख आहे.

किती डायनॅमिक असावं ह्याला काही मर्यादा? स्वतः स्वयंपाक करून इतरांना खाऊ घालण्यात किती आनंद मिळावा ह्यांना... मी फार कमी नॉनव्हेज खाते... पण नाना सरांच्या हातच्या कोलंबीला कशाचीच सर नाही. भाजी चिरणं, साबुदाण्याच्या खिचडीतलं तूप-जिरं, लहान मुलांसाठी त्यांच्या खोलीत असणारा सुका-मेवा ह्याबद्दल ते फार दक्ष असतात. तितकेच सजग फिटनेसबद्दल – लोकांनी फिट राहावं ह्याबद्दलही आग्रही असतात. चार लोकांत घालूनपाडून बोलत वरमायला लावतात. पण आजतागायत मी कधीच त्यांची जिमबद्दल मुलाखत वाचलेली नाही – त्यांचा वर्कआउट कधी पेपरात छापलेला पाहिला नाहीये. तसंच इतक्या वर्षांत कधी त्यांना बरं नव्हतं, आजारी पडलेत... असंही कधी कानावर आलं नाही. इतकी वर्षं सातत्यानं फिट राहणारा हा माणूस हिरो आहे, लेखक-कवी आहे, नेमबाज आहे, सैनिक आहे, शेतकरी आहे, महाभारतातला दानशूर कर्ण आहे, बल्लवाचार्य आहे. रसिक-श्रोता-प्रेक्षक आहे.

बिनशर्त परवानगी दिलीच. शिवाय श्रीकांतची शिदोरीपण अमेरिकेतील मराठी माणसांपर्यंत पोहोचवावी, असे वाटले. म्हणून प्रकाशकांची परवानगी मागण्यासाठी फोन केला. त्यांनीही ती दिली आणि लेख जसाच्या तसा पुनर्मुद्रित करावा, अशी अपेक्षाही व्यक्त केली. सोनालीचा लेख प्रत्यक्ष कंपोज करण्यापूर्वी मनात आले, शब्द जसेच्या तसे पुनर्मुद्रित होतील, पण या पुस्तकातील मांडणी-सजावट कशी वाचकांना कळणार?

या प्रश्नाचे उत्तर म्हणजे, ही पाने... जशीच्या तशी पुनर्मुद्रित केलेली...

एका देखण्या पुस्तकाची नुसती झलक...

**- आल्हाद गोडबोले**
भ्रमणध्वनी : ९५९४५४४८८८
alhadgodbole@gmail.com




उत्तम वाचक आहे, चित्रकार आहे, जगन्मित्र आहे, कुटुंबवत्सल आहे, एककल्ली आहे आणि तरी माणसांचा लोभी आहे... फार फार हवाहवासा आहे.

ते माझं बाळ बघायला आले होते. दुपट्यात गुंडाळलेल्या दीड-दोन वितीच्या माझ्या मुलीला जोजवतानाचा एक गोंडस फोटो आहे माझ्याकडे! रिक्षानी आले होते! माझ्या नवऱ्याने खूप आग्रह केला - परत जाताना तरी कारनी सोडतो म्हणून. पण हे रिक्षावाल्याला खाली थांबवून आले होते - तो अनोळखी रिक्षावाला युगानुयुगे अर्जुनाचं सारथ्य करत असल्याच्या चेहऱ्याने मीटर वेटिंग ठेवून थांबला होता. सर त्या रिक्षानेच परत गेले. प्रत्येक वेळी ते जातात तेव्हा एक धूसर ढग माझ्या डोळ्यांत उतरतो आणि भरून भरून येतो.

कुणी माझी काळजी घ्यायची गरज नाही - अशा आविर्भावात साळिंदरासारखे फिस्कारलेले असतात सदैव... पण इतर कुणावर मायेची पाखर नाही - झडप घालायला तितकेच आतुर आणि तत्पर असतात... मला ते महिनोन्महिने भेटत नाहीत - आणि शूटिंगच्या दरम्यान तासन्तास भेटतात... ते सगळं तसंच त्यांच्यासारखं बेहिशेबी ठेवावंसं वाटतं... अमिताभ बच्चननी त्यांना पाठवलेला कौतुकाचा पुष्पगुच्छ आपणच अंगी लावून घेतो - हे अळवाच्या पानासारखे असतात. पण कुठे कुठली गरीब, साधी माणसं असहाय असलेली दिसली की तळमळून व्याकूळ होतात...

आई आहे तोपर्यंत गणपती आणणार असं म्हणतात, तेव्हा माझ्याच छातीत धस्स् होतं. दुःख तरी किती भोगलं असेल, अपमान तरी किती साहले असतील - म्हणून आयुष्य अशी भरभरून भरपाई करत आहे... ह्या विचारानं आपण गळ्यात आलेला आवंढा दाबत असतो - आपल्याला वाटणारी काळजी त्यांना कळू नये ह्या बेतानं.

* * *

*With Best Compliments From*

**M/s HBL Power Systems Ltd.,**

Vashi
Navi Mumbai

*With Best Compliments From*

**J. K. WADHWA & COMPANY**

MFG.. OF : DEODARANT CUBES • LIQUID DETERGENTS • AM ONIAALUM • SOAP SOFT

- ISI SULPHURIC ACID BATTERY GRADE CONCENTRATED
- ISI HYDROCHLORIC ACID TECHNICAL GRADE
- ISI ALUMINA FERRIC GRADE 1,2 AND 4

REGD. OFF.: E-402, YOJANA CHS LTD., NATWAR NAGAR, ROAD NO. 5, JOGESHWARI (EAST), MUMBAI-400 060
HARSH WADHWA MOBILE : 98200 83815 9819583815
E-mail : harsh@wadhwachem.com
Website : www.wadhwachem.com

*With Best Compliments From*

**M/s Devharsh Infotech Pvt. Ltd.**

16, Samrat Mill Compound,
L.B.S. Marg, Vikhroli (West),
Mumbai-400 079
Phone : 91-22-2577 49 11, 66022000
Fax : 6602 2020

*With Best Compliments From*

**M/s R.K. Engineering Corporation**

98, Narayan Dhuru Street,
Office No. 303, K.K. Arcade,
Mumbai-400003.
Tel.: 022 2343 8667 / 23436273
Fax : 23401561

# पडद्यावरचे खरे हिरो...

**अपर्णा पाटील**


**'सचिन अ बिलियन ड्रीम्स' आणि 'दंगल' या दोन्ही फिल्म एकाच वेळी याव्यात, आणि त्यांना चाहत्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळावा, हा भारतीय सिनेमा आणि खेळ या दोन्हीसाठी एका वेगळ्या वाटेवरचा प्रवास ठरणार आहे.**


**स**चिन : अ बिलियन ड्रीम्स ही मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर याच्या आयुष्यवरची फिल्म नुकतीच प्रदर्शित झाली. त्याला बायोपिक म्हणता येणार नाही. त्याला डॉक्युड्रामा म्हटलं जातं. डॉक्युमेंटरीवजा सिनेमा असा काहीसा हा प्रकार. अशा प्रकारचा हा सिनेमा भारतीय प्रेक्षकांना आवडेल, असं वाटलं नव्हतं. कारण एखादी डॉक्युमेंटरीवजा फिल्म लोक थिएटरला जाऊन पाहतील,असा प्रयोग आजवर भारतीय दिग्दर्शकांनी फारसा केलेला नाही. शिवाय जेव्हा तो केला तेव्हा प्रेक्षकांनी त्याच्याकडे पाठ फिरवली आहे. सचिनवरच्या फिल्मला मिळालेलं यश मात्र अफलातून म्हणावं असंच आहे. खेळावरचे सिनेमे चालत नाही, ही आजवरची खंत जशी गेल्या काही वर्षांत दूर झाली आहे,तसा डॉक्युड्रामा हा प्रकार भारतीयांना रूचणार नाही, हा समजही या सिनेमाने दूर केला आहे.

सिनेमामध्ये वेगवेगळे प्रयोग होऊ लागले असताना 'सचिन : अ बिलियन ड्रीम्स' यासारखी फिल्म करणं




हेच मोठं आव्हान म्हणता येईल. कारण भारतात अशा आव्हानांना फारशी संधी मिळत नाही ते अशा प्रयोगांना मिळालेल्या अपयशामुळेच. 'शालिमार' या गाजलेल्या चित्रपटाचे दिग्दर्शक शाह कृष्णा यांनी १९७९मध्ये डॉक्युड्रामा या प्रकारातील फिल्मचा प्रयोग प्रथमच हिंदीत केला होता, तो सिनेमा सिनेमा या नावीन्यपूर्ण नावाने. दोन वर्षांच्या अथक मेहनतीनंतर भारतीय सिनेमांच्या वाटचालींचा आढावा घेणारी ही फिल्म तयार केली होती. सत्तरच्या दशकातील प्रचंड लोकप्रिय कलाकारांना त्यात सामावून घेतलं होतं. अमिताभ बच्चन, हेमामालिनी,धर्मेंद्र आणि झीनत अमान अशी स्टारकास्ट आहे, असं जाहीर करून या फिल्मविषयी खूप उत्सुकता निर्माण केली होती.तो डॉक्युड्रामा त्यांनी थिएटरमध्ये व्यावसायिक सिनेमाप्रमाणे प्रदर्शित केला होता. सिनेनिर्मितीच्या अनेक बाबींविषयी अत्यंत वेधक आणि माहितीपूर्ण असलेल्या या डॉक्युड्रामाकडे लोकांनी मात्र पाठ फिरवली होती. त्यानंतर पुन्हा एकदा पडद्यावर फिल्म ही है या नावाचा डॉक्युड्रामा लोकांसमोर आणला गेला. विशेष म्हणजे हाही सिनेसृष्टीचा आढावा घेणारा सिनेमा होता. त्यात अनेक प्रदर्शित न झालेल्या सिनेमांची माहिती आणि चित्रपटांमध्ये समाविष्ट झालेली दृश्ये होती. संदर्भमूल्याच्या दृष्टीने






**भारतीय सिनेमा एका नव्या वळणावर उभा आहे. या सिनेमाला आता मनोरंजन करणारी गाणी किंवा स्वप्नदृश्यांपेक्षा खऱ्या आयुष्यातला थरार जास्त खुणावू लागला आहे. अशा प्रकारच्या सिनेमांकडे वळण्याचं सगळ्यात मोठं कारण आहे ते म्हणजे, परदेशी चित्रपटांची सरसकट नक्कल करणं आता शक्य नाही.**

अत्यंत महत्त्वाची म्हणावी अशी ती फिल्म ठरली असती. परंतू ती बनवताना काही गफलती, चुका झाल्या. त्यामुळे तोही प्रयोग लोकांना आवडला नाही. या कारणांमुळे किंवा व्यावसायिक सिनेमांच्या प्रेमात असल्यामुळे आपल्याकडे अशा प्रकाराकडे कोणी फारसं वळलं नाही. परदेशात डॉक्युड्रामा खूप यशस्वी ठरत असतानाही भारतात व्यावसायिक यश मिळावं, यासाठी असे प्रयोग करण्याचामार्ग निवडलेला नाही. मात्र 'सचिन : द बिलियन ड्रीम्स'चा प्रयोग धाडसी तर ठरलाच शिवाय लोकांनी तो उचलूनही धरला. हे यश भविष्यात सत्यघटनांवर आधारित डॉक्युड्रामांसाठी वेगळी वाट तयार करून देणारं ठरलं आहे.

सध्या भारतीय सिनेमा एका नव्या वळणावर उभा आहे. या सिनेमाला आता मनोरंजन करणारी गाणी किंवा स्वप्नदृश्यांपेक्षा खऱ्या आयुष्यातला थरार जास्त खुणावू लागला आहे. अशा प्रकारच्या सिनेमांकडे वळण्याचं सगळ्यात मोठं कारण आहे ते म्हणजे, परदेशी चित्रपटांची सरसकट नक्कल करणं आता शक्य नाही. तसं केलं तर परदेशी निर्मात्यांकडून आपल्या दिग्दर्शकांची चोरी पकडली जाऊन कायदेशीर गुंतागुंती वाढू शकतात. दुसरं असं की, दिग्दर्शकाने केलेली चोरी आता इंटरनेटमुळे सहज उघड होऊ शकते. अगदी आगामी चित्रपटाची कथा नुसती चार-पाच ओळीत जरी समजली, तरी ती नेमकी कोणत्या देशातल्या, कोणत्या चित्रपटावरून घेतली आहे, हे चाक्षाण प्रेक्षकांना अवघ्या काही मिनिटांत कळू शकतं. त्यामुळे आपल्याच देशातल्या कथा शोधण्याची गरज दिग्दर्शक, कथालेखकांना भासू लागली आहे. अशावेळी सर्वसामान्यांना थेट सिनेमागृहात खेचून नेऊ शकतील, पण त्यांच्यातील एक वाटतील, अशा असामान्य व्यक्तिमत्त्वांचा शोध घेणं सुरू झालं आहे. त्यानिमित्ताने इतिहासातली पाने शोधण्याचा, त्यातल्या दुर्लक्षित व्यक्तिमत्त्वांच्या आयुष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न मोठ्या संख्येने होऊ लागलाय.

अर्थात हे काही आत्ताच होतंच,असं नाही तर अगदी सिनेमाच्या निर्मितीच्या सुरुवातीपासूनच इतिहासातील महनीय व्यक्तींच्या आयुष्यावरचे सिनेमे आपल्याकडे काढले गेलेत. अगदी छत्रपती शिवाजी महाराजांवर जसे चित्रपट आले, तसे 'बहिर्जी नाईक', 'बाजीप्रभू देशपांडे', 'नेताजी पालकर' यांच्या आयुष्यावरचे चित्रपट मराठीत आले. तर हिंदीमध्येही शहाजहान,अकबर या मुघल राजांच्या आयुष्यावरील विशिष्ट घटनांना रूपेरी पडद्यावर स्थान मिळालं. 'डॉ. कोटणीस की अमर कहानी', 'मोहित्यांची मंजुळा' यासारखे चित्रपट असामान्य व्यक्तिमत्त्वाच्या पण लोकांच्या विस्मरणात गेलेल्या व्यक्तींचा जीवनपट लोकांसमोर खुला करण्याचं काम करतच होते. आता मात्र अशी माणसं मोठ्या संख्येने शोधण्याची गरज जास्त भासू लागली आहे, इतकंच.

हिंदी सिनेमांचा इतिहास पाहता चित्रपट हा नुसताच मनोरंजनाचा पसारा कधीच नव्हता. त्यात प्रबोधनापासून ते चरित्रपटांपर्यंत सगळे प्रकार आणि प्रयोग केले आहेत. पण बायोपिक म्हटलं की राजकीय नेते असा मर्यादीत पायंडा पडला गेला. वास्तवाचा अनुभव देणारे चित्रपट








म्हणजे राजकीय नेत्यांचा आयुष्यपट, असा साचेबंद विचार ठाम झाला.शिवाय अचूक इतिहास आणि लार्जर दॅन लाइफ अशी व्यक्तिमत्त्व पडद्यावर मांडणं, ही काही दिग्दर्शकांची महत्त्वाकांक्षामानली गेली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नेताजी सुभाषचंद्र बोस, सरदार वल्लभभाई पटेल, भगत सिंग, लोकमान्य टिळक ही त्याची ठळक उदाहरणं म्हणता येतील. मात्र राजकीय पार्श्वभूमी असलेल्या व्यावसायिक चित्रपटांच्या निमित्ताने उठलेल्या वादांना मोठा इतिहास आहे. तो वाद अगदी 'आंधी'पासून ते 'इन्कलाब', 'बॉम्बे', 'मद्रास कॅफे', 'सरकार' असा दीर्घकालीन आहे. त्यामुळे आपल्याकडे अशा चित्रपटांना हात घालण्यापेक्षा घटकाभर मनोरंजन या जुजबी अपेक्षेला खूप जास्त महत्त्व सिनेमांतून मिळत गेलं. तरीही वेगळ्या चित्रपटांचे प्रयोग नियमितपणे होत राहिले. पण त्याला यश मिळालं नाही, जे आज शक्य झालं आहे. त्यामुळेच रिअल लाइफ हिरो ही यशस्वी चित्रपटाची भक्कम बाजू झाली आहे.

भारतीयांवर सगळ्यात जास्त प्रभाव आहे, तो राजकारणाचा. त्यानंतरचा क्रमांक लागतो तो खेळाचा. पण सिनेमांत हे दोन्ही विषय उपेक्षितच राहिले. राजकारण हा विषय जसा सिनेमातून वादांमुळे वळगला गेला, तसा खेळांवरील सिनेमांना मिळालेल्या अपयशामुळे खेळ हा विषय बाद ठरला. भले भारतात खेळ आणि खेळाडू हे राजकारण आणि राजकारणी यांच्याइतके लोकप्रिय आणि देवानंतर श्रद्धा ठेवण्याइतके नशीबवान असले तरी खेळावरच्या सिनेमांना वारंवार उपेक्षा सहन करावी लागली. त्यामुळेच संपूर्णत: खेळाला वाहिलेल्या भारतीय सिनेमांची संख्या ही अगदी मामूली ठरावी अशीच आहे. परदेशात जसे फुटबॉल आणि बेसबॉलवरचे असंख्य चित्रपट आले तसे आपल्याकडे क्रिकेटवर सर्वाधिक प्रेम असूनही त्यावरील सिनेमे फार आले नाहीत. जे आले, तर त्याला यशही फार मिळालं नाही. त्यामुळे अगदी क्रिकेटवरचं प्रेम उघडपणे दाखवणारे अभिनेते, दिग्दर्शकही संपूर्णपणे खेळाला वाहिलेला सिनेमा करणं टाळत होते. मात्र सिनेमात खेळाला विशेषतः क्रिकेटला मिळालेल्या स्थानाची दखल घेण्यासाठी काही दशकं मागे जावं लागेल.

देव आनंदची प्रमुख भूमिका असलेल्या 'लव मॅरेज'पासून खेळावरील चित्रपटांची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. दिग्दर्शक सुबोध मुखर्जी यांनी १९८३मध्ये हा सिनेमा केला. त्यातला नायक लोकप्रिय क्रिकेटर असल्याचं दाखवण्यात आलं होतं. त्याचं नावही सुनील कुमार होतं, जे त्यावेळी लोकप्रिय क्रिकेटकर सुनील गावसकर यांच्या नावावरून घेतल्याची दाट शक्यता आहे. याच चित्रपटात प्रमुख भूमिका करणाऱ्या देव आनंद यांनी 'अव्वल नंबर' दिग्दर्शित करून संपूर्णतः किक्रेटला वाहिलेला पहिला सिनेमा काढला. आमीर खानची प्रमुख भूमिका असलेला तो चित्रपट साफ आपटला होता. त्याच आमीर खानने पुढे लगानमध्ये प्रमुख भूमिका करून खेळावरच्या सिनेमाला एक वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवलं. भारतातील क्रिकेट स्पर्धांच्या निमित्ताने वर्षाला किमान एक या सरासरीने क्रिकेटवरचा सिनेमा येत राहिला. क्रिकेट खेळ म्हणून जरी तमाम भारतीयांचा धर्म असला तरी 'ऑल राऊंडर', 'स्टम्प्ड', 'इक्बाल', 'से सलाम इंडिया', 'हॅटट्रीक', 'चेन कुली की मेन कुली', 'मीराबाई नॉट आऊट', 'व्हिक्टरी', 'वर्ल्ड कप २०११' या चित्रपटांकडे प्रेक्षकांनी चक्क पाठ फिरवली. त्यातल्या त्यात 'दिल बोले हडिप्पा', 'फेरारी की सवारी' आणि अगदी अलीकडचा 'पतियाला हाऊस' या सिनेमांचं यश वेगळं ठरलं. नुसतं क्रिकेटच नाही तर त्यात घुसलेल्या बेटिंगसारख्या विषयावरील जन्नतला यशही मिळालं. पण

**भारतीयांवर सगळ्यात जास्त प्रभाव आहे, तो राजकारणाचा. त्यानंतरचा क्रमांक लागतो तो खेळाचा. पण सिनेमांत हे दोन्ही विषय उपेक्षितच राहिले. राजकारण हा विषय जसा सिनेमातून वादांमुळे वळगला गेला, तसा खेळांवरील सिनेमांना मिळालेल्या अपयशामुळे खेळ हा विषय बाद ठरला. खेळावरच्या सिनेमांना वारंवार उपेक्षा सहन करावी लागली. त्यामुळेच संपूर्णत: खेळाला वाहिलेल्या भारतीय सिनेमांची संख्या ही अगदी मामूली ठरावी अशीच आहे.**







> **'चक दे इंडिया' या सिनेमामुळे महिला हॉकी संघाचे प्रशिक्षक मीर रंजन नेगी यांची कामगिरी लोकांसमोर आली. नुसते खेळाडूच नाही तर रिअल लाइफ हिरो ही संकल्पना या सिनेमाने यशस्वी केली. त्यामुळे 'मेरी कोम' हिचा बॉक्सर म्हणून आयुष्यातील संघर्ष पडद्यावर मांडला गेला. फरहान अखतरचा 'भाग मिल्खा भाग' सिनेमा अप्रतिम म्हणावा असाच होता. या सिनेमात मिल्खा सिंग यांची कहाणी मांडली गेली.**

आशुतोष गोवारीकर यांच्या 'लगान'पर्यंत जे-जे चित्रपट आले, ते पायचीत झाले. हे अपयशच खेळावरचे सिनेमे न करण्याचं कारण ठरलं होतं.पण क्रिकेटवरचा सिनेमा यशस्वी होतो, एवढंच नाही तर थेट ऑस्करपर्यंत धडक मारू शकतो, हे 'लगान'ने दाखवून दिलं. एकीकडे खेळावरच्या सिनेमांना जरी यश मिळालं नसलं तरी भारतीय सिनेमा आणि क्रिकेटचं नातं खूपच घट्ट राहिल्याचं दिसून आलं आहे. त्यामुळे अनेकदा क्रिकेटची मॅच सिनेमात असते, तर क्वचित प्रसंगी खुद्द क्रिकेटर या सिनेमाचा भाग असतात. सुनील गावसकर, सलीम दुर्रानी, संदीप पाटील, कपिल देव, अजय जडेजा, विनोद कांबळी, सलिल अंकोला, संजय मांजरेकर, निखील चोप्रा आदी भारतीय खेळाडूंनी आणि त्याचबरोबर क्लाइव्ह लॉइड ते ब्रेट ली याच्यापर्यंत अनेक परदेशी खेळाडूंनीही हिंदी सिनेमात चक्क भूमिका केलेल्या आपण पाहिल्या आहेत. सुनील गावसकर आणि संदीप पाटील यांनी तर व्यावसायिक चित्रपटांत प्रमुख भूमिका केल्या आहेत. सुनील गावसकर यांनी 'सावली प्रेमाची', 'झाकोळ' या मराठी सिनेमांत काम केलंय तर संदीप पाटील 'कभी अजनबी थे' चित्रपटात नायक होते. मालामाल या नसीरुद्दीन शहांची प्रमुख भूमिका असलेल्या चित्रपटामध्ये सुनील गावसकर ही अत्यंत महत्त्वाची व्यक्तिरेखा होती. तर कपिल देव हे दयाल निहलानींच्या 'कर्मयोद्धा'मध्ये चमकले होते. सलीम दुर्रानींनी 'चरित्र' तर अजय जडेजाने 'खेल-नो ऑर्डिनरी गेम', विनोद कांबळी 'अनर्थ', सलिल अंकोलाने 'कुरुक्षेत्र' चित्रपटात भूमिका केल्या. मात्र या खेळांडूची पडद्यावरची इनिंग यशस्वी ठरली नाही. मात्र क्रिकेट सिनेमाचा पडदा अनेकदा व्यापत राहिला. 'मि. इंडिया', 'हम आपके है कौन', 'मासूम', 'जब प्यार किया तो डरना क्या', 'मुझसे शादी करोगी', 'कभी खुशी कभी गम', 'चमत्कार' ते अगदी 'सैराट' अशा असंख्य सिनेमांत क्रिकेटच्या मॅचचा प्रसंग दाखवला गेलाय. लगानच्या यशानंतर खेळावरचा सिनेमा यशस्वी होऊ शकतो,याचा अंदाज आला. प्रेक्षक असे चित्रपट उचलून धरू शकतो, याची खात्री झाली. मग नुसतं क्रिकेट नाही तर ॲथलेटिक्स, फुटबॉल, हॉकी, बॉक्सिंग, कुस्ती या खेळांनी पाहता पाहता चित्रपटांमध्ये स्थान मिळवलं.

'चक दे इंडिया' हा सिनेमा तर खेळांवरील भारतीय सिनेमांमधील महत्त्वाचा टप्पा ठरला. या सिनेमामुळे महिला हॉकी संघाचे प्रशिक्षक मीर रंजन नेगी यांची कामगिरी लोकांसमोर आली. नुसते खेळाडूच नाही तर रिअल लाइफ हिरो ही संकल्पना या सिनेमाने यशस्वी केली. त्यामुळे 'मेरी कोम' हिचा बॉक्सर म्हणून आयुष्यातील संघर्ष पडद्यावर मांडला गेला. फरहान अखतरचा 'भाग मिल्खा भाग' सिनेमा अप्रतिम म्हणावा असाच होता. या सिनेमात 'फ्लाईंग जाट' असा किताब मिळवलेले पण नव्या पिढीपर्यंत न पोहचलेल्या मिल्खा सिंग यांची कहाणी मांडली गेली. मिल्खा सिंग यांच्या कामगिरीबरोबरच फाळणीचा इतिहास, स्वतःशी सुरू असलेला झगडा अशा वास्तवाची किनार त्याला होती. त्यामुळे हा बायोपिक वेगळा ठरला. विशेष म्हणजे या सिनेमासाठी एखाद्या ॲथलिटप्रमाणे स्वतःचं सौष्ठव तयार करून फरहान अख्तरने मिल्खा सिंग यांचं व्यक्तिमत्त्व अधिक तीव्रतेने ठसवलं. त्यामुळेच खेळावरचा किंवा खेळाडूवरचा सिनेमा हा नुसताच प्रेक्षकांसाठी नाही तर भूमिका जगण्यासाठी करायचा असतो, याची जाणीवही अन्य कलाकारांना झाली. हीच गोष्ट सलमान खानने सुल्तान आणि आमीर खानने दंगलच्या निमित्ताने दाखवून दिली.

'दंगल' आणि 'सुल्तान' हे दोन्ही चित्रपट कुस्ती या खेळाला केंद्रस्थानी ठेवून काढलेले आहेत. त्यापैकी सुल्तान ही काल्पनिक कथा आहे तर दंगल हा वास्तवावर आधारित आहे. महावीर फोगट यांच्या गीता-







बबीता फोगट या कन्यांनी कुस्तीसारख्या खेळात कसा पाया रोवला, हे आपण पाहिलं तरी त्यांच्यावरचा सिनेमा करून त्यामागची प्रेरणा लोकांसमोर दंगलमधून मांडली गेली. कुस्तीवरच्या या सिनेमांनी आपल्या मातीतल्या सिनेमांना पुन्हा एकदा ओढ दिली आहे. त्याचाच परिणाम म्हणून भारताला ऑलिम्पिकमध्ये पहिलं वैयक्तिक पदक मिळवून देणारे कुस्तीपटू खाशबा जाधव यांच्यावरचा सिनेमा तयार करण्यासाठी खास तयारी करण्यात येत आहे. हा सिनेमा नामवंत दिग्दर्शक श्याम बेनेगल करणार असल्याचं जाहीरही झालं आहे. कुस्तीपटू म्हणून नावजलेला संग्राम सिंग ही भूमिका करणार असल्याचं निश्चितही झालं आहे. मल्ल असलेल्या संग्राम सिंग यानेही खाशबा यांच्या भूमिकेला न्याय देण्यासाठी वजन कमी करण्याचं आव्हान स्वीकारलं. गेली सहा महिने तो त्यासाठी मेहनत घेतोय, हे सगळं पडद्यावर खाशबा जाधव यांच्या आयुष्यातील स्फूर्तीदायी क्षण दाखवण्यासाठीच.

इरफान खान या अभिनेत्यानेही अशी मेहनत पानसिंग तोमर साकारण्यासाठी घेतली होती. हा सिनेमाही लक्षणीय ठरला. अर्थात तेच यश बुधिया किंवा पूर्णा मालवथच्या आयुष्यावरील एव्हरेस्ट सिनेमाला लाभलं नाही. तसंच अपयश अझर या चित्रपटालाही पाहावं लागलं. 'अझर' हा माजी कर्णधार अझरुद्दीनच्या आयुष्यावरचा सिनेमा होता. कर्णधार म्हणून त्याची कारकीर्द, वादग्रस्त आरोप, नामांकित अभिनेत्रींशी अफेअर मग लग्न अशा अनेक गोष्टी अझरुद्दीनच्या आयुष्यात घडलेल्याआहेत. त्यामुळे व्यावसायिक सिनेमासाठी आवश्यक असणारा बराचसा मसाला होता. मात्र सिनेमांत ते सगळं तीव्रतेने मांडलेलं दिसलं नाही, त्यामुळे हा सिनेमा लोकांना आवडला नाही. त्याउलट झालं ते 'धोनी द अनटोल्ड स्टोरी' या सिनेमाबाबत. हा सिनेमा त्याची मांडणी, त्यातही सर्वसामान्य घरातील मुलगा थेट वर्ल्डकप जिंकून देणारा कर्णधार ठरतो, याचं धोनीच्या चाहत्यांना म्हणजे प्रेक्षकांना नक्कीच अप्रूप होतं. त्यामुळे हा सिनेमा लोकांच्या पसंतीस उतरला होता. विशेष म्हणजे हे दोन्ही चित्रपट तद्दन व्यावसायिक प्रकारातले होते. एकाच्या वाट्याला यश आलं तर दुसऱ्याच्या वाट्याला अपयश. या दोन सिनेमांच्या अनुभवानंतर 'सचिन : अ बिलियन ड्रीम'सारखा डॉक्युड्रामा काढणं हे निर्माते, दिग्दर्शकासाठी कसोटी म्हणावं असंच आव्हान होतं. सचिन हा आपला हिरो आहे, असं माणणारे चाहते जगभरात आहेत. त्यामुळे सचिन तेंडुलकर नावाच्या खेळाडूला घडताना पाहणं या फिल्मच्या निमित्ताने शक्य झालं. 'सचिन अ बिलियन ड्रीम्स' आणि 'दंगल' या दोन्ही सिनेमांना एकाच वेळी यश मिळणं हे खेळासाठी आणि खेळांवरच्या सिनेमासाठी नक्कीच आशादायक चित्र आहे, असं खात्रीने म्हणता येईल.

या यशामुळे खेळावरील अनेक चित्रपटांची घोषणा आणि तयारी सुरू झाली आहे. 'गोल्ड' या अक्षयकुमारच्या सिनेमातून भारतीयांना पहिलं ऑलिम्पिक सुवर्णपदक मिळवून दिलेल्या भारतीय हॉकी संघांची कामगिरी लवकरच पडद्यावर पाहता येणार आहे. अभिनेता सोनू सूद बॅडमिंटनपटू सिंधू हिच्या आयुष्यावर सिनेमा करत आहे. तर सानिया मिर्जा, सायना नेहवाल यांच्यावरचे चित्रपटही पडद्यावर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे भारतीय सिनेमा आणि खेळांचं हे नातं भावी काळात देशाला अभिमान वाटेल, असे खेळाडू आणि त्यांच्या कामगिरीचं स्मरण करून देण्यास हातभार लावतील, यात शंका नाही.

**– अपर्णा पाटील**
भ्रमणध्वनी : ८९८३८२०२०२
aparna.patil1@gmail.com

**'अझर' हा माजी कर्णधार अझरुद्दीनच्या आयुष्यावरचा सिनेमा होता. हा सिनेमा लोकांना आवडला नाही. त्याउलट झालं ते 'धोनी द अनटोल्ड स्टोरी' या सिनेमाबाबत. विशेष म्हणजे हे दोन्ही चित्रपट तद्दन व्यावसायिक प्रकारातले होते. एकाच्या वाट्याला यश आलं तर दुसऱ्याच्या वाट्याला अपयश. या दोन सिनेमांच्या अनुभवानंतर 'सचिन : अ बिलियन ड्रीम'सारखा डॉक्युड्रामा काढणं हे निर्माते, दिग्दर्शकासाठी कसोटी म्हणावं असंच आव्हान होतं.**

# मराठी चित्रपटांच्या सुवर्णकाळाची संगीतमय सफर

**मुकेश माचकर**



मिलिंद इंगळेंसाठी एका हिंदी कार्यक्रमाचं निवेदन लिहीत होतो. किशोरकुमारच्या काल्पनिक डायरीच्या आधारे ते निवेदन खुलवायचं ठरलं होतं. त्यासंदर्भातल्या एका बैठकीत उत्तरा मोनेची भेट झाली आणि नेहमीच्या गप्पाटप्पा झाल्या काही दिवसांनी तिने फोन केला डोक्यात एक कल्पना आहे स्क्रिप्ट करशील का? म्हटलं भेटू आणि बोलू. दादरच्या तिच्या ऑफिसमध्ये भेट झाली आणि 'सुवर्ण मराठी' या दोन अंकी संगीतिकेचं बीज पडलं

उत्तरा ही मराठीतली आघाडीची निवेदिका, कार्यक्रम संचालक, सूत्रसंचालक आणि गाण्यांच्या अनेक कार्यक्रमांची निर्मितीही ती चिरंजीव अमेय मोने यांच्या साथीने करते. अशा कार्यक्रमांना लागणाऱ्या निवेदनाचा मालमसाला खरंतर तिच्याकडेच भरपूर असणार मग तिला माझ्याकडून काय लिहून घ्यायचं असेल, असं कुतूहल वाटत होतं तिच्या डोक्यातली कल्पना भावसंगीताच्या बैठ्या कार्यक्रमाची नव्हती मराठी चित्रपटांचा अगदी प्रारंभापासूनचा प्रवास तिला गाण्यांमधून उलगडायचा होता आणि त्यांना नृत्यांची जोडही द्यायची होती. या गाण्यांना जोडणारं निवेदन तिला हवं होतं. त्यात नेहमीचा, सूत्रधार आणि नटीचीच आवृत्ती असलेला, दोन निवेदकांचा फॉरमॅटही तिला मोडायचा होता. तिच्याकडे मंजिरी केळकर ही नियमित निवेदकांच्या साच्यात न बसणारी, पण अष्टपैलू अभिनय करणारी अभिनेत्री होती. तिचा फिरता वापर करून काहीतरी गंमत आणूयात, असं ठरलं आणि मग डोक्यात चक्र फिरायला लागलं.

विशिष्ट काळाचं आणि त्या काळातल्या सिनेमांचं दर्शन घडवणारी गाणी एकत्र, एकगठ्ठा सादर होणार होती. त्यामुळेच त्या काळातल्या प्रातिनिधिक सिनेमातल्या नायक-नायिकांमधला एकेक प्रसंग, त्या काळातल्या भाषिक आणि कायिक-वाचिक अभिनयासकट घडवावा, अशी मूळ कल्पना डोक्यात आली. या सगळ्या प्रसंगांना जोडणारा दुवा म्हणून तिसरी व्यक्तिरेखा वापरावी, असं ठरलं. होता होता, नायक-नायिका आणि नायिकेची फोटोतून अवतरलेली दिवंगत आजी अशा व्यक्तिरेखा तयार झाल्या आजीबरोबर बटवा आला, बटव्यात सुवर्णसंगीताची गुटी आली आणि तिच्या आधारे मालती आणि माधव या नायक-नायिकांना एकेका काळात घेऊन जाण्याची क्लृप्ती गवसली त्यातून एक सूत्र तयार झालं आणि या नृत्यगीतांच्या कार्यक्रमाचं रूपांतर दोन

अंकी संगीतिकेतून फुलणाऱ्या प्रेमकहाणीत झालं

उत्तराने उत्तम व्यावसायिक कलावंत-तंत्रज्ञांची साथ घेऊन या कार्यक्रमाला सर्वोत्तम निर्मितीमूल्यं लाभतील, याची काळजी घेतली. तीन मुख्य कलावंतांबरोबर गायक-गायिका यांच्या दोन जोड्या, नर्तकांचा ताफा असा खणखणीत संच जमला आणि 'सुवर्ण मराठी'चा दणक्यात शुभारंभ झाला मुंबईच्या परिसरात 'सुवर्ण मराठी'चे पाचही प्रयोग तुडुंब गर्दीत आणि प्रेक्षकांच्या जबरदस्त प्रतिसादात साजरे झाले गाण्यांचे कार्यक्रम खूप पाहिले, नृत्याचे कार्यक्रम खूप पाहिले, नृत्यगीतांचे कार्यक्रम खूप पाहिले, पण कथानकातून, त्या त्या काळातल्या खुमासदार प्रसंगांमधून आठवणी ताज्या करत जाणारा हा कार्यक्रम अभिनव वाटला, अशी एकमुखी दाद रसिकांनी दिली.

या कार्यक्रमाच्या संहितेमधले हे काही प्रसंग मुद्दाम त्यांचे संदर्भ देत नाही वाचताना तुम्हाला हा काळ आणि सिनेमाचा बाज आपोआप ओळखू येईल, याची खात्री आहे तर मग आता वाचा आणि मनाच्या पडद्यावर पाहा

'सुवर्ण मराठी'

(पडदा उघडतो तोच 'सूर निरागस हो' या गाण्याच्या सुरावटींनी. त्यानंतर 'मनमंदिरा' हे गाणंही सादर होतं त्यानंतर मालती आणि माधव येतात. दोघेही गाण्यात रंगून गेलेले आहेत.)

माधव : अहहाहा

मालती : अहाहाहा

माधव : अहाहाहाहा

मालती (त्याला ढोसून) : अहाहाहाहा

माधव (आधीच्याच तंद्रीत) : ओहोहोहोहो (मालती रागाने पाहते, माधव सावरून) चुकलं वाटतं काहीतरी... अहाहाहाहाहाच बरोबर आहे ना? अहाहाहाहाहा

मालती : अरे, हे अहाहाहाहा आणि ओहोहेहोहो किती वेळ चालणार आहे तुझं? पुढे काही बोलणार आहेस का?

माधव : छ्या, शब्दच नाहीत माझ्याकडे. असं हे दिव्य आणि स्वर्गीय गाणं ऐकलं की कानाला हात लावून (ॲक्शन करतो) अहाहाहाहाहा आणि ओहोहेहोहो म्हणायचं असतं राणी. यालाच दाद देणं म्हणतात आम्हा संगीतरसिकांच्या भाषेत.

मालती (त्याच्या स्टायलीत) : अरे वा, मस्त मस्त. आज ना मला दुप्पट आनंद झालाय. इतकी सुंदर गाणी ऐकल्याचा आणि इतका छान नाच पाहिल्याचा आनंद शिवाय, तुझ्यासारख्या जुन्या संगीताला नाक मुरडणाऱ्या माणसालाही ती आवडली, याचा आनंद.

माधव : अगं पण ही गाणी होतीच भारी. आवडण्यासारखीच होती ती. काय तो बालगंधर्वांचा आवाज. (मालती चाट पडते, ते पाहून हा सावरून घेत म्हणतो) बालगंधर्व नव्हते का ते? सवाई गंधर्व असतील मग. (मालती डोळे मोठे करते) अच्छा तेही नाहीत का. मग, छोटा गंधर्व असणार हंड्रेड परसेंट छोटा गंधर्व खूप ऐकलीत मी

**गाण्यांचे कार्यक्रम खूप पाहिले, नृत्याचे कार्यक्रम खूप पाहिले, नृत्यगीतांचे कार्यक्रम खूप पाहिले, पण कथानकातून, त्या त्या काळातल्या खुमासदार प्रसंगांमधून आठवणी ताज्या करत जाणारा हा कार्यक्रम अभिनव वाटला, अशी एकमुखी दाद रसिकांनी दिली.**



त्यांची गाणी (मालती आता पाय आपटते.) आयम सॉरी मालती, मला ना या म्युझिकमधलं काही फारसं कळत नाही आणि ते आवडतही नाही. तुझ्यासाठी ऐकली मी ही गाणी. ती आवडली, खरंच आवडली. पण, मला इतकंच माहितीये की असं आआआ ऊऊऊ करून गाणारा माणूस सहसा कोणी ना कोणी गंधर्व असतो. (थांबून आठवून) आता इथेही आनंद गंधर्वांचा आवाज होता की नाही? आठवलं ना बरोबर.

मालती : अगदी बरोबर नाही पण, जवळपास पोहोचलास तू याचाही मला आनंद झाला आपण ऐकलं ते गाणं शंकर महादेवन यांच्या आवाजातलं होतं तेही अर्थात भूलोकीचे एक गंधर्वच. पण, या सिनेमात आनंद भाटे अर्थात आनंद गंधर्व यांच्या आवाजातलीही गाणी होती. माधव, आता मला अशी शंका यायला लागलीये इन फॅक्ट अशी खात्रीच पटायला लागलीये की तू तू मला या सिनेमाचं नावही सांगशील.

माधव (खट्याळपणे) : प्रयत्न करतो. ही दोन्ही गाणी ना काय बरं नाव ते, 'गिटार काळजीत पडली' नाही नाही 'कट्यार काळजात घुसली' या सिनेमातली होती, राइट.

मालती (हसून) : बापरे, फारच अभ्यास केलास तू? एकदम हंड्रेड परसेंट मार्क मिळवलेच पहिल्याच फटक्यात.

माधव : अगं तुझ्यासाठी कायपण, कुठेपण, कधीपण!!! खरं सांगू का मालती. फक्त तुझ्यासाठी, म्हणजे तुला बरं वाटावं म्हणून मी ही सगळी माहिती काढली होती कट्यारमधली गाणी मलाही आवडली, मीही एंजॉय केली.



पण, माझी मजल तिथपर्यंतच. त्यापलीकडे या आ ऊ संगीतातलं काही कळत नाही आणि ते काही फारसं आवडतही नाही. इनफॅक्ट मला या जुन्या गाण्यांचा नॉशियाच आहे.

मालती : अरे काय बोलतोयस काय तू? भारतीय शास्त्रीय संगीताला तू आ ऊ संगीत म्हणतोयस? जुन्या गाण्यांचा नॉशिया आहे म्हणतोयस?

माधव : अगं मुली, तुझ्यासारखे अपवाद वगळले, तर आपल्या जनरेशनला या म्युझिकचं काही एक्स्पोजर आहे का? ती रेकून गायलेली, कंटाळा आणणारी स्लो गाणी आजच्या पिढीला कशी ऐकवतील? ही गाणी जरा डिफरंट आहेत म्हणून ऐकली. ती आवडली. एन्जॉय केली. विषय कट. दिवसरात्र कोणी ते ऐकू शकेल का? अगं माझे आजोबा टीव्हीवर ती ब्लॅक अँड व्हाइट गाणी पाहात असतात मराठी सिनेमातली देवा देवा देवा, इतकं बोअर होतं ते ऐकून

(एकदम अंधार होऊन विजा कडाडल्यासारखं होतं आणि आवाज घुमतो खामोश माधव आणि मालती घाबरतात)

माधव : अगं, हे गं काय होतं?

मालती : मलाही माहिती नाही रे. आमच्या वाड्याच्या या भागात फारसं कुणी येत नाही माझी आजी इथे राहते म्हणतात.

माधव : आजी राहते? मला कधी काही बोलली नाहीस कधी तिची भेट करून दिली नाहीस.

मालती : अरे, ती वर गेलीये.

माधव : वरच्या मजल्यावर होय. मग तिथे जाऊन भेटू, त्यात काय एवढं (चपापून) एक मिनिट-एक मिनिट; पण, तुमच्या वाड्याला तर वरचा मजलाच नाहीये.

(पुन्हा कडकडाट, पुन्हा अंधार, पुन्हा आवाज तुझ्यासारखाच आहे आमचा वाडा, वरचा मजलाच नाही त्याला, हा हा हा हा)

माधव : वाईट जोक होता हा मालती आणि ही अंधार करून स्टिरिओफोनिक साउंडमध्ये बोलण्याची काय आयडिया आहे तुझी?

मालती (चाचरत) : माधव, तुला कळतंय का? मी नव्हते बोलत हे तो माझ्या आजीचा आवाज आहे ती वर गेली आहे वीस वर्षांपूर्वी आणि तरीही ती इथे राहते म्हणतात तिच्या संग्रहातली जुनी गाणी ऐकवण्यासाठी मी तुला या भागात घेऊन आले हीच चूक झाली आपण निघू इथून, चल लवकर. आजीचं फार प्रेम होतं जुन्या

काळातल्या संगीतावर. तुझ्या बडबडीमुळे ती जागी झालेली दिसतेय चल लवकर.

(दोघे हात धरून निघणार इतक्यात कडकडाट, अंधार आणि उजेडात थेट समोर आजीच चमकते)

आजीबाई : अगं मालती, कुठे निघालीस इतक्यात?

(मालती-माधव दोघेही तंतरले आहेत माधव वरच्या फोटोकडे आणि आजीकडे पाहतोय ही तीच आहे, हे कळल्यावर सटपटलाय आजी दारातच आहे पुन्हा चमचमाट)

माधव : अहो, आजी, तुम्ही फोटोतून बाहेर कशा आलात?

मालती : आणि कशाला आलीयेस बाहेर?

आजी : म्हणजे काय, अगं तूच माझी आठवण काढलीस ना आता एवढ्यात कोई सच्चे दिल से पुकारे तो आजी धडाम से आ जाती है तू माझी मनापासून आठवण काढलीस आणि मग लगेच मी आले, निघाले, सजले फुलले फुलपाखरू झाले (गंमत जंमत'च्या गाण्याची संगीत साथ झाली तर मजा येईल. अचानक नाच थांबवून म्हणते) काय गं पोरी, हा कोण? याची ओळख नाही करून देणार?

मालती (चाचरत) : हो, म्हणजे काय देते ना ओळख करून ही माझी आजी हिला आम्ही म्युझिकल आजी म्हणतो.

आजी (गिरकी घेऊन माधवच्या पायावर पाय देत) : मी डान्सिकलसुद्धा होते बरं का अधून मधून. (माधव ओय ओय करत पाय उचलून नाचत असताना) आणि हा कोण? औरंगजेब?

मालती : नाही गं, हा माधव. माझा मित्र. माझी आजी फिरक्या घेण्यात पटाईत आहे बरं का एकदम.

आजी : आणि गुडघ्यांनी साथ दिली, तर या वयातही गिरक्यासुद्धा घेते अधूनमधून. माधवा, आमच्या मालतीचा मित्र ना रे तू? नुसता मित्र की (दोघे लाजतात.) कळलं कळलं हिच्यासारख्या मुलीवर प्रेम करतोस, मग संगीताच्या बाबतीत इतका अरसिक कसा रे तू? जुन्या गाण्यांचा नॉशिया कसा तुला इतका?

माधव : आजीबाई, तुम्हाला हर्ट करायचा हेतू नाहीये माझा. पण, म्हणजे ती ब्लॅक अँड व्हाइट गाणी मला जरा गूळ पाडल्यासारखीच वाटतात जाम झोपच येते मला ती ऐकल्यावर.

आजी : हं तुलाच नाही, तुझ्या पिढीतल्या, माझ्या पिढीतल्या, तुमच्या आईबाबांच्या पिढ्यांमधल्या बऱ्याचजणांना आहे हा आजार.

माधव-मालती : आजार?

आजी : हो हो, आजारच. आपल्या काळापेक्षा वेगळ्या काळातलं काही न आवडण्याचा आजार. तुला माझ्या काळातलं संगीत आवडत नाही. माझ्या पिढीतल्या लोकांना आजच्या काळातलं संगीत आवडत नाही. त्यात त्यांना गोडवाच सापडत नाही. काहीच चांगलं दिसत नाही. सगळं उथळ वाटतं. ही सगळी एकेका काळाच्या खाचेत रेकॉर्डची पिन अडकलेली माणसं पण, चांगली गोष्ट अशी आहे की हा एक आजारच आहे आणि प्रत्येक आजारावर औषध असतंच. आता तुझ्या आजारावरचं औषधही आहेच की माझ्याकडे. माझ्या या बटव्यात. कुठे आहे बरं ती गुटी हां, सापडली ही घे सुवर्णसंगीतासवाची गुटी ही घेतली की काय चमत्कार होतो पाहा (खोचलेला बटवा काढते, त्यातून एक जडीबुटी काढते, त्याचं मिश्रण करते, हे सगळं निव्वळ ॲक्शनमध्ये. मग त्याची गचांडी धरते आणि त्याला ती खायला लावते. वर काल्पनिक पाणी पाजते. तो डोकं धरतो)

आजी : बोल बाळा, आता तुला कसं वाटतंय.

माधव : माझं डोकं गरगरतंय डोळ्यांसमोर अंधारी आलीये लांबून कसलंतरी वेगळंच म्युझिक ऐकायला येतंय एकदम शांत.

आजी : लांब एक वीणाधारी आकृती दिसतेय का?

माधव : (मान डोलावून) हो.

आजी : अरे गधड्या, मग नमस्कार कर, संत तुकाराम

**माझ्या पिढीतल्या लोकांना आजच्या काळातलं संगीत आवडत नाही. त्यात त्यांना गोडवाच सापडत नाही. काहीच चांगलं दिसत नाही. सगळं उथळ वाटतं. ही सगळी एकेका काळाच्या खाचेत रेकॉर्डची पिन अडकलेली माणसं पण, चांगली गोष्ट अशी आहे की हा एक आजारच आहे आणि प्रत्येक आजारावर औषध असतंच.**



महाराज आहेत ते.

(तिघे वंदन करतात. पुढची गाणी सुरू होतात. अंधार झाल्यावर ते निघून जातात.)

(माधव डोक्यावरून कांबळं घेतल्यासारख्या अवतारात लपत छपत इकडे तिकडे पाहात येतो. तो एका दिशेला पाहात येत असताना दुसऱ्या दिशेने मालती येते. ती कमरेवर घागर घेतलेल्या अवतारात. तिची घागर फुटते.)

मालती : डोळं फुटलं काय रं तुजं? चांगला धट्टाकट्टा गबरू गडी तू? म्होरं पघून चालाया काय हुतंय?

माधव : (तलवार उपसल्याच्या आविर्भावात पुढे येतो.) कमळे तू?

(निवेदिकेचा सगळा आवेश दूर होतो. ती लाजून दुसरीकडेच पाहात उभी राहते.)

मालती : अगं बाई तुमी हायसा. माझं मेलीचं डोळं फुटलं व्हतं. पर आज हिकडं कुठं वाट वाकडी केली म्हनायची शिवाजीराजांच्या शूर मावळ्यानी?

माधव : (खासगी आवाजात कुजबुजत) अगं, खानाच्या फौजा निघाल्यात म्हनं विजापुरातनं. म्हाराजांनी सोत्ता बोलावून सांगिटलंय मला. जिवबा, खानाच्या दाढीतला एक क्येसजरी गळून पडला, तरी मला टाकोटाक खबर मिळायला हवी. आपली फुडची सगळी मसलत तुमच्या खबरीवर हाय.

मालती : गळला का मग क्येस हो खानाच्या दाढीतला.

माधव : लई मस्करी सुचतीय येका मानसाला. अगं



खानाला न्हाई लोळवला तर शिवरायाचा हा मावळा मिशी छाटून देईल सोत्ताच्या हातानं.

मालती : आनि खानाचा सफाया झाल्यावर काय करनायेय एक मानूस? दाढी वाढवनाराय खानासारखी.

माधव : काय करायचंय? तवर म्हाराज दुसरी म्होइम काढतीलच की.

मालती (खट्टू होऊन) : म्हंजी माजा जल्म बापाच्या घरात घागरी घागरी पानी भरन्यातच जानार म्हना की. त्यो सूर्याजी सांगत हुता त्ये काई खोटं न्हाई म्हना की. त्यो म्हनत हुता, त्या शिवरायाच्या सोराज्याच्या नादाला जो लागला, तो काय तुज्या हातात गवसत नाय. त्यापरीस म्या बघ. आदिलशाहीचा फर्जंद हाये. सालीना रग्गड कमवतोय. तुज्या बाशी बोलू का?

माधव : (तलवार उपसून) त्या सूर्याजीला म्हनावं भेट मला खंडुबाच्या माळावर, खांडुळीच करून टाकतो त्याची.

मालती : त्यापरास तुमीच माज्या बाशी बोललं तर काय बिघडलं व्हय.

माधव : तुझ्या बाशी? कशाबद्दल?

(मालती लाजते. निवेदकाला उलगडा होतो.)

माधव : आरंतिच्या, ध्येनातच न्हाई आलं माज्या. अशी इच्छा हाय व्हय रानीसरकारांची? ठीकंय. ठरलं तर मग. इकडं सोराज्याचं तोरन लागलं की दुसऱ्याच दिवशी तुझ्या बाला भेटून मुहूर्त पक्का करतो. निघू मी? लांब मजल मारायचीये आज.

मालती : नीट जा. जिवाला जपा. लवकर या. एक मानूस तुमची वाट पाहतंय, हे इसरू नका.

(तुतारी वाजते. पुढचं गाणं.)

......

(ढोलकीवाला सवाल-जवाबाआधीचा टिपिकल तुकडा वाजवतोय... मागून अंधारातून माधव मालती एकमेकांबरोबर चालत येतात... मागोमाग गायक कलावंत. समसंख्येत दोन ओळींत. दोघेही ताल धरतात, अहा, वावा म्हणून ढोलकीदादाला दाद देतात. शेवटच्या ढिंगटांगवर दोघेही एकत्रच 'ऐका' म्हणतात. आधी गोंधळून आणि मग नंतर रागारागाने एकमेकांकडे बघतात.)

मालती (आपल्या शेजारच्या गायिकेला) : काय गं हौसा? कलगीवाल्यांना शाहीर सापडला नाही वाटतं चांगला... सोंगाड्याला आणून हुबा केलेला दिसतोय...

(तिचे साथीदार खो खो हसतात...)

गायिका : आगं पन तू कसं वळिकलंस?
मालती : अगं शाहिराचा रुबाबदार पोषाख घातला, तरी सोंगाड्याच्या कळा काय जातायत का अंगातनं? फडावर कलगीतुऱ्याचा सवाल-जवाब करायला आल्यावर ज्याला शिंपल म्यानर्स कळत न्हाईत, तो काय शाहीर म्हनायचा का सोंगाड्या? (तिचे साथीदार हो हो म्हणून माना डोलावतात.) काय वो शाहीर, चांगले जंटलमन दिसताय आनि सादं 'लेडीज फर्ष्ट'बी ठावं नाय व्हय तुमाला? आजकाल सगळीकडं पहिला मान बाईचा असतुया. सवाल-जवाबातबी लेडीज फर्ष्ट. आधी मी सवाल करनार, तुमी जवाब द्यायचा. तो द्यायला जमलं, तर तुम्हाला सवाल इचारायचा चान्स. न्हाईतर आपला गाशा गुंडाळायचा आनि फुडचा फड गाठायचा.
(तिचे साथीदार हसतात. बरोबर बरोबर म्हणतात.)
माधव : अहो बाई, तुमी तर माझ्यासाठी लेडीज नाही... (आँ...ची प्रतिक्रिया, सगळ्यांची)... म्हणजे साध्या लेडीज न्हाईत, फर्ष्ट लेडीज आहात... येकदम व्हीव्हीआयपी. तुमचा पहिलेपनाचा मान मी कसा मोडेन?... म्हनून तर मी तुम्हालाच पहिला चान्स द्यायचं ठरवलंय... (आँ...ची प्रतिक्रिया, सगळ्यांची)... जवाब देन्याचा हो... माझ्या सवालावर पहिल्यांदा उत्तर देण्याचा मान तुमचा तुमचा तुमचा आणि फकस्त तुमचा.
(याचे साथीदार बरोबर, बरोबर म्हणून हसतात.)
मालती : मिष्टर शाहीर, तुम्हा पुरुषांच्या या चतुर बोलन्याला भुलून आमी बायांनी खूप लुकसान करून घेतलंय सोताचं. आता ह्यापुढे हे बोलबचन आपल्यापाशीच ठेवा. कोणतीही बाई आता कोणत्याही मर्दाच्या भुलाव्यात सापडणार नाही. पहिला सवाल मीच इच्यारनार. तुमी जवाब द्यायचा.
माधव : ठीकाय ठीकाय. तुमी म्हनाल तसं होईल रानीसरकार.
(आँ... सगळ्यांची प्रतिक्रिया, मालती भुवई वक्र करते.)
मालती : रानीसरकार...
माधव : अहो, गैरसमज करून घेऊ नका. तुमच्यासारखी देखणी, हुशार, लाखात एक गुणी आणि तेजतर्रार बाई आपल्या दिलाची राणी व्हावी, असं माझ्यासारख्या कोणत्याही जवानाला वाटलं तर त्यात चुकीचं काय? पण, मी त्या अर्थाने बोलत नव्हतो. राणी, म्हणजे एखाद्या राज्याची राणी समोर आली की सेवक कसा राणी सरकार म्हणतो, तसं राणी सरकार म्हणत होतो मी तुम्हाला राणीसरकार.

मालती : बरंबरं, ते ठीक आहे. त्या निमित्तानं चार येळा रानीसरकार म्हनून घेतलं ते कळलं मला. जास्त पाघळू नका. पहिला सवाल मीच इच्यारनार हे इसरू नका.
माधव : अहो, त्यात काय शंका रानी... चुकलो. तुम्ही करा की पहिला सवाल. आता तुम्हीच कमीपणा घ्यायला तयार असाल, तर माझी काय हरकत असणार. नंतर बोल लावू नका म्हणजे झालं...
मालती : कमीपना? मला कसला कमीपना येनार?
माधव : बघा आता, तुम्हीच सांगा. पुरुष आनि स्त्री यांच्यात हुशार कोण?
मालती : अर्थातच स्त्री. हा काय प्रश्न झाला का?
माधव : आता मला सांगा, शाळेतले गुरुजी आनि विद्यार्थी यांच्यात हुशार कोन?
मालती : शाहीर तब्येत बरी हाय न्हवं... शाळेतल्या पोरापेक्षा मास्तरच हुशार असतात.
माधव : मग आता मला सांगा प्रश्न कुणी विचारायचा? हुशार मास्तरनी प्रश्न विचारायचा आणि मठ्ठ विद्यार्थ्यांनी त्याला उत्तर द्यायचं, हे बरोबर का विद्यार्थ्याने प्रश्न विचारायचा आणि मास्तरनी शंकासमाधान करायचं, हे बरोबर.
मालती : काय शाहीर, काय येड्यासारखे सवाल इच्यारताय. ज्याला काही कळत नाही, त्याने इच्यारायचं आनि ज्याला कळतं त्याने इस्कटून सांगायचं, हेच बरोबर.
(इथून पुढचा संवाद 'आज सोमवार है, तुमको मुझसे प्यार है' या गाण्यातल्याप्रमाणे वेगाने झाला, तर गंमत येईल.)



**आजकाल सगळीकडं पहिला मान बाईचा असतुया. सवाल-जवाबातबी लेडीज फर्ष्ट. आधी मी सवाल करनार, तुमी जवाब द्यायचा. तो द्यायला जमलं, तर तुम्हाला सवाल इचारायचा चान्स. न्हाईतर आपला गाशा गुंडाळायचा आनि फुडचा फड गाठायचा.**

माधव : म्हणजे अडाण्यानं विचारायचं, शहाण्यानं उत्तर द्यायचं, बरोबर.
मालती : बरोबर.
माधव : बाई आणि बाप्या यांच्यात शहाणं कोण?
मालती : बाई.
माधव : अडाणी कोण?
मालती : बाप्या.
माधव : मग मला सांगा, प्रश्न कोण विचारणार, शहाणा की अडाणी?
मालती : अडाणी...
माधव : म्हणजे बाप्यानं... बरोबर.
मालती : बरोबर.
माधव : द्या टाळी.
मालती : कशाबद्दल?
माधव : अहो, बाप्यानेच आधी सवाल विचारला पाहिजे, हे तुम्ही मान्य केलं की आत्ताच.
(ती आणि तिचे साथीदार खंतावतात. याचे साथीदार जल्लोष करतात.)
मालती : असा शब्दांचा खेळ करून काही फरक पडणार नाही. पहिला सवाल मीच करणार?
माधव (खो खो हसून) : पहिला सवाल? नीट विचार करून पाहा... इतका वेळ आपला सवालजवाबच चालला होता... मी विचारत होतो, तुम्ही उत्तर देत होता... आता यापुढचा पहिला सवाल तुम्ही विचारला का मी याला अर्थ काय राहिला? अरे वाजव... कलगीवाल्या... हाण जोरात...
(तो ढोलकीवाल्याला इशारा करतो. पुन्हा एक कडक तुकडा वाजतो... तो जिथे थांबतो, तिथे गायक आणि गायिका पुढे येऊन 'आईका' म्हणून गाण्यातला सवाल जवाब सुरू करतात. इथे सुरुवातीचा सवाल-जवाब लिपसिंक होऊन पार्श्वगायनात बदलतो. नंतरच्या सवाल-जवाबापासून गायक टेकओव्हर करतात.)

(धनाजीराव मुर्दाबाद अशा घोषणा देत माधव येतो. त्याच्याबरोबर मालकशाही मुर्दाबाद अशी घोषणा देत मालती. आजीबाई आतून येतात. त्या खोकल्याने बेजार. वेंहेंविहीवुहू'च्या भाषेतच सर्वकाळ बोलतात. त्या काय अर्थाने खोकतील त्याचे सूचन संवादात.)
आजीबाई (बाहेर येऊन) : काय रे, काय ओरडतोयस? (हे किंवा पुढचा कोणताही संवाद त्यांनी बोलायचं नाही. हे हातवारे आणि वेंहेंविहीवुहूच्या आवाजात चालवायचं)
माधव : हिला लागलाय खोकला मधाचं बोट कुणी चाटवा हो हिला लागलाय खोकला, बाबाऽऽऽ कुठे गेले बाबा? नेमके कामाच्या वेळेला तडमडतात. अहो तुमची बायको इथे खोकल्याने बेजार आहे आणि तुम्हीच कुठे गुल झालात? (मागच्या भिंतीकडे पाहून) अरेच्चा, हे तर बाबाच दिसतायत. तिकडे तसबिरीत काय करताय बाबा? इकडे (एकदम प्रकाश पडून) अरे हो, तुम्ही तर देवाघरी गेलायत नाही का? सॉरी हं. आता तुम्ही मध कुठून चाटवणार तिकडून तिला? पण, काही चिंता करू नका. आता हा लक्ष्या आहे ना त्याच्या आईची काळजी घ्यायला.

आई (धपाटा घालून त्याच्या हातातल्या फलकांकडे बोट दाखवून खोकते) हे काय आहे?
माधव : अगं सिंपल मराठीतच लिहिलंय हे. बाबा गेल्याच्या धक्क्याने तू शाळेत शिकलेलं मराठीही विसरलीस? धनाजीराव मुर्दाबाद.
आई : कोण आहेत हे?
माधव : हे माझे मालक आहेत. त्यांनी मला नोटीस न देता कामावरून काढून टाकलंय. म्हणून मी त्यांचा निषेध करतोय.
आई : आणि ही कोण आहे?
माधव : ही त्या चांदोबाची (टकलाची ॲक्शन) मुलगी म्हणजे धनाजीरावाची.
(आईला खरोखरची ढास लागते.)
आई : अरे पण ही त्यांची मुलगी आहे ना? ती कशी वडिलांच्या विरोधात घोषणा देतेय?
(माधव स्वतःही वेंहेंविहिवुहू'च्या भाषेत उत्तर द्यायला जातो. मग गफलत लक्षात येते.)
मालती : काकू आता आत्याच म्हणते. आत्या, माझं लक्ष्यावर खूप प्रेम आहे. मला त्याच्याशी लग्न करायचंय. म्हणूनच माझ्या वडिलांनी त्याला नोकरीवरून काढून टाकलंय. म्हणाली, त्या भिकारड्या, दीडदमडीच्या कारकुंड्याच्या घरात देण्यासाठी मी तुला लहानाची मोठी नाही केली!
माधव : भिकारडा? कारकुंडा? अरे चांदोबा, सात जन्मात तुझ्या बंजर भूमीवर एकही केस उगवणार नाही, असा शाप देतो मी. आई, ही त्या मोडक्या फर्निचरची मुलगी असली तरी त्याच्यासारखी नाहीये. ही डोळस आहे. आपला बाप कसा अत्याचारी भांडवलशहा आहे, हे तिला कळलं आहे. त्यामुळे ती आता यापुढे माझ्या लढ्यात मला साथ देणार आहे!

आई : (खोकला थांबवून) अरे पण एवढ्या मोठ्या उद्योगपतीशी कशी लढाई लढणार आहात तुम्ही?

मालती : आत्या आम्ही मस्त प्लॅन बनवलाय. आम्ही दोघे त्या चांदोबाच्या घरातल्या, आय मीन माझ्याच घरातल्या बागेतच मिळून प्रेमगीत गाणार आहोत, त्यावर नाचणार आहोत आम्ही संगीतमय प्रेममय बंड करणार आहोत.

(आई डोकं धरून बसते. संगीत वाजू लागतं. दोघे त्या काळातल्या स्टायलीत नाचू लागतात.)

......

(मालती आतून येते. मागून माधव येतो.)

माधव : ए ए ए, धिस इज नॉट फेअर हां, काय तुझं नाव-काय म्हणालीस तू? थांब ना.

मालती : फार जुनी ट्रिक आहे ती. तुमच्या जुनाट पुण्यात अजून हीच चालते का? काय तुझं नाव म्हणालीस म्हणे तू? मी तुला माझं नाव सांगितलेलंच नाहीये अजून. शिवाय ते तुला सांगायची इच्छाही नाहीये माझी.

माधव : काय राव, बास का राव? तुमच्या मुंबईच्या मुलींमध्ये साधी कृतज्ञताही नसावी.

मालती : अरे मुलींना काय राव म्हणणाऱ्यांच्या बाबतीत कसली कृतज्ञता. काय राव? राव?

माधव : अगं आमच्या पुण्याची स्टाइल आहे ती सौदामिनी.

मालती : ईक्स.

माधव : का गं, झुरळबिरळ दिसलं की काय?

मालती : तू घाबरतोस की काय झुरळाला? सिरीयसली?

माधव : म्हणजे काय? कोणीही झुरळाला घाबरतंच. ते असतंच डेंजर.

मालती : छया! डेंजर म्हणे! मी तर झाडूच्या एका फटक्यात चेपून टाकते झुरळाला.

माधव : झाडू? केरसुणीला झाडू म्हणतात तुमच्या मुंबईत?

मालती : झाडूला केरसुणी म्हणतात तुमच्या पुण्यात?

माधव : अगं मराठीचा जाज्वल्य अभिमान आहे आम्हाला.

मालती : मघाशी रिक्षाने आले तेव्हाच दिसला मला तो. मी सर्ववेळ मराठीत बोलत होते आणि रिक्षावाला हिंदीत. मी त्याला म्हटलं, मुंबई की तरह आप लोग अब पुणेमेभी आये हो क्या? तर म्हणतो, मै तो पैदाइशी पुणेकर हूँ मॅडम. शुद्ध मराठी.

माधव : आपला नाहीये हा विश्वास या स्टोरीवर. तुम्ही मुंबईचे लोक एक दिवसासाठी इथे येता आणि या असल्या गोष्टी पसरवता पुण्याबद्दल मंदाकिनी.

मालती : मुला, तुझ्या या असल्या ट्रिक्सनाच ईक्स म्हणाले होते मी. तू कितीही प्रयत्न केलास, तरी मी तुला माझं नाव सांगणार नाही.

(मागून आजीबाई टपकतात.)

आजीबाई : मी सांगते. हिचं नाव मालती आहे, याचं नाव माधव आहे.

दोघेही : पण, मला हे माहिती आहे.

(दोघेही एकमेकांकडे आश्चर्याने पाहतात. तुला, तुलापण? असं बोलतात.)

आजीबाई : अगं पण मग

दोघेही : अगं आम्ही मुंबई-पुणे-मुंबई खेळत होतो

आजीबाई : पण मग त्या औषधांचा असर

माधव : तो कधीच संपला होता. पण, आम्हालाही या खेळाची मजा यायला लागली होती. त्यात नेमक्या तुम्ही तडमडलात.

मालती : ए, काहीतरीच काय बोलतोयस माझ्या आजीला. तुम्ही पुण्याचे लोक भयंकर उर्मट.

माधव : ए, उगाच काहीतरी बोलायचं नाही हां आमच्या पुण्याला. आम्ही तत्त्वाचे पक्के आहोत. तत्त्वापुढे आम्ही कोणाचीही पर्वा करत नाही. स्पष्टवक्तेपणा हे आमचं वैशिष्ट्य आहे

(दोघेही म्यूट होतात, मागे संगीत वाजू लागतं. ॲक्शन चालूच आहे.)

आजीबाई : आमचे हे मालती आणि माधव, किती छान रमलेत नाही या सुवर्णसंगीताच्या सफरीत. आता एकमेकांशी भांडण्याचा कितीही अभिनय करत असले, तरी पुढे कसे एकमेकांच्या डोळ्यांत हरवणार आहेत, कसे एकमेकांच्या बाहूंमध्ये विरघळून जाणार आहेत, हे मलाही माहिती आहे. मीही पाहते ना आजकालचे रोमॅंटिक मराठी सिनेमे, अगदी मस्त असतात त्यांची गाणी, मला जाम आवडतात

(एक गाणं गुणगुणते, तेच सुरू होतं)


**- मुकेश माचकर**

भ्रमणध्वनी : ९३२६४७३३४४,
९५९४९९९४४४
mamanji@gmail.com


**हे मालती आणि माधव, किती छान रमलेत नाही या सुवर्णसंगीताच्या सफरीत. आता एकमेकांशी भांडण्याचा कितीही अभिनय करत असले, तरी पुढे कसे एकमेकांच्या डोळ्यांत हरवणार आहेत, कसे एकमेकांच्या बाहूंमध्ये विरघळून जाणार आहेत, हे मलाही माहिती आहे मीही पाहते ना आजकालचे रोमॅंटिक मराठी सिनेमे.**



# ‘नायक’ मराठी सिनेमातला

**अरुण पुराणिक**

**शतकी वाटचाल पूर्ण केलेल्या चित्रपटाच्या इतिहासात आपली मुद्रा उमटविलेल्या मराठी नायकांची एक परंपरा लक्षणीय आहे. गोविंदराव टेंबे यांच्यापासून ती सुरू झाली. मराठी सिनेमा मा. विठ्ठल, बाबुराव पेंढारकर, चंद्रकांत मांढरे, राजा गोसावी, दादा कोंडके, अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे, सचिन, महेश कोठारे अलीकडच्या काळात भरत जाधव, मकरंद अनासपुरे, किशोर कदम या त्यामानाने लिटिल स्टार्सने गाजवला.**

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला हिंदुस्थानात एका नावीन्यपूर्ण अनोख्या कलेचा जन्म झाला. सिनेमाच्या मोठ्या पडद्यावर हलत्या चित्रांनी कथा सांगण्याची कला विकसित होऊन चलतचित्रांच्या निर्मितीला सुरुवात झाली. या कलेचे प्रणेते भारतीय सिनेउद्योगाचे जनक होते, कै. धुंडिराज गोविंद ऊर्फ दादासाहेब फाळके! त्यांच्या राजा हरिश्चंद्र या पहिल्या मूकपटात भाषा नसली तरी यातील बहुतेक कलावंत हे मराठीच होते.

हिंदी आलमआरा पाठोपाठ प्रभातने १९३२ मध्ये

'अयोध्येचा राजा' हा मराठीतील पहिला बोलपट निर्माण केला. बोलपटाचे आगमन झाल्यावर ज्यांना अभिनयासह तालसुरात बोलता-गाता येते अशा कलावंतांची मागणी वाढली. संगीत दिग्दर्शक हे बोलपटांचे महत्त्वाचे अंग बनले. या गरजेतूनच गोविंदराव टेंबे 'अयोध्येचा राजा' बोलपटाचे नायक व संगीत दिग्दर्शक बनले. त्यावेळी पन्नास वर्षे वयाच्या गोविंदरावांना टक्कल पडले होते. तसाच चष्माही लागला होता. हरिश्चंद्राच्या भूमिकेसाठी गोविंदरावांना डोक्यावर केसांचा विग चढवावा लागला व चष्मा काढून ती भूमिका करावी लागली. डोक्यावर चष्मा नसल्यामुळे चित्रीकरणाच्या वेळी अनेक गंमतीजमती घडल्या. परंतु मराठी बोलपटाचा पहिला नायक म्हणून इतिहासात त्यांचे नाव कोरले गेले.

लोकांना माहीत असलेल्या पौराणिक व ऐतिहासिक कथांवर चित्रपटनिर्मिती करणे हीच त्या काळातील बहुसंख्य निर्मात्यांची मनोधारणा होती.

१९३२चा भालजी पेंढारकरांनी दिग्दर्शित केलेल्या 'श्यामसुंदर' या बोलपटातून शाहू मोडक चित्रपटात आले. भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात 'रौप्य महोत्सव' साजरा करणारा हा पहिला चित्रपट होता. मुंबईच्या वेस्ट एंड (सध्याचे नाझ) थिएटरमध्ये श्यामसुंदर सत्तावीस आठवडे चालला. यातील शाहू मोडकांची बालकृष्णाची भूमिका इतकी गाजली की त्यानंतर १९६० पर्यंत त्यांनी तब्बल तीस चित्रपटातून कृष्णाचीच भूमिका केली. दलितांना ज्या काळात मंदिरात प्रवेश नव्हता त्या काळात जन्माने ख्रिश्चन असलेल्या शाहू मोडकांची लोक भक्तिभावाने त्यांच्या पायावर हार-फुले, अक्षता, नारळ ठेवून त्यांची पूजा करीत होते. ही किमया त्यांनी साकारलेल्या कृष्णाच्या भूमिकेची होती. त्यांच्या सात्त्विक, सोज्ज्वळ, प्रसन्न व्यक्तिमत्त्वामुळे प्रभातच्या 'संत ज्ञानेश्वर'मध्ये ते ज्ञानेश्वर झाले होते.

प्रभातचा 'माणूस' म्हणजे एक भोळाभाबडा पोलिस गणपत आणि व्यवहारचतुर वेश्या मैना यांची सुरेख प्रेमकहाणी होती. कथा भास्करराव अमेंबल यांची तर पटकथा संवाद, गीते अनंत काणेकर यांची होती. साक्षात फोरास रोड वाटेल असा तीन मजली वेश्यावस्तीचा भव्य सेट, चिंधीचा प्रतिकात्मक उपयोग, पोलिस नेहमी एकमेकांना बक्कल नंबरने हाक मारतात असे डोळस निरीक्षण सहजसुंदर चटकदार संवाद हे 'माणूस'चे वैशिष्ट्य होते. 'माणूस' हा पोलिस जीवनावरचा सर्वप्रथम चित्रपट होता. यानंतर मराठी-हिंदी चित्रपटांतून अनेक पोलिस आले आणि गेले. परंतु शाहू मोडकांनी साकारलेला गणपत हवालदार आजही विसरता येत नाही. इतका त्यांनी जिवंत, रसरशीत वास्तववादी अभिनय केला होता. त्यांनी 'माझा मुलगा', 'पहिली मंगळागौर', 'ही माझी लक्ष्मी', 'वसंतसेना', 'पारिजातक' आदी चित्रपटांतून भूमिका केल्या. पण आजही ते लक्षात राहतात ते 'माणूस'मधील गणपत हवालदार म्हणूनच!


इंडियन डग्लस म्हणून नावाजलेले हजाराची भाषा चित्रपटात आणणारे, मास्टर विठ्ठल हे पहिले अभिनेते! कोल्हापुरातील हा देखणा, गालांवर सुंदर खळी पडणारा, घोडेसवारी, तलवारबाजी, हाणामारी आदी स्टंट प्रकारातील निपुण तरुण भालजी पेंढारकरांबरोबर सिनेमात आला. लोक केवळ त्यांना पाहण्यासाठी गर्दी करत. सिनेमा तिकिटांचा काळाबाजार त्यांच्याच चित्रपटांपासून सुरू झाला. त्यांचे 'नेताजी पालकर', 'बहिर्जी नाईक', 'शिलंगणाचे सोने', 'नरवीर तानाजी', 'पावनखिंड', 'मोहित्यांची मंजुळा' आदी ऐतिहासिक तसेच 'मीठ-भाकर', 'वादळ', आकाशगंगा', 'साधी माणसं' आदी सामाजिक चित्रपट खूप लोकप्रिय झाले. स्टंट प्रकारात भगवानदादांचे ते गुरू होते. यावरून मास्टर विठ्ठल यांची योग्यता व लोकप्रियता लक्षात येते.

काही कलाकार एखाद्या विशिष्ट भूमिकेसाठीच जन्माला आलेले असतात. ती व्यक्तिरेखा हीच त्यांची जन्माची ओळख असते. त्यांच्या शिवाय त्या भूमिकेसाठी आपण इतर कुणाचाही विचार करू शकत नाही. इतकी समर्थपणे त्यांनी ती भूमिका साकारलेली असते.

१९५६ मध्ये भालजी पेंढारकर यांच्या 'पावनखिंड' चित्रपटात वसंतराव पहेलवान यांनी बाजीप्रभू देशपांडे साकार केला. त्यांची बाजीप्रभूची भूमिका प्रचंड गाजली.

कोल्हापूर जवळच्या पन्हाळगडावरील बाजीप्रभू देशपांडे यांचा पुतळा उभारताना वसंतरावांच्या याच भूमिकेची मोहिनी शिल्पकाराच्या मनावर पडली होती. आजही तो पुतळा पाहताना, लीलया दांडपट्टा फिरविणाऱ्या वसंतराव पहेलवानांचाच भास होतो.

प्रभातच्या 'संत तुकाराम'मधील पहिल्यावहिल्या अप्रतिम भूमिकेने विष्णूपंत पागनीसांना अजरामर केले. आत्यंतिक सात्त्विक, साधाभोळा भाव, परम विठ्ठलभक्ती, पत्नीविषयी अकृत्रिम प्रिती, अभंग म्हणताना त्यांची होणारी तल्लीनता वाखाणण्यासारखी




**शाहू मोडकांनी साकारलेला गणपत हवालदार आजही विसरता येत नाही. इतका त्यांनी जिवंत, रसरशीत वास्तववादी अभिनय केला होता. त्यांनी 'माझा मुलगा', 'पहिली मंगळागौर', 'ही माझी लक्ष्मी', 'वसंतसेना', 'पारिजातक' आदी चित्रपटांतून भूमिका केल्या. पण आजही ते लक्षात राहतात ते 'माणूस'मधील गणपत हवालदार म्हणूनच!**






**१९३८ मध्ये मास्टर विनायकांच्या 'ब्रह्मचारी' चित्रपटातील दामुअण्णा मालवणकरांच्या भूमिकेने मराठीत विनोदी चित्रपटांचे युग अवतरले. बोलण्याची विशिष्ट ढब, पाहताक्षणी हसू यावे असा बोलका चेहरा आणि तिरळा डोळा त्यांच्या या व्यक्तिमत्त्वाला साजेसे एक गीत आचार्य अत्रे यांनी 'ब्रह्मचारी'साठी रचले होते, 'फिरवा ना सख्या जरा डोळां'.**




होती. हाती वीणा, चिपळ्या घेऊन अभंग म्हणताना ते रंगून जात. त्या काळात, तुकारामाचे म्हणून पागनीसांचेच फोटो मंदिरात आणि घराघरात लागले. संत तुकारामला भाषेची अडचण पडली नाही. मराठी-अमराठी प्रेक्षकांना तुकाराम जबरदस्त भावला. लंडनच्या म्युझियममध्ये महाराष्ट्राचा थोर संत म्हणून विष्णूपंत पागनीसांचेच छायाचित्र आहे. पागनीसांनी पुढे अनेक संतपटांत भूमिका केल्या पण ते प्रेक्षकांच्या चिरस्मरणात राहिले ते केवळ संत तुकाराम म्हणूनच!

शांताराम बापूंच्या 'अमर भूपाळी'मध्ये पंडितराव नगरकरांनी कवी होनाजींची तर विजया ऊर्फ संध्याने त्यांच्या नायिकेची भूमिका केली होती. पंडितराव हे मराठी रंगभूमीवरील गायक नट होते. त्या दोघांचा हा पहिलाच चित्रपट होता. त्या दोघांनी यात अप्रतिम भूमिका तर केलीच पण होनाजीची वसंत देसाई यांनी स्वरबद्ध केलेली, 'घनश्याम सुंदर श्रीधरा' ही भूपाळी अजरामर करून टाकली. या भूपाळीने अवघ्या महाराष्ट्राला नुसते झपाटून टाकले होते. यात राज कपूर, नर्गिससारखे कलाकारही होते. राज कपूरने या 'भूपाळी'वरूनच प्रेरणा घेऊन 'जागते रहो' चित्रपटामध्ये 'जागो मोहन प्यारे' या गीताची निर्मिती केली.

मजबूत अंगापिंडाचे अनंत धुमाळ खरे पहेलवान व्हायचे. पण चुकून अभिनेता झाले. १९५२चा राजा परांजपे यांचा पेडगावचे शहाणे चित्रपटात त्यांनी साकारलेला मद्रासी आचारी तेव्हा इतका गाजला की ए.आर. कारदारनी त्यांच्या हिंदी आवृत्तीत 'चाचा चौधरी'मध्ये ही धुमाळनाच घेतले. मुंबईतील मद्रासी लोकांनी त्यांचा सत्कारही आयोजित केला पण नंतर ते मद्रासी नसून मराठीच आहेत हे कळल्यावर तो सत्कार कॅन्सल केला. त्यांच्यासारखा मद्रासी माणूस मद्रासी माणसालाही साकार करता येत नव्हता. प्रमोद चक्रवर्ती, शक्ती सामन्ता आपल्या प्रत्येक चित्रपटात धुमाळांना घ्यायचे. मराठीत ही त्यांनी 'वहिनीच्या बांगड्या', 'जगाच्या पाठीवर', 'पुनवेची रात', 'घरचं झालं थोडं', 'दिसतं तसं नसतं' आदी चित्रपटांतून भूमिका केल्या पण त्यांनी उमटवलेला मद्रासी भूमिकांचा ठसा त्यांच्या पश्चातही कुणाला पुसता आलेला नाही.

मूकपटांच्या काळात सिनेनायकांना जेमतेम तीन आकडी पगार मिळत असे. पुढे बोलपटांना सुरुवात झाली तेव्हा हिंदीमधील मास्टर विठ्ठल, कुंदनलाल सहगल, अशोककुमार, राज कपूर, दिलीपकुमार, देव आनंद, राजेंद्रकुमार, राजेश खन्ना, अमिताभ बच्चन, आमीर खान, सलमान खान, शाहरूख खान या सुपरस्टार्सनी नायकांचा भाव पुढे कोट्यवधी रुपयांपर्यंत वाढवला.

मराठी सिनेमा मा. विठ्ठल, बाबुराव पेंढारकर, चंद्रकांत मांढरे, राजा गोसावी, दादा कोंडके, अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे, सचिन, महेश कोठारे अलीकडच्या काळात भरत जाधव, मकरंद अनासपुरे, किशोर कदम या त्यामानाने लिटिल स्टार्सने गाजवला. यात बहुतांश विनोदी अभिनेते आहेत. हिंदीमध्ये अनेक भव्यदिव्य बिग बजेट, सुपरहिट चित्रपटांची निर्मिती झाली. तरीसुद्धा सशक्त कथाविषय व निखळ विनोद या बाबतीत हिंदी चित्रपट काही अपवाद वगळता मराठीची कधीच बरोबरी करू शकला नाही. नूरमहंमद चार्ली, आगा, जॉनी वॉकर, मेहमूद, आय.एस. जौहर वगळता बाकी कुणी विनोदी अभिनेता नायक म्हणून चमकला नाही की एकट्याच्या जीवावर प्रेक्षकांची गर्दी खेचू शकला नाही.

भालजी पेंढारकरांच्या 'नारद नारदी' चित्रपटातील दिनकर कामण्णांच्या भूमिकेने मराठीत विनोदी चित्रपटाला सुरुवात झाली. भावबंधन नाटकातील कामण्णांच्या लोकप्रिय भूमिकेमुळे दिनकर ढेरे, दिनकर कामण्णा म्हणून ओळखले जात होते.

१९३८ मध्ये मास्टर विनायकांच्या 'ब्रह्मचारी' चित्रपटातील दामुअण्णा मालवणकरांच्या भूमिकेने मराठीत विनोदी चित्रपटांचे युग अवतरले. बोलण्याची विशिष्ट ढब, पाहताक्षणी हसू यावे असा बोलका चेहरा आणि तिरळा डोळा त्यांच्या या व्यक्तिमत्त्वाला साजेसे एक गीत आचार्य अत्रे यांनी 'ब्रह्मचारी'साठी रचले होते, 'फिरवा ना सख्या जरा डोळां'. 'ब्रॅन्डीची बाटली'मध्ये दामुअण्णा चक्क नायक होते. गोपिकांचे वस्त्रहरण या चित्रातल्या श्रीकृष्णाला उद्देशून बावळट बगाराम (दामुअण्णा) अभावितपणे बोलून जातो. 'देवा आम्हालाही एकदा चान्स द्या की!' अत्र्यांचे खुशखुशीत विनोदी संवाद दामुअण्णांच्या तोंडून ऐकणे म्हणजे सिनेप्रेक्षकांसाठी एक पर्वणी होती. 'लग्न पहावं करून', 'सरकारी पाहुणे', 'गजाभाऊ' आदी चित्रपटांतील त्यांची नायकाची भूमिकाही गाजली. आचार्य अत्रे यांच्या 'मोरूची मावशी'मधून स्त्रीवेषधारी नायक ही संकल्पना त्यांनीच सर्वप्रथम चित्रपटातून आणली. दामुअण्णांची भूमिका असलेल्या चित्रपटात इतर नायक-नायिकांचे अस्तित्वही कधी कधी जाणवत नसे. दादा

*With Best Compliments From*

**WAVE**

*advertising*

Dreams Complex, 4/C-605, L.B.S. Marg, Near
Bhandup Station (W), Mumbai-400078.
Mobile : 0981934 9596 / 08451939 077
E-mail : wave.girish@gmail.com
niceads.girish@gmail.com
Website : www.niceads.in

*With Best Compliments From*

**SANDEEP ROOPCHANDANI**

**CONTRACTOR & BUILDER**

Shop No. 9 & 10, Antrolikar Nagar,
Bhajji Apartment, Hotgi Road,
Solapur-413004
Ph. 9822329964

*With Best Compliments From*

**UNIQUE ASSOCIATES**

**ENGINEERS & BUILDER**

Corporate Office : G-02, Unique Jheel Apartment,
Sawarbandhe Layout, Opp. Dr. Sathawane
Chumbak Chikitsa, Lake Side Near Hingna T-point
Hingna Road, Nagpur-440 036
Telefax : 2221513
Emailid-uniqueassociates.ngp@gmail.com

Regd. Office : Plot No. 13, Zenda Chowk,
2nd Bus Stop, Gopal Nagar
Nagpur-440022

*With Best Compliments From*

**Sadhana Electricals**

Pune




**राजा गोसावी म्हणजे शहरी, मध्यमवर्गीय भाबडा, निरागस नायक! नाव राजा असूनही एखाद्या सुंदर तरुणीने बघता क्षणीच भाळावे असे रंगरूप नाही. आडनाव गोसावी म्हणजे नावात ग्लॅमरही नाही. तरी राजा सर्वात लोकप्रिय नायक झाला.**

कोंडकेंनी सुद्धा त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन 'आली अंगावर' चित्रपट निर्माण केला. १९५०च्या 'देव पावला' चित्रपटातील नायिकेच्या भूमिकेसाठी सुलोचनाबाईंना बाराशे रुपये मानधन मिळाले होते, तर दामुअण्णांना चक्क चौदा हजार रुपये मानधन मिळाले होते. यावरून दामुअण्णांच्या लोकप्रियतेची कल्पना येते. चिमणराव-गुंड्याभाऊ म्हटलं की आजही लोकांना प्रथम दामुअण्णा-जोग आठवतात, मग दिलीप प्रभावळकर-बाळ कर्वे आठवतात.

राजा गोसावी म्हणजे शहरी, मध्यमवर्गीय भाबडा, निरागस नायक! नाव राजा असूनही एखाद्या सुंदर तरुणीने बघता क्षणीच भाळावे असे रंगरूप नाही. आडनाव गोसावी म्हणजे नावात ग्लॅमरही नाही. खलनायकांशी दोन हात करण्यासाठी मजबूत शरीरयष्टी नाही. पौराणिक, ऐतिहासिक स्टंट चित्रपटांसाठी तर यांचा कुणी विचारही करू शकणार नाही. तरी राजा सर्वात लोकप्रिय नायक झाला. नैसर्गिक अभिनय, मराठी भाषेची उत्तम जाण आणि जन्मजात मिस्किलपणा!

या अस्त्रांवर त्यांनी 'अखेर जमलं', 'लाखाची गोष्ट', 'अवघाची संसार', 'गंगेत घोडं न्हालं', 'दोन घडीचा डाव', 'गाठ पडली ठकाठका', 'याला जीवन ऐसे नाव', 'कामापुरता मामा', 'वाट चुकलेले नवरे', 'उतावळा नारद', 'श्रीमान बाळासाहेब', 'असला नवरा नको गं बाई' आदी चित्रपटांतून विनोदी भूमिका करून, तब्बल पंचवीस वर्षे कारकीर्द गाजवली.

'गंगेत घोडं न्हालं'मध्ये राजा गोसावी रेखाशी विवाह करून तिला घरी घेऊन येतो तेव्हा त्याची आई इंदिरा चिटणीस सुनेकडे (रेखा) पाहत म्हणते, 'घरात पाळणा हलावा, एक लहान मूल खेळावं अशी माझी इच्छा आहे.' यावर राजा गोसावी हजरजबाबीपणे तिला उत्तर देतो, 'ते लागलं माझ्याकडे!' राजा गोसावींचे टायमिंग, बोलण्याची ढब वाखाणण्यासारखी होती. हिंदी-मराठी चित्रपटसृष्टीत नर्गिस, मधुबाला, जॉनी वॉकर यांच्या नावाने चित्रपटनिर्मिती झाली. मराठीत राजा गोसावींना ते भाग्य मिळाले. 'राजा गोसावीची गोष्ट' या चित्रपटात राजाभाऊंनी तिहेरी भूमिका करून धम्माल उडवून दिली होती.




राजाभाऊंच्या अनेक लोकप्रिय मराठी चित्रपटांची हिंदीत कॉपी करण्यात आली. गंगेत घोडं न्हालं - एक दिल सौ अफसाने, दोन घडीचा डाव - नॉटी बॉय, अवघाची संसार - मैं शादी करने चला, याला जीवन ऐसे नाव - हॉलिडे इन बॉम्बे, बोलविता धनी - कल क्या होगा. हिंदीतील कोणत्याही दिग्गज कलाकाराला राजा गोसावींसारखी ती भूमिका फुलवता आली नाही. दामुअण्णा-जोग सारखीच राजा गोसावी-शरद तळवलकर ही विनोदवीरांची जोडीही त्याकाळी खूप गाजली होती. डोक्यावरचे टक्कल ही शरदरावांची खासियत होती. 'एकटी', 'मुंबईचा जावई', 'याला जीवन ऐसे नाव', 'दोन घडीचा डाव', 'अवघाची संसार'मधील त्यांच्या भूमिका लोकप्रिय झाला होत्या.

दादा कोंडके म्हणजे हाडाचा सोंगाड्या! अत्यंत हजरजवाबी, चेहऱ्यावर रांगडा भाबडेपणा, घोगऱ्या आवाजातले इरसाल संवाद, कसलीही भीडभाड न बाळगता समोरच्या माणसाला हसविणे हाच याचा धंदा! निर्माते सेंसॉरला घाबरायचे तर सेंसॉर दादांना! त्यांच्या भन्नाट विनोदबुद्धीपुढे कुणाचे काही चालत नसे. दादा म्हणजे सिनेमा प्रेक्षकाची अचूक नाडी आणि सिनेधंद्यांची नीट जाण असणारा सर्वात यशस्वी नायक आणि निर्माता!

वसंत सबनीसांच्या 'विच्छा माझी पुरी करा' या लोकनाट्यांतून दादा मराठी चित्रपटात आले. डोक्यावर आडवी टोपी कपाळावर टिळा, खाकी हाफ पॅण्ट व ढिला शर्ट या गबाळ्या अवतारातच ते १९७१ चा 'सोंगाड्या' ते १९९६चा 'वाजवू का?' चित्रपटात वावरले. पंचवीस वर्षे त्यांनी फक्त एकच प्रतिमा जपली. दादांनी महाराष्ट्रातील शहरे व ग्रामीण भागातून अफाट लोकप्रियता मिळवली. सुशिक्षित, स्वत:ला बुद्धिजीवी समजणारा प्रेक्षकवर्ग दादांच्या डबल मिनिंग संवादांना नाक मुरडत असे. परंतु दादांनी शहरी, ग्रामीण प्रेक्षकांबरोबरच गुजराती, सिंधी प्रेक्षकवर्गही निर्माण केला. हा प्रेक्षक दादांच्या वाह्यातपणाला हसून मनमुराद दाद देत असे. पंढरपूरला शिवसेनेच्या जाहीरसभेत दादा व्यासपीठावर माईक हातात घेत असतानाच, प्रेक्षकांतून एक जोरदार आवाज आला, 'काय दादा, आज चक्क फुलपॅण्टीत?' दादांनी ताडकन जवाब दिला, 'हाफ पॅण्टीतील पहायला तिकीट पडतं.' श्रोत्यांची हसून हसून मुरकुंडी उडाली. या सभेत दादांबरोबर मी स्वत: हजर होतो. दादांनी आपल्या चाकोरीबाह्य विनोदी चित्रपटांनी स्वत:चे एक युग निर्माण केले.

अशोक सराफने 'दोन्ही घरचा पाहुणा' या गीतविरहित चित्रपटात आपल्या रूपेरी जीवनाची सुरुवात केली. दादा कोंडके यांच्या 'पांडू हवालदार' चित्रपटातून तो विनोदी नट म्हणून नावरूपाला आला. अशोक हा मूळचा रंगभूमीवरचा कलाकार. भूमिका

कोणतीही असो, अशोक आपल्या खास शैलीने त्यात रंग भरत असे. अशोकने विनोदी भूमिका केल्याच पण गंभीर, करुण रसपूर्ण भूमिकाही तितक्याच ताकदीने रंगविल्या. 'राम राम गंगाराम'मधील 'खाटीक', 'अरे संसार संसार'मधील 'दुष्ट सावकार', 'धुमधडाका'मधील त्याची भूमिका म्हणजे 'प्यार किये जा' या हिंदी चित्रपटातील किशोरकुमारचा अवतार होता. अशोक सराफ म्हणजे प्रेक्षकांचे निखळ मनोरंजन होते. महाराष्ट्र सरकारच्या मराठी चित्रपट महोत्सवात अशोक सराफना नऊ वेळा उत्कृष्ट अभिनयाचा पुरस्कार तसाच २००६चा व्ही. शांताराम पुरस्कारही मिळाला.

लक्ष्मीकांत बेर्डे हा सुद्धा एक गुणी अभिनेता. जब्बार पटेल यांच्या 'एक होता विदूषक' चित्रपटात लक्ष्मीकांतने विदुषकाची भूमिका केली आणि तीच त्याची ओळख बनली. 'धुमधडाका', 'अशी ही बनवाबनवी', 'धडाकेबाज', 'थरथराट' आदी चित्रपटांतील त्याच्या भूमिका गाजल्या. 'चल रे लक्ष्या मुंबईला'मुळे त्याचं नाव चित्रपटाच्या टायटलमध्ये आले. 'घोळात घोळ'साठी त्याला उत्कृष्ट अभिनेत्याचे पारितोषिक मिळाले. मात्र एकाच टाईपच्या भूमिका सातत्याने मिळत गेल्यामुळे त्याला आपला अभिनय खुलविता आला नाही. पण अशोक सराफ व लक्ष्मीकांत बेर्डे या जोडीने दहा ते पंधरा वर्षे मराठी सिनेमा गाजवला.

वासंती, बेबी शंकुतला, राम मराठे, सचिन पिळगावकर, महेश कोठारे यांसारखी चिमुरडी पण चुणचुणीत मुले हिंदी-मराठी चित्रपटांतून अशा काही भूमिका करून गेली आहे की पाहताना अचंबा वाटावा. 'हा माझा मार्ग एकला' हा चार वर्षांच्या मास्टर सचिनचा पहिला चित्रपट! यातील हृदयस्पर्शी भूमिकेसाठी सचिनला राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांच्या हस्ते राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. सचिन 'पारध'मध्ये सर्वप्रथम नायक बनला. त्यांनी 'नवरी मिळे नवऱ्याला', 'गम्मत जम्मत', 'अशी ही बनवाबनवी', 'नवरा माझा नवसाचा', 'एकापेक्षा एक' असे एकामागोमाग एक सुपरहिट चित्रपट दिले. 'अशी ही बनवाबनवी'ने तर जवळपास एक कोटीचा धंदा केला. सचिनला पाहताना मेहमूदच्या कॉमेडीची आठवण होते. 'नवरा माझा नवसाचा' ही मेहमूदच्या 'बॉम्बे टु गोवा'ची मराठी आवृत्ती होती. १९८० नंतर प्रेक्षक परत मराठी चित्रपटांकडे वळू लागले. याचे बरेचसे श्रेय सचिन, अशोक सराफ, महेश कोठारे व लक्ष्मीकांत बेर्डे आदी कलाकारांना जाते.

सचिनसारखेच महेश कोठारे यांनी सुद्धा आपले संपूर्ण आयुष्य चित्रपटसृष्टीला वाहिले आहे. 'छोटा जवान'मध्ये तो बालकलाकार म्हणून नावारूपाला आला. त्यांच्या 'धुमधडाका'मुळे तरुण प्रेक्षकवर्ग मराठी सिनेमाकडे आकर्षित झाला. महेशने सर्वप्रथम मराठी सिनेमाला ग्लॅमर मिळवून दिले. 'पछाडलेला', 'झपाटलेला', 'धडाकेबाज', 'धुमधडाका', 'थरथराट', 'दे दणादण' आदी चित्रपटांत त्याने पोलिस अधिकाऱ्याची भूमिका रंगविली होती. प्रत्येक चित्रपटात त्या व्यक्तिरेखेचे नाव मात्र महेशच होते.

दिलीप प्रभावळकरांनी चिमणराव-गुंड्याभाऊ या चित्रपटाद्वारे पदार्पण करून आपली स्वत:ची वेगळी शैली जोपासली. 'चौकटचा राजा'मधील त्यांची अप्रतिम भूमिका कधीच विसरली जाणार नाही.

बाबुराव पेंढारकर खरं तर अव्वल दर्जाचे नटश्रेष्ठ! केवळ मराठीतच नव्हे तर भारतीय चित्रपटसृष्टीत खलनायकालाही नायकासारखी लोकप्रियता मिळवून देणारा पहिला अभिनेता! तीसच्या दशकात खलनायक म्हणून त्यांच्याशिवाय इतर कुणाचाही विचार केला जात नसे. पुढे ते नायक म्हणून भूमिका करू लागले तेव्हा पड्यावरील अट्टल बदमाश सुधारला म्हणून त्यांच्या भूमिकेची जाहिरात करण्यात आली होती.

१५ ऑगस्ट १९४७ ला आपला देश स्वतंत्र झाला. सामाजिक आणि राजकीय जीवनात एक नवीन परिवर्तन झाले. मराठी बरोबर हिंदीत निर्माण होणारी मराठी चित्रपटांची निर्मिती थांबली. मराठीची बाजारपेठ ही फक्त महाराष्ट्र आणि मराठी प्रेक्षक यांच्यापुरतीच मर्यादित होत गेली. त्यातही परत शहरी आणि ग्रामीण प्रेक्षक अशी विभागणी झाली.

दिलीप, राज आणि देव यांच्या हिंदी चित्रपटांच्या आकर्षणामुळे शहरी प्रेक्षक मराठी चित्रपटांपासून हळूहळू दूर होत गेला. त्या काळात चित्रपट हा केवळ तंबू सिनेमातून खेड्यापाड्यात जात होता. स्वातंत्र्योत्तर काळात खेड्यापाड्यातही हळूहळू स्थायी स्वरूपात चित्रपटगृहे उभी राहू लागली. त्यातूनच पुढे प्रचंड असा ग्रामीण प्रेक्षकवर्ग उभा राहिला.

याच काळात मंगल पिक्चर्सचा दिनकर द. पाटीलांनी लिहिलेला माडगूळकरांच्या ढंगदार लावण्यांनी नटलेला 'जय मल्हार' हा पहिला ग्रामीण चित्रपट निर्माण झाला व गावचा पाटील सिनेमात आला. या चित्रपटाच्या तुफान यशामुळे मराठी चित्रपटांना एक नवीन विषय मिळाला. 'तमाशा' हा



**दादा कोंडके म्हणजे हाडाचा सोंगाड्या! अत्यंत हजरजवाबी, चेहऱ्यावर रांगडा भाबडेपणा, घोगऱ्या आवाजातले इरसाल संवाद, कसलीही भीडभाड न बाळगता समोरच्या माणसाला हसविणे हाच याचा धंदा! अशोक सराफने 'दोन्ही घरचा पाहुणा' या गीतविरहित चित्रपटात आपल्या रूपेरी जीवनाची सुरुवात केली. दादा कोंडके यांच्या 'पांडू हवालदार' चित्रपटातून तो विनोदी नट म्हणून नावरूपाला आला.**




ग्रामीण विषयावरच्या चित्रपटांचा एक अविभाज्य घटक बनला. 'जय मल्हार' (१९४७) पासून निर्माण झालेली ग्रामीण विषयावरच्या चित्रपटांची लाट 'पिंजरा' (१९७२) पर्यंत सतत पंचवीस वर्षे येत राहिली.

चंद्रकांत आणि सूर्यकांत मांढरे या बंधूंच्या रूपात मराठी सिनेमाला अस्सल रांगडा, दिलदार, रगेल व रंगेल ग्रामीण नायक मिळाला. चंद्रकांत यांचे खरे नाव गोपाळ मांढरे, भालजी पेंढारकरांनी 'राजा गोपीचंद' चित्रपटात त्यांचे नाव चंद्रकांत केले. प्रकाशच्या रामराज्य व भरतभेट चित्रपटात चंद्रकांत राम होते, तर 'स्वयंवर झाले सीतेचे'मध्ये त्यांनी रावणाची भूमिका करून पं. भीमसेन जोशी यांच्या आवाजात 'रम्य ही स्वर्गाहून लंका' हे गाणेही गायले होते. चंद्रकांतने अनेक ऐतिहासिक चित्रपटातून भूमिका केल्या. शिवाजी आणि संभाजी यांच्या भूमिका साकारण्यात त्यांचा हातखंडा होता. राम म्हणून अनेक स्त्रिया भाबडेपणाने चंद्रकांत यांची पूजा करायच्या. शिवाजी किंवा संभाजी महाराज म्हणून त्यांचा आदर करायच्या. 'जय मल्हार'मधील मुजोर बाहेरख्याली पाटलाच्या भूमिकेमुळे चंद्रकांत यांची इमेज पूर्णत: बदलली. चंद्रकांतने ग्रामीण चित्रपटांतून परस्पर भिन्न असा दोन प्रकारचा नायक सादर केला. 'सावकारी पाश', 'मीठभाकर', 'मानाचं पान', 'पवनाकाठचा धोंडी', 'मोठी माणसं'मध्ये त्यांनी गरीब शेतकऱ्याची भूमिका केली होती. एकेकाळी चंद्रकांत व सुलोचना ही जोडी प्रचंड लोकप्रिय झाली होती. सुलोचना कपाळावर बंदा रुपयासारखा मोठा कुंकवाचा टिळा लावायच्या व पतीला धनी म्हणून हाक मारायच्या. त्यांच्या भूमिकेत एक वेगळा जिव्हाळा असायचा. चंद्रकांत यांचे 'पाटलाचा पोर', 'भाऊबीज', 'सांगत्ये ऐका', 'पंचारती', 'खंडोबाच आण', 'ईर्षा' या ग्रामीण चित्रपटांबरोबरच 'वादळ', 'तारका', 'पतिव्रता' आदी शहरी चित्रपटही लोकप्रिय झाले. चंद्रकांत मात्र शेवटपर्यंत पाटलाचा पोर म्हणूनच लक्षात राहिले.

'बहिर्जी नाईक' हा सूर्यकांत मांढरे यांचा पहिला चित्रपट. अभिनयातील अस्सल मर्दानी रांगडेपणा, गावरान बाज हे त्यांच्या भूमिकेचे वैशिष्ट्य होते. यासाठीच ग.दि. माडगूळकरांनी 'बाळा जो जो रे' व 'स्त्री जन्मा ही तुझी कहाणी' या ब्राह्मणी कुटुंबवत्सल चित्रपटाचा नायक म्हणून सूर्यकांत यांना घेण्यास विरोध केला होता. याउलट व्यंकटेश माडगूळकरांच्या 'सांगत्ये ऐका' व 'वैजयंता' या दोन्ही चित्रपटांत सूर्यकांत नायक होते. सूर्यकांत हे अण्णाभाऊ साठेंच्या 'फकिरा', 'वारणेचा वाघ', 'मुरळी मल्हारीरायाची' आदी चित्रपटांचा रांगडा नायक म्हणूनच अधिक लक्षात राहतात.

दिनकर द. पाटलांचाही सूर्यकांत आवडता नायक होता. त्यांच्या 'कुलदैवत', 'मल्हारी मार्तंड', 'शिकलेली बायको', 'धन्य ते संताजी धनाजी', 'ज्योतिबांचा नवस', 'पाटलाची सून', 'सवत' आदी चित्रपटांतून वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका केल्या. अस्सल तुरेदार कोल्हापुरी फेटा, बंडीच्या बटनाला गोंड्याचा गोफ, चालताना कर्रकर्र वाजणाऱ्या कोल्हापुरी वहाणा यामुळे ते अस्सल पाटील वाटले. ऐतिहासिक चित्रपटातही तलवारबाजी, मल्हारी मार्तंडसाठी त्यांना सर्वश्रेष्ठ अभिनेत्याचा पुरस्कारही मिळाला होता.

हिंदीसारखीच मराठी चित्रपटांनाही रुबाबदार, देखण्या नायकांची परंपरा लाभली आहे. अस्सल कोल्हापुरी, मर्दानी रगेल रंगेल नायक सूर्यकांत व चंद्रकांत राजबिंड्या व्यक्तिमत्त्वाचे विवेक, देखणे-चिकणे नायक काशिनाथ घाणेकर, रवींद्र महाजनी, रुबाबदार व्यक्तिमत्त्वाचे रमेश देव, शहरी व ग्रामीण व्यक्तिरेखेत चपखलपणे शोभून दिसणारे अरुण सरनाईक! अरुणचे वडील शंकरराव व काका निवृत्तीबुवा सरनाईक शास्त्रीय संगीतातील जानेमाने गायक. त्यामुळे गायन-वादनकला अरुणच्या रक्तातच होती.

राजा ठाकूरांनी 'रंगल्या रात्री अशा' चित्रपटातील ढोलकी व तबलावादक नायक यशवंत याच्या भूमिकेसाठी अरुण सरनाईक यांची निवड केली. नायकाच्या या पहिल्याच भूमिकेसाठी अरुणला सर्वश्रेष्ठ अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला.

'रंगल्या रात्री'मध्ये प्रत्यक्षात उस्ताद अल्लारखा साहेबांनी तबलावादन केले होते, तर अरुणने त्यावर सफाईदार अभिनय केला होता. अभिनय, उत्कृष्ट संवादफेक आणि रुबाबदार व्यक्तिमत्त्व या गुणांवर त्यांनी ग्रामीण व शहरी नायक तितक्याच ताकदीने रंगवला. 'पाहू रे किती वाट' (डॉ. चारुदत्त), 'सवाल माझा ऐका' (ढोलकीवादक जयवंत), 'मुंबईचा जावई (नाट्यवेडा अविनाश), 'केला इशारा जाता जाता' (ढोलकीवाला), 'पाच नाजूक बोटे' (दुहेरी भूमिका), 'सिंहासन' (मुख्यमंत्री जयाजीराव शिंदे), 'एक गाव बारा भानगडी' (ग्रामीण व्यक्तिरेखा) याशिवाय 'धाकटी बहीण, 'भोळीभाबडी' चित्रपटातील त्यांच्या भूमिकाही विशेष गाजल्या. त्यांनी चित्रपटांतून पार्श्वगायनही केले. प्रेक्षकांच्या

**दिनकर द. पाटलांचाही सूर्यकांत आवडता नायक होता. त्यांच्या 'कुलदैवत', 'मल्हारी मार्तंड', 'शिकलेली बायको', 'धन्य ते संताजी धनाजी', 'ज्योतिबाचा नवस', 'पाटलाची सून', 'सवत' आदी चित्रपटांतून वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका केल्या. अस्सल तुरेदार कोल्हापुरी फेटा, बंडीच्या बटनाला गोंड्याचा गोफ, चालताना कर्रकर्र वाजणाऱ्या कोल्हापुरी वहाणा यामुळे ते अस्सल पाटील वाटले. मल्हारी मार्तंडसाठी त्यांना सर्वश्रेष्ठ अभिनेत्याचा पुरस्कारही मिळाला होता.**

हृदय-सिंहासनावर स्वार असतानाच- अपघातात त्याचं निधन झाले... हे रसिकांचे दुर्दैव!

निर्माते, दिग्दर्शक, लेखक अभिनेते राजा परांजपे हे भालजी पेंढारकर यांच्या 'कोल्हापूर स्कूल'चे विद्यार्थी! भालजींना काही सामाजिक चित्रपटांची निर्मिती केली असली तरी त्यांना ऐतिहासिक आणि पौराणिक चित्रपटांसाठीच ओळखले जाते. राजाभाऊंनी कधी कोणत्या ऐतिहासिक चित्रपटात भूमिका केली नाही. 'कान्होपात्रा', 'गोरखनाथ' या पौराणिक चित्रपटात मात्र नगण्य भूमिका केल्या. भालजींच्या 'सूनबाई' (१९४३) चित्रपटात ते सर्वप्रथम विनोदी अभिनेता म्हणून चमकले. राजाभाऊंच्या भूमिका म्हणजे विनोद आणि कारुण्य यांचा सर्वोत्कृष्ट मिलाफ होता. भूमिकेतील सहजपणा हे त्यांचे वैशिष्ट्य होते.

'पेडगावचे शहाणे'मधील त्यांची दुहेरी भूमिका (काका शहाणे) 'हा माझा मार्ग'मधील व्यसनाधीन पिता, 'ऊन पाऊस'मधील स्कूलमास्टर, 'पुढचं पाऊल'मधील इरसाल हॉटेलवाला मामा चिपळूणकर राजाभाऊंनी आपल्या कसदार अभिनयाने या भूमिका अजरामर केल्या. 'जगाच्या पाठीवर'मधील त्यांनी साकार केलेला नायक आजही विसरता येत नाही. राजाभाऊ म्हणजे बहुरंगी कलाकार! क्षणात डोळे ओले करण्याची किमया फक्त त्यांनाच साध्य झाली होती. चाळीस वर्षांच्या दीर्घ कारकीर्दीत त्यांनी जवळजवळ ऐंशी चित्रपट केले.

'आंधळा मागतो एक डोळा' या चित्रपटात खलनायक म्हणूनच रमेश देव यांच्या रूपेरी जीवनाची सुरुवात झाली. सत्तरच्या दशकात हिंदीमध्ये खलनायक म्हणून प्राणला जे स्थान होते ते रमेश देवने मराठी चित्रपटात मिळवले होते. 'अपराध'मधील खलनायकाच्या भूमिकेसाठी मराठी चित्रपट महोत्सवात विशेष अभिनेत्याचे त्यांना पारितोषिक मिळाले होते. एकदा खलनायक म्हणून शिक्का बसल्यावर परत नायक बनून यशस्वी होणे भल्याभल्यांनाही जमत नाही. 'साता जन्माचा सोबती'मध्ये ते उषा किरणचे नायक बनले. १९६१च्या 'सुवासिनी' चित्रपटापासून रमेश देव व सीमा या जोडीची नायक-नायिका म्हणून यशस्वी वाटचाल चालू झाली. 'आलिया भोगासी'मध्ये ते बहीण-भाऊ तर 'पडछाया'मध्ये ते चक्क पिता-पुत्री होते. आपल्या रुबाबदार व्यक्तिमत्त्वामुळे नायिकाप्रधान चित्रपटांच्या जमान्यातही ते नायक म्हणूनच वावरले. विविध ढंगाच्या, रंगाच्या भूमिका केल्या व हिंदी चित्रपटातही यशस्वी ठरले. 'सुवासिनी', 'वैशाख वणवा', 'वरदक्षिणा', 'मोलकरीण', 'पडछाया', 'उमज पडेल तर', 'एक धागा सुखाचा', 'ते माझं घर', 'शेवटचा मालसुरा', 'प्रेम आंधळं असतं' हे त्यांचे विशेष उल्लेखनीय चित्रपट होते. रमेश देव हे मराठीतील खऱ्या अर्थाने ग्लॅमरस नायक होते.


मराठी सिनेमा हा सर्वार्थाने ग्लोबल झाला आहे. गेल्या वीस वर्षांत अनेक कलाकारांनी तो प्रचंड समृद्ध केला आहे. प्रेक्षक परत मराठी सिनेमांकडे वळत आहेत. नवीन नवीन कथा विषयांवर सिनेनिर्मिती होत आहे, प्रतिभाशाली नायक येत आहेत.

मराठी चित्रपटांचे नायक कदाचित हिंदीसारखे ग्लॅमरस, हायफाय पैसेवाले नसतील. परंतु सशक्त अभिनय, टॅलेंट आणि निखळ विनोदबुद्धी या बाबतीत त्यांची कुणीही बरोबरी करू शकत नाही आणि म्हणूनच मराठी चित्रपटांची कॉपी हिंदीत कधी यशस्वी झाली नाही. याचे पूर्ण श्रेय हे मराठी नायकांनाच द्यावे लागेल! अभिनयाच्या बाबतीत ते बेजोड आहेत.


**- अरुण पुराणिक**

भ्रमणध्वनी : ९३२२२१८६५३

arun.puranik@gmail.com


**मराठी चित्रपटांची कॉपी हिंदीत कधी यशस्वी झाली नाही. याचे पूर्ण श्रेय हे मराठी नायकांनाच द्यावे लागेल! अभिनयाच्या बाबतीत ते बेजोड आहेत.**


आपल्या घरात असायलाच हवीत अशी दोन नियतकालिकं

अवघ्या मराठी जनांचं पाक्षिक

१ पुणेपोस्ट

२ लीगलपोस्ट

कायद्याचे मराठीतील एकमेव त्रैमासिक

आजच संपर्क करा. घरपोच अंक मिळवा.

वार्षिक वर्गणी ५००रु. (प्रत्येकी)

संपर्क : ९५५२३४०१६७ ७७२२००५०८१



# मनस्विनी


## (प्रगती बाबुराव कोळगे)

**डॉ. लतिका भानुशाली**

**खू**प रात्री उशिरा फोन वाजला. इतक्या रात्री फोन म्हणजे अमेरिकेहून प्रगतीच असणार हे एव्हाना अनुभवावरून ठाऊक झालं होतं.

''हॅलो, बोल गं.'' मी झोपेतच आवाज दिला. ''अगं लतिका, मी एक सिनेमा काढतेय. त्यासाठी पूर्वतयारी करायला भारतात येतेय.'' प्रगतीने बाँब फोडला.

कसलाही आगापिछा माहीत नसलेल्या, कोणत्याही क्षेत्रात बिनधास्त, बेधडक घुसण्याची तिची प्रवृत्ती मला माहीत होती. पण म्हणून एकदम सिनेमा? त्यात साडेपाच वर्षांची, सतत गोड-गोड बडबड करणाऱ्या दोन गोंडस जुळ्या मुलांची जबाबदारी तिच्यावर होती. त्यांना सांभाळून हे शिवधनुष्य ती कशी पेलू शकणार? माझ्या मध्यमवर्गीय, भित्र्या स्वभावाला पडलेला हा गहन प्रश्न.



फोनवर काही सेकंद शांतताच होती.

''अगं, मुलांना घेऊन येणार नाही.'' तिने माझ्या भावना ओळखल्या. ''देव त्यांना सांभाळेल. 'मी ऑफिसच्या कामासाठी काही दिवस बाहेर जात आहे. येताना तुम्हाला दोघांना प्रत्येकी ५० खेळणी आणणार आहे' या आश्वासनावर ती दोघं देवबरोबर राहायला तयार आहेत. तू चिंता करू नकोस.''

प्रगतीने कितीही म्हटलं, 'तू चिंता करू नकोस' तरी चिंतेचा भुंगा मला पोखरायला लागलाच. तिला हे कसे जमेल? तिच्या संपूर्ण खानदानात किंवा मित्रमैत्रिणींत सिनेमाच्या 'सी'शीसुद्धा कोणाचा दुरूनही संबंध नाही आणि ही थेट सिनेमा दिग्दर्शित करायचा म्हणतेय.

''प्रॉडक्शन?'' माझा आगंतुक प्रश्न.

''आपलंच.'' तिचं उत्तर.

''प्रोड्युसर?'' माझा चढलेला श्वास.

''मीच.'' तिचं शांत उत्तर.

''पटकथा?'' माझा कोंडलेला श्वास.


''माझी लिहून तयार आहे.'' तिचं थंड स्पष्टीकरण.

''दिग्दर्शन?'' माझे शब्द जेमतेम बाहेर आले.

''अगं मीच करणार.'' तिचा सळसळत्या उत्साहाने भरलेला आवाज.

''कलाकार?''





''आपल्या गावात आहेत की बक्कळ लोक उस्मानाबादला! शिवाय मी रोज वेळ मिळेल तसे खूप सिनेमे पण बघते ना.'' मी खरोखर मनातल्या मनात तिच्या आत्मविश्वासाला सलाम केला.

काही दिवसांनी ती भारतात आली ती चैतन्य आणि उत्साह घेऊनच. सिनेमातील सगळे बारकावे माहीत करून घेण्यासाठी मुंबईला खेटे घालणे भाग होते. म्हणून ठाण्याला दोन दिवस ती माझ्याकडे राहिली. काही जाणकारांच्या भेटी घेतल्या. या क्षेत्रातील सरकारी नियमावली समजावून घेतली. शुटिंग उस्मानबादला तिच्या गावाजवळ करायचं हे आधीच ठरलेलं होतं. त्यामुळे लोकेशन शोधण्याचा प्रश्न नव्हताच मुळी! शेवटचे काही दिवस ती उस्मानाबादला गेली. मदतीला भाऊ होताच. सगळं पाहून-ठरवून परतीच्या प्रवासात माझ्याकडे राहून मग मुंबई एअरपोर्टवरून अमेरिका प्रयाण असा प्रवास तिने ठरवला होता.

दुपारी जेवायला येते म्हणणारी प्रगती दुपार झाली तरी कोल्हापूरच्या एका संगीतकाराच्या भेटीसाठी अडकून पडली होती त्यामुळे ती उशीरा संध्याकाळी पुण्यात पोहचली. तिथल्या गाठीभेटी आटपेपर्यंत रात्रीचे पावणेबारा वाजले. आंतरराष्ट्रीय प्रवासात वापरल्या जाणाऱ्या भल्यामोठ्या तीन बॅगा घेऊन रात्री टॅक्सीने प्रवास करण्यापेक्षा सरकारी बस अधिक सुरक्षित असा विचार करून तिने बस पकडली. ''पुणे सोडलं गं'' हे रात्री बारा वाजता मला कळवलं. त्यानंतर तिचा फोन बंद. माझ्या जिवाची नुसती घालमेल. बरोबर अडीच वाजता भलत्याच नंबरचा फोन वाजला. मी घाबरून तो उचलला.

''माझी बॅटरी संपलीये. हा शेजारी बसलेल्या बाईचा फोन आहे. पनवेल येतंय. तू तासाभरात बसस्टॉपवर पोच.'' फोन बंद.


एका तासाने मी नवऱ्याबरोबर बसस्टॉपवर पोहचले. रात्रीचे साडेतीन वाजले होते. कधी नव्हे ते वाऱ्याच्या वेगाने बस सुसाट पळत, वेळेच्या आधीच पोहचली होती. सुनसान रस्ते, तुरळक रिक्षावाले आणि बसस्टॉपवरची स्मशानशांतता! माझ्या काळजात चर्रऽऽ झाले. प्रगती शांतपणे भल्यामोठ्या बॅगांच्या मधोमध पाय हलवत बसली होती. भीतीचा लवलेशही तिच्या चेहऱ्यावर नव्हता.

''तू एवढी घाबरलेली का दिसतेस?'' तिने मलाच उलटा प्रश्न केला. मी आवंढा गिळला.

''एवढ्या रात्री येण्यापेक्षा माझ्या मुलाकडे पुण्याला राहून सकाळी का निघाली नाहीस?'' माझी काळजी बाहेर पडली.

''तिथे झोपेत रात्र घालविण्यापेक्षा मला एक जास्तीचा दिवस वापरायला मिळेल ना.''

मी थक्क होऊन तिच्याकडे पाहतच राहिले. शहरांमध्ये घडणाऱ्या बलात्काराच्या घटना आठवून





माझ्या पायाखालची जमीन सरकत होती आणि ही शांत-स्थितप्रज्ञ, प्रचंड आनंद-उत्साह चेहऱ्यावर घेऊन मजेत आमची वाट पाहत बसली होती. कधी कधी मला तिच्या या वृत्तीचा हेवा वाटतो. सिनेमाचं शिवधनुष्य ही समर्थपणे पेलू शकेल ही सकारात्मक भावना नकळतपणे माझ्या मनात त्याचवेळी फेर धरू लागली.

प्रगतीची आणि माझी ओळख अमेरिकेतच झाली. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाला मी गेले होते. अधिवेशनानंतर कोणा प्रगती कोळगे नावाच्या लेखिकेच्या घरी आपल्याला राहायचे आहे हे कळल्यावर माझ्या पोटात गोळाच आला. ओळख नाही -पाळख नाही. थेट अपरिचिताच्या घरी थडकायचं म्हणजे थोडं अवघडल्यासारखं वाटत होतं. तोपर्यंत प्रगतीची 'मनातल्या वावटळी', 'दत्तकवेणा', 'हळुवार तरुणाई' ही दोन पुस्तकं प्रकाशित झाली होती. पुस्तकाच्या एकूण आशयावरून पोक्त, गंभीर स्त्रीच्या घरी जायचंय हे लक्षात आले. मी मनातल्या मनात थोडे चरफडले. त्यापेक्षा दोन पैसे जास्त खर्च करून हॉटेल केलं असतं तर बरं झालं असतं असं नकळतपणे वाटायला लागले.



आम्हाला न्यायला येणारी प्रगती थोडी उशीरा आली. आम्हा सगळ्यांचं तिच्या घरी असं उतरणं तिला कदाचित आवडलं नसेल म्हणून मुद्दाम तर उशीर केला नाही ना? असा शंकेचा किडा उगाचच डोक्यात वळवळला. संकोच अजूनच वाढला. उगाचच एक लाचारीची भावना मनातून शरीरभर पसरली पण पूर्वग्रह करणं किती चुकीचं असतं हे मला तिला भेटल्यावर कळलं.

मी पाहतच राहिले. ती एक तरतरीत, छोट्या चणीची गोड मुलगी होती. दहावीच्या वर्गात बसवले तरी खपून जाईल अशी किशोरवयीन मुलगी वाटत होती. दोन जुळ्या मुलांची ती आई आहे यावर विश्वास ठेवणं कठीण जात होतं.

''सॉरी रस्त्याचं काम चालू असल्याने वळसा घालून यावे लागले. म्हणून उशीर झाला'' असं म्हणून तिने सामान गाडीत घातले आणि आमची धिंडका तिच्या घराकडे निघाली. इतके दिवस पिझ्झा-बर्गर खाऊन वीट आला होता आणि प्रगतीने पोळी-भाजीची ऑर्डर एका बाईला दिली आहे हे कळलं. जरा बरं वाटलं. तिच्या घरी पोचलो. भारतातल्या घरासारखंच साधंसं पण सुंदर असं तिचं घर बघून बरं वाटलं. चला उगाचच 'सॉफिस्टिकेटेड' वागण्याचं दडपण घ्यायला नको. ही आपल्याचसारखी आहे हे बघून जीव भांड्यात पडला. प्रगतीचा नवरा 'देव' तर नावाप्रमाणेच देवमाणूस निघाला. आठ तासाचं ड्रायव्हिंग करून आम्हाला तिथली अॅटलांटिक सिटी दाखवून परत तेवढंच अंतर कापून आम्हाला न्यूयॉर्कला सोडून तो तसाच न झोपता दुसऱ्या दिवशी ऑफिसला गेला. कोण परक्या माणसांसाठी एवढी दगदग करतं? पण देवने हे सगळं अगदी सहजतेने पार पाडलं. आम्ही प्रगतीच्या घरी राहत होतो म्हणण्यापेक्षा ती आमच्या घरी राहत होती म्हणणं अधिक संयुक्तिक ठरेल. तिच्या स्वयंपाकघराचा पूर्ण ताबा आम्ही घेतला किंबहुना तिने तो आम्हाला आनंदाने घेऊ दिला.

''आयतं जेवण मिळणं (घरचं) ही अमेरिकेत चैन आहे गं! मला माहेरी आल्यासारखं वाटतंय. तुम्ही सगळे नेहमीच येत जा की...'' तिच्या या मोकळ्या बोलण्याने आमच्या मनातील संकोच कुठल्याकुठे गळून गेला.

पुस्तकात भेटलेली गंभीर प्रवृत्तीची लेखिका प्रगती आणि वास्तवातील हसरी-खेळकर प्रगती यात जमीन-आस्मानाचा फरक होता. ती कोणाची पर्वा न करणारी, आपल्या विश्वात आनंदी असणारी अल्लड-निरागस बालिका होती. या चार दिवसात कुठे कुठे जायचे, काय काय पाहायचे याचे तिने प्लॅन केले होते. पण घरातून निघताना ठरलेली वेळ गाठणं शक्य होत नसे मग ती प्लॅन 'ए' बाजूला ठेवून प्लॅन 'बी' बाहेर काढायची. मला पूर्ण खात्री असायची की ही वेळ पण जमणार नाही. मग ती प्लॅन 'सी' काढायची. ती प्रचंड सर्जनशील होती. त्यामुळे विचारांचा प्रचंड गुंता सतत तिच्या डोक्यात असायचा. दोन मुलांना जराही न ओरडता, रागावता त्यांच्या कलेने घेत घेत ती त्यांच्याशी संवाद साधायची. त्यात मधे मधे लॅपटॉप घेऊन ऑफिसची कामं


सांभाळायची. आम्ही दिवसभराचा थकवा घालवण्यासाठी रात्री बिछान्यावर पडायचो, तिची दोन मुलं 'मावशी गोष्ट सांग' म्हणून मागे लागायची तेव्हा प्रगती उत्साहाने ऑफिसचं राहिलेलं काम पूर्ण करण्यासाठी लॅपटॉप घेऊन रात्री बसायची. एवढ्या चिमुकल्या देहात एवढी एनर्जी कुठून येते याचं कोडं मला आजही सुटलेलं नाही.

आम्ही भारतात परतताना प्रगती-देव यांच्याबरोबर इतके घट्ट नाते निर्माण झाले की एअरपोर्टवर सगळ्यांना रडू आवरत नव्हते. इतका जिव्हाळा, इतकी आत्मीयता, इतकी आपुलकी भारतात सख्ख्या नातेवाईकांच्या घरातसुद्धा अनुभवायला मिळत नाही. प्रगती आणि देव यांचा लाघवी स्वभाव मनामध्ये घट्ट रूतून बसला.

अमेरिकेहून भारतात परतलो आणि तिथल्या गोड आठवणीत रमलेलो असतानाच एक दिवस प्रगतीचा फोन आला. तिला खास अमेरिकेतच होणारा ताप आला होता. विशिष्ट किडा चावल्यानंतर हात ताप येतो. तो अनेक दिवस उतरतच नव्हता. पोटात अन्नाचा कण ठरत नव्हता. शेजारीपाजारी काळजी घेणारे कोणी नाही. देव सकाळी दोन मुलांना शाळेत सोडून ऑफिसला गेल्यावर त्या भल्यामोठ्या घरात ही एकटी तापाने फणफणत पडलेली असायची. कितीही काळजी वाटली तरी इथे बसून काय मदत करणार? तिच्याशी संवाद साधून तिचा एकटेपणा दूर करणे एवढेच हातात होते. जवळजवळ एक वर्ष तिने या आजाराला तोंड दिले. कधी कधी परिस्थिती अत्यंत गंभीर झाली होती. जीवन-मृत्यूच्या सीमारेषेवर ती हिंदकळत होती. पण ज्या जिजीविषा प्रवृत्तीने तिने या आजाराला तोंड दिले त्याला तोड नाही. फिनिक्स पक्ष्याप्रमाणे तिने राखेतून भरारी घेतली. मन रमवण्यासाठी लेखनाचा आधार घेतला आणि त्यातूनच 'सल' पुस्तक तयार झालं.

लेखन हा तिचा श्वास आहे. खरंतर तिचं वाचन तसं अजिबात दांडगं नाही. पण म्हणूनच कुठलेही पूर्वसंस्कार नसलेलं तिचं साधं-सोपं लिखाण वाचकांना भावतं. देवला गंभीर लिखाण आवडत नाही म्हणून 'हसिकरसिक' हे विनोदी पुस्तक खास त्याच्यासाठी तिनं लिहिलं. तिथेही समाजातील नेमकी विसंगती टिपत तिने विनोदासारख्या साहित्यप्रकाराला यशस्वीपणे हात घातला.

उस्मानाबाद ते अमेरिका हा तिचा जीवनप्रवास असल्याने पुण्या-मुंबईची प्रमाणभाषा ती बोलत नाही. उस्मानबादी हेल काढून किंचित पॉझ घेत घेत बोललेलं तिचं बोली मराठी बोलणं कमालीचं गोड आहे. ग्रामीण



बोलीभाषेतला जिवंतपणा त्यात खळाळून वाहतोय. अमेरिकेत गेली तेरा वर्ष राहतेय तरी आपला मूळ उगम उस्मानाबादचा आहे हे जाणीवपूर्वक तिने स्वत:ला विसरू दिलं नाही. 'अमेरिकेत आमच्या भावना दगड झाल्या' असं खेदाने जरी ती म्हणत असली तरी आतून तिचा गाभा आजही भारतीय आहे. दोन्ही मुलांना घेऊन दरवर्षी ती उस्मानाबादला येते. घरी न राहता शेतावर मुलांना राहायला घेऊन जाते. चिखल-मातीशी त्यांचं नातं तयार करण्यासाठी ती खास वेळ काढते.

तिचे वडील व्यवसायाने वकील होते. पॅरालिसिस-सारख्या आजाराने अंथरूणाला खिळले असतानाही, बोलता येत नसतानाही 'मी पुन्हा कोर्टात उभा राहीन' या आत्मविश्वासाने त्यांनी आजारावर मात केली. तीच जिद्द प्रगतीमध्ये उतरलीय. उस्मानाबादच्या छत्रपती शिवाजी हायस्कूलमध्ये शालेय शिक्षण पार पडलं. शाळेच्या नावातील शिवराय हिच्याही रक्तात उतरले. त्यामुळे कुठल्याही क्षेत्रात बेधडकपणे घुसण्याचा बिनधास्तपणा तिच्यात आपोआप आलाय. पुढे प्रॉडक्शन मेकॅनिकल इंजिनीअरिंगची पदवी घेतली. ती मुलांची शाखा मानली गेली असल्याने चौऱ्याहत्तर मुलांमध्ये ही एकटीच मुलगी. सतत पुरुषांबरोबर वावरायला लागल्याने पुरुषी बिनधास्तपणा, निर्णय घेण्याची क्षमता, रांगडी




भाषा तिने आपोआप उचलली. 'भीती', 'रडणे', 'घाबरणे' हा जो स्त्री स्वभावाचा विशेष सार्वत्रिकपणे पाहायला मिळतो ते गुण तिला दुरूनसुद्धा स्पर्श करत नाहीत. पदवीनंतर पुण्यात पहिली नोकरी केली तीही मॅकेनिकल इंडस्ट्रीमध्ये. पुन्हा सगळ्या कामगार पुरुषांचे व्यवस्थापन सांभाळले. म्हणूनच सिनेमा बनवताना स्त्री–पुरुषांच्या समूहाचे व्यवस्थापन तिला सहजपणे जमले. कॉम्प्युटरचे ज्ञान नसताना अट्टाहासाने ते ज्ञान प्राप्त केलं. CDCAच्या कोर्समध्ये दोनदा टायफाईडने आजारी पडली तरी तो कोर्स नेटाने पूर्ण केला आणि आयटी क्षेत्रात स्थिरावली. लग्न केलं तेही मुलाचा फोटो न बघता. फक्त काही महिने फोनवर बोलून मुलाच्या स्वभावाचा अंदाज घेतला. मग निर्णय झाल्यावरच प्रत्यक्ष लग्नातच भेट घेतली. देव बरोबर लग्न करून अमेरिकेत गेली तरी तिचं मन मात्र पूर्ण भारतीयच राहिलं. माणसांसाठी, त्यांच्या गोतावळ्यात गप्पा मारण्यासाठी ती सतत तळमळत असते. अमेरिकेतल्या एकटेपणावर मात करण्यासाठी स्वत:च्या झोपेचा बळी देऊन इथल्या दिवसाच्या वेळेत (तिथल्या रात्रीच्या वेळेत) एफ.बी.वर गप्पांचा फड जमवते. या सोशल मिडियाच्या माध्यमातून अगदी सगळ्या वयोगटाच्या व्यक्तींबरोबर तिने मैत्री स्थापन केली आहे. भारतभेटीत या सगळ्यांना भेटण्याचा मोठा कार्यक्रम असतो.

पुढच्या भारतभेटीत दोन मुलांच्या शाळा बुडवून तीन महिने भारतात राहून तिने सिनेमा पूर्ण केला. दोन मुलांना स्टुडिओत बाजूला बसवून एडिटिंग पूर्ण केले. या तीन महिन्यात असंख्य अडचणींचा तिने सामना केला. पण हार न मानता नेटाने काम केलं. सिनेमा पूर्ण करून अमेरिकेतल्या अनेक फेस्टिव्हलमध्ये तो पाठवला तेव्हा मोठा आश्चर्याचा धक्का तिने आम्हाला दिला. तो म्हणजे 'पल्याडवासी' या तिच्या सिनेमात मध्यवर्ती नायिकेचं काम तिनेच केलं आहे. सुदैवाने अमेरिकेतील अनेक फेस्टिव्हलमध्ये सिनेमाला विविध कॅटगरीत पारितोषिके मिळाली आणि प्रगतीच्या मेहनतीला योग्य फळ मिळालं.

लॉस एंजलिस इंडिपेंडंट फिल्म फेस्टिव्हल अॅवॉर्ड २०१७ यासाठी तसेच हॉलिवूड इंटरनॅशनल मुव्हिंग पिक्चर्स फिल्म फेस्टिव्ल यात 'विनर' म्हणून पारितोषिक प्राप्त केलंय. तर Alt FF अल्टरनेटिव्ह फिल्म फेस्टिव्हलसाठी 'बेस्ट अॅक्ट्रेस'चे पारितोषिक प्राप्त केलं. अमेरिकेतील अशा विविध फेस्टिव्हलमध्ये 'पल्याडवासी' या चित्रपटाला नावाजले गेले आहे.

लेखिका ते दिग्दर्शक, अभिनेत्री, पटकथा–लेखक, गीतकार, प्रोड्यूसर हा तिचा माझ्या डोळ्यांदेखत झालेला प्रवास म्हणजे समस्त समाजासाठी मार्गदर्शक दीपस्तंभच आहे असं म्हणायला हरकत नाही. 'पल्याडवासी' हा सिनेमा म्हणजे तिच्या धाडसी, अभ्यासू आणि कष्टाळू प्रवृत्तीचं गोड फळ आहे. भारतात तिचा 'पल्याडवासी' हा सिनेमा केव्हा येतोय याची आतुरतेने वाट बघणं एवढंच आता माझ्या हाती आहे. मला खात्री की आहे एव्हाना एका नव्या धक्क्याची तिने तयारी सुरूही केली असेल.

**– डॉ. लतिका भानुशाली**
भ्रमणध्वनी : ९३२२२०७८७८
latikabhanushali@yahoo.co.in

*With Best Compliments From*

**Sadhana Electricals**

Pune

*With Best Compliments From*

**Ramratansi Nathasingn Badoriya**

Pune

*With Best Compliments From*

**M/S MALLIKARJUN S BANKAPORE**

Pune

*With Best Compliments From*

**A**

**Well**

**Wisher**



# ज्ञानातून जीवनानंदाकडे

**शशिकांत सावंत**

**वाचन आणि कला आत्मसात करण्याने जर माणूस समृद्ध होत असेल तर त्यातून त्याचे आयुष्य आनंदी होते का? आणि समजा तसं असेल तर इतर कलावंत आणि ज्ञानी मंडळी ही अधिक आनंदी असतात का?**

**सा**धारणपणे अनेक वर्षे डोक्यात घुमणारा हा विषय आहे. तो म्हणजे वाचन आणि कला आत्मसात करण्याने जर माणूस समृद्ध होत असेल तर त्यातून त्याचे आयुष्य आनंदी होते का? आणि समजा तसं असेल तर इतर कलावंत आणि ज्ञानी मंडळी ही अधिक आनंदी असतात का? आता या गोष्टीला छेद देणारे अनुभव बऱ्याचदा आढळतात. म्हणजे बरेचदा असं असतं की चांगले गायक, चांगले कलावंत अहंकारी असतात. समाधानी नसतात, बरेचदा अस्वस्थ असतात; हे क्रमांक एक. क्रमांक दोन- काही माणसे खरंच वाचनाने आपल्याला बुद्धिमान किंवा हुशार वाटतात. परंतु छोट्यामोठ्या लटपटी करणे. दुसऱ्यांना खिजवणे, अहंकार अशा कितीतरी गोष्टी त्यांच्यात आढळतात. खरंतर हे मानवी दोष आहेत आणि वाचनाने किंवा ज्ञानाने समृद्ध झालेल्या माणसात यांचा अभाव आढळतो का? अनेकदा अज्ञानी माणसे ही साधी आणि छान वाटतात. त्यांचे आयुष्य आनंदी आणि समाधानी वाटते. म्हणूनच या विषयाच्या मांडणीत कलावंत आणि ज्ञानी मंडळी यात फरक करायला हवा. ज्ञानीऐवजी मला जे म्हणायचे आहे ते, चांगले वाचणारा माणूस. आता इथे चांगले वाचन म्हणजे आपण किती वाचायला हवे, किती विषयातले ज्ञान आपल्याला हवे?एकत्र माहितीचा पूर सतत येत असतो. वर्तमानपत्रातून आपल्याला राजकीय स्तिथी, घडणाऱ्या घडामोडी, पुन्हा लागणारे शोध या गोष्टी सतत आपल्यासमोर येतात आणि आपण त्या वाचत असतो. अनेक माणसांचा वेळ सकाळी एक दीड तास वर्तमानपत्र वाचण्यात जातो. तसेच दूरदर्शन, शिवाय बातम्या, डिस्कव्हरीसारख्या चॅनेल मधून मिळणारी माहिती, चर्चा हे सारे येत असते. अर्थात याच्यातून वाचनाला मिळणारा वेळ आक्रसून जातो. पण तरीही वाचन हीच एकमेव माहिती घेण्याची किवा ज्ञान ग्रहण करण्याची रीत नव्हे. अनेक पद्धती आहेत. अनेक सोयी आहेत. विशेषतः इंटरनेटमध्ये युट्युबसारख्या माध्यमातून माहिती आणि ज्ञान घेता येते. माझ्या ओळखीचे एक मोठ्या कंपनीचे काम करणारे गृहस्थ होते. अर्थात त्यांना वेळ कमी होता. ते म्हणायचे मी कुठलीही पुस्तके वाचण्यापेक्षा बीबीसीवर किवा सीएनेनवर त्यांच्या झालेल्या मुलाखती वाचतो. त्यातून त्यांनी पुस्तकात काय लिहिले आहे हे कळते.

आता रुचिर शर्माची मुलाखत मीही ऐकली आहे. पण रुचिर शर्माचे 'ब्रेकआऊट' वाचणे आणि त्याची मुलाखत ऐकणे. मुलाखतीतील मांडणीत काही मुद्दे सापडू शकतात. त्याची निरीक्षणे मिळतात. पण पुस्तकात तो ज्या पद्धतीने रचना करतो, ग्राफ दाखवतो त्याचा अर्थातच मुलाखतीत अभाव असतो. पण मुलाखत ही शॉर्टकट झाली. म्हणून इथे एक प्रश्न विचारायला हवा की, वाचन म्हणजे किती वाचन पुरेसे आहे? माणसाने चांगल्या कादंबऱ्या वाचायला हव्यात. कविता वाचायला हव्यात. जागतिक साहित्य वाचायला हवे. विविध शास्त्रांची त्याला माहिती हवी. म्हणजे थोडक्यात तुम्हाला ग्लोबल सिटीझन व्हायचं असेल, एक चांगला माणूस होणे आवश्यक असेल तर अनेक भाषा येणे आवश्यक आहे. अनेक शास्त्रांचे वाचन फायद्याचे असते. बरेचदा असे दुर्दैवाने दिसून येते की, आपल्याकडील लेखक हे प्रामुख्याने कलामहाविद्यालयात शिकवणारे दिसतात. यांना विज्ञान आणि गणित यासारख्या विषयात रुची नसते. परिणामी त्यातील सौंदर्याला ते पारखे होतात. म्हणजेच प्राईममधील एक कोडे जगात दोनशे वर्षे कोणी सोडवले नव्हते. ते कोडे असे होते की अगदी अनंतापर्यंत जाताना दोनचा फरक असणारे किती प्राईम नंबर मिळू शकतात की नाही आणि ते अनंतापर्यंत मिळू शकतात की नाही? याचे उत्तर एका साध्या माणसाने काढले जो केवळ प्राध्यापक आहे. त्याने आता पर्यंत एकही शोधनिबंध लिहिला नव्हता. त्याने जेव्हा गणिताच्या नियतकालिकेला- म्हणजे, ज्यात शोधनिबंध प्रसिद्ध होते, आपला निबंध पाठवला तेव्हा त्या तपासणाऱ्याने तो जवळपास तो बादच केला होता. पण तितक्यात त्याला आणखी एका संशोधकाचा फोन आला आणि तोही हा निबंध तपासत होता आणि दोघांनाही मिळून असा निष्कर्ष काढला की निबंध पुढे वाचायला हवा. कारण १५० वर्षे या विषयावर अनेक निबंध प्रसिद्ध झाले. ते सर्व चुकीचे ठरले. शिवाय ज्या संशोधकाने हे संशोधन केले होते, ते प्रसिद्ध केले होते आणि त्यातील सिद्धता चुकीची ठरली. तर आता ही माहिती मिळाल्यामुळे मी कित्ती समृद्ध होतो. माझ्यात काय फरक पडतो? असे आजूबाजूला लागणारे शोध, विविध विषयातील शोध, त्यांनी काढलेले निष्कर्ष. यातून एक प्रकारचा आपला बुध्यांक असतो तसा माहित्यांक सिद्ध होतो. आणि हा माहित्यांक जितका जास्त मग तुमची एखादी मुलाखत असो किंवा तुमचे दैनंदिन कामकाज असो, त्यात तुम्ही अधिक हुशारीने काम करू शकता. आता हा सिद्धांत आपण मांडला खरा पण त्याची सिद्धता नीट चाचापायला हवी. त्यासाठी आपण एकएक मुद्दे विचारात घेऊ. सर्वप्रथम ज्या माणसांना अनेक विषयांचे ज्ञान असते ती अधिक यशस्वी आनंदी होतात का? आपल्या आजूबाजूला अशी काही उदाहरणे नाव घेऊन सागता येतील. उदा: आशुतोष गोवारीकर हा माणूस आहे.तर हा नुसते सिनेमे बनवत नाही तर तो अनेक विषयावर वाचतो देखील. इतिहासावर पण वाचतो. परिणामी त्यांनी 'जोधा-अकबर'सारखा सिनेमा केला, 'लगान'सारखा असेल. उलट इतर दिग्दर्शकांचे आपण पाहिले तर ते कथा-कादंबऱ्यात अडकलेले असतात. तेही गुन्हेगारी, किंवा सूडकथा याला प्राधान्य असते. याचाच अर्थ थोडंसं वाचन असेल तर दिग्दर्शन क्षेत्रातला माणूस पुढे जाऊ शकतो. आजचे आघाडीचे जे कथाकार आणि पटकथाकार आहेत, सिनेमा दिग्दर्शक आहेत त्यांचे वाचन चांगले आहे. उदा: अनुराग कश्यप असेल किंवा अजून अशी दोन तीन नावे सांगता येतील.

इथे दोन तीन प्रसंग सांगता येतील एक म्हणजे, जवळपास पंचवी एक वर्षापूर्वी वाशीच्या एका प्राध्यापक दाम्पत्याच्या घरी त्या बाईंचे वडील काही महिन्यापूर्वी मरण पावले होते. आणि नंतर मग काहीच महिन्यात त्यांचा भाऊ जो जवळपास त्यांच्याच वयाचा होता, तोही मरण पावला. अर्थात बाईंना खूप धक्का बसला आणि त्या दु:खात होत्या. त्यावेळी मी ज्ञानेश्वरी वाचत होतो. त्यावेळेस ज्ञानेश्वरी वाचण्याची माझी दुसरी वेळ होती. मी त्यांना म्हटले की, बघा मी काही तुमचं सांत्वन वगैरे करू शकत नाही. मला तितका आयुष्याचा अनुभव नाही. तुम्ही वयाने ज्येष्ठ आहात. पण मी असं तुम्हाला सुचवतो की, तुम्ही ज्ञानेश्वरी, खास करून सोनोपंत दांडेकरांची लिहिलेली प्रस्तावना वाचा आणि कृष्णमूर्तींचं 'कॉमेंट्री ऑन लिविंग' वाचा. म्हणजे कृष्णमूर्ती असं म्हणतात की, एखादी व्यक्ती जाते. तेव्हा आपण का रडतो तर ते आपण आपल्यासाठी रडतो. हे निरीक्षण मी सांगितले आणि दोन्ही पुस्तके आणून दिली आणि एक दिवस त्या म्हणाल्या की, तुमच्याशी त्या दिवशी बोलल्यानंतर खूप बरे वाटले. अगदी अलीकडे माझ्या एका मित्राचा मुलगा वयाच्या २५ व्या वर्षी मरण पावला. नुकतेच त्या मुलाचे लग्नही झाले होते. कुटुंबाला आणि त्या मित्राला खूपच मोठा धक्का होता. पण मित्र शांत होता त्याचा स्वभाव असं काही जाणून नव्हते. मी एक काम केलं. साधारण १५-२० दिवसातून मी नियमित त्याच्याकडे जायला लागलो.

**माणसाने चांगल्या कादंबऱ्या वाचायला हव्यात. कविता वाचायला हव्यात. जागतिक साहित्य वाचायला हवे. विविध शास्त्रांची त्याला माहिती हवी. म्हणजे थोडक्यात तुम्हाला ग्लोबल सिटीझन व्हायचं असेल, एक चांगला माणूस होणे आवश्यक असेल तर अनेक भाषा येणे आवश्यक आहे.**



**इंटरनेटच्या प्रगतीनंतर, विस्तारानंतर, गुगलनंतर आणि प्रत्येकाच्या हातात स्मार्ट फोन आल्यानंतर इतक्या पुस्तकांची तुम्हाला गरज आह का? इतके संदर्भ तुम्हाला भोवताली असणे गरजेचे आहे का?**

तसाही मी त्याला अधूनमधून भेटत असेच. त्याने एकदोन पुस्तके मागितली. मी त्याला अनेक पुस्तके सुचविली. एलिझाबेथ कुबलेर रॉसची मृत्यूवरची पुस्तके किंवा त्या अनुषंगाने झालेले इतर लेखन, फिलोसॉफीची पुस्तके, कृष्णमूर्ती असं काही काही मी त्याला देत गेलो. अस साधारण एक वर्ष दीड वर्ष गेल्यानंतर तो मला म्हणाला की, शशिकांत तू मला असं नियमित भेटतोस आणि बोलतोस, हे मला खूप चांगले वाटले. कधीकधी मला असे वाटले की, यू आर इव्हॉल्व्हड मॅन अशी स्तुती फारशी मनाला लावून घ्यायची नसते. कारण लोक मायेपोटी कौतुक करत असतात. पण 'इव्हॉल्व्हड मॅन' हा शब्द मला आवडला आणि मला असे वाटले की, नेहमीच आपण ज्या पायरीवर आहोत तिथून वर जाण्याचा प्रयत्न करण्यालाही दाद आहे. हे आपण नेहमीच करायला हवे. साधारणपणे माणसे stagnant होतात. कंटाळतात. जिथे आहेत तिथेच राहतात. पुढे सरकत नाहीत. किंबहुना पुढे सरकण्याचा आपल्याला धोका वाटत असतो. इथे पुढे सरकणे म्हणजे महत्त्वाकांक्षा नव्हे. मी पद वर चढण्याबद्दल बोलत नसून माणूस म्हणून वरच्या पायरीवर चढण्याबाबत बोलत आहे. आणि हे अतिशय महत्त्वाचे असते. किती उदाहरणे सांगता येतील. याच्यातून मला माणसाविषयी विचार करण्याची प्रवृत्ती जडली. माणसे काय विचार करतात, कसा करतात. हे करणे अनेकदा असे होते... पुस्तक विकायला जाताना म्हणजे मी एका माणसाला पाच-सहा पुस्तके विकत घेऊन गेलो आणि त्यातली एक दोनच त्याने घेतली, तर मला काहीच वाटत नाही. याचे कारण असे- पूर्वी कॉम्प्युटर विकत असे तेव्हा मी अक्षरशः रडलेलो आहे. मला ते काम आवडत नसे. पुस्तक विक्री करण्याचे काम मला आवडते. कदाचित एकच पुस्तक विकत गेले असेल, जाण्यायेण्याचा खर्चही निघत नसेल. तरही गंमत अशी असते की, तो मला काहीतरी सांगत असतो. मी त्याला काहीतरी सांगत असतो. एक तास छान गप्पा होतात. चहापाणी होते, आम्ही सगळे मित्र मिळून एक पायरी वर जातो. तर ही गोष्ट मला खूप महत्वाची वाटते.

२००७ साली मुंबई मिररने एक लेख प्रसिद्ध केला. त्यानंतर अगदी सकाळी आठ-नऊ वाजल्यापासून माझा फोन सुरु व्हायचा तो रात्री दहा वाजेपर्यंत. आज या गोष्टीला दहा वर्षे झाली तरी आजही एखादा फोन येतोच येतो. एक शाशिपुरा नावाचे डॉक्टर होते. टाईम्स ऑफ इंडियाचे डॉक्टर म्हणून काम करत होते. वयाने साठीच्या पुढचे होते. त्यांच्या पी.ए.ने मला फोन करण्याचा प्रयत्न केला आणि फोन सहसा एंगेज लागल्यावर त्यांनी चक्क पत्रकार मुलीला सांगितले की ह्यांना जरा फोन लाव. आणि ती मला म्हणाली की, डॉ. शाशिपुराना तुमच्याशी बोलायचे होते. म्हणून मी तुम्हाला फोन केला. मग मी त्यांचा नंबर घेऊन फोन केला. त्यांना भेटायला गेलो. आणि आमच्या भरपूर गप्पा झाल्या आणि त्यांनी माझ्याकडून चर्चिलचे खंड विकत घेतले. विकत घेताना ते असेही म्हणाले की, काय रे मी डॉक्टर आहे आणि मी असा बसलोय म्हणून मला जास्त पैसे तर लावत नाहीस ना? या अश्या गमतीजमतीच्या गोष्टीबरोबर त्यात्या माणसाशी नाते जडत जाते. मेनू मोदी म्हणून एक गृहस्थ होते. त्यांच्याकडून मी जवळपास लाखभर रुपयांची पुस्तके घेतली. काही नकाशे विकत घेतले. आणि हे सगळे झाल्यानंतर त्यांनी माझ्या खांद्यावर एक शाल पांघरली. ते म्हणाले, मी तुम्हाला केवळ पुस्तके विकत नाही आहे, तर माझी पुस्तके मी तुमच्याकडे सुपूर्त करतोय. त्यामुळे आम्ही तुमचा सत्कार करतोय. या प्रकारचे सहप्रवासी अनेकदा भेटतात. अनेकदा आपल्यात अहंकार आणि उद्धटपणा येतो. तो नीटपणे वापरला पाहिजे असे मला वाटते. एक माझा मित्र आहे स्वान मेहुनी नावाचा. जन्माने तो ब्रिटीश आहे. तर तो म्हणाला की, शशिकांत तुझे उच्चार सुधार, कारण तुझे उच्चार चुकीचे असतात आणि लोक तुला हसतील. मी म्हटले मला लोक हसणार नाहीत. मी तुला एक प्रश्न विचारतो it is to to solid flesh बरोबर आहे की चुकीचे. तो म्हणतो solid मी त्याला म्हटले शेक्सपिअरचे हे प्रसिद्ध वाक्य आहे. त्यात solid नसून sallied शब्द आहे, असे सांगून त्याला मी पुढे म्हटले, 'पहिल्या अंकाच्या हॅम्लेटच्या स्वगतामधील 'Oh, that this too, too solid flesh would melt', हा उल्लेख चुकीचा असून ते sallied आहे असे सांगणारी प्रत ८० वर्षे आर्डेन शेक्सपिअरचे संपादन करणारे हेरॉल्ड जेनकिन्स यांनी तयार केली.' म्हणजे मला म्हणायचे होते की, काहीतरी अधिक मला माहीत आहे. (अर्थात हा उद्धटपणाही वाटू शकेल.)

आता एक प्रश्न तयार होतो की इंटरनेटच्या प्रगतीनंतर, विस्तारानंतर, गुगलनंतर आणि प्रत्येकाच्या हातात स्मार्ट फोन आल्यानंतर इतक्या पुस्तकांची तुम्हाला गरज आह का? इतके संदर्भ तुम्हाला भोवताली




असणे गरजेचे आहे का? जसं डिक्शनरीच झालं. की आज डिक्शनरी नसली तरी माणसाचे चालू शकते. कारण प्रत्येकाच्या फोनमध्ये डिक्शनरी असते. आता मोबाईल मध्ये डिक्शनरी असण्यात आणि गुगल असण्यात फरक आहे. मागे म्हटल्याप्रमाणे गुगलमधून जी काही माहिती आपल्याला मिळते त्या माहितीला कोणताच आधार नसतो. उदा-संदर्भ कसे शोधायचे. यापूर्वी वाचनालयाच्या प्रमुखांना प्रशिक्षण दिले जात असे. प्रदीप कर्णिक यांनी एक उदाहरण दिले होते की माणूस जागच्याजागी जळून गेला. अशा काही घटना घडल्या होत्या. आता हे तुम्ही कसे शोधणार? (स. न. वि. वि. दिवाळी अंक)

मला अनेकजण फोन करून विचारत असत. त्यात एकाने असे विचारले की, विल्यम टेल ही गोष्ट कुठल्या राज्यात घडली. विल्यम टेलच्या गोष्टीत एक धनुर्धारी असतो, जो आवाजाने अचूक वेध घेऊ शकतो. आणि त्याला त्याच्या मुलाच्या डोक्यावर सफरचंद ठेवून सफरचंदाचा छेद करायला लावतात. तेव्हा तो राजाचा आवाज ऐकून राजाला मारून टाकतो. ही अशी कथा आहे. खरंतर ही दंतकथा आहे. पण अनेकांना ती खरी वाटते. याप्रकारे कितीतरी संदर्भ हे माणसे खरे म्हणून चालले असतात.ज्याला कुठलाही आधार नसतो. अशा वेळी अनेक उपसाउपशी करायला लागते. भालचंद्र नेमाडेंचं वाक्य आहे की 'वसंत पळशीकर कसे आहेत तर जॉन्सन-ज्याने डिक्शनरी तयार केली तसे. पाऊस लागतोय म्हणून आडोश्यासाठी जरी तुम्ही त्याच्याबरोबर पाच मिनिटे उभे राहिलात तरी तो तुम्हाला समृद्ध करून सोडेल. खरंतर हे वाक्य जॉसनने म्हटले नसून त्याच्या एका मित्राने म्हटले आहे. पण नेमाडेंनी हा संदर्भ दिला आणि हा संदर्भ पुढे कायम राहिला. (मूळ संदर्भ ए. जे. अय्यर यांच्या आत्मचरित्रात आहे)

पुस्तके कधी जेव्हा मी विकायला सुरवात केली. तेव्हा बहुतेकांना प्रश्न पडला. याचे कारण मी काही अभ्यासात सुमार नव्हतो. दहावीला मला ८०% होते. नंतर मला डिप्लोमाला कमी मार्क मिळाले. नंतर मी अभाविपचे काम केले . आता आपल्याकडे कुठलीही गोष्ट मराठी माणसाने विकणे हे आधी फारच बावळटपणाचे मानले जाते आणि त्यातही जुनी पुस्तके विकणे वगैरे आणि त्यात काय करियर होते. रस्त्यावरचे विक्रेते हे कामं करतात. मी हे का करतोय?.असे अनेक प्रश्न माझ्या मित्रांना पडायचे. जेव्हा माझे शाळेतले मित्र भेटले तेव्हा त्यांनी अशी काही चर्चा सुरू केली जणू काही मी रस्त्यावर बसून भाजी विकतोय. पुस्तकविक्रीबद्दल खूपच गैरसमज होते. दुसरं म्हणजे त्या काळात तुम्हाला हवे ते पुस्तक आणून देणारी एजन्सी नव्हती. सतीश काळसेकरांसारखी काही मंडळी पुस्तके वगैरे आणून देत. त्यामुळे मी निर्णय घेतला की आपण सगळा वेळ हेच करावे. मित्रासाठी एखादे पुस्तक घेताना माझ्यासाठी पण दोनतीन पुस्तके घ्यायचो. किंवा मित्रासाठी घेतलेले पुस्तकही मला वाचता यायचे. पुस्तकाच्या या शोधात वेळ कसा जायचा हे कळायचं नाही. म्हणजे एकूणच काळ सारा आनंदात जायचा. पुस्तकाचा भाग हा मला फारच आनंदी वाटायचा. या प्रकारे पुस्तके जमवताना ज्या काही फर्माईश आल्या त्या कठीण होत्या. उदा. प्रशांत कुलकर्णीने मला रसेल बेकरचे आत्मचरित्र मिळवायला सांगितले. याचे कारण त्यांना विश्राम बेडेकर म्हणाले होते की तुम्ही हे आत्मचरित्र वाचा. मिश्कील खुसखुशीत लिहिणारा हा लेखक होता आणि ते आत्मचरित्र अक्षरशः एकदीड वर्षानंतर मला ते मिळाले.

खरंतर जॉर्ज मीकेश या लेखकाची पुस्तके मिळतच नसत. अशी अनेक पुस्तके मी घेत असे. एक शिस्त मी स्वतःसाठी अशी लावली होती की, जे पुस्तक मी मित्रासाठी घेईन ते मी स्वतःला कधीच ठेवणार नाही. यामुळे मी कितीतरी चांगली पुस्तके विकून टाकली. दुसऱ्या बाजूने असेही व्हायचे की, मी त्यांना सांगायचो की हे वाचा, ते वाचा, मग मंडळी ते पुस्तक मागून घ्यायची. आवडलं तर विकत घ्यायची. म्हणजे एक प्रकारे रीडिंग कन्सल्टंटन्सीसारखा व्यवसाय होता. याचा मला एक फायदा असा झाला की, अनेक विषयावर मी वाचू लागलो. किंवा खूपदा मी असे पुस्तक विकत घ्यायचो की जे कोण वाचेल मला माहित नाही. पण मला असे वाटायचे की, अरे हे पुस्तक कोणीतरी घ्यायला हवे. यातूनच मी जगातील अनेक गणित विज्ञानातील कोडी असलेले पुस्तक विकत घेतले. न्यूयॉर्कर वाचायला मी सुरुवात केली आणि ज्ञानाचे एक घबाड मला मिळाले. मगाशी उल्लेख केलेले शेक्सपिअर, आर्डेन, सिरीजची माहिती. काल पॉपरला प्रत्यक्ष भेटून संपादक डेव्हिड रेमनीक याने लिहिलेला लेख असं कितीतरी माहिती न्यूयॉर्करमध्ये असायची. अनेक लेखक, अनेक कलावंत, अनेक कलांचे सांगणारे लेख न्यूयॉर्कर प्रसिद्ध करत असे.



**गुगलमधून जी काही माहिती आपल्याला मिळते त्या माहितीला कोणताच आधार नसतो. कितीतरी संदर्भ हे माणसे खरे म्हणून चालले असतात.ज्याला कुठलाही आधार नसतो. अशा वेळी अनेक उपसाउपशी करायला लागते.**



**केवळ वाचन आणि अभ्यास याच काही गोष्टी माणसाला सुसंस्कृत करणाऱ्या आहेत असे नाही. तर अनेकांना भेटणे, एखादी संघटना चालवणे, एखादी चळवळ उभारणे किंवा एखादा कारखाना चालवणे, एखादा उद्योग चालवणे या साऱ्यामधून माणूस समृद्ध होऊ शकतो.**

शेवटी मी इतकंच म्हणेन की केवळ वाचन आणि अभ्यास याच काही गोष्टी माणसाला सुसंस्कृत करणाऱ्या आहेत असे नाही. तर अनेकांना भेटणे, एखादी संघटना चालवणे, एखादी चळवळ उभारणे किंवा एखादा कारखाना चालवणे, एखादा उद्योग चालवणे या साऱ्या मधून माणूस समृद्ध होऊ शकतो. काही वर्षापूर्वी प्रसाद देशमुख भेटले. ते प्रताप ओर्गनिकमध्ये काम करत. ओर्गनिक नावाची कंपनी ते स्वतः चालवत. आणि त्यांचे उत्पादन प्रामुख्याने परदेशी जायचे. त्यांच्या उत्पादनाची शुद्धता ९९.९९% होती. ते मला एकदा म्हणाले, अनेक प्रश्न सोडवले कारखान्याशी संबंधित की मग कुठलेही प्रश्न सुटायला लागतात. म्हणजे गणिताचे कसे असते, की तुम्ही वेगवेगळ्या प्रकारची गणिते सोडवायची तयारी केलीत की तुम्हाला कोणतेही गणित सोडवता येते. मला या प्रकारे आपण वेगवेगळ्या क्षेत्रातल्या लोकांना भेटतो त्यांचा एक अनुभव असतो, तोही आपण आत्मसात करू शकतो किंवा आपण बघू शकतो. उदा. – एक बिल्डर मला भेटले.अर्थात बिल्डरकडून आपण काय शिकणार? जागेबद्दल ते सांगतच होते. पण ते एकदम म्हणाले की काय आहे, मोबाईलचे ज्या मोबाईलवर आपला हात बसलेला असतो, त्याच मोबाईलमधून आपली कामे लवकर होतात. मी तेव्हा स्मार्ट फोन वापरत होतो. पण अरे मी ठरविले की, अरे जुना फोन वापरून बघू. कारण स्मार्ट फोनच्या काचांवर सतत बोट ठेवणे, अनेकदा पेज उघडत नसे, त्याचे खूप प्रॉब्लेम होते आणि माझी मोठी गरज ही फोन करणे, एसएमएस करणे ही होती. मग मी जुना बटनांचा फोन वापरायला लागलो आणि तो इतका सरावाचा होता की, त्यामुळे आपोआप कामे वेगाने होऊ लागली. एसेमेस करण्यात जाणारा वेळ कमी जाऊ लागला. याचे कारण यात एक किवा दोन ओळींचा एसेमेस करता येत असे. फोटो काढणे कमी झाले, म्हणजे बंद झाले. अर्थात voice रेकॉर्डिंगला जुना मोबाईल उपयोगी यायचा. याचा उपयोग नव्हता. पण थोडक्यात माझ्या लक्षात आले की वेगळ्या क्षेत्रातला पैसे कमवणारा माणूसही काहीतरी करत असतो, अनेक घटना, याच्यातून तो निष्कर्ष काढत असतो. ते आपण काढूच असे नाही.




रिचर्ड फाईनमनचे उदाहरण आहे. प्राणी वास घ्यायचे, मग आपल्याला हातावरून माणसे का ओळखू नयेत? त्याने ते सुरू केले. छोटे छोटे प्रश्न त्याला पडत की, लघवी खरंच गुरुत्वाकर्षणाने जाते का? मग त्याने एकदा डोक्यावर लघवी करून पाहिले. किंवा झोप येते म्हणजे काय? मग एक दिवस तो झोपला आणि पडदे बंद केले. तो observe करू लागला की झोप येताना नक्की काय होते. या प्रकारे जीवनाला त्याने प्रयोगशाळा बनवले. आणि मग त्याने अनेक मोठ्या प्रकल्पावर काम केले. प्रकल्पांवर काम करत असताना त्याला जे अनुभव आले, आयुष्यातल्या प्रत्येक गोष्टीत त्याने चौकसपणे रस घेतला. म्हणजे पासवर्ड कसा उघडायचा. तर लोक बहुदा आपल्या बायकोचे, मित्राचे, मुलांच्या नावाने पासवर्ड ठेवतात. हे एक लॉजिक आहे. एकदा मला कळले की तुम्ही इतर पासवर्डचा लॉजिक लावून बघू शकता. आणि परत हे प्रयोगासारखे असते की, तुमचे एक अनुमान असते. त्यानुसार तुम्ही काहीतरी प्रयोग करत जाता. प्रयोग चुकला तर ते अनुमान चुकले. जीवनाला प्रयोगशाळा मानले तर अनेक प्रकारच्या अनुमाने चाचपून करता येतील. म्हणजे मग रोजच्या जीवनातले प्रश्न खरेच आपण चार वेळा खातो हे आवश्यक आहे का? किंवा अगदी मी हाही प्रश्न विचारेन की वाचन आणि अभ्यास करणे आवश्यक आहे का? ते न करता माहिती प्राप्त करण्याची कळ आपल्याला उपलब्ध करता येईल. उदा. ऑडिओ-व्हिडिओ पाहणे, अनेक विषयावरील मुलाखती पाहणे, याचा उल्लेख झाला. तर मला असे वाटते की कुठलाही निष्कर्ष न काढता आपण वेगवेगळ्या प्रकरे जीवनाला भिडणे आणि त्यातील प्रश्नांबाबत पाहणे. अनेक समस्या पाहिल्या तर

काळानुसार नाहीशा होतात. उदा. प्रेमभंग किंवा एखाद्या जिवलग माणसाचा मृत्यू ही घटना त्या-त्या वेळी खूप चटका लावणारी असते. पण काही काळ गेल्यानंतर तिचा असर तेवढा राहत नाही. अर्थात प्रेमाचं माणूस आठवत राहते. पण अनेकदा असे दिसते की दुखःतून सावरण्यासाठी माणसे अनेक छंद लावून घेतात. अधिक काम करतात. आणि मग आयुष्य समृद्ध करणारे असे काहीतरी त्यांना गवसते.


अनेक वर्षांपूर्वी आम्ही माणसाला वर्कशॉपला बोलवले होते.आमचे सर्वच विद्यार्थी अभाविपचे काम करणारे होते. आणि तो माणूस अत्यंत उद्धट होता. तो भरपूर चिडायचा. मग तो म्हणाला की तुमच्या लक्षात आले असेल की मी कसा आहे तो? रागावतो. एकदा कलकत्त्याला गेलो. एक माणूस भेटला. त्याची ओळख करताना कोणी सांगितले की हा माणूस ५० वर्षे prompting काम करतोय. २०-२५ वर्षांपासून नाटकात काम करत असे. तर मग नाटक सुरु झाले आणि मग लक्षात येते की त्यातला जो मुख्य पात्र आहे तो काहीतरी संवाद विसरलाय. तेवढ्यात झटक्यात त्याच्या तोंडून संवाद आला. मग माझ्या लक्षात आले की तो संवाद त्याने म्हंटलेला नव्हता. Prompter ने अशा प्रकारे आवाज काढला होता, की तेच पात्र बोलतेय असे वाटावे. मग माझ्या लक्षात आले की ५० वर्षे त्याने त्याच्यातच काम केले आहे. नाटकाच्या संबधित त्याने अनेक गोष्टी शिकून घेतल्या होत्या. ज्या नाटकात कुठल्याही समस्या आल्या तर तो उपयोगी पडते. मग त्या माणसाविषयी मला आदर वाटला. अशी कितीतरी माणसे असतात. ४० वर्षे promting करण्यात घालवतात. निरर्थक काम करत राहतात. अशा माणसाविषयी आपण लगेच निष्कर्ष काढतो. साधारणपणे भारतीय तत्वज्ञानात सांगितल्याप्रमाणे धर्म, अर्थ, मोक्ष, काम या माणसाच्या अहित चिंता असतात. उलट पाश्चात्य तर मानसशास्त्रज्ञांनी, समाजशास्त्रज्ञांनी काढलेल्या निष्कर्षांनुसार अन्न, वस्त्र, निवारानंतर महत्त्व मिळाले. भोवतालच्या समुदायात सन्मान प्राप्त होणे, आवडीच्या गोष्टी प्राप्त करून घेणे, समानतेने वागणे, अशी काही मूल्ये आवश्यक असतात. त्याच्या त्याच्या आनंदासाठी करण्याचे स्वातंत्र ज्या समाजात आहे. तो देश सुखी मानता येईल. पण शोक म्हणजे काय याच्या व्याख्या व्यक्तिगणिक बदलतात. पण सर्वसाधारणपणे सुखाच्या आनंदाच्या गोष्टी करता येतील. राहायला व्यवस्थित घर. कुटुंब प्रेम करणारी माणसे आनंद देणाऱ्या मनोरंजनाच्या गोष्टी सिनेमा, पुस्तके, टीव्ही इ. घेता येणे, रेफ्रिजरेटर, पंखा, एयर कंडीशनर यासारख्या सुखसोई घरात असणे. याबद्दल सर्वसाधारण माणसाची ओढ वाढते. पण माणूस म्हणून मी उत्कृष्ट बनावे, माझ्यात करुणेचा अंतर्भाव असावा, जगण्यामध्ये मी संवेदनशील असावे. भोवतालच्या माणसांना त्रास देणे तर दूरच. पण त्यांच्या समस्या निवारण करण्यात मी आनंदी व्हावे. अशी एक समाजात आदर्श दिसतात की जे झोकून जाऊन इतरांसाठी काम करतात. त्याच्यात अधिक आनंदी आणि समाधानी असतात. पण प्रत्येकाला समाधानासाठी काय शक्य आहे, तर समृद्ध होणे. माझ्या अनुभवाची कक्षा वाढवणे. माझ्या जगण्याची कक्षा वाढवणे आणि हे काम शिक्षण, कला, नॉन शिक्षण साहित्य, सिनेमा, नाटक करत असते. उत्तर ध्रुवावर माणूस जात असतो त्याचे मला महत्व वाचनातून मिळू शकतो. ताज, पिरॅमिड या गोष्टी बांधताना काय घडले. उत्तुंग इमारती कशा बांधल्या जातात. अमेझॉनच्या खोऱ्यात कोणती भाषा बोलली जाते. नाईल नदीच्या उगमाचा शोध कसा लागला. हे सारे जिज्ञासेचे विषय पुस्तकातून पूर्ण होतात. पण त्याच बरोबर रोजच्या जगण्यातील संवेदना म्हणजे मला कायम काहीतरी जगण्यातून हवे असते. हे सेन्शेशन मिळण्याचे मार्ग मला प्राप्त होतात. फ्रीजमधून मी थंड सरबत पिऊ शकतो. आईसक्रीम खाऊ शकतो. कपडे धुण्याचे कष्ट यातून कमी होतात. उन्हाळ्याच्या झळा मला वातानुकुलीत यंत्रामुळे माहीत होत नाहीत. या सगळ्या शारीरिक संवेदना झाल्या. मनाला चेतवणारे, मनाला जागवणारे, पुस्तक आणि वाचन आणि इतर माहितीचे स्रोत हे एक साधन आहे. त्याच्यातून अधिक उन्नत अधिक ज्ञान असे आयुष्य आपल्याला जगता येईल. थोडसं आत्मचरित्रात्मक थोडसं इतर उदाहरणे देऊन या लेखात मांडायचा प्रयत्न केलाय. आपापल्या जीवनातील किंवा आवडीच्या गोष्टींसाठी आपण केलेले प्रयत्न, त्याची तुलना या अनुभवांशी केली तर मला वाटते, ज्ञानातून जीवनानंदाकडे जाता येईल का याचे उत्तर मिळेल.

**- शशिकांत सावंत**
भ्रमणध्वनी : ९८२१७८५६१८
shashibooks@gmail.com



**जिज्ञासेचे विषय पुस्तकातून पूर्ण होतात. पण त्याच बरोबर रोजच्या जगण्यातील संवेदना म्हणजे मला कायम काहीतरी जगण्यातून हवे असते. हे सेन्शेशन मिळण्याचे मार्ग मला प्राप्त होतात. आपापल्या जीवनातील किंवा आवडीच्या गोष्टींसाठी आपण केलेले प्रयत्न, त्याची तुलना या अनुभवांशी केली तर मला वाटते, ज्ञानातून जीवनानंदाकडे जाता येईल का याचे उत्तर मिळेल.**






# जावे पुस्तकांच्या गावा

**राहुल बोरसे**

**म**हाबळेश्वर व पाचगणी ही महाराष्ट्रातील निसर्गरम्य पर्यटन स्थळे आहेत. या निसर्गरम्य ठिकाणांच्या जवळच पुस्तक-पर्यटनाचा एक अनोखा प्रयोग केला जातोय. महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाने हा प्रकल्प साकारला आहे. त्यासाठी भिलार या गावाची निवड करण्यात आलेली आहे. पाचगणीहून महाबळेश्वरकडे जातांना अवघ्या सहा किलोमीटरवर भिलार हे गाव आहे. भिलार हे स्ट्रॉबेरीचे गाव म्हणून ओळखले जाते. दरवर्षी येथे स्ट्रॉबेरी महोत्सवही आयोजित केला जातो. त्यामुळे या गावाची ओळख स्ट्रॉबेरीचे गाव अशीही आहे. परंतु आता भिलार पुस्तकांचं गाव म्हणूनही ओळखले जाणार आहे. त्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाने येथे घरोघरी वाचनालये उघडण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे. वाचनसंस्कृती वाढावी या उद्देशाने गावातील घरामध्ये विषयानुरूप पुस्तके ठेवण्यात आलेली आहेत. गावाला भेट देण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना जास्तीतजास्त पुस्तके वाचण्यासाठी उपलब्ध व्हावीत म्हणून २५ घरांची निवड करण्यात आलेली आहे. ४ मे रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या प्रकल्पाचे उद्घाटन झाले. त्यानिमित्त चित्रलेखाने घेतलेला आढावा.

भिलार गावात प्रवेश करतांनाच 'स्ट्रॉबेरीसोबत पुस्तकांचा आनंद घ्या' असा फलक तुमचे लक्ष वेधून घेतो. तुम्ही गावात शिरतात तसे आकर्षक चित्रे काढलेली घरे तुमच्या दृष्टीस पडतात. घरांसमोर पुस्तकांच्या विषयांच्या नावाचे फलक लावलेले दिसतात. तसेच विषयांनुसार घरांवर आकर्षक चित्रेही काढलेली दिसतात. गावामध्ये थोडे आत गेल्यानंतर पार्वती शंकर निवास नावाच्या इमारतीत 'राज्य मराठी विकास संस्थे'चे

प्रकल्प कार्यालय आहे. तेथे प्रकल्प प्रमुख विनय मावळणकर यांना भेटून आम्ही या प्रकल्पाविषयीची माहिती जाणून घेतली. २७ फेब्रुवारी २०१५ रोजी मराठी भाषा व सांस्कृतिक मंत्री विनोद तावडे यांनी मराठी राजभाषा दिनाच्या वेळी केलेल्या भाषणात महाराष्ट्रात पुस्तकांचं गाव निर्माण करू अशी घोषणा केली होती. ही कल्पना इंग्लंड येथील वेल्समधील 'हे ऑन वे' या गावात असलेल्या पुस्तकांच्या गावावर आधारित आहे. लोकांनी या गावी यावे पुस्तके वाचावीत. लेखकांनी व प्रकाशकांनी येथे पुस्तकांचे प्रकाशन करावे. २७ फेब्रुवारी, मराठी भाषा दिन, जागतिक पुस्तकदिन दिवाळी नाताळ अशा सुट्ट्यांच्या दिवशी येथे वेगवेगळे साहित्याशी संबंधित कार्यक्रम व्हावेत अशी अपेक्षा आहे.

पुस्तकांच्या गावासाठी भिलारची निवड का केली असे विचारल्यावर माळवणकरांनी सांगितले, मराठी भाषा विभागातर्फे पुस्तकांचे गाव या प्रकल्पासाठी जागा शोधणे सुरु होते. मात्र जागा निश्चिती होत नव्हती. एखाद्या पर्यटन स्थळाजवळ असलेल्या ठिकाणी पुस्तकांचं गाव असावे, अशी अट असल्याने जागा निश्चिती करण्यासाठी अडचणी येत होत्या. इतर पर्यटन स्थळांच्या तुलनेत महाबळेश्वर व पाचगणी येथे मोठ्या प्रमाणात पर्यटक येतात. त्यामुळे मराठी भाषा विभागाने भिलार हे गाव हा प्रकल्प राबविण्यासाठी निश्चित केले. ग्रामसभा घेऊन गावकऱ्यांना या प्रकल्पाची माहिती देण्यात आली. गावकऱ्यांच्या काही शंका होत्या त्यांचेही निरसन करण्यात आले. प्रकल्पात सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांकडून अर्ज मागवण्यात आले होते. त्यानुसार ५० अर्ज आले होते. त्यांची छाननी करून २५ जागांची निवड करण्यात आली. पर्यटकांना चहा, नाश्ता किंवा जेवण या सुविधा उपलब्ध करून देण्यात येऊ शकतील, अशा घरांची निवड करण्यात आली आहे. यात घरे, मंदिरे, रिसॉर्ट्स, शाळा अशी एकूण २५ ठिकाणे आहेत.

पुस्तकांचं गाव या प्रकल्पासाठी १५ हजार पुस्तके घेण्यात आलेली आहेत. या पुस्तकांची एकूण किंमत सुमारे ४० लाख रुपये आहे. मात्र प्रकाशकांनी दिलेल्या सवलतीमुळे आम्हाला ही पुस्तके २५ लाख रुपयांत मिळाली. पुस्तक निवड करण्यासाठी सदानंद मोरे, बाबा भांड असे लेखक, ग्रंथसखाचे संचालक श्याम जोशी व महाराष्ट्रातील ग्रंथपालांची मदत घेण्यात आलेली आहे. प्रत्येक घरात पुस्तके ठेवण्यासाठी एक कपाट शासनामार्फत देण्यात आलेले आहे. निवडक ४० पुस्तके



सर्वांना देण्यात आलेली आहेत. तसेच प्रत्येक घरात आपण ४०० ते ४५० विषयवार पुस्तके दिलेली आहेत. ती पुस्तके ठेवण्यासाठी एक स्टँड, बसण्यासाठी खुर्च्या, टेबल, लहान टेबल, मोठी छत्री आणि बिन बॅग असे साहित्यही देण्यात आले आहे. प्रत्येक घरासाठी एक विषय ठरवून देण्यात आलेला आहे. त्यात बालसाहित्य, कादंबरी, विज्ञान, नियतकालिके व साहित्यिक माहिती फलक, इतिहास, क्रीडा व विविध लोकप्रिय, दिवाळी अंक, चरित्रे व आत्मचरित्रे, बोलकी पुस्तके, वर्तमानपत्रे व साप्ताहिके, छत्रपती शिवाजी महाराज, शिवकालीन इतिहास व गडकिल्ले, परिवर्तन चळवळ, साजसुधारकांचा व सुधारणांचा इतिहास, कथा, स्त्री साहित्य, लोकसाहित्य, बालसाहित्य, ललित गद्य, व वैचारिक, साहित्य व भाषिक साहित्य खेळ, विनोदी, विविध लोकप्रिय व पुरस्कार विजेते, संत साहित्य अशा वेगवेगळ्या २५ विषयांची पुस्तके देण्यात आली आहेत. अंध व्यक्तींसाठी दृक्श्राव्य विभागही बनवण्यात आलेला आहे. यात ६०० ते ७०० ऑडिओ व व्हिडिओ स्वरूपात पुस्तके आहेत. पुस्तके वाचल्यानंतर वाचकांची मते जाणून घेण्यासाठी आम्ही अभिप्रायाची वही सुद्धा ठेवण्यात आली आहे. जेणे करून आम्हाला पर्यटकांची मते जाणून घेता येतील व वाचकांच्या सूचनेनुसार आवश्यक ते बदल करता येतील.

पुस्तकांची विषयानुसार निवड करताना काय अडचणी आल्या याबद्दल बोलताना माळवणकर सांगतात. काही विषयांची खूपच कमी पुस्तके उपलब्ध असल्याने त्यात इतर विषयही जोडण्यात आले. जसे क्रीडा व विविध लोकप्रिय हा विषय. कारण क्रीडा विषयावरील पुस्तके कमी आहेत. तसेच विनोदी साहित्याबाबत विनोदी

**पुस्तकांचं गाव या प्रकल्पासाठी १५ हजार पुस्तके घेण्यात आलेली आहेत. या पुस्तकांची एकूण किंमत सुमारे ४० लाख रुपये आहे. मात्र प्रकाशकांनी दिलेल्या सवलतीमुळे आम्हाला ही पुस्तके २५ लाख रुपयांत मिळाली.**




साहित्यात जुनीच पुस्तके जास्त करून उपलब्ध आहेत. त्यातही पु. ल. देशपांडे व चिं. वि. जोशी यांची व इतर काही मोजक्या साहित्यिकांची पुस्तके उपलब्ध आहेत. खरंतर याचा विचार व्हायला हवा. नवीन लेखकांनी क्रीडा व विनोदी लेखनही वाढायला हवं.

पुस्तके वाचण्यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क घेतले जाणार नाही. पुस्तके विकण्याचाही विचार नाही. पण भविष्यात जर एखाद्या गावकऱ्याला पुस्तकांचे दुकान सुरू करावेसे वाटले, तर ते पुस्तके विकू शकतील. एखाद्या प्रकाशकाला वाटल्यास ते येथे दुकान सुरू करू शकतील. हा प्रकल्प वाचन संस्कृती वाढीस लागावी या उद्देशाने सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे भविष्यात राम मंदिरासमोरील तीन एकराच्या शासकीय भूखंडावर स्वतंत्र दालन उभारून तेथेही पुस्तके ठेवण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. पुस्तकांचं गाव पाहायला पर्यटक येतात फोटो काढतात, सेल्फी काढतात. परंतु पर्यटकांनी वाचन करायला यायला हवं.' अशी अपेक्षाही मावळणकर यांनी व्यक्त केली.

भिलारमध्ये फिरताना घरांवर काढलेली आकर्षक चित्रे तुमचे लक्ष वेधून घेतात. प्रत्येक घराच्या बाहेर विषयाची माहिती देणारे फलक लावण्यात आलेले आहेत. तसेच घर मालकांच्या नावाचे आकर्षक फलकही प्रत्येक घरावर लावलेले आहेत. ही चित्रे काढण्याचे काम ठाण्यातील 'स्वत्व' या स्वयंसेवी संस्थेने केले आहे. चित्रलेखाने स्वत्वचे सदस्य श्रीपाद भालेराव यांच्याशी संपर्क करून अधिकची माहिती जाणून घेतली. ठाण्यात आम्ही भिंती रंगवा ठाणे सजवा हा उपक्रम राबवला होता. तो पाहून विनोद तावडे यांनी आम्हाला, भिलार गावात रंगकाम कराल का अशी विचारणा केली. त्यानंतर आम्ही कलाकारांची निवड करण्याची सुरू केली. आम्ही व्हाट्सअपच्या माध्यमातून लोकांना या प्रकल्पात सहभागी होण्याचे आवाहन केले. त्यात १०० जणांनी हे काम करण्याची इच्छा दर्शवली होती. त्यापैकी ७५ जणांची आम्ही निवड केली. त्यात विजयराज बोधनकर, महेश आंजर्लेकर, शशिकांत झगडे, चंद्रकांत हुळवळे, रवी चव्हाण, अमेय म्हात्रे, सुधीर उदगीरकर आणि सदाशिव कुलकर्णी हे ज्येष्ठ व्यावसायिक कलाकार आणि कलाशिक्षक या उपक्रमासाठी पुढे आले. सातारा, मुंबई, ठाणे, पुणे आणि इंदोर येथून कलाकार या कामासाठी आले होते. ७५ कलाकारांच्या संचासह स्वत्वचे कार्यकर्ते १४ एप्रिलला भिलार येथे पोहोचले. तीन दिवस व रात्र काम करून २५ घरांवर वेगवेगळी चित्रे चितारण्याचे काम या कलाकारानी पूर्ण केले. सर्वांनी मिळून ११००० चौ. फूट क्षेत्रफळ व्यापणारी आकर्षक अशी चित्रे काढली. 'स्वत्व'चे स्वाती दीक्षित आणि विनोद शर्मा यांनी संपूर्ण नियोजन केले होते.

गावातील ज्या घरांमध्ये पुस्तके ठेवण्यात आलेली आहेत त्या गावकऱ्यांनाही आम्ही भेटलो व त्यांची या प्रकल्पाबद्दलची मते आम्ही जाणून घेतली. शशिकांत भिलारे यांच्याकडे आत्मचरित्र या विषयांची पुस्तके ठेवण्यात आलेली आहेत. जवळपास ६५० आत्मचरित्रे त्यांच्या घरात ठेवलेली आहेत. अंध व्यक्तींसाठी दृक्श्राव्य विभागही त्यांच्या घरातील एका खोलीमध्ये बनवण्यात आला आहे. पुस्तके वाचण्यासाठी पर्यटक येतात का? असे विचारल्यावर शशिकांत भिलारे म्हणाले पुस्तकांचं गाव होणार आहे हे कळल्यानंतर पर्यटकांची संख्या वाढली आहे. पर्यटक उत्सुकतेने पुस्तकांचा गाव पाहायला येतात. पुस्तकांविषयी माहिती विचारतात. आमचे गाव आता ज्ञानाचा पाझर तलाव झाल्यासारखे वाटते आहे. इथून फुटणारे झरे अवघ्या महाराष्ट्रात पोहचतील अशी आम्हाला आशा वाटते.

राजेंद्र भिलारे हे भिलारचे माजी सरपंच आहेत. त्यांच्या 'हॉटेल अनमोल्स इन'मध्ये महाराष्ट्र प्रदेश, मराठी भाषा व संस्कृती या विषयांची पुस्तके ठेवण्यात आलेली आहेत. राजेंद्र भिलारे सांगतात ४००० लोकसंख्येचे आमचे गाव आधीपासून प्रसिद्ध आहे. या गावाला स्वातंत्र्यसंग्रामाची पार्श्वभूमी आहे. गांधीजींवर पाचगणी येथे झालेल्या प्राणघातक हल्ल्यापासून वाचविणाऱ्या भिलारे गुरुजींचे हे गाव आहे. त्यावेळी भि. दा. भिलारे गुरुजींनी भिलार या गावी ही संकल्पना

**हे ऑन वे काय आहे?**

हे ऑन वे हे इंग्लंड जवळील वेल्स मधील शहर आहे. याला पुस्तकांचे शहर म्हणूनही ओळखले जाते. १९६१ मध्ये रिचर्ड बूथने हे ऑन वे गावी जुन्या पुस्तकांचे पहिले दुकान उघडले होते. आज तेथे ४० पेक्षा जास्त पुस्तकांची दुकाने आहेत. वर्षभरात येथे भेट पाच लाख लोकं भेट देत असतात. दरवर्षी या शहरात हे ऑन वे फेस्टिवल आयोजित करण्यात येतो. मे महिन्याच्या अखेरच्या दहा दिवसात हा उत्सव साजरा करण्यात येतो. या उत्सवा दरम्यान हे ऑन वेला ८५ हजार लोकं भेट देतात. त्यात लेखक, कवी, राजकीय नेते, वैज्ञानिक, विनोदी कलाकार, गायक, संगीतकार आणि विचारवंत असे वेगवेगळ्या क्षेत्रातील दिग्गज हजेरी लावत असतात. त्याकाळात हे ऑन वेमध्ये खाणेपिणे, नाटक, पुस्तक वाचन, गाणी असे वेगवेगळे कार्यक्रम आयोजित केले जातात.

राबवावी असे सुचवले होते. भिलारमध्ये चित्रपट क्षेत्रातील नौशाद, आनंद बक्षी यांची घरेही आहेत. आचार्य अत्रे यांच्या कन्या शिरीष पै यांचेही घर येथे आहे. आम्ही येथे कृषी पर्यटनाची संकल्पना चार वर्षांपूर्वी सुरु केली होती. आता गावात पुस्तक पर्यटनाचा प्रकल्प राबवला जातोय याचा आनंद होतोय.'

दत्तात्रय भिलारे यांच्या घरी परिवर्तन चळवळीशी संबंधित पुस्तके ठेवण्यात आलेली आहेत. त्यात समग्र आगरकर, समग्र बाबासाहेब आंबेडकर, समग्र विठ्ठल रामजी शिंदे, समग्र महात्मा फुले वाङ्मय व इतर परिवर्तन चळवळींशी संबंधित पुस्तके ठेवण्यात आली आहेत. तुम्ही स्वतः पुस्तके वाचतात का? असे विचारल्यावर भिलारे म्हणतात, वडील प्राथमिक शिक्षक असल्याने वाचनाची गोडी आधीपासूनच होती. घरात माझेही स्वतःचा पुस्तक संग्रह आहे. त्यामुळे परिवर्तन चळवळची पुस्तकांचे वाचनालय आमच्या घरात आल्याने आम्हाला खूप आनंद झाला. या वाचनालयामुळे परिवर्तन चळवळीशी असलेले नाते अधिक घट्ट होईल. तसेच परिवर्तन चळवळीच्या वाचकांशी संवादही साधता येईल.'

पुस्तकांचं गाव पहायला येणाऱ्या पर्यटकांशीही आम्ही बोललो. यशदा खरे व उर्मिला जोशी या पुण्याहून पुस्तकांचं गाव पाहण्यास आलेल्या होत्या. वाचनाची आवड असल्याने पुस्तकांचे गाव कसे असेल याची उत्सुकता होती. त्यामुळे हे गाव पाहण्यास आलो. हा प्रकल्प खूप छान राबवला आहे. विषयानुसार पुस्तकांची विभागणी केल्याने आवडत्या विषयांची अधिक पुस्तके हाताळता येणार आहेत. तसेच वाचनाची आवड असलेल्या पर्यटकांना पुस्तकांचा खजिनाच या गावात उपलब्ध होणार आहे. असे यशदा खरे यांनी सांगितले.


सरपंच वंदना भिलारे यांच्या घरी कथा विषयाशी संबंधित पुस्तके ठेवण्यात आलेली आहेत. त्यांच्या घरी असलेली पुस्तके आम्ही पाहिली. 'पुस्तकांचे गाव' हा अभिनव प्रकल्प मराठी भाषा विभागातर्फे आमच्या गावात राबविला जात आहे. तसेच भविष्यात राम मंदिराच्या समोरील तीन एकर भूखंडावर स्वतंत्र दालन उघडण्याचा विचार आहे. या दालनात वेगवेगळी पुस्तके ठेवण्यात येतील तसेच वाचकांसाठी राहण्याची सोय करता येईल का याचाही विचार करण्यात येईल. गावात कायमस्वरूपी कविकट्टा आणि अभिवाचन कट्टा असेल. लेखन, वाचन, संपादन यांची प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असू. लेखकांच्या भेटी आयोजित करण्याचाही प्रयत्न आम्ही करू. प्रकल्पासाठी गावकऱ्यांनी उत्साहाने आपल्या घरातील जागा वापरण्यास दिली. या प्रकल्पामुळे वाचनसंस्कृती रुजवण्यासाठी प्रयत्न करणारे गाव म्हणून महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात भिलारचे नाव अग्रेसर राहील याचा आम्हाला अभिमान वाटतो. असे मत सरपंच वंदन भिलारे यांनी व्यक्त केले.

भिलारमध्ये पुस्तकांचे गाव हा प्रकल्प उभारल्याने गावकऱ्यांमध्ये उत्साह आहे. गावकऱ्यांनी मोठ्या आनंदाने आपल्या घरातील काही भाग वाचनालयासाठी वापरायला दिला आहे. तसेच हॉटेल व्यावसायिकांनाही आपल्या हॉटेलमधील जागा या उपक्रमासाठी दिलेली आहे. दुसरा टप्प्यातील काम सुरु करण्याचा विचार शासनाच्या विचाराधीन आहे. पुस्तकांच्या गावाचा हा अभिनव प्रकल्प देशात पहिल्यांदाच साकारत असल्याने पर्यटक आवर्जून या गावाला भेट देत आहेत. पुस्तकांचं गाव कसे असेल हे जाणून घेण्याची उत्सुकता पर्यटकांमध्ये आहे. मराठी भाषा विभागाने उभारलेले हे पुस्तकांचं गाव एक माईलस्टोन (मैलाचा दगड) ठरेल. महाबळेश्वरला जर जाणार असाल तर थोडी वाट वाकडी करून पुस्तकांच्या या गावाला जरूर भेट द्या.

**– राहुल बोरसे**

भ्रमणध्वनी : ९८५०८४०७३७

# इंडियन रेल्वे 'टॉप गिअर'मध्ये, गतिमान आणि गुणवत्तापूर्ण बदल...



## सुरेश प्रभू यांची खास मुलाखत

मुलाखतकार
**दीपक करंजीकर**

**प्रश्न–** तुम्ही रेल्वेचा कारभार हाती घेतल्यापासून विकासाच्या कामांना वेग मिळाला आहे. रेल्वे खातं तुमच्याकडे आल्यापासून ३० महिने झाले आहेत. परंतु या येवढ्या कमी वेळातही आपण रेल्वेला पुढच्या टप्प्यावर आणून ठेवलं आहे. हे सर्व कसं शक्य झालं, त्याविषयी काय सांगाल?

**उत्तर–** कोणत्याही संस्थेत बदल घडवून आणायचा असल्यास पहिल्यांदा त्या संस्थेची सध्याची स्थिती काय आहे, हे माहीत असावं लागतं. ती जाणून घेतल्यास आपल्याला पुढे कोणत्या दिशेनं जायचं आहे, त्याचा अंदाज येतो. रेल्वेखात्याचा कारभार हाती घेतल्यावर मला पत्रकारांनी विचारायला सुरुवात केली, की तुम्ही काय काय बदल करणार आहात? जसं शाळेत लहान विद्यार्थ्याल विचारलं जातं, की तू पंतप्रधान बनल्यावर काय करशील? मग तो मुलगा सांगत जातो, मी हे करीन–ते करीन. तसंच काहीसं हे. परंतु पत्रकारांचे प्रश्न झाल्यावर मी त्यांना म्हणालो, मी या खात्यात काय करणार आहे हे सांगण्यापेक्षा इथं काय आहे ते आधी सांगतो. त्याच्याच आधारावर आम्ही सुधारणा केल्या की नाही ते कळू शकेल. त्यामुळेच  रेल्वेची स्थिती सांगणारी श्वेतपत्रिका काढणार असल्याचं मी जाहीर केलं होतं. त्यानुसार संसदेत श्वतेपत्रिका मांडलीही. त्यात रेल्वेच्या सर्व प्रश्नांचा ऊहापोह केला गेला. उदा. १७४० टक्के ट्रॅफिक वाढलेलं दिसतं, मात्र त्या तुलनेत रेल्वेच्या संसाधनांमध्ये केवळ ३४–३५ टक्क्यांची वाढ झाली आहे. हा फरक खूप मोठा आहे. त्यातच रेल्वेचे सर्व प्रश्न गुंतलेले आहेत. आम्ही मांडलेल्या रेल्वेच्या सर्व अर्थसंकल्पांमध्ये तिच्या विकासासाठीची रणनिती दिसेल.

रेल्वेचे प्रश्न आम्ही कसे सोडवणार याविषयी त्यात काही दिशा स्पष्ट केली गेली. म्हणजे समजा, जर रेल्वेच्या संसाधनांमध्ये वाढ व्हायला हवी तर ती योग्यप्रकारे व मुख्य म्हणजे योग्य ठिकाणी करायला हवी. जसं रुग्णाची शस्त्रक्रिया करायची आहे, पण ती कुठे करायची हे पक्के माहीत असायला हवं. उदा. रेल्वेच्या केवळ १६ नेटवर्कमधून तिचे तब्बल ६० टक्के ट्रॅफिक हाताळलं जातं. (हे कसं चालतं हे खरं तर एक कोडंच आहे.) म्हणजे इथं संसाधनं कमी, वापर जास्त, त्यामुळे गर्दी अधिक, परिणामी गाड्यांना उशीर, प्रवाशांना त्रास - असे हे चक्र आहे. याचा अर्थ, प्रश्न या १६ टक्के नेटवर्कमध्ये अधिक जटील आहे. यात बदल करायचा तर तिथे आधी प्रयत्न व्हायला हवेत. त्यावर उपाय

दुसरा प्रश्न होता संसाधनांच्या विकासाचा. त्यासाठी पहिल्यांदा मीटर-गेजचं संपूर्णपणे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर करण्याचं आम्ही ठरवलं आहे. आतापर्यंत रेल्वेचं केवळ ४२ टक्के इलेक्ट्रीफिकेशन झालं आहे. ते पुढील पाच वर्षांत दुप्पट करण्याचं आमचं लक्ष्य आहे. मालवाहू गाड्यांसाठीच्या विशेष राखीव मार्गाचा प्रकल्प खितपत पडला होता. तोही आम्ही पुनर्जिवित करणार आहोत. २०१९ सालापर्यंत त्याचे काम पूर्ण होईल. आधी मालवाहू व प्रवासी गाड्या पाठोपाठ एकाच मार्गावरून जात असत, त्या या विशेष मार्गामुळे स्वतंत्रपणे धावू लागतील. रेल्वेचा दोन तृतीयांश महसूल हा मालवाहू गाड्यांपासून मिळतो, परंत रेल्वेच्या एकूण नेटवर्कमध्ये त्यांचा वाटा मात्र एकतृतीयांश इतकाच

**रेल्वेला आर्थिकदृष्ट्या स्थिर करणं हेही आमच्यासमोरचं एक आव्हान आहे. त्यासाठी पुढील दहा वर्षांत प्रवासी भाडे व्यतिरिक्तचा महसूल वाढवण्याकडे आमचं लक्ष असेल.**

### रेल्वेच्या इतिहासात प्रथमच घडणाऱ्या गोष्टी

रेल्वेचे कामकाज अत्याधुनिक स्वरूपाचे, पारदर्शक आणि मोकळे व्हावे या दृष्टीने रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांनी अनेक नावीन्यपूर्ण निर्णय घेऊन त्यांची धडाकेबाज अंमलबजावणी सुरू केली. त्यासाठी त्यांनी विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचे मोहोळ रेल्वेच्या पाठीशी उभे केले आहे.

एखादा प्रकल्प नियोजित वेळेतच पूर्ण व्हावा. त्याच्या खर्चात वाढ होऊ नये तसेच तो गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण व्हावा यावर त्यांचा कटाक्ष असतो. त्यांनी घेतलेल्या निर्णयांची झलक.

- १६०० कि.मी. लांबीचे दोन आणि तीन मार्गिकांचे नवे रेल्वेमार्ग.
- संपूर्ण मीटरगेजचे ब्रॉडगेजमध्ये परिवर्तन.
- रेल्वेच्या उत्पन्नातील ४१,००० कोटी रुपयांची बचत
- कर्मचाऱ्यांना/अधिकाऱ्यांना त्यांच्या उत्तरदायित्वाची जाणीव करून देणे तसेच त्यांच्या कार्यक्षमतेबद्दल त्यांना प्रोत्साहित करणे.
- नवी स्थानके स्वच्छ, सौर ऊर्जाधारित, हरित आणि पाणीबचतीचा आदर्शन घालून देणारी करणे.
- मुंबईसारख्या शहरांमध्ये वातानुकूलित गाड्या सुरू करणे.
- जमिनीची धूप थांबवावी म्हणून मार्गांच्या दुतर्फा वृक्ष लागवड करणे.
- दुर्घटना थोपविण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे.
- रेल्वेचा इतिहास सांगणाऱ्या वस्तुसंग्रहालयाची निर्मिती करणे.
- प्रवाशांना अत्याधुनिक सुविधा देऊन महसुलात वाढ करणे.
- मालवाहतुकीसाठी खास नवे मार्ग निर्माण करणे.

म्हणजे संसाधनाची वाढ व उपलब्धता तिथं- योग्य ठिकाणी- निर्माण केली पाहिजे. त्यामुळे गेल्या अडीच वर्षांत आम्ही १६,५०० कि.मी. मार्गांचं डबलिंग-ट्रीपलिंगचं काम पूर्ण केलं. गेल्या सत्तर वर्षांत केवळ २०,००० कि.मी.च्या आसपास हे काम झालं होतं. ते पाहिलं की गेल्या अडीच वर्षांतील आमच्या कामगिरीचं महत्त्व ध्यानात येईल. याचा अर्थ जिथं प्रश्न आहेत, तिथं आम्ही लक्ष द्यायला सुरुवात केली.

आहे. तर प्रवासी वाहतुकीतून रेल्वेच्या एकूण महसुलातील एक तृतीयांश वाटा मिळत असतो, मात्र त्याचे नेटवर्क एकूण दोन तृतीयांश आहे. असे हे नेटवर्क आणि महसूलाचे व्यस्त प्रमाण आहे. ही व्यस्तता कमी होण्यात यामुळे मदत होऊ शकेल. जिथं डबलिंग-ट्रिपलिंगची कामं सुरू आहेत, तिथं वाहतुकही सुरू आहे. ती न थांबवता कामं सुरू आहेत. बदलाची प्रक्रिया सुरू आहे. ही कामं पूर्ण होतील तेव्हा रेल्वेचे स्वरूप

**संपूर्ण रेल्वेचं डिजीटलयाझेशन करण्याचा आमचा प्रयत्न आहे. ई-कॉमर्स, ई-टेंडरिंग, ऑनलाईन परीक्षा यांसारखे उपक्रम आम्ही सुरू करत आहोत. याचा परिणाम कारभारात पारदर्शकता येण्यात होईल.**


पालटल्याचं ध्यानात येईल. या सर्वाचे परिणाम गाड्या उपलब्ध होण्यात, गर्दी कमी होण्यात, सुविधा निर्माण होण्यात होईल.

रेल्वेला आर्थिकदृष्ट्या स्थिर करणं हेही एक आमच्यासमोरचं आव्हान आहे. त्यासाठी पुढील दहा वर्षांत प्रवासी भाडे व्यतिरिक्तचा महसूल वाढवण्याकडे आमचं लक्ष्य असेल. या महसूलात ४० हजार कोटींपेक्षा अधिक वाढ करण्याचं आम्ही ठरवलं आहे. मालवाहू गाड्यांसाठी आधी केवळ १० उत्पादनांच्या प्रवासाची मान्यता होती. त्यात वाढ करून आम्ही ती आता ४० उत्पादनांना मान्यता दिली आहे. तसेच त्यासाठीचे शुल्कही कमी केले आहे. मालवाहू गाड्यांच्या खाजगीकरणाचाही आमचा प्रयत्न आहे. रेल्वे स्थानकांच्या विकासासाठीही आम्ही १ लाख कोटीची गुंतवणूक केली आहे. तर एकूणच विकासकामांसाठी सुमारे ८ लाख ५० हजार कोटींची गुंतवणूक लागणार आहे. हे पैसे उभारण्यातही आम्हाला यश येत आहे. भारतीय रेल्वेच्या इतिहासात कधीही न झालेली एक गोष्ट आम्ही यासाठी केली. ती म्हणजे एलआयसीकडून सुमारे दीड लाख कोटी रुपये आम्ही उभे केले. ते पाहून आधी रेल्वेकडे ढुंकूनही न पाहणाऱ्या जागितक बँक, आशियायी विकास बँक यांसारख्या निधीसंस्था रेल्वेत गुंतवणूक करण्यास तयार झाल्या आहेत. याचा अर्थ पैसे उभारण्यात रेल्वे आता सक्षम होऊ लागली आहे. शिवाय खर्चात सुमारे ४१ हजार कोटींची बचतही आम्ही केली आहे.

याशिवाय संपूर्ण रेल्वेचं डिजीटलयझेशन करण्याचा आमचा प्रयत्न आहे. ई-कॉमर्स, ई-टेंडरिंग, ऑनलाईन परीक्षा यांसारखे उपक्रम आम्ही सुरू करत आहोत. याचा परिणाम कारभारात पारदर्शकता येण्यात होईल. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे गेल्या अडिच वर्षांत आम्ही कारभारात निर्णय घेण्यासाठी अधिकारांचे वाटप केले आहे. त्याने निर्णय घेण्यात व कामाच्या अंमलबजावणीत सुसूत्रता येण्यात मदत झाली आहे. भारतीय रेल्वेच्या इतिहासात हे कधीही घडले नव्हते.

खाजगी क्षेत्राच्या मदतीने आम्ही रेल्वे स्थानकांच्या विकासाची प्रक्रिया गतिमान केली आहे. गाड्यांमधील कोचेसमध्ये सुधारणा करत आहेत. तब्बल ४२ हजार कोचेसचे काम झाले आहे. नवीन ड्रायक्लिनिंग यंत्रंही आम्ही घेतली आहेत. नवीन केटरिंग धोरणही आम्ही आणले आहे. तेजस, हससफर, अंत्योदय, गतिमान यांसारख्या अद्ययावत गाड्याही आम्ही आणल्या आहेत. उदय ही त्यातील आणखी एक गाडी लवकरच येईल. ग्राहकांच्या तक्रारींसाठी सर्वात मोठी तक्रारनिवारण यंत्रणा आम्ही उभारत आहोत. या सर्वांमुळे ग्राहकांना अद्ययावत सुविधा मिळतील. शेवटी त्यांचे समाधान हेच रेल्वेचं उद्दीष्ट आहे.

**प्रश्न-** हे सर्व आपण सांगितलंत, परंतु हे सर्व ऐकताना व पाहताना एक गोष्ट सतत जाणवत राहते. ती म्हणजे या सर्व कामांत नितीमत्ता आणि अर्थशास्त्र हातात हात



घालून जाणं, यावर तुमचा कटाक्ष राहिला आहे. विकास करायचा, त्यासाठी निधी उभारायचा, आणि तेही नितीमत्तेला धक्का न देता. रेल्वेसारखी एवढी अवाढव्य यंत्रणेला बदलताना ते आव्हानात्मक वाटलं नाही का?
**उत्तर–** एक लक्षात घ्या की, रेल्वेच्या विकासाची प्रक्रिया सुरू आहे. ती अजून पूर्ण झालेली नाही. आणि शेवटी तुम्ही बदलणार नसाल तर संस्थाही बदलणार नाही.

**प्रश्न–** आणखी एक बाब म्हणजे गेल्या अडीच वर्षांत महाराष्ट्र राज्य रेल्वेविकासाच्या रडारवर आल्याचे दिसते. रेल्वेशिवाय महाराष्ट्राच्या काही भागांत विकासप्रक्रिया थांबली होती. ती आता सुरू झाली आहे. त्याविषयी...
**उत्तर –** होय. गेल्या अडीच वर्षांत आम्ही महाराष्ट्रातील रेल्वेच्या विकासावर लक्ष केंद्रित केलं आहे. सुमारे १ लाख ३६ हजार कोटींची कामं सुरू झाली आहेत. मुंबईमध्येही आम्ही ५६ हजार कोटींच्या कामाला मान्यता दिली आहे. ती कामंही सुरू होतील. रेल्वेच्या या विकासप्रकल्पांचा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेलाही नक्कीच फायदा होईल, असे मला वाटते.

**प्रश्न–** काही दिवसांपूर्वी सर्व वाहतूक–व्यवस्थांचं एकात्मिकरण करण्याचं ठरवल्याचं ऐकलं होतं. त्याबद्दल काय सांगाल.
**उत्तर–** प्रवाशांना फायदा होईल. त्यांच्या प्रवास सुखकर होईल, असा उद्देश समोर ठेवून सर्व प्रकारच्या सार्वजनिक वाहतूक–व्यवस्थांचं एकात्मीकरण करण्याची योजना आम्ही आणली आहे. राज्य सरकारकडे त्याविषयीची माहिती आम्ही दिली आहे. योजनेला अद्याप काही विशिष्ट नाव दिलं नसलं तरी योजना तयार आहे. लवकरच ती प्रत्यक्षात येईल अशी आशा आहे.

**प्रश्न–** रेल्वेने कोकणामध्ये घडवून आणलेले बदल महत्त्वाचे आहेत. तुमच्या कार्यकाळात या प्रक्रियेला अधिक गती आली...
**उत्तर–** कोकणामध्ये आम्ही आमूलाग्र बदल केले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. रेल्वेच्या अनेक गोष्टी कोकणात पोहोचवल्या. उदा. कोकणातले स्वयंबचतगट. या गटांना रेल्वेशी जोडून त्यांना रोजगाराच्या संधी मिळवून देण्यात आम्ही पुढाकार घेतला. कोकणात मी व माझी पत्नी गेल्या वीस–बावीस वर्षांपासून 'मानव साधन विकास संस्थान' नावाची अशासकीय संस्था चालवतो. त्याद्वारे सुमारे १ लाख महिलांच्या सक्षमीकरणाचे काम आम्ही केले. या महिलांना स्वयंबचतगटांशी जोडून घेणे व त्यातून त्यांना रोजगाराच्या सधी मिळवून देणे, हे आम्ही केले. या सर्वांमुळे या महिलांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडून आला आहे.

सावंतवाडीत आम्ही रेल्वेकडून ई–कॅटरिंगची उपक्रम राबवत आहोत, ज्यात तेथील स्थानिकांनी बनवलेल्या उत्पादनांना आम्ही देशभर पोहोचवणार आहोत.रेल्वेच्या ऑनलाईन पोर्टलद्वारे हे सर्व होईल. सध्या सावंतवाडीत हे सुरू केले आहे. परंतु लवकरच संपूर्ण देशभर हा उपक्रम राबवला जाईल.

**प्रश्न–** आणखी एक प्रश्न येथे विचारावासा वाटतो. तो म्हणजे जेव्हा अनिवासी भारतीय येथे येतात तेव्हा त्यांना परदेशातील परिस्थिती आणि इथली परिस्थिती यात तफावत जाणवते. तिथली वाहतूक व्यवस्था अतिविकसित आहे. मात्र आपल्याकडे तसे नाही. त्यामुळे त्यांचा रेल्वेकडे किंवा एकूणच आपल्या वाहतूक व्यवस्थेकडे पाहण्याचा दृष्टीकोन नकारात्मक असतो. त्यांना तुम्ही काय सांगाल?
**उत्तर–** भारतीय रेल्वे जागतिक स्तरावरची व्हावी असे आमचं लक्ष्य आहे. परंतु त्यासाठी रेल्वेविकासात मोठ्या गुंतवणुकीची दोन आवर्तनं व्हायला हवीत. पहिलं गुंतवणूक–आवर्तन आम्ही केलं आहे. त्याच्या कामाला सुरुवातही झाली आहे. पुढची गुंतवणूक यापेक्षाही दुप्पट रकमेची व्हायला हवी. तर ही विकासप्रक्रिया अधिक गतिमान होईल. परंतु आता सुरू असलेल्या कामांमुळे चांगले रेल्वेमार्ग तयार होतील. २०२२ सालापर्यंत बुलेट ट्रेन येईल. मुंबई–दिल्ली, मुंबई–गोवा, दिल्ली–कोलकाता या मार्गांवरील गाड्यांचा वेग २०० कि.मी.पर्यंत नेण्याचा आमचा प्रयत्न आहे, जेणेकरून प्रवास जलद होईल. त्यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात १७ हजार कोटींची तरतूदही केली आहे. एवढंच की हे सर्व १०–१५ वर्षं आधीच केलं असतं, तर आज रेल्वेची स्थिती अधिक चांगली असती. पण आताही आमचे प्रयत्न सुरू आहेत. त्याचे परिणाम येत्या काळात नक्कीच दिसतील.

**(शब्दांकन – प्रसाद हावळे)**
prasadhavale@gmail.com

**आता सुरू असलेल्या कामांमुळे चांगले रेल्वेमार्ग तयार होतील. २०२२ सालापर्यंत बुलेट ट्रेन येईल. मुंबई–दिल्ली, मुंबई–गोवा, दिल्ली–कोलकाता या मार्गांवरील गाड्यांचा वेग २०० कि.मी.पर्यंत नेण्याचा आमचा प्रयत्न आहे,**




# नवी मुंबई : समृद्धीच्या मार्गावरील सुपरसिटी!

**डॉ. मोहन निनावे**

**नवी मुंबई येथे साकारण्यात येणाऱ्या विमानतळाचे वैशिष्ट्य म्हणजे तो देशातील पहिला 'ग्रीनफिल्ड आंतरराष्ट्रीय विमानतळ' ठरणार आहे.**

शहरांचे शिल्पकार बिरूदावली लाभलेल्या सिडको महामंडळाचा मुख्य मानस केवळ साचेबद्ध शहर निर्माण करण्याचा कधीच नव्हता. शहर स्वयंपूर्ण व नियोजनबद्ध असावे हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवूनच शहराची रचना व मांडणी करण्यात आली. सिडकोने प्रस्थापित केलेल्या भौतिक, सामाजिक व पायाभूत सुविधांमुळेच नवी मुंबई शहराला परिपूर्ण शहराचा दर्जा मिळाला आहे. मुंबईतील वृद्धिंगत होणारी लोकसंख्या व पर्यायाने वाढत्या औद्योगिकीकरणाला पर्याय म्हणून नवी मुंबई शहर वसविण्यात आले. सुरुवातीच्या काही दशकांनंतरच नवी मुंबई शहराचा विकास झपाट्याने होत गेला. खरे तर सिडको महामंडळाने ज्या शहराला आकार दिला त्या शहराची जागतिक पातळीवर नोंद घेतली जाणे ही अभिमानाची गोष्ट आहे.

सिडको महामंडळाच्या महत्त्वाच्या अनेक प्रकल्पांपैकी अग्रगण्य स्थानावर असलेला एक प्रकल्प म्हणजे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प. त्याबरोबरच नवी मुंबई मेट्रो, नैना, सर्वसामान्यांना परवडणारी घरे, हार्बर रेल्वे लाईनचा विस्तार व 'मल्टी मॉडेल कॉरीडॉर' हे महत्त्वाकांक्षी प्रकल्पदेखील सिडकोमार्फत राबवले जात आहेत.

मुंबई शहरातील आर्थिक व औद्योगिक

घडामोडींमध्ये अनेक पटीने वाढ झाल्याने त्याचा ताण पर्यायाने मुंबईस्थित आंतरराष्ट्रीय विमानतळावर पडू लागल्याने, मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाला पर्यायी विमानतळाची गरज भासू लागली. या गरजेतूनच मुंबई शहराशेजारील नवी मुंबई शहरात विमानतळ प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव १९९७ साली मांडण्यात आला. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ विकास प्राधिकरणाचा सदर प्रस्ताव जुलै २००८ साली मंजूर झाला. नवी मुंबई येथे साकारण्यात येणाऱ्या विमानतळाचे वैशिष्ट्य म्हणजे तो देशातील पहिला 'ग्रीनफिल्ड आंतरराष्ट्रीय विमानतळ' ठरणार आहे. मुंबईस्थित छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील भार कमी करून महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास साधण्याची महत्वपूर्ण भूमिका हा विमानतळ प्रकल्प पार पाडणार आहे. अंदाजे १६ हजार कोटी रूपयांचा विकासखर्च असलेला 'नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प' ११६० हेक्टर क्षेत्रावर विस्तारलेला आहे.



केंद्रीय नागरी हवाई उड्डाण राज्यमंत्री जयंत सिन्हा यांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या जागेच्या केलेल्या हवाई दौऱ्यानंतर सिडको महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. भूषण गगराणी यांनी केंद्रीय पर्यावरण मंत्रालयातील मंत्र्यांची भेट घेऊन विमानतळाच्या दुसऱ्या महत्त्वपूर्ण टप्प्यांसाठी केंद्र शासनाकडून परवानगी मिळवली. 'टप्पा-दोन परवानगी'ला हिरवा कंदील मिळाल्यामुळे विमानतळाची विकासपूर्व कामे सुरु झाली आहेत. २०१९ मध्ये १० दशलक्ष प्रवाशांसाठी पहिला टप्पा कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे अंतिम टप्प्यात विमानतळाची वाहतूक क्षमता दरवर्षी ६० दशलक्ष हवाई प्रवासी होण्याची अपेक्षा आहे. साधारणतः १६ हजार कोटींच्या महत्वाकांक्षी विमानतळ प्रकल्पाची धुरा सिडकोतर्फे मुंबईच्या आंतरराष्ट्रीय विमानतळ विकासाचा दांडगा अनुभव गाठीशी असलेल्या 'जीव्हीके' कंपनीला सोपवण्याचा निर्णय आता अंतिम टप्प्यात आहे. सदर आर्थिक निविदेचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पाठविण्यात आला असून प्रस्ताव मंजुरीच्या प्रतिक्षेत आहे. नवी मुंबई विमानतळाची विकासपूर्व कामे जोमाने सुरु आहेत. विमानतळाच्या विकासामुळे पर्यावरणाला कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही याची दक्षता सिडकोमार्फत घेण्यात आली आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास होऊ नये याकरिता सिडकोद्वारा खारफुटी पुनर्रोपण करण्याची मोहिम हाती घेण्यात आली आहे. सिडको महामंडळातर्फे निविदाकारांना साल २०१९ची अंतिम मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे

**येत्या दोन वर्षात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन पहिले विमान झेप घेईल...**



आजपासून दोन वर्षांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून पहिले विमान झेप घेईल अशी आशा आहे.

विमानतळ प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीवर पिढ्यानपिढ्या वास्तव्यास असणाऱ्या कुटुंबांच्या स्थलांतराचा व पुनर्वसनाचा विषय जिकरीचा होता. वर्षानुवर्षांच्या संसाराला दुसरीकडे स्थालांतरित करण्यासाठीची मानसिकता व सिडकोच्या योजने-संदर्भातील विश्वासार्हता प्रकल्पबाधितांमध्ये निर्माण करण्याच्या सिडको महामंडळाच्या कठोर मेहनतीस अखेर यश प्राप्त झाले. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी चिंचपाडा, कोपर, कोल्ही, उलवे, वरचे ओवळे, वाघिवली वाडा, वाघिवली, गणेशपुरी, तरघर व कोंबडभुजे या १० गावांचे स्थलांतर करण्यात येत आहे. या गावातील ३५०० कुटुंबांच्या पुनर्वसन आणि पुन:स्थापनेचा मुद्दा ऐरणीवर होता. सिडको महामंडळातर्फे प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनासाठी देशातील सर्वोत्तम पॅकेज अंतर्गत २२.५% मोबदला व विविध सुविधा त्याचप्रमाणे R & R (पुनर्वसन व पुन:स्थापन) योजनेची घोषणा करण्यात आली. प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या जमिनीच्या मोबदल्यात योग्य मोबदला व भूसंपादन कायद्यांतर्गत जमीन संपादनासोबत पुनर्वसनाची तरतुददेखील करण्यात आली आहे. या धोरणास शासनातर्फे दिनांक १ मार्च २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे.

२२.५% टक्के योजनेसाठी सिडकोतर्फे राष्ट्रीय महामार्ग ४-बी पासून ०.५ कि.मी. अंतरावर पुष्पकनगर हा नोड निवडण्यात आला. पुष्पनिगरमध्ये जागतिक दर्जाच्या अत्याधुनिक नागरी व सामाजिक सुविधा पुरविण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे १३९ मी. रूंद मल्टी मॉडेल कॉरिडोर सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या मल्टी मॉडेल कॉरिडॉरमध्ये एक्सप्रेस वे, मेट्रो रेल्वे, बीआरटीएस, सर्विस रोड व बफर झोन अशा सुविधांचा समावेश असणार आहे. २२२ हेक्टरवर वसवली जाणारी ही वसाहत खऱ्या अर्थाने स्वयंपूर्ण करणे प्रस्तावित आहे. यापैकी वडघरमधील पॉकेट क्र. १ व २ मधील एकूण ८४४ भूखंडांची विकासकामे पूर्ण झाली असून त्याचा ताबा लाभार्थ्यांना देण्याची प्रक्रीया सुरू करण्यात आली आहे. उर्वरित परिसरातील भूखंड विकासाची कामे बहुतांशी पूर्ण झाली असून भौतिक पायाभूत सुविधा विकासाची कामे प्रगतीपथावर आहेत. ही सर्व कामे डिसेंबर २०१८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

**नजिकच्या भविष्यात नवी मुंबई शहर आंतरराष्ट्रीय ख्यातीचे वित्तिय केंद्र म्हणून नावारूपाला येणार आहे.**

नवी मुंबई विमानतळ कार्यरत झाल्यानंतर विमानतळ-प्रभावित क्षेत्राचे वेगाने शहरीकरण होणे अपेक्षित आहे. नमुंआविच्या माध्यमातून तब्बल १ लाख रोजगार उपलब्ध होणार आहे. येत्या काळात नवी मुंबई शहर आंतरराष्ट्रीय ख्यातीचे वित्तिय केंद्र म्हणून ओळखले जाणार आहे. नवी मुंबईच्या भोवतालच्या परिसरात करण्यात येणाऱ्या पर्यावरण अनुकूल, व्यावसायिक, निवासी व औद्योगिकदृष्ट्या स्वयंपूर्ण नगर निर्मितीचा समन्वय जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी), नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (नमुंआंवि), मुंबई ट्रान्स हार्बर लिंक (एमटीएचएल) व मल्टी मॉडेल कॉरिडोर (एमएमसी) या प्रकल्पांशी साधण्यात येणार आहे. सिडकोतर्फे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय शहराला साजेशा सुसज्ज आणि आधुनिक सुविधांनी सज्ज अशा नैना शहराची निर्मिती करण्यात येणार आहे. आंतराराष्ट्रीय विमानतळामुळे केवळ नवी मुंबई शहराचाच नव्हे तर आसपासच्या परिसराचा देखील परिपूर्ण विकास होणार आहे.

एखाद्या शहराची वाहतूक-व्यवस्था हा त्या शहराच्या विकासाचा आधारस्तंभ असतो. त्यामुळे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या माध्यमातून नवी मुंबई शहरातील वाहतूक व दळणवळण व्यवस्था अधिक प्रगतशील होईल यात काही शंका नाही. यासाठी कार्यक्षम, जलद व 'मल्टीमॉडेल वाहतूक व्यवस्थे'चे नियोजन करण्यात येत आहे. नमुंआंविच्या माध्यमातून ६०% प्रवासी मुंबई आणि उपनगरांशी जोडले जाणार आहेत. ८५% नागरीक विमानतळापर्यंत पोचण्यासाठी खाजगी वाहतुकीचा वापर करतील, याकरिता मोठ्या प्रमाणावर रस्त्यांचे जाळे तयार करण्यात येणार आहे. सुरळीत वाहतूकीसाठी मोठ्या जंक्शनच्या माध्यमातून वाहतूक व्यवस्थेचे नियोजन करण्यात येईल. विमानतळावरील वाहतूक जोडणी अशा प्रकारे करण्यात आली आहे की मुंबई महानगरप्रदेशातील कोणत्याही स्थानावरून प्रवासी व्यक्ती विमानतळापर्यंत एका तासात सहज पोहचू शकेल. रस्ते, मेट्रो, ट्रान्स-हार्बर लिंक रोड अशा महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमुळे नवी मुंबई शहर सुसज्ज होणार आहे. अलिबाग मल्टी मॉडेल कॉरिडॉर (एमएमसी)मुळे नवी मुंबई ही मुंबईच्या दक्षिण, मध्य व पश्चिम भागातील व्यवसाय केंद्राशी जोडली जाणार आहे.

नवी मुंबई शहर विकासाच्या दिशेने घोडदोड करत

असताना येथील लोकसंख्येतही वृद्धी होऊ लागली आहे. शहरातील उपलब्ध पारंपारिक वाहतूक व्यवस्थेला आधुनिक वाहतूक पर्यायाची आवश्यकता भासू लागली आहे. गेल्या काही वर्षांमध्ये शहरात खाजगी वाहनांचे प्रमाण लक्षणीय वाढल्यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर कमी होऊ लागला. पर्यावरणाचा विचार करता वाढत जाणाऱ्या खाजगी वाहनांमुळे शहराच्या प्रदूषण-पातळीत वाढ होऊ लागली. उड्डाणपूल, रेल्वे, रस्ते यासोबतच नवी मुंबईला अधिक वेगवान करण्यासाठी नवी मुंबई मेट्रो प्रकल्पाचा प्रस्ताव मांडण्यात आला. महाराष्ट्र सरकारने ३० सप्टेंबर २०१० साली भारतीय ट्रामवे कायदा, १८८६च्या अंतर्गत नवी मुंबई मेट्रो मार्गिका क्रमांक १ बेलापूर-पेंधर-कळंबोली-खांदेश्वर-नमुंआवि या मार्गाच्या प्रशासन अंमलबजावणी-साठी सिडकोची अधिकृतपणे नेमणूक केली आहे. नवी मुंबई मेट्रो प्रकल्पाच्या पुलाचे ९०% काम पूर्ण झाले असून, प्रकल्पातील दुसऱ्या टप्प्यातील विकासकामाचे नियोजन टप्प्यात सुरु आहे.


या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसोबतच सिडको महामंडळातर्फे खारघर, तळोजा, घणसोली, कळंबोली व द्रोणागिरी नोडमध्ये १५००० हजार घरांचे गृहसंकुल उभारण्यात येणार आहे. सुसज्ज व सामान्यांच्या आवाक्यातील घरांची निर्मिती करणे हे सिडकोचे मूलभूत ध्येय आहे. उच्च,मध्यम व अल्प उत्पन्न गटातील स्तरांतील नागरिकांसाठी परवडणाऱ्या किंमतीत घरे उपलब्ध करून देण्याचा सिडको महामंडळाचा मानस आहे.

नवी मुंबईच्या दक्षिण भागात उरण क्षेत्र आणि नवी मुंबईच्या आगामी आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विकास वेगाने सुरु आहे. उरण शहर आणि त्याच्या परिसरात होत असलेली प्रगती झपाट्याने होत असल्यामुळे त्यामुळे उपनगरीय रेल्वे वाहतुकीची मागणी होऊ लागली, व त्यास अनुसरुन नेरुळ-उरण या रेल्वे मार्गाचा विकास करण्याचा प्रस्ताव पुढे आला. सिडको आणि मध्य रेल्वे यांच्या सहभागाने नेरुळ-उरण मार्गातील ५ रेल्वे स्थानकांचा पहिला टप्पा डिसेंबर, २०१७मध्ये पूर्ण होऊन तो सार्वजनिक सेवा सुरु करण्यासाठी कार्यरत होईल. नेरुळ ते उरण या मार्गातील उलवे व इतर नोडस् उपनगरीय रेल्वे वाहतुकीस जोडले जाणार असून संबंधित भागांचा गतिमान विकास होणे अपेक्षित आहे. पहिल्या टप्प्यात सागरसंगम, तरघर, आणि खारकोपर या स्थानकांचा विस्तार होणार आहे.

सिडको महामंडळाने नवी मुंबईच्या विकासासाठी अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्पांची मांडणी केली आहे आणि येत्या पाच वर्षांमध्ये जगाच्या नकाशात या शहराची एक वेगळी ओळख प्रस्थापित होईल याबद्दल सिडको महामंडळाला पूर्ण विश्वास आहे.

**सिडको आणि मध्य रेल्वे यांच्या सहभागाने नेरुळ-उरण मार्गातील ५ रेल्वे स्थानकांचा पहिला टप्पा डिसेंबर २०१७मध्ये पूर्ण होऊन कार्यरत होईल.**

**- डॉ. मोहन निनावे**
वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी
सिडको
भ्रमणध्वनी : ९९२०२१७५११





इंफोसिसचे सहसंस्थापक नारायण मूर्ती



विप्रोचे चेअरमन अझिम प्रेमजी



टिसीएसचे चेअरमन नटराजन चंद्रशेखरन

# कॉम्प्युटरवाल्यांची कोंडी

डॉ. अनंत पां. लाभसेटवार

**भा**रतानं २०१५ मध्ये एकूण २७६ अब्ज डॉलरच्या मालाची व सेवेची निर्यात केली. तुलनेनं त्याच काळात चीननं २३७० अब्ज व अमेरिकनं २२०० अब्ज डॉलरच्या वस्तू व सेवा परदेशात पाठवून विक्रम केला. आपण एवढे मागे का असा असोईस्कर प्रश्न विचारणाऱ्याला आपल्या देशातले जे मुख्य दोन धंदे आहेत त्याविषयी, काही ठाऊक नसावं असं वाटतं. ते म्हणजे फायली पुढे ढकलणं व दर मिनिटाला ३४ मुलं जन्माला आणणं. यात सगळी ऊर्जा खर्च केल्यावर इतर बाबतीत उत्पादक असणं शक्य नाही. या पाव ट्रिलियन डॉलरच्या निर्यातीतल्या ७८ टक्के गोष्टी निसर्गमालाशी (Commodities) निगडित आहेत. आपण खनिज तेल आयात करून त्याचं शुद्धीकरण केल्यावर पेट्रोल निर्यात करतो. ही परदेशी चलन कमावणारी भारताची सर्वात मोठी निर्यात (२९ अब्ज डॉलर). यात दुसरा नंबर हिऱ्यांचा लागतो. ओबडधोबड खडे आयात करून त्यांना तासणे व सौंदर्यवान करून परदेशात विकणे या उलाढालीतून आपल्याला २३ अब्ज डॉलर मिळतात. औषधी रसायनं निर्यात करूनही चांगली कमाई होते (१९ अब्ज डॉलर). पण या सर्वांना लाजवणारी व सरकारी ताळेबंदात न दिसणारी सर्वात मोठी निर्यात म्हणजे कच्ची बुद्धी. ती परदेशात पाठवून तासली आणि परिपक्व केली की तिचं दुभत्या गाईत रूपांतर होतं. लोहमाती, तेल किंवा हिरे विकल्याने एकदाच किंमत मिळते. पण परदेशात तासलेल्या बुद्धीचे लोक उच्चविद्याविभूषित होऊन वर्षानुवर्षे पैसे मायदेशी पाठवतात. बिनमजल्याची बुद्धी देशाचा किनारा सोडताच बहुमजली होऊन उत्पादक होते व देशाला मदत करते हे गणित आईनस्टाईनच्या सिद्धांताएवढं खरं आहे. २०१५ मध्ये जगभर विखुरलेल्या २५ दशलक्ष अनिवासी भारतीयांनी जगात सर्वात जास्त रक्कम मायदेशी पाठवून देशाला समृद्ध केलं. ६९ अब्ज डॉलर घरी आले व परदेशी चलनाची गंगाजळी फुगली. शेण व कच्ची बुद्धी यांत बरंच साम्य आहे. ते पसरवल्यावरच फायदेशीर होतात. शेणामुळे पीक वाढतं तर कच्ची बुद्धी जगभर पाठवल्यानं देश श्रीमंत होतो.

अलीकडे या कच्च्या बुद्धीनं माहिती व तंत्रज्ञानाचं रूप धारण केलं. हा उद्योग एवढा मोठा झाला आहे की

त्यापासून देशाला १५० अब्ज डॉलर्सचं उत्पन्न दरवर्षी होतं. त्यामुळे ३.७ दशलक्ष कर्मचाऱ्यांना थेट व ६ दशलक्ष लोकांना अप्रत्यक्ष नोकऱ्या मिळतात. ज्या देशात नुसत्या सरकारी नोकऱ्या व फायली हवेतून निर्माण केल्या जातात तिथे ही खाजगी क्षेत्रातली उत्पादक रोजगारनिर्मिती महत्त्वाची ठरते. या १५० अब्ज मधली ९० टक्के आवक अमेरिका, युनायटेड किंगडम व युरोपमधून होते. सरकार व देशी कंपन्या या आधुनिक तंत्रज्ञानाच्या वाट्याला फारसं जात नाहीत. फक्त १७ वर्षांपूर्वी हे क्षेत्र हडकुळं होतं. २००० मध्ये फक्त ८ अब्ज डॉलरची निर्यात होऊन या क्षेत्रात ३,४०,००० नोकऱ्या होत्या. म्हणून ही वाढ जेवढी लक्षणीय तेवढीच देशाला संवर्धक ठरली हे कुणी विसरू नये.

या सोनेरी अंडी देणाऱ्या कोंबडीचे पंख नुकतेच उखडण्यात आले आणि सगळा डोलारा ढिला झाला. तो केव्हा निखळून पडेल हे सांगणं कठीण. आपल्या आय.टी.वाल्यांना अमेरिकेत जाण्याचे सारखे डोहाळे लागलेले असतात. या स्वर्गाला जोडणारी नाळ म्हणजे H1B व्हिसा. त्यावर गदा पडल्यामुळे कॉम्प्युटरवाल्यांचं जगच कोसळून पडलं. त्यामुळे I.I.T. सारख्या नामवंत शिक्षणसंस्थेचे गुणवंत विद्यार्थ्यांच्या नव्हे तर अमेरिकेत येऊन उच्च शिक्षण घेणारे भारतीय अभियंते नोकऱ्याअभावी कोंडीत सापडले.

अमेरिका दरवर्षी एकूण ८५,००० H1B व्हिसे जगातल्या गुणवंतांना बहाल करते. त्यातले ८८ टक्के आपल्या वाट्याला येतात म्हणून याला भारताचा व्हिसा म्हणतात. तो वापरून अमेरिकेत आतापर्यंत ५ लाख भारतीय तज्ज्ञ आले असं म्हणतात. ग्रीन कार्ड व मग नागरिकत्व मिळण्याचा तो धोपट मार्ग झाला आहे. दर एप्रिलमध्ये या व्हिसासाठी अर्ज मागवले जातात. काही दिवसांतच हा कोटा भरून दुप्पट-तिप्पट अर्ज आल्यामुळे लाभार्थी लॉटरीमधून निवडण्यात येतात. आपल्या संगणक कंपन्या हजारोंनी अर्ज करून सर्वाधिक व्हिसे पटकवतात. त्यामुळे कायद्याचा होत नसला तरी त्याच्या आशयाचा भंग होतो असा अमेरिकेचा दावा आहे. भारतीय अभियंते उच्च दर्जाचे व स्वस्त किंमतीचे म्हणून त्यांना प्राधान्यानं कामावर ठेवून अमेरिकन अभियंत्यांना नारळ देण्यात येतो असं अमेरिकन अभियंत्यांची संघटना म्हणते. त्याच्या दबावगटाचे वॉशिंग्टनशी लागेबंधे असल्यामुळे तिथल्या राजकारण्यांचे दरवाजे त्यांना नेहमी खुले असतात, पण वस्तुस्थिती अशी आहे की एक भारतीय अभियंता जोडधंद्यात ४-५ अतिरिक्त नोकऱ्या निर्माण करून अर्थकारणात भर घालतो. पण देशाभिमानापुढे तर्क चालत नाही हे दुर्दैव. सिलिकॉन व्हॅलीमधल्या कंपन्यांना स्वस्त अभियंत्यांचा स्त्रोत सारखा हवा असल्यामुळे व त्यांचे मुख्य मोठे देणगीदार असल्यामुळे आतापर्यंत वॉशिंग्टनने अमेरिकन अभियंत्यांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केलं. पण गेल्या ८ नोव्हेंबर २०१६ रोजी ट्रंप निवडून आले आणि सर्व चित्र पार बदललं. 'अमेरिका फर्स्ट' हे त्यांचं ब्रीदवाक्य. म्हणजे अमेरिकन अभियंत्यांना प्राधान्य देणं ओघानं आलंच. महत्त्वाचं म्हणजे व्हॅलीमधल्या तमाम कंपन्यांच्या मुख्यांनी ट्रंपला विरोध केला होता. तो त्यांनी जिभेनंच नव्हे तर हिलरीला पैशाचे पोते देऊन व्यक्त केला पण त्यांचा दबाव उपड्या घागरीवर पडला.

एप्रिल २०१७ मध्ये ट्रंप यांनी H1B व्हिसा प्रकल्पाचं परीक्षण करणार अशी निरूपद्रवी वाटणारी नुसती घोषणा केली आणि त्याचे भूकंपी पडसाद सिलिकॉन व्हॅलीमध्येच नव्हे तर दिल्लीपासून बंगलोरपर्यंत उमटले. नव्यानेच उत्खनन केलेल्या व अमेरिकेत प्रवेश केलेल्या अभियंत्यांचं स्वप्न बेचिराख झालं. तसंच अमेरिकेत पदवी मिळवून नोकरीची वाट बघणारे भारतीय अभियंते कोंडीत सापडले. अनिश्चितीमुळे कंपन्यांनी H1B व्हिस्याचा वापर कमी करून त्या नोकऱ्या अमेरिकन पदवीधारकांना देण्यास सुरुवात केली. हा कल्लोळ बघून मोदींनी एक शिष्टमंडळ वॉशिंग्टनला रवाना केलं, पण त्याचे मुख्य वित्तमंत्री अरुण जेटली यांचं वजन दिल्लीत जेवढं पडतं तेवढं अमेरिकेच्या राजधानीत पडत नसल्यामुळे त्यांनी अपयश राजनैतिक भाषेत गुंडाळून, प्रयत्न केल्याचा भास निर्माण केला व घरचा रस्ता पकडला.

या परीक्षणामुळे काय बदल होणार हे कुणालाच ठाऊक नाही. ते भारताला प्रतिकूल असणार या विषयी कुणाच्या मनात शंका नाही. नवलाची गोष्ट म्हणजे ट्रंप यांनी सुचवलेल्या प्रत्येक गोष्टीला विरोध करणारा डेमॉक्रॅट पक्ष या व्हिस्याच्या बाबतीत त्यांच्या बाजूला आहे. अमेरिकेतल्या नोकऱ्या प्रथम नागरिकांना देण्यात याव्यात या विधानाला विरोध करणं आत्मघातकी ठरेल. याप्रमाणे विरोधी पक्षाचा पाठिंबा मिळाल्यामुळे ट्रंप यांना H1B व्हिस्यात बदल करण्यात मुळीच अडचण पडणार नाही.

या बदलांची सखोल माहिती नसली तरी त्यांची रूपरेखा गोचर झाली आहे. H1B व्हिसा वेगवेगळ्या क्षेत्रात कौशल्य असलेल्या लोकांनाच दिला जातो. गुणवंतांना तो मिळे पण त्याची व्याख्या बदलण्यात आली.

**सिलिकॉन व्हॅलीमधल्या कंपन्यांना स्वस्त अभियंत्यांचा स्त्रोत सारखा हवा असल्यामुळे व त्यांचे मुख्य मोठे देणगीदार असल्यामुळे आतापर्यंत वॉशिंग्टनने अमेरिकन अभियंत्यांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केलं. पण गेल्या ८ नोव्हेंबर २०१६ रोजी ट्रंप निवडून आले आणि सर्व चित्र पार बदललं. 'अमेरिका फर्स्ट' हे त्यांचं ब्रीदवाक्य.**

आता या व्हिस्यासाठी पात्र होण्यास प्रज्ञावंतांची गरज असते. त्यांना किमान ८०,००० डॉलर वार्षिक वेतन व इतर लाभ देण्याचं अपरिहार्य करण्यात आलं. असे महागडे प्रज्ञावंत कंपन्यांना परवडत नसल्यामुळे त्या अमेरिकन पदवीधरांना कामावर ठेवण्याची शक्यता जास्त. याप्रमाणे परदेशी अभियंत्यांवर भावाच्या अतिरेकांची एकदम कुऱ्हाड पडणार.

त्याची चिन्हं आता बाजारपेठेत दिसताहेत. भारतातल्या ७ प्रमुख कंपन्या २०१७ मध्ये एकूण ५६,००० अभियंत्यांना कामावरून काढून टाकणार असा एक अंदाज नुकताच प्रकाशित आला. या डच्चू देण्याच्या प्रक्रियेला कंपन्यांनी 'कामगिरी परिक्षण' (Performance Review) असं गोंडस नाव दिलं आहे. यात उणे पडणारे काही टक्के कर्मचाऱ्यांना नारळ देण्यात येतो. त्यामुळे उर्वरित कर्मचाऱ्यांचा दर्जा सारखा वाढत राहतो. त्यासाठी दर ६ महिन्यांनी कर्मचाऱ्यांचं कामगिरी परीक्षण करण्यात येतं. ही पद्धती अभियंत्यांना अर्थातच क्लेशदायक व प्रक्षुब्ध करणारी वाटते. ती जॅक वेल्श या जनरल इलेक्ट्रिक कंपनीच्या तत्कालीन कार्यकारी मुख्याधिकाऱ्यानं प्रथम अंगिकारली होती. पण मंदी आली की ही प्रक्रिया कठोर करून जास्तीच्या नोकरवर्गाला निष्कासित करण्यास मदत करू शकते. शेवटी डच्चू देण्यास नाव काहीही असलं तरी नोकरगणती कमी होऊन बेरोजगारी वाढणार किंवा वाढत आहे याविषयी वाद नाही. म्हणून अशा अभियंत्यांनी संघटित होऊन कंपन्यांना लढा देण्याचं ठरवलं. याशिवाय आंध्र प्रदेश सरकारनं या 'अवैध' जंत्रीला आळा घालावा म्हणून भूमिका घेतली. बाजारपेठेत राजकारण्यांनी हस्तक्षेप केला तर जागतिक क्षितिजावर झळकणाऱ्या आपल्या संगणक कंपन्यांचं रूपांतर एअर इंडिया किंवा इंडियन रेल्वेमध्ये होण्यास फार वेळ लागणार आहे. या दोन्ही परिवहनच्या उद्योगात 'कायमस्वरूपी' नोकऱ्या हा योगायोग नाही. दर्जा व राजकारण तेलपाण्यासारखे. ते कधीही एकमेकांत मिसळू शकत नाही. बेरोजगार होणं ही अत्यंत दु:खदायक घटना. त्यात राजकारण्यांनी हस्तक्षेप करणं जखमेवर मीठ चोळण्यासारखं होईल.

हे भविष्य ओळखून आपल्या इंफोसिस कंपनीनं (वार्षिक खप : १० अब्ज डॉलर नफा २.१ अब्ज डॉलर व नोकरवर्ग २ लक्ष) १ मे २०१७ रोजी महत्त्वाची घोषणा केली. ती ट्रंपना अमृततुल्य वाटली. कंपनी अमेरिकेत ४ विकास केंद्र उघडून एकूण १०,००० चा नोकरवृंद कामावर ठेवणार आहे. त्यातलं पहिलं केंद्र ऑगस्ट २०१७ मध्ये उपाध्यक्ष माईक पेन्सच्या राज्यात उघडणार. त्यात H1B व्हिसाधारकांचा भरणा नगण्य असून प्रामुख्यानं अमेरिकन नागरिक असणार. त्यांची गुणवत्ता आपल्या अभियंत्यांपेक्षा कमी म्हणून इंफोसिस त्यांना खास प्रशिक्षण देऊन नोकरीयोग्य करणार. त्यासाठी लागणारा प्राध्यापक वर्ग भारतातून येण्याची शक्यता. हे बघून भारतातल्या इतर संगणक कंन्या (टी.सी.एस., विप्रो वगैरे) तसंच करतील व लवकरच लक्षावधी अमेरिकन लोकांना नोकऱ्या मिळून ट्रंपचं धोरण यशस्वी होईल असं वाटतं.

या यशात भारताचं योगदान कमी असेल. H1B वाल्यांची गरज भासणार नाही. म्हणून भारतात कंपनीच्या नोकरवर्गात घट होऊन अनेकांना दरवाजा दाखवण्यात येत आहे. ट्रंपचं धोरण ऑस्ट्रेलिया, सिंगापूर व बेक्सिटमुळे युनायटेड किंगडम यांनी देखील अंगीकारलं. जागतिकीकरणाचे एकेकाळी गोडवे गाणारे हे देश आता त्याचे वैरी झाले आहेत. या जगातिक चळवळीला उलटं टांगण्यास त्यांना मुळीच संकोच वाटला नाही.

आता भारतीय अभियंत्यांची बाजारपेठ संकुचित झाली आहे. देशांतर्गत मागणी नसल्यामुळे त्यांच्या बेकारीचे प्रमाण वाढेल हे उघड आहे. ट्रंपच्या धोरणामुळे आपल्या संगणक कंपन्यांचे समभाग गडगडले व गुंतवणूकदारांचं नुकसान झालं. पण त्यापेक्षा जास्त यातना बेकार झालेल्या अभियंत्यांना होणार. अगोदरच मंत्रणालेखनाचं (Software Writing) स्वयंचलन होत असल्यामुळे अशा अभियंत्यांची गरज घटत आहे. त्यात कृत्रिम बुद्धिमत्तेची भर पडल्यामुळे यंत्रमानव अभियंत्यांचं बरंचसं काम करू शकतो असं आढळून आलं.

अभियंत्यांचं भविष्य अंधारलेलं असण्याचं दुसरं कारण म्हणजे आपल्या देशात त्यांचा दर्जा खालावलेला आहे. त्यातले ७५ ते ८० टक्के नोकरीयोग्य नाहीत असं खळबळजनक विधान इंफोसिसचे सहसंस्थापक नारायण मूर्तींनी काही वर्षांनी केलं होतं. या अभियंत्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा गंध नसतो. या शिवाय जे नोकरीवर आहेत त्यातले ५० टक्के पुढील २-४ वर्षांत अनावश्यक ठरतील असा अहवाल बोस्टन येथील मॅकींझी या जागतिक सल्लागार कंपनीनं अलीकडेच प्रसिद्ध केला. याचं कारण असं की तंत्रज्ञानात झपाट्यानं प्रगती होत असल्यामुळे उजळणी व सुधारणा प्रशिक्षणाच्या सुविधा देशात असणं आवश्यक आहे. त्या उपलब्ध नाहीत म्हणून त्यांचं कौशल्य कालबाह्य होत आहे. अशा गंजलेल्या कौशल्यधारकांना आजच्या अतिस्पर्धात्मक जगात

स्थान नाही.

आपल्या कंपन्या परदेशात आस्थापनं उघडून स्थानिक गुणवत्ता (talent) कामावर ठेवेल. या बाबतीत त्या अनुभवी आहेत. त्यांनी आतापर्यंत ८० वेगवेगळ्या देशांत एकूण ६४० केंद्र उघडलीत. जगात संगणक अभियंत्यांचं जे संचित आहे त्यातला ३८ टक्के हिस्सा भारतीय आहे पण आपली लोकसंख्या जगात १५-१६ टक्केच आहे. अभियांत्रिकी या प्रमाणे आपल्या देशाचा कणा आहे पण तो ठिसूळ होऊ नये म्हणून शिक्षणाचा दर्जा उच्च व अद्यावत ठेवणं आवश्यक आहे. सांख्यिक सूजेऐवजी गुणवत्तेवर जास्त भर दिला पाहिजे. याशिवाय ही गुणवत्ता नुसतं परदेशी चलन मिळवण्यासाठी न वापरता देशाचा विकास करण्यासही तिचा उपयोग करणं फलदायी ठरेल. इतर देश आपली प्रगती करण्यास गुणवत्तेचा फायदा घेतात. मग आपण आपल्याच देशाची वाढ करण्यास तिचा उपयोग केला तर बिघडलं कुठे?


आय.टी. क्षेत्राशिवाय इतर व्यवसायांवरही ट्रंपचं सावट पसरलं आहे. अमेरिकेत प्रशिक्षणासाठी सर्व जगातून डॉक्टर येतात. त्यासाठी ते J-1 नावाचा व्हिसा वापरतात. याचं वैशिष्ट्य असं की शिक्षण संपल्यावर अशा डॉक्टरांना निदान दोन वर्षं तरी देश सोडून जावं लागतं. याला अपवाद म्हणजे त्यानं ज्या भागात वैद्यकीय सेवा उपलब्ध नाही तिथे प्रॅक्टिस करण्याचं कबूल करणं. तेव्हा या J-1 व्हिसाचं H1B मध्ये रूपांतर होऊ शकतं. अशा मागास भागात देखील अनेक डॉक्टर काम करण्यास तयार असतात पण आता H1B व्हिसाचे नवीन नियम कुणाला ठाऊक नसल्यामुळे ही योजना बारगाळली असून जगभरातले डॉक्टर काळजीत पडले आहेत.

अमेरिकन विद्यापीठातून मिळवलेली पदव्युत्तर व्यवस्थापन पदवी (M.B.A.) उत्कृष्ट प्रकारची समजण्यात येते. अशा पदवीधरांना लगेच बहुद्देशीय कंपन्यांत नोकऱ्या मिळतात. या उज्ज्वल भविष्यामुळे भारतातून अनेक विद्यार्थी कर्ज काढून या अभ्यासक्रमासाठी येत असत. त्यात फार कमी धोका असल्यामुळे बँका कर्ज देण्यास कचरत नसत. पण आता पदवी मिळवल्यानंतर H1B व्हिसा प्राप्त करणं अनिश्चित झाल्यामुळे अर्थार्जन करून कर्जफेड करणं कठीण झालं आहे. त्यामुळे परदेशी विद्यार्थ्यांची संख्या ३२४ विद्यापीठांपैकी २२७ मध्ये घटली. सर्वसामान्यपणे अदमासे २५ टक्के वर्ग अशा विद्यार्थ्यांनी भरत असे. पण आता ऑगस्ट २०१७ मध्ये सुरू होणाऱ्या सत्रामध्ये परदेशी अर्जदारांची संख्या गेल्या १० वर्षांत प्रथमच घटल्यामुळे त्यांची उपस्थिती कमी झाली. याचे दूरगामी परिणाम होतील असं ही विद्यापीठं म्हणतात. बहुदेशीय कंपन्यांना कौशल्यवान मजूर वर्ग व मिळाल्यामुळे त्या कोंडीत सापडतील हे उघड आहे.

**– डॉ. अनंत पां. लाभसेटवार Ph.D.**
latalabh@aol.com
(लेखक फर्स्ट नॅशनल बँक आणि ट्रस्ट कंपनी, कॅन्सास अमेरिका या वित्तसंस्थेचे १४ वर्षं चेअरमन ऑफ दी बोर्ड होते.)

**॥ग्रंथाली॥**

## अमेरिका : दशा व दिशा – डॉ. अनंत पां. लाभसेटवार




अमेरिकेत राहण्याचं भाग्य लाभलं की त्याला पहिली ठेच बसते. अतिस्पर्धेच्या युगात त्याला रात्रंदिवस काम करावं लागतं, कुटुंबाची हेळसाड होते आणि भौतिक ऐश्वर्य लाभलं तरी मानसिक शांतता आकाशातल्या चंद्राप्रमाणे दूरच राहते. आंतरराष्ट्रीय स्पर्धेमुळे कंपन्या सारख्या कार्यक्षमता व उत्पादनशक्ती वाढवण्यासाठी आकाशपाताळ एक करतात. त्यांना सारखी पुनर्रचना करावी लागते. यात अनेकदा नोकरी भरडली जाते आणि नवीन शोधावी लागते. जीवनातल्या अस्थैर्यामुळे तो या स्वप्नवत देशाकडे जरा करड्या नजरेनं बघू लागतो. त्यानंतर तो ठिकठिकाणी चिकित्सक दृष्टी वापरतो. चकाकणारं सर्वच सोनं नसतं याची त्याला खात्री होते. इतर देशांप्रमाणे या देशातही खाचखळगे, चढउतार, अन्याय व भ्रष्टाचार आहे याची त्याला जाणीव होते आणि मानसिक उत्क्रांतीची शेवटची पायरी तो चढतो. तिथून त्याला दिसतं ते सर्वच जादुई नसतं. आता तो अमेरिकेविषयी प्रगल्भ झालेला असतो.

**मूल्य ३५० रुपये**
**सवलतीत २१० रुपये**

*With Best Compliments From*

## M/s Anupam Marketing Pvt. Ltd.,

91, Nagdevi X Lane, Mumbai-400003
Tel. no.: 23425604, 23445672, 23439436
Mobile : 9820495593
E-mail : sbdaga@hotmail.com

*With Best Compliments From*

## M/s Supreme Suppliers

210, Sagar Avenue,
Andheri (W),
Mumbai-400058

*With Best Compliments From*

## NIYATI TRAIN CARGO MOVERS

**Central Railway**

**Authorised Regd. Lease Holder**
**Booking : Clearing & Forwarding Service**

HO : Off. No. 2, 1st Floor, 265 Sant Nivas, Shaheed Bhagat Singh Road, Fort, Mumbai-01 • Tel.: 49704117
Booking Off. : Parcel Office, Central Railway C.S.T. Mumbai-400 001 • Mob. : 9833606150
E-mail : manikandan.niyati@gmail.com

*With Best Compliments From*

## DEWANCHAND & SONS

Fleet Owners, Govt. Transport Contractor
& Mobile Crane Suppliers

PLOT NO. 109, 3rd LANE, DARUKHANA, MUMBAI-10
E-mail : dewanchandsharma@hotmail.com
Website : www.dewanchandcranes.com

## उषा परब लिखित 'कुसवा'




कोमसाप सिंधुदुर्गच्या अध्यक्षा, ज्येष्ठ कार्यकर्त्या, लेखिका, कवयित्री आणि मैत्रीण असलेल्या प्रा. उषा परब यांच्या 'कुसवा' या कादंबरीच्या प्रकाशन सोहळ्याला गेले असता तिकडची मैत्रिणींनी काढलेली क्षणचित्रे आणि थोडक्यात वृत्तांत.

कुसवाच्या प्रकाशन सोहळ्यास गेल्याचे समाधान लाभले, कारण उषाताईंच्या आगळ्यावेगळ्या कुसवाबद्दल मान्यवरांचे विचार ऐकायला मिळाले. प्रा. उषाताई परब यांच्या एका कथेत मा. मधु मंगेश कर्णिक यांना त्यांच्या ह्या कादंबरीचे बीज दिसले आणि मग उषाताईंचा प्रवास सुरु झाला, लिहिण्याचा, जगण्याचा, मनात साचलेलं, निरीक्षण केलेल्या अनुभवांना शब्दात गुंफण्याचा आणि माणुसकीचा ....खुद्द मधु मंगेश कर्णिक, दिनकर गांगल, उर्मिला पवार, सुदेश हिंगलासपूरकर, डॉ महेश केळुसकर सर्वांनी कुसवाचे भरभरून कौतुक केलं. केळुसकर सरांनी तर त्यांना भावलेल्या काही पानांचे अभिवाचन करून कादंबरी वाचण्याची उत्सुकता निर्माण केली. उषाताईंचे सचे मनोगत अतिशय भावले. प्रतिभा सराफचे सुत्रसंचलन तसेच गौरीताई कुलकर्णी, लता गुठे आणि परब परिवार आणि इतर कोमसाप कार्यकर्त्यांचे आयोजन उत्तम होते. व्यासपीठावर आणि व्यासपीठाच्या समोर अनेक रसिक व विद्वान मान्यवर होते. हॉल तुडुंब भरला होता. पुस्तक तर हातोहात विकले गेले, त्यामुळे इच्छा असूनही पुस्तक घेता विकत आलं नाही पण मन आणि कान तर तृप्त झालेत कुसवाबद्दल ऐकून लवकरच कुसवा वाचायला हवी.

---




## विजय माळी यांना देवदत्त पाटील पुरस्कार



विजय माळी लिखित 'आर्त माझ्या बहु पोटी' या कादंबरीला दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूरच्या वतीने २०१६ वर्षातील उत्कृष्ट कादंबरीसाठी दिल्या जाणाऱ्या 'देवदत्त पाटील पुरस्काराने' त्यांना सन्मानित करण्यात आले. दि. २५ मे २०१७ रोजी, शाहू स्मारक भवन, कोल्हापूर येथे डॉ. भालचंद्र मुणगेकर, माजी कुलगुरू, मुंबई विद्यापीठ यांच्या हस्ते व प्राचार्य विश्वास सायनाकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या पुरस्कार प्रदान सोहळ्यात पुरस्कार प्रदान करण्यात आला. रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते. डॉ. मोहन पाटील, डॉ. गिरीश मोरे, प्राचार्य विश्वास सायनाकर, गोविंद गोडबोले यांच्या निवड समितीने पुस्तकाची निवड केली .




## बदक-नामा


### मिलिंद पदकी

''मिलिंद पदकी यांनी मूलत: इंग्लिशमधून बरंच कवितालेखन केलं आहे, अमेरिकेत त्यांचं वास्तव्य असलेल्या न्यू जर्सीमध्ये अनेक कविता-वाचनांमध्ये सहभाग घेतला आहे. इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, अन्यही यूरपीय भाषांमधील अनेक प्रतिभावंत कवींच्या कवितांचं मनन, उर्दू भाषा व उर्दू कवी-गझलकारांच्याही परंपरेचा अभ्यास या काव्यलेखनाच्या नेणिवेत आहे. यातच एकीकडे कवीचं स्वत:चं विज्ञान-संशोधनाचं जगही आहेच, या सर्व परिशीलनातून सिद्ध झालेली ही कविता वरवर सोपी वाटली तरी व्यामिश्र झाली आहे.''

– भारती बिर्जे-डिग्गीकर

**मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.**

## शब्दकिमया




### नीला पाटणकर

पुस्तकातील कोडी साधे व सोपे, नेहमी बोलण्यात येणारे शब्द घालून केली आहेत. दोन किंवा तीन शब्दांच्या जोड्या व रोजच्या वापरात येणारे वा.प्र., म्हणी घालून नावीन्य आणले आहे.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**




**मूल्य ४०० रु.**
**सवलतीत २५० रु.**

## रानवीचा माळ

### अभिजित हेगशेट्ये

जागतिकीरणाबरोबर होणारी अनेक संक्रमणे आणि संकटे यातून नवी नैतिकता, मूल्याधिष्ठता आणि स्वत्वाच्या संकल्पना आकार घेत आहेत. गेल्या शेकडो वर्षांच्या परंपरा जपत आलेला हा 'माळ' अचानक वेगळ्याच विश्वाला सामोरा जातो. ह्या ऋतू बदलाची अवघडता त्याला मानवत नाही. पारंपरिक मळलेल्या वाटांवर उमटत जाणारी पावले दिवसाची सुरुवात तेथूनच करतात. मात्र अचानक आता ही वाट तुमची नाही आणि हा निवाराही तुमचा नाही, अशी नोटीस घरावर लागताच येथील प्रत्येक चिरा अनामिक काळजीने थरथरतो! एक विलक्षण कळ काळीज चिरत जाते, सारा माळ व्यापून टाकणारी! त्याचाच हा चलपट आहे. कादंबरीच्या अंगाने जाताना तो काही ठिकाणी माहितीपरही होत जातो आणि उघड्या ओसाड माळरानावर अचानकपणे आक्रमित होणाऱ्या महाकाय आक्रमणाने भयभीत होणाऱ्या माळरानाच्या कातरतेची वेदना मांडत जातो.

# चित्रपटनिर्मितीची वेगळी कहाणी : ऑस्कर 10

साऱ्या जगभर ऑस्कर पुरस्काराची चर्चा सातत्याने सुरू असते. जगभरातील चित्रपट उद्योगाला प्रेरणा देणाऱ्या या ऑस्कर पुरस्काराच्या भोवतीचे विलक्षण जगर 'ऑस्कर 10' या अपर्णा पाटील यांनी लिहिलेल्या पुस्तकात अतिशय मार्मिक शैलीत मांडण्यात आले आहे. हॉलिवूड सिनेमाच्या रसिकांना इंग्रजी चित्रपटांची माहिती असते. ऑस्कर पुरस्काराच्या निमित्ताने जगभरातील चांगल्या चित्रपटांची चर्चा होते. ऑस्करसाठी नामांकन मिळालेल्या चित्रपटांचा बोलबाला सुरू होतो. प्रत्यक्ष पुरस्कार वितरणाच्या वेळी घोषित होणारी नावे आणि चर्चा यांचा सारा कल्लोळ सिनेजगतात उठत असतो.

अपर्णा पाटील यांनी ऑस्कर पुरस्कार मिळवणारे जगभरातील वेगवेगळ्या कालखंडातील दहा चित्रपट आपल्या पुस्तकासाठी निवडले आहेत. अपर्णा पाटील यांचे कसदार लेखन चित्रपटाच्या मागील घडामोडींचा वेध घेऊन त्यातील घटनांची मालिका अनेक प्रसंगांचे दाखले देऊ लागते तेव्हा कोणताही रसिक हे पुस्तक वाचताना मंत्रमुग्ध होऊन जाईल, अशी त्यांची शैली आहे. अपर्णा पाटील यांचा प्रचंड दांडगा व्यासंग त्यांच्या या लेखनाची प्रेरणा आहे, हे त्यांचे या पुस्तकातील लेखन वाचताना जाणवते. पुरस्कार मिळालेले दहा चित्रपट जे पुढीलप्रमाणे आहेत. 'गॉन विथ द विंड', 'बेन-हर', 'लॉरेन्स ऑफ अरेबिया', 'द गॉडफादर', 'रॉकी', 'गांधी', 'द प्लॅटून शिंडलर्स लिस्ट', 'टायटॅनिक', 'स्लमडॉग मिलेनिअर' या चित्रपटांच्याबद्दल लेखिकेने खूपच उद्‌बोधक, वेगळेपणाची, नावीन्यपूर्ण माहिती दिली आहे.

'गांधी' चित्रपटाच्या निर्मिती मागचा इतिहास सांगताना सर रिचर्ड ॲटनबरो यांनी 'गांधी' चित्रपट बनवण्याचे ध्येय उराशी बाळगून आपल्या या स्वप्नाला सत्यात उतरवण्यासाठी किती पराकोटीची शक्ती पणाला लावली आणि एक सुंदर चित्रपट जगाला दिला, याची विलक्षण कथा अपर्णा पाटील यांनी जितक्या रोचकपणे मांडली आहे तेवढ्याच ताकदीने 'गॉडफादर' या चित्रपटाच्या निर्मितीच्या वेळेपासून या चित्रपटाने जागतिक पातळीवर टाकलेल्या प्रभावाचे दर्शन आपल्या लेखात घडवले आहे. 'डॉन' कसे असतात, याची केवळ झलक यात मांडली नाहीतर 'गॉडफादर' या चित्रपटाचे गुन्हेगारी जगतावर आधारित बनविण्यात येणाऱ्या चित्रपटांची शैलीच बदलून टाकली. हे सारे लेखिकेने फार सुंदर रीतीने मांडले आहे.

चित्रपटांचे दिग्दर्शक, अभिनेते, निर्माते, अभिनेत्री या सगळ्यांच्या सुरस आणि वैविध्यपूर्ण कथांची मालिका या सर्व लेखांच्या माध्यमातून लेखिका अपर्णा पाटील यांनी अतिशय समर्थपणे गुंफली आहे. या पुस्तकाचे हे वैशिष्ट्य म्हणता येईल की, हॉलिवूड चित्रपटांची तुम्हाला फारशी माहिती नसली तरी या पुस्तकाच्या वाचनाने तुम्हाला मिळणारा आनंद हा तेवढाच मिळतो. चित्रपटनिर्मितीच्या वेळी पडणाऱ्या अनेक घटनांचा चित्रपटाच्या एकूण साऱ्या गोष्टींवर कसा परिणाम होत असतो, हे लेखिकेने अनेक चित्रपटांच्या उदाहरणातून दाखवून दिले आहे.

ग्रंथाली प्रकाशन संस्थेने अपर्णा पाटील यांचे 'ऑस्कर 10' हे पुस्तक प्रकाशित करून इंग्रजी चित्रपटांविषयीचे कुतूहलच जागे केले नाहीतर, त्यांना या चित्रपटांच्या मागील घडामोडींचा इतिहास सांगून सिनेजगतातील खरी ओळख करून दिली आहे. अपर्णा पाटील यांच्या पत्रकारितेचा अनुभव मोठा आहे. त्यांची लेखनशैली ही ओघवती आहे.

या दहा चित्रपटांविषयी त्यांच्या प्रत्येक लेखात इतकी माहिती त्यांनी दिली आहे तरी अजून काही अपुरे आहे, असे वाटते. कारण लेखिकेला या विषयाची असणारी माहिती इतकी प्रचंड आहे की, हे सारे लेख म्हणजे केवळ प्रस्तावना वाटावी इतके छोटे वाटतात. यामध्ये लेखिकेला दोष देता येणार नाही. दहा चित्रपट आणि ऑस्कर पुरस्काराबद्दलची माहिती देण्यासाठी दोनशे पानी पुस्तक पुरे पडू शकत नाही. मला फार प्रत्येक चित्रपटाबद्दल वाचताना वेगळा अनुभव मिळाला. म्हणजे 'गांधी' आणि 'स्लमडॉग मिलेनिअर' हे चित्रपट आपल्याकडे त्यांच्या भारतीयत्वाच्या अंगामुळे अधिक चर्चेत होते. त्यांच्याबद्दल खूप वाचन होऊनही अपर्णा पाटील यांनी सांगितलेली माहिती ही अतिशय वेगळी वाटते. तिचा ताजेपणा, सरळ सरळ मुद्दा मांडण्याची पद्धत मनाला भावते.

अपर्णा पाटील यांनी हे सारे लेखन भारावून जाऊन केले आहे. केवळ कुतूहल हा त्यांचा हेतू नाही. या साऱ्या मागचे मर्म शोधणे त्यांना आवडते, असे दिसून येते. स्टीव्हन स्पिलबर्ग ज्यांनी 'ज्युरासिक पार्क' दिग्दर्शित केला, त्यांचा 'शिंडलर्स लिस्ट' हा सिनेमा किती वेगळा होता, याचे मोल लेखिकेला वाटते. 'गांधी' मांडणाऱ्या रिचर्ड ॲटनबरोंची जगाला गांधींची ओळख करून देण्याची भूमिका लेखिकेला महत्त्वाची वाटते. 'टायटॅनिक'सारखा प्रचंड लोकप्रियता मिळवलेला चित्रपट निर्माण होण्यामागच्या कारणांचा शोध लेखिका आपल्या लेखनातून घेते. या भव्य यशस्वी आणि प्रभावशाली चित्रपटांच्या निर्मितीच्या वेळी दिग्दर्शकांनी उपसलेले कष्ट, कलाकारांच्या निवडी, त्यांचा प्रवास हे सगळं खूप मनोवेधक आहे, असे लेखिका आपल्या प्रस्तावनेत म्हणते, ते खरेच आहे. सोनाली कुलकर्णी या अभिनेत्रीने प्रस्तावना लिहिताना या पुस्तकाकडे मी एक विद्यार्थी म्हणून पाहते असे लिहिले. तेव्हा या पुस्तकातून खूप काही शिकण्यासारखे आहे, हे आपणाला समजून येते.

विलक्षण गतीने बदलत्या चित्रपटांच्या जगताची अतिशय सोप्या, ओघवत्या शैलीत ऑस्कर पुरस्काराच्या माध्यमातून करून दिलेली 'ऑस्कर 10' या पुस्तकाची ओळख वाचकांच्या मनात एक उत्तम कलाकृती म्हणून निश्चितच राहील, यात शंका नाही.

सर्व चित्रपटांविषयी या परिक्षणात मी मुद्दामच विस्ताराने लिहिलेले नाही, कारण मुळापासून पुस्तक वाचण्याचा आनंद वेगळाच असतो. त्यादृष्टीने 'ऑस्कर 10' हे पुस्तक अतिशय माहितीपूर्ण आणि मनोरंजक पुस्तक आहे, नेहमीच्या फिल्मी पुस्तकाहून वेगळेपणा जपणारे आहे.

**- पाटलोबा पाटील**, ९६६५०४९५६३

# ॥ग्रंथाली॥

## डॉ. अनंत लाभसेटवार यांचे लेखसंग्रह




### झोके अमेरिकेतले

भारतापेक्षा मी अमेरिकेत जास्त पावसाळे काढले. तिथल्या लोकांना जवळून बघण्याची संधी मिळाली. माणूस जेव्हा कर्ज काढण्यासाठी बँकेकडे अर्ज करतो तेव्हा त्याला जीवनातल्या सर्व उलाढाली उघड्या कराव्या लागतात. थोडक्यात म्हणजे तो बँकेपुढे 'नग्न' होतो. बँकेचा चेअरमन म्हणून ते मला जवळून बघायला मिळालं. या अनुभवांमुळे मला अमेरिकन लोकांच्या सुखाचीच नव्हे तर दु:खाचीही चांगली पारख झाली. मोठं अंगण असलेलं प्रशस्त व टुमदार घर, लठ्ठ पगाराची नोकरी, त्याहीपेक्षा भारी गाडी व घरात अनेक टीव्ही सेट असले तरी मालक आणि मालकीण अपसेट का असतात या गुढाकडे लक्ष वेधलं गेलं. या प्रत्ययकारिकेतून हा लेखसंग्रह लिहिला.


**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रुपये**




### अमेरिकेच्या दुर्बिणीतून भारत

'मानापमान' नाटक सुरू झालं. कृष्णाजी खाडिलकर लिखित आवृत्तीतील पदं खूपच श्रवणीय. संगणक संस्कृती आली. इंग्रज गेले, मानवानं चंद्रावर पाय ठेवला आणि भ्रष्टाचारानं मन गंजून बधीर झालं तरी या १०० वर्षांच्या नाटकातील गाण्याची पकड मराठी मनावर महाराष्ट्रातच नव्हे तर जगभर कायम आहे.

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रुपये**




### पराकाष्ठा

या कादंबरीतून वाचकांना अमेरिकन जीवनशैली, जीवनमूल्ये व चालीरीतींची ओळख होईल अशी आशा आहे. कथानकात योजलेली दोन भारतीय पात्रं ओघाओघानं आली असून ती मराठी वाचकांना आवडावीत अशीच आहे. डॉ. विजय सॅमीसारखे अनेक डॉयटर्स अमेरिकेत स्थायिक झालेले आहेत. येथील परदेशी डॉयटरांमध्ये सर्वाधिक भारतातून आलेले आहेत. हल्ली व्हिसा बंधनामुळे त्यांचं आगमन कमी झालं असलं तरी त्यांची जागा या देशात जन्मलेली पिढी घेत आहे. मेडिकल कॉलेज व अभियांत्रिकी हे अमेरिकेतही भारतीयांचे आवडते विषय आहेत.

**मूल्य ४०० रु. सवलतीत २५० रुपये**




### विश्वसंचारी

भारताचा मध्यमवर्ग जसा वाढत आहे तशी पर्यटकांच्या संख्येतही लक्षणीय वृद्धी होत आहे. परदेशात भारतीय प्रवाशांची भेट होणं ही अपवादात्मक गोष्ट राहिली नाही. पण जे या वारीत भाग घेऊ शकत नाहीत त्यांना घरी बसून देशांतर करण्यास व पर्यायानं नवीन लोक, संस्कृती, चालीरीती आणि राजकारण अभिज्ञ होण्याचे अनुभव पदरात पडण्यास हे पुस्तक उपयोगी पडेल.

**मूल्य ७०० रु. सवलतीत ४२० रुपये**

# ग्रंथाली

द्वारा बुलन मिल म्युनिसिपल स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग, माटुंगा (प.), मुंबई-४०००१६
दूरध्वनी : २४३०६६२४/२४२१६०५० । granthaliruchee@gmail.com । www.granthali.com । वेळ : सकाळी ११ ते ६

## गुलजार यांची ९ पुस्तके...





**९ पुस्तकांच्या संचाची मूळ किंमत १००० रु. सवलतीत ६०० रु. टपालखर्च ५० रु.**

(सुटी पुस्तके विकत मिळणार नाहीत.)


# 'ग्रंथाली'ची ताजी प्रकाशने

## पर्यायी मातृत्व : डॉ. संदीप माने




**मूल्य १८० रुपये । सवलतीत ११० रुपये**

## माझी माय सरसोती : अनुराधा गानू




**मूल्य १०० रुपये । सवलतीत ६० रुपये**

# निस्वार्थी सेवेचा आणि सुधारणेचा वसा घेतलेले 'प्रकाशाचे बेट'




ग्रंथाली प्रकाशित आणि अनुराधा गोरे लिखित 'प्रकाशाचे बेट' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर यांच्या हस्ते २२ जून रोजी पु.ल. देशपांडे अकादमीच्या सभागृहात झाले. प्रसिद्ध मनोविकारतज्ज्ञ डॉ. अद्वैत पाध्ये, खेरवाडी सोशल वेलफेअर असोसिएशनच्या पदाधिकारी आणि 'युवा परिवर्तन'च्या सह-संस्थापिका मृणालिनी खेर, 'केसावा'चे अध्यक्ष आणि विश्वस्त किशोर खेर, लेखिका अनुराधा गोरे, 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर इ. मान्यवर कार्यक्रमात सहभागी होते.

संस्थेची खरी ओळख ही तिच्या कार्यातून होत असते. 'विचार बदला, आयुष्य बदलेल' हे खेरवाडी सोशल वेलफेअर असो.च्या 'युवा परिवर्तन' या संस्थेचे मिशन स्टेटमेंट आहे. गेल्या २० वर्षांपासून शिक्षण अर्धवट सोडलेल्या, कळतनकळत गुन्हा करून ज्यांचे आयुष्य उध्वस्त होण्याच्या वाटेवर आहे अशा मुलांच्या, युवकांच्या मनातली निराशा, नाउमेद आणि भरकटलेपण दूर करून त्यांना स्वत:ची नवी ओळख देणारे, उमेद देणारे युवापरिवर्तन हे प्रकाशाचे बेट आहे.

'ग्रंथाली'च्या वतीने कार्यक्रमाच्या संयोजिका धनश्री धारप यांनी मान्यवरांचे स्वागत केले. सुदेश हिंगलासपूरकर यांनी ग्रंथालीच्या ४२ वर्षांच्या वाचक चळवळीचा आढावा घेत या नव्या पुस्तकातून एका महत्त्वाच्या सामाजिक चळवळीची माहिती लोकांसमोर यावी हा ग्रंथालीचा विचार व्यक्त केला.

'युवा परिवर्तन'च्या मृणालिनी खेर यांनी माजी मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांनी स्थापन केलेल्या आणि ९० वर्षांची कार्यपरंपरा असणाऱ्या खेरवाडी वेलफेअर असोसिएशनबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. 'युवा परिवर्तन'च्या माध्यमातून होणाऱ्या महत्त्वाच्या सामाजिक कार्यांची त्यांनी ओळख करून दिली.

युवा परिवर्तनच्या स्मिता खानझोडे, उमा सुंदररामन यांच्याशी झालेल्या चर्चेतून जी समस्याग्रस्त मुले संस्थेत आली त्यांच्या आयुष्यातल्या समस्या आणि त्यांना मिळालेले समुपदेशन याच्या कहाण्या कशा शब्दबद्ध झाल्या, हा लेखनप्रवास लेखिका अनुराधा गोरे यांनी मांडला. प्रसिद्ध अभिनेते शशांक केतकर, अनुराधा गोरे यांनी 'प्रकाशाचे बेट' या पुस्तकातील निवडक चार कथांचे अभिवाचन केले. शशांक केतकर यांच्या दिग्दर्शनातून या कथांचा उत्तम रंगमंचीय आविष्कार पार्ले टिळक आणि गांधी गुरूकुलच्या विद्यार्थ्यांनी केला. निवेदिका अनघा मोडक यांनी अत्यंत नेमक्या आणि ओघवत्या भाषेत या अभिवाचन आणि नाट्याविष्काराची गुंफण उपस्थितांपर्यंत पोहचवली.




प्रसिद्ध मनोविकारतज्ज्ञ डॉ. अद्वैत पाध्ये यांनी 'युवा परिवर्तन' या संस्थेच्या कार्याचे कौतुक करीत समुपदेशनाचं महत्त्व आणि गरज अधोरेखित केली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर यांनी तथाकथित प्रगतीबरोबर वाढलेल्या सामाजिक समस्यांचा वेध घेत 'युवा परिवर्तन'च्या कार्याचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अस्मिता पांडे यांनी केले. शितीन देसाई, लता व विठ्ठल पालेकर यांनी प्रत्येकी १००० प्रती पुरस्कृत केल्या.

## विनता कुलकर्णी यांची दोन पुस्तके




### क्षितिज पश्चिमेचे


**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

''भारत-अमेरिका सेतू बांधण्याचे प्रयत्न अनेकांनी केले आहेत. त्यातल्या काहींची शब्दचित्रे विनता कुलकर्णी यांनी या पुस्तकात संवेदनशीलतेने काढली आहेत. अनेक सत्यचित्र-चरित्रकथांनी हे पुस्तक भरलेले आहे. १४-९४ वयोगटतील विविध प्रकारच्या व्यक्ती, प्रकृती आणि जीवनशैली या पुस्तकात आढळतात. प्रत्येक मराठी अमेरिकनाने आणि प्रत्येक महाराष्ट्रीय मराठी माणसाने संग्रही ठेवण्यासारखे हे पुस्तक आहे.''

**- कुमार केतकर**

### ठसे आठवांचे


**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत ९० रुपये**




लेखिकेने केवळ आठवणींची गुहा उघडलेली नाही तर त्याभोवती असलेले हळुवारपण, स्निग्धता, स्थित्यंतर, त्यातून उभे राहिलेले भावविश्व यांचा मागोवा घेतलेला आहे. घटना, प्रसंग, अनुभव यांना सहाणेवर घासून त्याचा उजळपणा टिपला आहे, आवश्यक तेथे परखडपणे स्वत:ला व्यक्त केले आहे तर कधी मार्मिकपणे वेध घेतलेला आहे. अनुभवांशी असलेला प्रामाणिकपणा, लेखनातला तरलपणा, शब्दांची अचूकता, विचारांची व्यापक बैठक, संशोधन यामुळे या संग्रहाला समृद्धपणा लाभला आहे. लेखांचा आवाका लहान स्वरूपाचा दिसत असला तरी त्यांना कवेत घेतलेला आशय खूप मोठा आहे आणि तेच या संग्रहाचे मोठेपण आहे.

## नीलिमा कुलकर्णी यांची नवी कादंबरी कवडसे स्त्रीजीवनाचे

गेल्या शंभर वर्षात म्हणजे जवळजवळ चार पिढ्यांमध्ये स्त्रियांनी केलेल्या कौटुंबिक, व सामाजिक संघर्षाचे चित्रण इथे आहे. या काळात मराठी स्त्रीचं आयुष्य कसं बदललं हा या कादंबरीचा विषय आहे. खरं म्हणजे प्रत्येक व्यक्तीचं जीवन ही एक कादंबरी असते. व्यक्तीचा मूळ स्वभाव, भोवतालची परिस्थिती आणि ती परिस्थिती जाणून घेण्याची आकलनशक्ती यातून आपण घडत असतो. म्हणून प्रत्येक जीवनपट वेगळा रंगत जातो. प्रत्येक पिढीतील काही पात्रे घेऊन कादंबरी तयार झाली. त्यात स्त्रियांची दु:खं आहेत, पण आशावादही आहे. त्यांनी केलेला संघर्ष महत्त्वाचा आहे. परिस्थितीने माणूस घडत असतो. एकात एक गुंतलेले जीवनाचे धागे, त्यातूनच समाजाचा पट विणला जात असतो. व्यक्तींच्या संयुक्त घडण्यापासून समाजाची उत्क्रांती, आणि समाजाच्या उत्क्रांतीमधून व्यक्तीचा विकास असे हे चक्र फिरत असतं. या आयुष्यांकडे मागे वळून पहाताना समाजाच्या बदलांची जाणीव होते. बदलत्या जीवनांचे कवडसे पहात त्यातून समाजाचा इतिहास पुढल्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा हा प्रयत्न वाचकांना आवडेल अशी आशा आहे.




**मूल्य ३५० रुपये**
**सवलतीत २१० रुपये**

## ग्रंथाली प्रायोजित 'सह्याद्री' वाहिनीवरील जुलै महिन्यामध्ये प्रक्षेपित होणारे 'अमृतवेल'चे कार्यक्रम




दिनांक १३ जुलै २०१७ रोजी, गुरुवार, रात्री ८.३० वा. 'अमृतवेल' कार्यक्रमाचा विषय आहे प्रवासवर्णने. सहभाग – सुप्रसिद्ध विज्ञानकथा–लेखक आणि संशोधक डॉ. बाळ फोंडके आणि लेखिका मेधा आलकरी.
दिनांक २७ जुलै २०१७, गुरुवार, रोजी रात्री ८.३० वा. 'अमृतवेल' कार्यक्रमाचा विषय आहे– 'वाचन संस्कृती आणि साहित्य प्रसार'. सहभाग – श्यामसुंदर जोशी, संचालक ग्रंथसखा वाचनालय, बदलापूर आणि सुदेश हिंगलासपूरकर, विश्वस्त ग्रंथाली. 'पुस्तकांचे गाव' याबद्दलचे निवेदन – शिक्षण व सांस्कृतिक मंत्री विनोद तावडे. संपादन आणि सूत्रसंचालन – रविराज गंधे.

## अपर्णा पाटील यांच्या ऑस्कर 10 पुस्तकास 'दमसा पुरस्कार'



कोल्हापूर येथील दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेच्यावतीने (दमसा) देण्यात येत असलेला ग्रंथ पुरस्कार सोहळा नुकताच संपन्न झाला. या पुरस्कार सोहळ्यात विशेष पुरस्कारांमध्ये बाबुराव पेंटर पुरस्कारासाठी अपर्णा पाटील लिखित 'ऑस्कर 10' या पुस्तकाची निवड करण्यात आली. हा पुरस्कार मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या हस्ते अपर्णा पाटील यांना प्रदान करण्यात आला.


'ग्रंथाली' प्रकाशनने प्रकाशित केलेल्या 'ऑस्कर 10' या पुस्तकात ऑस्करविजेत्या दहा सिनेमांचा वेधक आढावा घेण्यात आलेला आहे. पुस्तकाला अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांची प्रस्तावना लाभली आहे. अपर्णा पाटील या महाराष्ट्र टाइम्स या वृत्तपत्रात मुख्य उपसंपादक म्हणून कार्यरत आहेत.






'कासव'
चित्रपटासाठी
संपर्क :
डॉ. मोहन आगाशे
magashe@gmail.com
9822091355

मानवी जीवनाशी निगडित बाबींवर संकल्पनांचा सूक्ष्म अर्थ उलगडणारे 'संकल्पना'कोश मानवी संस्कृतीचा वारसा जपणारे लेणी-मूर्तिकलेचे आविष्कार आणि मानवी जीवन विवेकी आणि समृद्ध करणारी थोर व्यक्तिमत्त्वं यावर आधारित हा वीस ग्रंथांचा संच म्हणजे वाङ्मयीन खजिनाच. प्रत्येक घरात, संस्थेत, वाचनालयांत असावाच असा.

**इंग्रजी थिसॉरसच्या धर्तीवर... मराठीत प्रथमच**












**संकल्पनाकोश (खंड १ ते ५) - सुरेश वाघे**

विषय : धर्म, काळ, विश्व, प्राणी, वनस्पती • मानवी शरीर व जीवनावस्था, कुटुंबसंस्था • नागरिक जीवन • गुणावगुण • मन व स्वभाव, ललितकला

**मूळ किंमत ३२०० रुपये • सवलतीत २४०० रुपये**

## ॥ग्रंथाली॥


द्वारा गुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली क्र. ९, तळमजला, जे.के. सावंत मार्ग, यशवंतराव चव्हाण नाट्यमंदिराशेजारी,
माटुंगा (प.), मुंबई ४०००१६ • दूरध्वनी : २४३०६६२४, २४२१६०५० • granthaliruchee@gmail.com www.granthali.com




### जलसूक्त - संजीवनी खेर

लेखिका संजीवनी खेर यांनी गावातल्या खेडूत स्त्रीच्या डोळ्यांतले पाणी शोधायचा प्रयत्न केला आहे. एखादा खेडवळ ग्रामीण माणूस जसा हातात काठी घेऊन पाण्याचा शोध अचूकपणे घेतो तसा. ती कला, पण लेखिकेने लेखणीच्या काठीने पाणी धुंडायचा प्रयत्न केला आहे आणि आनंदाचे भरते यावे तसा पाण्याचा साठा तुमच्या-आमच्या संवेदनांमध्ये असल्याचा आनंद तिला होत आहे. तो तुमच्यापर्यंत पोचवायची ही धडपड म्हणजे हे पुस्तक...


मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.



### नोबेल साहित्यिक - संजीवनी खेर

या शतकातील माणसाच्या वेदनांचे, अत्यानंदाच्या सार्थ क्षणांचे हे साक्षीदार, ज्यांनी हा अंतर्मनातील बहुरंगी मोरपिसारा जगापुढं फुलवला. जग सदाहरित करणाऱ्या करुणाकर मेघांच्या आगमनाची आशा फुलवली. सत्तेच्या, संपत्तीच्या, सुखाच्या उन्मादात माणुसकीचं प्रेय नि ईप्सित काय असावं याचं भान दिलं. दुःखाचे, नानाविध छटा असलेले विव्हळ क्षण वाचकाला वाचनानंद देऊन जातात. एकप्रकारे हा जागतिक स्तरावरच्या भावनांचा ऐतिहासिक दस्तावेजच म्हणावा लागेल. ज्यात तुम्ही-आम्ही आहोत, आपलं जीवनगाणं, उद्याची स्वप्नं, अपेक्षा नि अपेक्षाभंगही आहेत. आपल्याच अंतरीचं गूढ उकललेलं आहे.

मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.




### शोधयात्रा - डॉ. अनंत देशमुख

मराठी साहित्य संशोधन, वाङ्मयेतिहास आणि समीक्षा हे डॉ. अनंत देशमुख यांच्या दीर्घकालीन अभ्यासाचे विषय आहेत. त्यांच्या वाचन, व्यासंग आणि चिंतनातून त्यांनी केलेले हे लेखन असून त्यात त्यांच्या सूक्ष्मदर्शी आणि चिकित्सक वृत्तीचे प्रतिबिंब पडल्याचे दिसून येते. साहित्यकृतींवर त्यांचे भाष्य या लेखांमधून दिसून येते. संशोधनाच्या, वाङ्मयेइतिहासाच्या आणि समीक्षेच्या अवघड आणि अनघड वाटेवरून केलेल्या प्रवासाचे आणि त्यातील त्यांच्या चिंतनाचे दर्शन या पुस्तकात पाहायला मिळते.

मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.




### सफरनामा - स्मिता भागवत

लेखिका स्मिता भागवत यांचा प्रवासाचा छंद वारसागत! टुरिझमची फॅशन अस्तित्वात येण्यापूर्वी ज्येष्ठांनी आम्हाला हेतुपूर्ण प्रवास घडवले. या अनुभवांना शब्ददेह देताना लेखिकाने प्रवासाच्या पुनःप्रत्ययाचा आनंद लुटला. ज्यांना प्रवासानंद लाभला आहे त्यांना समांतर स्मरणयात्रा घडावी आणि ज्यांना आवड असून प्रवास जमलेला नाही त्यांना शब्दयात्रेचा आनंद लाभावा या हेतूने प्रवासप्रेमी लेखिकेने 'ग्रंथाली'च्या वाचकदिनी वाचकांना दिलेल्या नजराण्याचे नाव आहे 'सफरनामा'!

मूल्य १६० रु. सवलतीत १०० रु.



### डोळियांचा डोळा - पुरुषोत्तम गावंडे

पुरुषोत्तम गावंडे यांच्या 'डोळियांचा डोळा' या लेखसंग्रहाचे वैशिष्ट्य असे आहे, की जीवनाच्या अनेक टप्प्यांवर किंवा मुक्कामावर जो अनुभव आला किंवा जे बघावयास मिळाले आहे त्याचे फार सुंदर वर्णन यातील लेखांत केले आहे. या लेखांवरुन हे जाणवते, की जसे सुख वाटून घेतले की वाढते, तसेच दुःखही वाटून घेतल्याने कमी होते. म्हणजे सुखदुःखात 'सामिलकी' हा मनुष्यस्वभाव आहे किंवा असावा पण आज अशी वृत्ती दिसून येत नाही. यावर भाष्य करताना लेखकाने नेम्के समाजाच्या चंगळवादी मानसिकतेवर बोट ठेवलेले आहे.

मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.



### मिरग - डॉ. सई लळीत

लग्न हे आयुष्यभराचे बंधन असते. दुसरे लग्न हा विषयच खूप गुंतागुंतीचा आहे. दुसरेपणाला दिलेली मुलगी... कसं असेल तिचं भावविश्व... त्याचं वरकरणी स्थिर भासणारं भावविश्व... आणि त्या दोघांचं मिळून भावजीवन... ही कादंबरी आहे त्यांचं अंतरंग... कादंबरीतला काळ साधारण वीस वर्षांपूर्वीचं आहे. डॉ. सई लळीत यांनी त्यावेळी टिपलेल्या गोष्टींचे अर्थ आयुष्याच्या वेगवेगळ्या वळणांवर वेगवेगळे लागले आणि त्यांना कातर करून गेले.

मूल्य १३० रु. सवलतीत ६५ रु.

मेहता पब्लिशिंग हाऊस


## ग्रंथपान

**आखाडा**

**महावीर सिंग फोगाट यांचे जीवनचरित्र**

लेखन : सौरभ दुग्गल

अनुवाद : लीना सोहोनी




### पिळदार शरीरातलं उधान ..लाल मातीतली झिंग ... आखाडा'

लालमातीतला धोबीपछाड म्हणजे फक्त मर्दानी कामगिरी, हा पूर्वापार समज. पोटच्या पोरींना मैदानात उतरवत महावीरसिंग फोगाट यांनी त्या समजाला लालमातीतच समाधी दिली. दंगल सिनेमानं फोगाटांच्या या कामगिरीला लोकप्रियतेचे नवे आयाम दिले. या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाच्या आयुष्याचा पट सौरभ दुग्गल लिखित 'आखाडा' पुस्तकानं वाचकांसमोर आणला. मेहता पब्लिशिंग हाऊसने लीना सोहोनी यांनी अनुवादित केलेला हा आखाडा मराठीत आणला आहे.

हरियाणातलं बलालीसारखं छोटंसं खेडं. जिथं मुलींना कुस्तीसारख्या मर्दानी खेळाचं प्रशिक्षण देणं म्हणजे कुळाला बट्टा लावणंच मानलं जात होतं. अशा वातावरणात महावीरसिंग फोगाट या अवलियानं निव्वळ मुलींना आखाड्यातच उतरवलं नाही, तर ऑलिम्पिक्समध्ये बाजी मारण्याचं स्वप्न पाहिलं. कुटुंब आणि समाजाचा विरोध पत्करुन त्या स्वप्नाचा माग घेतला. आणि सबंध देशासाठी नवी वाट रुजू दिली. 'आखाडा' ही या अत्यंत धैर्यवान नायकाची आणि आपल्या मुलींच्या उज्ज्वल भविष्याची स्वप्नं पाहून ती साकार करण्यासाठी तनमनधन पणाला लावून झटणाऱ्या पित्याची, महावीरसिंग फोगाटांची लोकविलक्षण कहाणी आहे. सौरभ दुग्गल यांनी फोगाट यांचा हा जीवनपट अत्यंत साध्या-सोप्या शब्दशैलीत वाचकांपुढे मांडला आहे

हरियाणा राज्याच्या उत्तर भागामध्ये स्त्रियांच्या लोकसंख्येचं प्रमाण पुरुषांच्या संख्येच्या तुलनेत फारच कमी आहे. एखादा माणूस या अशा पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत जन्माला येतो, लहानाचा मोठा होतो; परंतु त्याची विचारसरणी मात्र त्या समाजव्यवस्थेच्या विचारसरणीच्या अगदी विरुद्ध टोकाची बनते; त्याची तत्त्वं, त्याचे आदर्श पूर्णपणे वेगळे असतात. महावीर सिंगजींनी कुस्ती या खेळाला आयुष्य वाहून घेतलेलं आहे. महावीर सिंगजींनी घडवलेल्या महिला कुस्तीपटूंनी जेव्हा आंतरराष्ट्रीय पातळीवर नाव कमावलं, तेव्हा देशातील जनतेचं लक्ष या खेळाकडे वेधलं गेलं. हे असं होण्याचं कारण म्हणजे या मुलींसाठी ते स्वतःच कोच बनले. त्यांनी स्वतःसुद्धा अत्यंत कठोर नियमांचं पालन केलं आणि तेच नियम त्या मुलींनाही घालून दिले. त्यांच्याकडून योग्य तो सराव आणि आवश्यक ती शारीरिक कसरत नियमितपणे करून घेतली.

महावीर सिंग फोगाट हे एके काळचे राष्ट्रीय पातळीवरचे कुस्तीगीर. आपल्या या शिष्यांपैकी निदान कुणीतरी ऑलिम्पिक खेळात सुवर्णपदक पटकावून भारताचं नाव उज्ज्वल करावं, अशी त्यांची तीव्र इच्छा होती. त्यासाठी गेली १६ वर्षं ते झटले होते. आपलं स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

महावीर सिंग यांचा जीवनपट असणारं 'आखाडा' त्यांच्या विचारसरणीची स्पष्ट कल्पना देते. त्यांचा महिलांच्या बाबतीतला दृष्टिकोन स्पष्ट करून सांगताना ते म्हणतात, ''आजसुद्धा आपला समाज पुरोगामी विचारसरणीचा नाही. परंतु मी स्वतः मात्र स्त्री-पुरुष भेदभावाच्या विरुद्ध आहे. याच कारणानं मी माझ्या मुलींना आणि पुतण्यांना कुस्तीच्या क्षेत्राची ओळख करून दिली. खरंतर यासाठी मला खुद्द माझ्या घरच्यांचा, तसंच गावकऱ्यांचा खूप विरोध सहन करावा लागला.''

महावीर सिंगांच्या पाच भावंडांना बारा मुलं होती. त्यांत पाच मुली होत्या. एका संध्याकाळी त्यांनी सर्व मुलांना बोलावून, दुसऱ्या दिवशीपासून कुस्तीचा सराव करण्यासाठी पहाटे उठून आखाड्यात जमायला सांगितलं. त्यादिवसापासून त्यांच्या नशिबात पुढची कित्येक वर्षं नुसते अपार परिश्रम, अंगमेहनत, अंग ठणकणं असं सगळं लिहिलेलं होतं, याची त्या बिचाऱ्यांना काय कल्पना? कुस्तीचे धडे गिरवत असताना कुठलीही पळवाट चालायची नाही. नित्याचा सराव संपवून आखाड्यातून बाहेर पडेपर्यंत महावीरसिंग थोडीसुद्धा दयामाया दाखवत नसत.

अत्याधुनिक प्रशिक्षणाच्या कोणत्याही सुविधा उपलब्ध नसताना गीता आणि बबिता आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळल्या होत्या. गीता आणि बबिता या २००६मध्ये भिवानीच्या ज्या सरकारी महाविद्यालयात शिकत होत्या, त्या महाविद्यालयानं त्यांच्या कामगिरीची दखल घेऊन बलाली येथे त्यांना व्यवस्थित प्रशिक्षण मिळावं म्हणून मॅट्सचा नवाकोरा सेट भेट दिला. एशियन कॅडेट चँपियनशिप पार पडल्यावर महावीर सिंगजींनी आपलं लक्ष २०१० मध्ये होणाऱ्या राष्ट्रकुल स्पर्धांवर केंद्रित केलं.

२०१० सालच्या राष्ट्रकुल स्पर्धांनंतर फोगाट भगिनींचं आयुष्यच बदलून गेलं. विशेषतः गीता आणि बबिता यांचं. एका रात्रीत त्या दोघी 'स्टार' झाल्या. या विजयानंतर त्या दोघींच्या नावाची कीर्ती फक्त यांच्या गावापुरतीच न राहता आजूबाजूच्या परिसरातही पसरली. इतकंच नव्हे, तर देशभरात त्यांचं नाव ज्याच्या-त्याच्या तोंडी झालं. देशातील स्त्रियांच्या सबलीकरणाच्या चळवळीसाठी गीता आणि बबिता आदर्श बनल्या. या कहाणीमुळे राष्ट्रीयच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय माध्यमांचं लक्ष फोगाट भगिनींकडे गेलं. त्यामुळे फोगाट घराण्याचं नाव जगाच्या नकाशावर जाऊन पोचलं.

आपल्या घरच्या मुलींनी कुस्तीच्या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय पातळीवर यश मिळवावं, हे महावीर सिंग फोगाट यांचं वैयक्तिक स्वप्न होतं. पण या स्वप्नामुळे हरियाणाच्या ग्रामीण भागात कुस्तीच्या क्षेत्रात क्रांती घडून येण्यास चालना मिळेल, याची त्यांना मुळीच कल्पना नव्हती. पुरुषप्रधान संस्कृतीचं वर्चस्व असलेल्या समाजामध्ये महिलांचं सक्षमीकरण होण्यास सुरुवात होईल, याची खुद्द महावीर सिंगजींना तरी कुठं कल्पना होती? परंतु त्यांच्यामुळेच आज या समाजातील मुलींचा वर्तमानकाळ आशादायी बनला आहे. ज्या मुली अशी स्वप्नं बघण्याचं धाडस करतील, त्यांचा भविष्यकाळ नक्कीच उज्ज्वल आहे. त्यांच्या यशोगाथेची ही कहाणी नक्कीच प्रेरणादायी आहे .

**आखाडा** : सौरभ दुग्गल

अनुवाद - लीना सोहोनी

पृष्ठसंख्या - २०८, किंमत - २२०/-


**'ग्रंथाली' येथे सभासदांना सवलतीत १७५ रुपये**




## ग्रंथपान

### मी भरून पावले आहे

मेहेरुन्निसा दलवाई



### या पुस्तकाची बोलकथा

हमीद दलवाई आणि मी दोघं 'सत्यकथे' त एकाच सुमारास लिहीत होतो. त्या वेळी असं होतं की– 'सत्यकथे'त लिहितो ना, मग तो माणूस आपला. 'सत्यकथे'च्या या नात्यामुळेच दलवाई आणि आम्ही दोघं यांत आत्मीयता निर्माण झाली.

आठवतो तो त्यांच्या त्या सुप्रसिद्ध लकबीसह बोलण्याचा उत्साह. मुसलमानांची आर्थिक स्थिती सुधारली तर जातीय तणाव खूप कमी होतील, असं त्यांचं एक मत आठवतं. पण असं फारच थोडं आठवतंय.

आपल्या नवपरिणीत पत्नीलाही दलवाई आमच्याकडे दोन–तीनदा घेऊन आले होते. त्या वेळी अबोल साक्षीदाराच्या भूमिकेतून मेहरुन्निसाबाई वावरल्या, असं आता आठवतं. पण ते साक्षित्व किती सूक्ष्म निरीक्षण करणारं होतं याचा आता झालेल्या त्यांच्या गप्पांत प्रत्यय आला!

मेहरुन्निसा दलवाईंबद्दल मला विशेष आस्था होती, कारण त्यांनी जन्मभर नोकरी केली आणि हमीद दलवाईंना– नेहमी समाज–कार्यकर्त्यांच्या भाळी जे लिहिलेलं असतं ते– मिंधेपण भोगावं लागलं नाही.

साधारण तीन वर्षांपूर्वीची गोष्ट. त्या वेळी मुस्लिम सत्यशोधकचे कार्यकर्ते श्री. हुसेन जमादार यांच्या 'जिहाद'च्या संपादनाचं माझं काम चालू होतं. त्या वेळी ते आमच्या घरी यायचे. एके दिवशी संध्याकाळी ते मेहरुन्निसाबाईंना बरोबर घेऊन आले आणि मधल्या वर्षांचं अंतर तुटून गेलं.

बोलता–बोलता विषय निघाला– दलवाईंचं शेवटचं आजारपण आणि मृत्यू याबद्दलचा. कमालीच्या हाल–अपेष्टा सोसायला लावून आलेला तो मृत्यू.... त्यानंतर स्वतःच्या जातवाल्यांशी तत्त्वनिष्ठेसाठी करावं लागलेलं घनघोर युद्ध.... या साऱ्यांचं दुःख इतकी वर्षं लोटली तरी अगदी ताजं होतं मेहरुन्निसाबाईंच्या मनात.

आपले त्या वेळचे ते रौद्र भीषण अनुभव त्या जणू क्षणाक्षणानं पुन्हा जगू लागल्या. शब्दांसाठी कुठेही न अडता भराभरा सांगू लागल्या आणि ते शब्दही कसे– तर त्या चरचरीत अनुभवांना घट्ट मिठी मारणारे, थेटच भिडणारे.

काही वेळानं बाई बोलायच्या थांबल्या. किती तरी वेळ लागला पुन्हा या काळात, या जगात यायला. मी म्हटलं, ''बाई, हे अनुभव नुसते तुमच्या–माझ्यात नकोत राहायला. हे लिहून काढा, सगळ्यांना कळू देत.''

''कसं लिहिणार? मला लेखन तर सोडाच; साधी मराठी लिपीही येत नाही.'' त्या म्हणाल्या.

''मग कॅसेटवर रेकॉर्ड करा. आत्ता मला सांगितलंत तसं.'' मी मार्ग सुचवला.

''करीन, पण प्रश्न विचारायला तुम्ही पाहिजेत. किंबहुना, हे सगळंच काम तुम्हीच अंगावर घ्यायला पाहिजे.'' बाईंनी अट घातली. मी मेहरुन्निसाबाईंना 'होय' म्हटलं आणि पुन्हा भेटायचं ठरवून त्या हुसेन जमादारांबरोबर निघून गेल्या.

ते धगधगते अनुभव माझ्यापर्यंत त्यांनी इतके नेमके पोचवले होते की, त्या गेल्यानंतर मला अतिशय खोल अशा उदासीनतेनं गिळून टाकलं.

दलवाई दांपत्याची बालपणं, विवाह, संसार, दलवाईंचं लेखन व समाजकार्य, दलवाईंचं दुखणं व मृत्यू, त्यानंतर मेहरुन्निसाबाईंचं कार्य आणि भूमिका– असं सगळं या पुस्तकात यावं, असं मला वाटलं. त्या दृष्टीनं मी प्रश्न विचारत गेले. पण बाईंना स्वतःलाच सगळं सांगून डोक्यावरचं आयुष्यभराचं ओझं हलकं करण्याची एवढी मोठी ओढ होती की, मला फारसे प्रश्न विचारावेच लागले नाहीत. त्या बोलत गेल्या– मोकळेपणानं, सचेपणानं.

मेहरुन्निसा खान आणि हमीद दलवाई यांच्या कौटुंबिक पूर्वपीठिका अगदी भिन्न. पण एकदा लग्न केल्यानंतर मेहरुन्निसाबाईंनी दलवाईंचे आई–वडील, भावंडं, इतर नातेवाईक या साऱ्यांना आपलं म्हटलं आणि त्यांच्यासाठी करता येईल तितकं तन–मन–धनानं केलं. दलवाईंच्या असंख्य मित्रमंडळींना त्यांनी आपलेपणानं धरून ठेवलं. एवढंच नव्हे, तर समाजकार्याची पुसटशीही कल्पना नसलेल्या पार्श्वभूमीतून येऊनही त्यांनी पतीचे विचार आत्मसात केले.

हमीद दलवाईंनीही आपल्या मिळवत्या पत्नीचा मान राखला. केवळ एक अर्थार्जन करणारं यंत्र एवढीच किंमत तिला दिली नाही. आपल्या कार्यात त्यांनी तिला हळूहळू समाविष्ट करून घेतलं. आपल्यासाठी तिनं जे जे केलं, त्याची त्यांनी मनापासून पावती तिला दिली. त्यामुळेच मेहरुन्निसाबाई म्हणाल्या की, मी भरून पावले आहे.

हे मेहरुन्निसाबाईंनी सांगितलेले शब्द आहेत. त्यांची मराठीची अशी वेगळीच धाटणी आहे. मातृभाषा पुणेरी उर्दू, शिक्षणभाषा उर्दूच आणि महाराष्ट्रात राहत असल्यामुळे मराठी भाषा आपली मानली ती पतीच्या आग्रहाखातर– वयाच्या तिशीला. या साऱ्यांमुळे भाषेचं एक वेगळंच रसायन मेहरुन्निसाबाईंच्या बोलण्यात दिसून येतं. मुसलमान स्त्रीचं– निदान मराठीतलं तरी– पहिलंच आत्मचरित्र आहे.

टंकलिखित प्रत प्रकाशनासाठी तयार झाल्यावर प्रकाशक म्हणून 'साधना प्रकाशना'खेरीज दुसरं कुठलंही नाव आम्हा दोघींच्याही मनात येणं शक्य नव्हतं. तेव्हा साधनेतर्फे हे पुस्तक निघणं, हा औचित्याचा परमबिंदू होता.

साधनेच्या परंपरेला साजेशा देखण्या स्वरूपात आज हे पुस्तक प्रकाशित होत आहे.

हमीद दलवाईंना जितकं दुर्धर दुखणं झालं तितकं किंवा त्यापेक्षा कमी–जास्त कठीण असणारं दुखणं प्रत्येकाला होऊ शकतं. अशा वेळी तो रोगीच नव्हे तर त्याची शुश्रूषा करणारेही एकाकी पडतात, हे दृश्य आपण नेहमी पाहतो. दलवाई दांपत्याला मात्र त्यांच्या ज्ञात–अज्ञात सखेजनांनी कधीही एकटं पडू दिलं नाही. प्राणांतिक संकटात सापडलेल्या व्यक्तीला समाज कशी–कशी मदत करू शकतो ह्याचं हे पुस्तक हा एक वस्तुपाठच वाटतो मला.

तीन वर्षांपूर्वी अगदी ध्यानी–मनी नसताना हातात घेतलेला हा प्रकल्प या पुस्तकाच्या प्रकाशनानं पुरा होत आहे. हे अवघड काम आम्हा दोघींच्या हातून खरंच पुरं झालं आहे, यावर विश्वासच बसत नाही.

**– सरिता पदकी**

**मी भरून पावले आहे** : लेखिका मेहेरुन्निसा दलवाई
पृष्ठसंख्या – २०४, किंमत – २००/–
**'ग्रंथाली' येथे सभासदांना सवलतीत १६० रुपये**

ग्रंथाली

# विश्वकोशाचे २० खंड भेटकार्ड

## स्मृतिशलाका स्वरूपात...(व्हिजिटिंग कार्ड पेनड्राईव्ह)




महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे सर्व २० खंड त्यातील ३१२ सूची आणि १८१६३ लेख महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने तयार केलेल्या २० मराठी विश्वकोश हे आता सर्व जगभरातील चोखंदळ मराठी प्रेमींसाठी पेन ड्राईव्हवर उपलब्ध करून देण्यात येत आहेत. 'ग्रंथाली' आणि 'बुकगंगा.कॉम' यांच्या तंत्रज्ञान आणि वितरण साहाय्याने हा पेनड्राईव्ह आपणाला अत्यल्प किंमतीत (रुपये ८००) उपलब्ध करून दिला आहे. विद्यार्थी, शिक्षक, शाळा, महाविद्यालये आणि समस्त मराठी प्रेमींनी या अनोख्या संधीचा लाभ घेऊन आपल्या मराठीच्या जागरात सहभागी व्हावे. या पेनड्राईव्ह मधील विश्वकोशाचे ॲप्लिकेशन विन्डोज बेस कॉम्प्युटरवर, लॅपटॉपवर इन्स्टॉल करून युनिकोड फॉंट स्वरूपात वाचता येईल.

खंडामधील संपूर्ण सूची, विविध नोंदी, विषयवार नोंदी शोधण्याच्या विविध सुविधा यात उपलब्ध आहेत.

पेन ड्राईव्ह ८०० रुपयांत, टपालखर्च ५० रुपये.

हा विश्वकोश www.bookganga.com या साईटवर उपलब्ध आहे किंवा एक फोन ८८८८ ३०० ३०० या नंबरवर 'ग्रंथाली' कार्यालय फोन-२४३०६६२४ (granthali02@gmail.com) करून आपणाला या पेनड्राईव्ह विश्वकोशाची नोंदणी करता येईल.

# जगभर कुणीही शिकावी अशी...

# माय मराठी – My Marathi

## मराठी शिकवणारे सुलभ मार्गदर्शन

मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागाने तयार केलेला,
ग्रंथालीने प्रकाशित केलेला एक अपूर्व अभ्यासक्रम




एकात्मिक संभाषणात्मक पद्धतीने पद्धतशीर
मराठी शिकू इच्छिणाऱ्या अमराठींसाठी.
'माय मराठी'च्या एका संचात
पाठ्यपुस्तक, अभ्यासपुस्तिका आणि
विनामूल्य दृक्श्राव्य डीव्हीडी यांचा समावेश आहे.

| प्रकल्प समन्वयक | लेखक | |
|---|---|---|
| विभा सुराणा | सुहास लिमये | सवलत मूल्य १००० रु. |
| दीपक पवार | जयवंत चुनेकर | टपालखर्च १०० रु. |

## ॥ग्रंथाली॥

द्वारा बुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली क्र. ९, तळमजला, जे.के. सावंत मार्ग, यशवंतराव चव्हाण नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प.), मुंबई ४०००१६ ● दूरध्वनी : २४३०६६२४, २४२१६०५० ● granthalimchee@gmail.com www.granthali.com



### फुलाला सुगंध मातीचा - डॉ. अनुराधा हरकरे, डॉ. अंजली कुलकर्णी

ह्या पुस्तकात लेखिकांनी, समाजातील काही निवडक, सुजाण, सुशिक्षित, सुसंस्कृत, सजग आणि सर्वार्थाने प्रज्ञावंत, यशवंत, कीर्तिवंत व्यक्ती व त्यांच्या पालकांशी संवाद साधला आहे व त्यांची माहिती शब्दात गुंफून त्याचा भरजरी शेला विणला आहे. ह्या सर्व व्यक्तींच्या संगोपनात योगदान देणाऱ्या आप्तस्वकीयांशी प्रत्यक्ष चर्चा करून माहिती मिळवली असल्याने त्यात ओघवता सच्चेपणा जाणवतो. **- स्नेहलता देशमुख**


मूल्य १६० रु. सवलतीत १०० रु.

### कुसवा - उषा परब



कुसवा कुस! बाईच्या बाईपणास आईपणाची कृतार्थता देणारी प्राकृतिक देणगी, पण तो अनुभव साक्षात होण्यापूर्वी आणि नंतरही तिच्या दैहिक भोगांची अनेक विरूपे ही कादंबरी धक्कादायकपणे मांडते. सामान्यपणे लेखनात, चर्चेत त्याज्य समजले जाणारे विषय इथे सरळ स्वाभाविकपणे येतात. एका कुटुंबकथेपासून सुरू झालेली ही कादंबरी कोकणच्या बदलत्या उद्ध्वस्तीकरणाच्या वास्तवाचे चित्रण या कथेला व्यापक परिणाम देते आहे. भारतातील ग्रामजीवनाची आणि मानवी मनाची द्विखंडावस्था इथे प्रभावीपणे आली आहे असे वाटते. **- डॉ. तारा भवाळकर**

मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.



### महाभारतातील काही प्रसंग : विवेचन व रसग्रहण खंड २ - अरुण/वासंती जातेगांवकर

प्रस्तुत पुस्तकाचा मुख्य उद्देश, द्यूत आणि दुर्योधनवध ह्या प्रसंगावरचे लेखकांचे लेख वाचकांसमोर ठेवणे हा आहे. लेखाचे मुख्य उद्दिष्ट आहे, द्यूतासंबंधी सामान्यत: न विचारल्या जाणाऱ्या एका महत्त्वाच्या प्रश्नाला संलग्न असलेली संहितेतली सर्व माहिती वाचकांसमोर अशा प्रकारे ठेवायची की इच्छा असल्यास त्या प्रश्नाचे संहितेशी सुसंगत असे उत्तर त्याला स्वत:ला तयार करता येईल. दुर्योधन वध व त्याला संलग्न असलेले प्रसंग महाभारतात ज्या स्वरूपात मांडले आहेत त्या स्वरूपात ते वाचकांसमोर मांडण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.

### विमुक्ता (तेलगू लेखिका वोल्गा) - अनुवाद : वंदना करंबेळकर



भारतीय संस्कृतीवर रामायण, महाभारताचा महत्त्वपूर्ण प्रभाव आहे. यातील पात्रांना आपण देवत्व बहाल करून त्यांना पूजनीय ठरवलं आहे. पण त्यांना अनुकरणीय करता येईल का? तसं करायचं असेल तर त्यांचा माणूस म्हणून विचार करावा लागेल. त्यांच्या मर्यादा आणि क्षमता यांचा अतिशय समजुतदारपणे आणि शहाणपणाने जाणीवपूर्वक विचार करावा लागेल. हा विचार वोल्गाजींनी या सर्व पात्रांबाबत केलेला जाणवतो. हा वेगळेपणा, हा नवा उच्चार अचंबित करणारा आणि आश्वासक आहे. **मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.**






### ग्रेट दिव्यांग - उषा धर्माधिकारी

या पुस्तकात तीन विभागाचे असून पहिल्यात शारीरिक अपंगत्वाला हरवून यश मिळविणाऱ्या दिव्यांगांचे व्यक्तिचित्रण तर दुसऱ्यात अंधत्वावर मात करून स्वत:च्या मेहनतीने-कर्तृत्वाने अपंगांच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या अनेक स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने स्वयंप्रकाशित होऊन इतरांसाठी पथदर्शक ठरलेल्या व्यक्तींचे वर्णन आहे. तिसऱ्यात विशेष दिव्यांगांच्या मल्टिपल डिसेबिलिटीमुळे अपंगत्व आलेल्या व्यक्तींनी आपल्या जीवनात मिळालेल्या यशाचे वर्णन आहे.

मूल्य १२० रु. सवलतीत ८० रु.

### बदक-नामा - मिलिंद पदकी






'बदक-नामा'मधली कविता ही अशा अस्वस्थ वर्तमानाची कविता आहे. कवीच्या अमेरिकेतील वास्तव्यामुळे या वर्तमानाची मराठी कवितेला अपरिचित अशी समाजजीवनाची अनेक रूपं कवितेत साकारली आहेत. वाचनीय आणि मननीय असा हा संग्रह आहे.

**- भारती बिर्जे-डिग्गीकर**

मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.

## मुक्या जंगलाची गर्जना

**अर्जुन व्हटकर**





जंगलातील मुका जीव आणि मायमातीची मशागत करणारे मातीमोल होत आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. माणूस देखील 'डेंजर झोन'मध्ये आहे. माणूस सृष्टीतून हद्दपार झाला पाहिजे. जंगलजीव जगला पाहिजे हा अर्जुन व्हटकरांच्या 'मुक्या जंगलाची गर्जना' या कथासंग्रहाचा गाभा आहे. अर्जुन व्हटकरांना पर्यावरणाविषयी अतीव कणव आहे. जंगल व जंगलातील मुक्या जीवाच्या वाचेला भाषारूप देऊन त्यांचा उद्रेक शब्दरूपात प्रकट केला आहे. या कथा वाचकांना अंतर्मुख व विचारप्रवण करतील.

**मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

---

## प्रकाशाचे बेट

**अनुराधा गोरे**





**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

आपल्या सर्वसामान्य माणसांच्या कोषापलिकडचं जग वेगळं आणि अनोळखी असतं. गरिबी, बेकारी, अंधश्रद्धा यांच्या विळख्यात अडकलेल्या तरुण-तरुणींचं ज्यांना शाळेत जायला जमलंच नाही वा शाळा मधूनच सोडावी लागली अशांचं. यांच्या भविष्यात अंधार असतो. त्यांची छोटी स्वप्नही साकार करणं म्हणजे असते लढाई. असे युवक-युवती जेव्हा 'केसवा'च्या 'युवा परिवर्तन'च्या संपर्कात येतात तेव्हा त्यांचे विचार बदलतात, आचारात परिवर्तन होते, स्वप्नं सत्यात आणण्याचं बळ त्यांना मिळतं. नवं आकाश त्यांना खुणावतं. अशा युवक-युवतींच्या कथा वाचा 'प्रकाशाचे बेट'मध्ये.

---

## शहरातला प्रत्येक

**सुजाता महाजन**




हिंसेच्या आसपासच वावरत असतो आपण. जणू आपल्या उजव्या नाकपुडीतून श्वासाबरोबर हिंसा आत जातेय आणि डाव्या नाकपुडीतून भीती बाहेर पडतेय. कधी भीती आत तर हिंसा बाहेर. शरीराला कवटाळून बसणारी. शरीराला उल्लंघून टाकणारी हिंसा, हिंसेच्या आसपास वावरूनही हिंसेला स्वीकारू न शकणारी भीती. आपण सगळे भयाच्या नाहीतर हिंसेच्या छायेत जगणारे. हा प्रवास एकट्याचाच असतो... काही काळ काही भ्रम असतात आपल्याबरोबर. ते भ्रमच असतात, सावल्या असतात. जेव्हा ज्ञानाची जाणीव फुटते तेव्हा आपल्याला सोडून जातात ते. जावंच त्यांनी. सत्याच्या प्रकाशात चालायचं असतं ते, एकट्यानेच!

**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

॥ग्रंथयात्री॥

# ग्रंथपान

चांगदेव काळे

संपर्क : ९८६९२०७४०३

## विश्वसंचारी

डॉ. अनंत पां. लाभसेटवार




'ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात मावळत्या उन्हाळ्याचं शेपूट धरून आम्ही तिथे बोटीनं गेलो. त्यावेळी तिथे शिशिराचं नुकतंच आगमन झाल्यामुळे वनश्री आपलं नेसणं बदलत होती. पिवळ्याजर्द किंवा आरक्तवर्णीय पर्णभाराची झाडं नववधूसारखी नटली होती.' 'राजाचं आगमन जसं ढोल पिटून जगजाहीर करण्यात येतं तसं या भव्य धबधब्याचं अस्तित्व त्याच्या गर्जनेनं दुरूनच कळतं.' 'भारतातला एकदेखील राजकारणी अशा बोटीवर तर सोडाच पण मुंबईतल्या पंचतारांकित हॉटेलमध्ये कधी बघितला नाही.' 'पृथ्वीच्या पोटातून एक औंस (२८.३ ग्रॅम) सोनं मिळवण्यासाठी १७ टन माती उकरावी लागते.' 'माणसाला सरलतेपेक्षा वक्रतेत, सत्यापेक्षा खोट्यात, उदात्ततेपेक्षा वामकृत्यात आणि आकृतीपेक्षा विकृतीत जास्त रस वाटतो.'

'हे विश्वची माझे घर', असे वचन आपण देवालयात बसलेल्या साधुसंतांच्या मुखातून अनेकदा ऐकलेले आहे. 'दुनिया मेरी मुठ्ठीमे' हेही वचन अलीकडे प्रत्येकाच्या मुखी झालेले आपण गल्लोगल्ली ऐकतो आहोत. परंतु विश्वभर मी संचार केलेला आहे, असे सांगणारा कुणी आपल्या ऐकिवात नव्हता. परंतु डॉ. अनंत लाभसेटवार हा अनुभव समोर घेऊन आलेले आहेत, 'विश्वसंचारी' या नावाच्या पुस्तकरुपात. हे पुस्तक म्हणजे त्यांनी केलेल्या विश्वटनाचा पुरावा समजण्याची गरज नाही. उलट त्याकडे पाहायचेच झालेतर ते विश्वटनाचे गाईड म्हणावे लागेल. प्रवासात प्रवासाचा आनंद कसा उपभोगायचा त्याचे टॉनिक या गाईडात आहे. ज्यांना कुणाला अशा पर्यटनाची आवड असेल, वा विश्वातल्या कुठल्याही देशाची पर्यटनाच्या दृष्टिकोनातून माहिती मिळवण्याचे कुतूहल असेल, त्यांच्यासाठी वाटाड्या ठरावे, असे हे पुस्तक आहे.

पर्यटन म्हटले की त्या त्या ठिकाणची प्रेक्षणीय स्थळे पाहणे, याला प्राधान्य असते. त्यातले सौंदर्य टिपण्यातला आनंद मोठाच असतो. परंतु सगळ्यांत महत्वाची गोष्ट असते ती म्हणजे त्याचा इतिहास समजून घेण्याचा. तो माहीत असल्याशिवाय त्यातल्या खऱ्या सौंदर्याच्या अंतरंगाचा आनंद नाही घेता येत. डॉ. लाभसेटवार यांनी प्रत्येक देशाचा, तिथल्या प्रत्येक स्थळांचा इतिहास, त्याची संपूर्ण माहिती, तपशील, इतकेच नव्हेतर भूगोल, अशा सगळ्यांचा अभ्यास केलेला दिसून येतो. प्रवासाचे साधन म्हणून विमान, जहाज, बस, कार, घोडागाडी, असा सगळ्यांचा वापर उपयोग केलेला आहे. त्या साधनांनी दिलेला आनंद आणि त्यांच्यातली मौज यांचे तपशीलसुद्धा अनोखे वाटावेत असे आहेत. फोर्ट लॉटरडेल, फ्लोरिडा येथील सव्वादोन लाख टन वजन, ६२९२ उतारूंचा क्षमता आणि सतरा माळे असलेली जगातील सर्वात मोठी आरामबोट- 'ओयासिस ऑफ सी' म्हणजे महाबोटच. तिचे वर्णन आणि तिच्यातले राजेशाही वैभव कल्पनेला भूरळ घालणारे आहे. लास व्हेगास या पापनगरीतील एमजीएम ग्रँड हॉटेलाचा अतिभव्यपणा आणि चैन, सुप्रसिद्ध लेखक अर्नेस्ट हेमिंग्वे जिथे पाच वर्षे वास्तव्याला होता ते हवाना-क्यूबा येथील अँबोज मुंडोज हॉटेल, दक्षिण ब्राझील व उत्तर अर्जेंटिना यांच्या सरहद्दीवर असलेला २७५ धारांचा इग्वाझू धबधबे, एकेकाळी मधुचंद्राची राजधानी समजला गेलेला नायगारा धबधबा, पश्चिम ग्रँड कॅनियनची महादरी आणि तिच्यावर बांधलेली घोड्याच्या नालीच्या आकाराचा भव्य गोल, इजिप्तची संस्कृती, पिरॅमीड आणि नाईल नदी, व्हिएतनाम आणि नाईक क्रीडा पादत्राणे, रोम आणि ज्युलियस सिझर, नेपोलियन, मुसोलिनी; सोने, सोने शोधण्याची पद्धत, सॅनफ्रान्सिकोचा गोल्डन ग्रेट ब्रिज, लिसबन येथील वास्को-द-गामाच्या वारीचं उगमस्थान, लंडन जवळील शेक्सपिअरचे जन्मस्थान, अशा अगणित स्थळांची माहिती आपल्यासमोर उलगडून ठेवली आहे.

वाचकांच्या सोईसाठी पुस्तकाची भारत, युरोप, आखाती देश, करिबियन समुद्र, दक्षिण अमेरिका, अमेरिका, उत्तर आफ्रिका, आग्नेय आशिया, दक्षिण आफ्रिका, रशिया अशी विभागवार मांडणी केलेली आहे. त्यानुसार त्यात समावेश असलेल्या देशांत केलेल्या पर्यटनाचे वर्णन दिलेले आहे. यात संस्कृती, लोकांच्या आवडीनिवडी, पेहराव, वागणे, वाहतूक, हॉटेल, अतिथ्य, पर्यावरण, निसर्ग, व्यवसाय, युद्धे, मनोरंजन, अशा अनेक स्तरावरील सर्वांगीण अनुभवांचा समावेश आहे. आत अतिशय सुंदर असे स्थळांचे रंगीत फोटो आणि त्या देशांचे नकाशे दिलेले आहेत. विशेष म्हणजे तेथील अनुभव घेताना त्यांची तुलना आपल्या देशाशी केलेली आहे. यात चीन व जपानचा उल्लेख नाही. परंतु या दोन देशांविषयीचे लेखकाचे लेखन अगोदरच प्रकाशित झालेले आहे.

डॉ. लाभसेटवार हे अमेरिकास्थित प्रतिथयश असे लेखक आहेत. कथा, कादंबऱ्या, प्रवासवर्णन, लेखसंग्रह, अशी त्यांची विपुल ग्रंथसंपदा प्रकाशित झालेली आहे. रसिकमान्यता त्यांना मिळालेली आहे. त्यांची 'विश्वसंचारी' ही गाथा त्याच परंपरेचा प्रवाह पुढे घेऊन जाणारी आहे. त्यांनी प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे ही मोठ्या आकारात असलेली प्रवासातील अनुभवांची गाथा आहे. ही गाथा केवळ लेखकाची न राहता वाचकही तिच्यात आपोआप सहभागी होत जातो. तिच्यातला प्रसन्न ओघवता प्रवाह हा प्रवासातल्या प्रवाहाइतकाच मनोरंजक आणि गुंगवून टाकणारा आहे. उत्कंठा वाढवणारा आहे. परदेशांतील अनुभव हे इंग्रजाळलेल्या शब्दांनी सजलेले नसून अस्सल आपले वाटावेत इतके चपखलपणे आपल्या शब्दांचा साज घेऊन आलेले आहेत. क्रेडीट कार्ड -पतपत्र, उधारपत्र; क्लोजेट-वस्त्रगृह, बार-मद्यागार, शरीरपूजक अल्पवस्त्रधारी, ही त्यातली काही उदाहरणे.

लेखकाने लिहिलेली प्रस्तावना पुस्तकाचे अंतरंग स्पष्ट करणारी आहे. लेखनामागील प्रेरणा आणि प्रस्तावनेचे औचित्य या दृष्टीने ही प्रस्तावना वाचनीय आहे. सतीश भावसार यांनी विश्वसंचार करण्याचे साधन म्हणजे विमान आणि खुला आसमंत यांचा उपयोग करून सुंदर मुखपृष्ठ सजविले आहे.

**मूल्य ७०० रु. • सवलतीत १८० रु.**

ग्रंथयात्री

# ग्रंथपान

**शब्दकिमया**

नीला पाटणकर




'शब्दकिमया' या नावाचे नीला पाटणकरांचे हे पुस्तक म्हणजे शब्दांच्या जादूची गुहा आहे. शब्दकोशांतले शब्द अर्थासह मिळतात. पर्याय शब्दाकोशांतून, समानार्थी शब्दकोशांतून अनेक शब्द एका शब्दासाठी उपलब्ध असतात. म्हणींच्या कोशांतून असंख्य म्हणी आपल्याला वाचायला मिळतात. म्हणजेच शब्दांचे भांडार आपणास कोशांतून उपलब्ध होते. त्यांचा उपयोग त्या त्या वेळी चपखलपणे व्हावा म्हणून हे कोश उपलब्ध आहेत. अभ्यासक, संशोधक आणि शब्दांच्या प्रेमात पडलेली माणसे सतत त्यांचा धांडोळा घेत असतात. स्वतःला समृद्ध करण्याचा प्रयत्न करीत असतात. असाच शब्दांच्या संपत्तीने समृद्धपणे असलेला खजिना म्हणजे शब्दकोडे.

वर्तमानपत्रे, नियतकालिके यातून अनेकदा शब्दकोडे छापलेले आपण सतत पाहत आलेले आहोत. त्यांचा आकार लहानमोठा असू शकेल, परंतु त्यांचे महत्त्व कुणाला नाकारता आलेले नाही. अनेक जण अगदी मन लावून ती सोडवताना दिसतात. आपणही कुतूहल म्हणून स्वतः तो प्रयत्न अनेकदा केलेला असतो. त्याकडे काहीजण विरंगुळा म्हणून पाहतात, काहीजण स्वतःच्या क्षमतेचा, आकलनाचा, शब्दभांडाराचा शोध घेण्याचा प्रयत्न म्हणून त्याकडे पाहतात. खरेतर प्रत्येकाने शब्दकोडे सोडवण्याचा प्रयत्न करायला हवा. वाहनाला जशी साफसफाईची, इंधनाची गरज असते, तसे स्वतःला ताजेतवाने करण्यासाठी सतत शब्दांच्या सहवासात राहिले पाहिजे.

शब्द काय किमया करू शकतात, हे शब्दकोडे सोडवताना लक्षात येते. शब्दांच्या अंगी किमया करण्याचे, भुलवण्याचे, चकवा देण्याचे, मूळ स्थळी परत आणण्याचे सामर्थ्य आहे. आपली संस्कृती, आपल्या म्हणी, आपले ग्रामीण वाक्यप्रचार, ग्रामीण शब्द, विज्ञान, इतिहास, भूगोल, आपल्या दैनंदिन वापरातले शब्द, इतर भाषांचे सहज बोलण्यात येणारे शब्द, पदव्या, सन्मान, खेळ, सण, चालीरीती, प्राणी, पक्षी, नद्या ... अशा असंख्य घटकांशी जोडलेले शब्दही शब्दकोड्यांची सामुग्री असते. ती एकत्रित सापडण्याचे स्थळ म्हणजे शब्दकोडे. शब्दकोड्यांत येणारे सगळे शब्द आपणास ठाऊक आहेत, असा आपला समज असतो. तो समज किती सार्थ आहे, याचा उलगडा होतो तो शब्दकोडे सोडवताना. वरवर सहज वाटणारा शब्द आठवताना घाम फोडतो. तर कधी अतिशय क्लिष्ट वाटणारा शब्द सहज सापडतो. कधी तो लीलया समोर येतो, नाहीतर तिष्ठत ठेवतो प्रियेच्या आगमनासारखा. कधी सहज आनंद देऊन जातो, तर कधी आपलाच द्वेष करायला लावतो. अगदी संपूर्ण सोडवण्याच्या अखेरपर्यंत यावे, तर एकच शब्द अडून बसतो, तेव्हा सोडवणाऱ्याची अवस्था पक्वान्नात माशी पडावी, तशी झाल्याशिवाय राहात नाही. शब्द नाजूक असतात तितकेच कठोर असतात, शब्द आपले वाटतात कधी परकेपणा दाखवतात. कधी आनंद देतात तर कधी दूर गर्तेत भिरकावून देतात. शब्द जणू आपल्या भावनांशी खेळत असल्यासारखे वाटते परंतु संपूर्ण कोडे सुटले तर वाटणारा आनंद हा जगज्जेत्यापेक्षा कमी नसतो. हेही सत्य की कोडे सोडवताना आपण कोड्यात सापडलेले असतो, जगाचे भान विसरून.

शब्दकोड्यांकडे आपुलकीने पाहिले पाहिजे. आपले सर्वसामान्यज्ञान किती आहे, याचा आलेख दाखवणारे यंत्र म्हणजे शब्दकोडे. त्याच्याशी मैत्री केली तर आपल्या शब्दांचा गाव आपल्यासोबत सदैव राहील. त्यांची वेगवेगळी रूपे, भाव आनंद देत राहतील. या पुस्तकात शब्दकोडी दिलेली आहेत. रिकामा पट आहे, उभे आडवे शब्द दिलेले आहेत. आणि त्यांची उत्तरे पुस्तकाच्या शेवटी दिलेली आहेत. प्रत्येकाने शब्दकोडी सोडवून पाहावीत. नंतर उत्तर तपासून पाहावे. आपण चूक की बरोबर, हे तिथेच शोधून पाहता येईल. इतकेच नाही तर शब्दांचे भांडार, व त्याची किमया काय आहे, त्याचा प्रयत्य आल्याशिवाय राहणार नाही. आपण काही शब्द पाहू, त्यावरून वरील विवेचनाची कल्पना येईल.

पहिल्या बाजीराव पेशव्यांचे घरगुती नाव : राऊ. रेव असणारी वालुकामय जमीन : रेताड, नियमित येणारा दुधाचा उकडा : रतीब, गुजराती, मारवाडी लोकांत नावापुढे आदरार्थी लावलेली उपाधी : शेट, एक शेंदरी रंगाचा मणी : पोवळे. अक्षरावरच्या उच्चारासाठी मारलेली अर्धाकृती उलटी वेलांटी: रफार, मग्न, गुंग, तल्लीन : रत, विप्र, भटजी, द्विज, ब्राह्मण : भट, हजाम, रजक, नाभिक : न्हावी. दाक्षिणात्त्य लोकांची आई : अम्मा, वधूने लग्नासमयी पांघरावयाचे वस्त्र, शाल : आडवल.

लेखिकेने शब्दकिमयेसाठी केलेला प्रयास न वाटता तो लांब पल्ल्याचा प्रवास वाटतो. शब्दकोडे तयार करणे सोपे काम नाही. त्यासाठी बुद्धीची तरलता आवश्यक आहे. शब्दांचे इमान शोधण्याची कला आवश्यक आहे. त्यांच्यातली लय, ताल, तोल, अवधान, समन्वय, अचूकता, अक्षरांतला नेमकेपणा आणि त्यांची योग्य अशी सांगड घालण्याची कसरतीसारखी कला आवश्यक आहे. हे सारे लेखिकेने सांभाळले आहे. त्याबरोबर संयमाची आवश्यकता आहे. हे सारे एकत्र आले म्हणूनच हा ग्रंथ आकाराला आला आहे.

सतीश खानविलकर यांनी मुखपृष्ठ सजविलेले आहे. बुद्धिबळाचा पट असावा, तसा शब्दकोड्याचा पट मुखपृष्ठावर दिलेला आहे. बुद्धिबळ आणि शब्दकोडे यांच्यात किती साम्य आहे, हेच यावरून सुचविण्यात आल्यासारखे वाटते.

**मूल्य ३०० रु. • सवलतीत १८० रु.**




# ग्रंथपान

## यश म्हणजे काय?

शिल्पा खेर




'मला भरपूर आनंदी व्हायचं आहे, ही ॲम्बिशन हवी. अशा स्टेप्स स्वतःसाठी ठरवू नका की, मला ५० लाख कमवायचे आहे. एक करोड कमवायचे आहेत. आहे त्यात आनंदी राहायला शिका. आनंदी मनुष्य नेहमी यशस्वी असतो. स्ट्रेस कमी असेल तर तुमचं काम अधिक सुंदर होतं. जेव्हा आपण तणावात काम करतो, यश दूर राहतं. यशाची गुरुकिल्ली ही आहे की, लाईफ शूड बी हॅप्पी, हॅप्पीअर ॲंड हॅपीइस्ट, हा आनंदाचा ग्राफ कधी खाली येता कामा नये. मग आयुष्य यशस्वीच आहे.'

शिल्पा खेर यांचे 'यश म्हणजे काय?' हे पुस्तक नुकतेच ग्रंथाली आणि बुकगंगा यांनी प्रकाशित केलेले आहे. खरंतर यशाविषयी सांगणारी बरीच पुस्तके सध्या बाजारात आहेत. मग त्यात खेरांचे 'यश म्हणजे काय?' हे पुस्तक यात काय आणि किती भर घालणार आहे, एवढेच त्यातले औत्सुक्य होते. परंतु पुस्तक हातावेगळे केले तेव्हा लक्षात आले, हे पुस्तक सवंग लोकप्रियतेच्या पंक्तीत बसणारे नसून त्याचे स्वतःचे वेगळेपण आहे आणि ते नजरेत भरावे, नव्हे प्रत्येकाने ते वाचावे असे दर्जेदार आहे. आजच्या यशाच्या मागे धावणाऱ्या पिढीसाठी ते प्रेरक ठरावे.

हे मुलाखतींवर आधारलेले पुस्तक आहे. मुलाखती ज्यांच्या घेतलेल्या आहेत, ती सर्वच मंडळी प्रतिथयश, यश प्राप्त केलेली, आपापल्या क्षेत्रात नाव लौकिकाच्या शिखरावर पोहोचलेली आहेत. त्यांचे अनुभव, त्यांचा यशाकडे, जगण्याकडे आणि सामाजिक जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा आहे, त्यांचा यशापर्यंतचा प्रवास कसा आहे, याचा मागोवा यात घेतलेला आहे. आणि दुसरा आहे लेखनकौशल्याचा. लेखनतंत्र म्हणून या पुस्तकात मुलाखत तंत्राचा वापर केलेला आहे. परंतु या मुलाखतींना चिकित्सकपणाची जोड दिलेली आहे. मुलाखतीतून व्यक्त झालेल्या विचारांना समजून घेण्याचा, विचारांमागची प्रेरणा आणि व्यक्तिमत्त्वाचा मागोवा देखील घेण्याचा सुज्ञ प्रयत्न यात केलेला आहे. या प्रयत्नाला मानसविवेकाची जोड आहे. त्यातून अनुमानाच्या टप्प्यावर चिंतनाचे निश्चित असे विधान आहे. त्यामुळे लेखिकेच्या कसदारपणाचा कस मुलाखत देणाऱ्या व्यक्तीइतकाच प्रभावीपणे नजरेत भरतो. एक सुंदर सुसंवाद वाचकासमोर सुरू आहे, असेच वाचताना वाटत राहते.

लेखिकेने मुलाखतीसाठी निवडलेल्या व्यक्ती या सगळ्यांना आपले आदर्श वाटाव्यात इतके समृद्धपण त्यांच्याकडे आहे. ही निवड आणि त्यांच्याकडून मिळालेल्या मुलाखती हा वाचकांसाठी मोठा ठेवा म्हणता येईल. डॉ अनिल काकोडकर, डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. प्रेमानंद रामाणी, डॉ. प्रकाश आमटे, डॉ. नरेंद्र जाधव, डॉ. ॲड. उज्ज्वल निकम, श्रीमती मीरा बोरवणकर, श्रीमती अंजली भागवत, रवींद्र प्रभुदेसाई, अविनाश धर्माधिकारी, भरत दाभोळकर, नितीन गडकरी या नावांवरून या विधानाची सत्यता पटावी. या मान्यवरांच्या मुलाखतींसाठी लेखिकेने केलेली प्रश्नावली समान आहे. यश, गुरू, आनंद, आदर्श, सत्यमेव जयते, अंधश्रद्धा, गुन्हेगारी, प्रसिद्धिमाध्यमे, परीक्षेत मिळणारे गुण, आयुष्यातील प्रभावी घटना, पूर्वाश्रमीचे जीवन, इतरांचे मिळालेले योगदान, अशा विविध विषयांना स्पर्श केलेला आहे. या विषयांची ही प्रश्नावली समोर ठेवून त्या व्यक्तींचे विचार, त्यांचे अनुभव, त्यांचा दृष्टिकोन, त्यांचे जीवन समजून घेण्यात आले आहे. मुलाखत म्हटली की तिला एकसुरीपणाच्या आरोपाला सामोरे जावे लागते. परंतु तसे इथे घडलेले नाही. कॉलेज विद्यार्थ्यांचा गट निर्माण करून, प्राध्यापकांसोबत या सर्व घटनांची पार्श्वभूमी निर्माण केली आहे. आणि शालेय शिक्षणासोबत अशा यशस्वी व्यक्तींना समजून घेणे कसे आवश्यक आहे, ते कसे घेता येईल, आणि समजून घेतल्यानंतर त्याविषयी कसे अनुमानावर येता येईल, असा सुंदर प्रवास लेखिकेने तंत्र म्हणून येथे केलेला आहे. त्यामुळे प्रश्न सारखे असले तरी व्यक्ती भिन्न आहेत.

सगळ्यांच मान्यवरांच्या मुलाखती म्हणजे त्यांच्या चरित्राचा हा संक्षिप्त भाग म्हणता येईल. या मान्यवरांनी मुलाखतींच्या ओघात व्यक्त केलेली मते ही अनेकांच्या सुंदर 'विचारांनी' युक्त अशी आहेत. त्यांनी वर्णन केलेल्या घटना तर आपल्या मनाचा ठाव घेतात. एफआरएसच्या वेळी आईन्स्टाईनने सही केलेल्या रजिस्टरमध्ये सही करण्याचा मिळालेला आनंद डॉ. माशेलकरांनी व्यक्त केलेला आहे, तो अवर्णनीय असा आहे. आईन्स्टाईनचं स्वतः फिजिक्सचा विद्यार्थी आहे, हे सांगणे नम्रपणाचा कळस गाठते. जे करशील ते असं कर, इतरांनी त्याची नोंद घेतली पाहिजे, ही डॉ. नरेंद्र जाधव यांच्या वडिलांची शिकवण कुणालाही नाकारता येणार नाही. आयुष्यात आदर्श घ्यावा अशा व्यक्ती अनेक भेटतात, परंतु स्वतः असे वागा, असा आदर्श निर्माण करा, जो इतरांसाठी आदर्श असेल, असे धर्माधिकारी सांगतात, तेव्हा ती स्वतःसाठी प्रेरणाच असते. 'साब, आप मेरे वकील होते तो..' असे अबू सालेम डॉ. ॲड. उज्ज्वल निकम यांना म्हणतो तेव्हा ती त्यांच्या कठोर कर्तव्याला पावतीच असते.

सतीश भावसारांनी यशाची कल्पना मुखपृष्ठावर साकारली आहे ती आईसबर्गवर उभे राहून जगाकडे पाहणाऱ्या व्यक्तीची. यश किती मोठं असू शकतं आणि प्रत्येकाला ते कसं भावतं, याचा हा सुंदर मिलाफ आहे.


**मूल्य २५० रु. • सवलतीत १५० रु.**




# ग्रंथपान

## कथा परमवीरचक्र विजेत्यांच्या आणि सद्भावना ऑपरेशन

अनुराधा गोरे




परमवीरचक्र हा सर्वोच्च शौर्य पुरस्कार आहे. २६ जानेवारी १९५० पासून तो प्रदान करण्यात येत आहे. आतापर्यंत एकवीस महारथींना हा सन्मान प्राप्त झालेला आहे. फ्लाईंग ऑफिसर निर्मल जित सिंग सिखॉन हे एअरफोर्सने एकमेव सन्मानार्थी आहेत. उर्वरित वीस सन्मानार्थी सैन्यदलातील आहेत. सैन्यदलातील हा सर्वोच्च सन्मान केवळ युद्धप्रसंगी दिला जातो. धैर्य, प्रेरणा, स्वयंशिस्त, मान सन्मान, कामाप्रती निष्ठा, आपल्या पलटणीची प्रतिष्ठा राखण्याचा केलेला आटोकाट प्रयत्न, उच्च मूल्ये, जिंकण्याची परमोच्च मनीषा, आत्मविश्वास, अशक्य ते शक्य करण्याची दुर्दम्य इच्छा, नेतृत्वगुण, देश, हाताखालची, बरोबरीची माणसे यांवरील पराकोटीचे प्रेम, सैनिकांचे उत्तम चारित्र्य या आणि अशा साऱ्या सद्गुणांचा हा सन्मान असतो.

अशा परमवीरचक्र पुरस्कार सन्मानाचे मानकरी ठरलेल्या एकवीस महारथींचा परिचय, त्यांच्या कामगिरीची माहिती या पुस्तकात दिलेली आहे. भारत स्वतंत्र झाला, तरी युद्धांची परंपरा खंडित झालेली नाही. १९४७-४८ साली पाकिस्तानने काश्मीर आपल्यात सामील करून घेण्याच्या इराद्याने काश्मीरवर आक्रमण केले होते. काश्मीर भारतात विलीन होण्यास कारण ठरलेले हे पहिले युद्ध. प्रचंड थंडी, बर्फ, दुर्गम भाग. तरीही १६००० फुटांवरील झोझिला खिंडीत तोफा चढवण्याचा भीमपराक्रम मेजर जनरल के.एस. थिमय्या यांच्या फौजेने केला. या युद्धात अतुलनीय पराक्रम गाजविल्याबद्दल मेजर सोमनाथ शर्मा, लान्सनायक करमसिंग, सेकंड लेफ्टनन्ट रामा राघोबा राणे, नायक यदुनाथ सिंग आणि कंपनी हवीलदार मेजर पीरू सिंग हे पाच वीर या सर्वोच्च सन्मानाचे मानकरी ठरलेले आहेत. १९६१ मध्ये कांगोच्या मदतीसाठी शांतीसेनेत गेलेल्या कॅ. गुरुबच्चन सिंग सलालिया यांनी 'आयो गुरखाली'चा नारा देत आपल्या साऱ्या गुणांचा परिचय या युद्धात करून दिला. त्यांच्या या धाडसी कृतीने युनायटेड नेशनच्या फौजेला वेढा घालून इतर सैनिकांपासून तोडायचा बंडखोरांचा प्रयत्न फसला. म्हणूनच त्यांना मरणोत्तर परमवीरचक्र प्रदान करण्यात आले.

१९६२ चे भारत-चीन युद्ध ही आपल्या अभिमानावरची भळभळती जखम आहे. या युद्धात भारतीय सैन्याला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले परंतु त्यात आपण पराक्रम गाजविलेला नाही, असे नाही. पराभवाला अनेक कारणे आहेत, परंतु पराक्रमाला कुणाला गालबोट लावू शकले नाही. सुभेदार जागिंदर सिंह, मेजर शैतान सिंह, मेजर धनसिंग थापा, हे या युद्धातील परमवीरचक्र पुरस्काराचे मानकरी ठरलेले आहेत.

१९४७ साली काश्मीर बळकावण्याचा अर्धवट राहिलेला डाव पूर्ण करण्यासाठी पाकने १९६५ साली पुन्हा युद्ध छेडले. सैन्यदलाने जिंकलेले युद्ध आणि मिळविलेला प्रदेश केवळ टेबलावरील चर्चेने हातून गेला, असे हे युद्ध. पाकिस्तानच्या रणगाड्यांचे आणि सेबरजेट विमानांचे अतोनात नुकसान भारताने केले. अतुलनीय पराक्रम करणारे कंपनी क्वार्टर मास्टर हवीलदार अब्दुल हमीद, लेफ्टनंट कर्नल ऐ.बी. तारापोर, लेफ्टनंट अरुण क्षेत्रपाल यांना परमवीरचक्र प्रदान करण्यात आले. १९७१ मध्ये बांगला देशाला स्वातंत्र्य मिळवून देणारे युद्ध झाले, पूर्व आणि पश्चिम अशा दोन्ही दिशांना. या युद्धात भारताने पाकचा सर्वच स्तरावर पराभव केला. या युद्धात चार वीरांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. १९८७ मध्ये सियाचेन-मेघदूत ऑपरेशन झाले त्यात नायब सुभेदार बाणासिंग हे या सन्मानाचे मानकरी ठरले. १९८७-९० या काळात ऑपरेशन पवन झाले. यात मेजर रामस्वामी परमेश्वरन हे मानकरी ठरले. तर १९९९ साली कारगील युद्ध झाले. यात चौघांना हा पुरस्कार प्रापत झाला.

या पुस्तकाची रचना तीन भागात करण्यात आलेली आहे. पहिल्या भागात परमवीरचक्र पुरस्कार प्राप्त शूरवीरांचा परिचय अणि त्यांच्या पराक्रमाविषयी माहिती दिलेली आहे. दुसऱ्या भागात 'ऑपरेशन सद्भावना' हा हेतू ठेवून ज्या अनेक संस्था काम करीत आहेत, त्यांच्या कार्याविषयीचे लेख दिलेले आहेत. दहा दहशतवाद्यांना मारणं सोपं आहे. मात्र एखादा दहशतवादी घडूच नये म्हणून प्रयत्न करणे अवघड आहे. तो अवघड प्रयत्न या संस्था करीत आहेत. अशा तेवीस संस्था आहेत. त्यांचे कार्य हे सद्भावनेचे आहे तरी ते तितकेच धाडसी आणि खडतर आहे. त्यातून त्या कार्यकर्त्यांच्या चिकाटीचे आणि अथक परिश्रमाचे नवल वाटल्याशिवाय राहात नाही.

शेवटचा तिसरा भाग आहे देण्यात येणाऱ्या सन्मान पदकांबाबतचा. युद्ध व शांततेच्या काळात सैनिकांना देण्यात येणारी पदके कोणती आहेत, त्यांचे स्वरूप कसे असते, ती कोणत्या साली देणे सुरू झालेली आहेत, त्यावरील कोरलेला मजकूर कसा असतो, इ. तपशील यात दिलेला आहे.

सदर पुस्तकासाठी अनुराधा गोरे यांनी घेतलेले परिश्रम लक्षात येण्यासारखे आहेत. त्यांनी मिळविलेले संदर्भ, स्थळांना दिलेल्या भेटी, यातून दिलेले तपशील, नकाशे, फोटो यामुळे या पुस्तकाला परिपूर्णता लाभली आहे. प्रत्येक भारतीयास आपल्या परमवीरचक्र पुरस्कार प्राप्त वीरांची माहिती असलीच पाहिजे. 'ओळख सियाचेनची' या पुस्तकाइतकंच हे पुस्तक म्हणजे संदर्भमूल्य असलेला दस्तऐवज आहे.

परमवीरचक्र पदकाची प्रतिकृती, ते प्राप्त करणारा शूरवीर सैनिक, युद्धाची पार्श्वभूमी आणि तिला दिलेला तिरंगी झेंड्याचा आभास, यामुळे मुखपृष्ठाचा उठावदारपणा थेट आपल्याला येऊन भिडणारा वाटत राहतो. सतीश भावसार यांची ही कल्पना सुंदरच!

**मूल्य ३५० रु. • सवलतीत २१० रु.**

## ॥ग्रंथाली॥

द्वारा बुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली क्र. ९, तळमजला, जे.के. सावंत मार्ग, यशवंतराव चव्हाण नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प.), मुंबई ४०००१६ ● दूरध्वनी : २४३०६६२४, २४२१६०५० ● granthalimchee@gmail.com www.granthali.com




### गुलाबराव पारनेरकर - सचिन जगदाळे

निखळ आणि नितळ विनोद हे या पुस्तकाचं बलस्थान आहे. तो ओढून ताणून आणलेला कुठेच वाटत नाही. फक्त विनोद हा या पुस्तकाचा उद्देश असेल असेही मला वाटत नाही. विनोदातून काही ठिकाणी सामाजिक संदेश देण्याचाही प्रयत्न केला गेलेला दिसतो. पुस्तकात वर्णन करण्यात आलेल्या पात्रांव्यतिरिक्तही आणखी बऱ्याच प्रकारच्या/स्वभावाच्या व्यक्ती गिरगावात बघायला मिळतात.

मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.

### कथा परमवीरचक्र विजेत्यांच्या आणि ऑपरेशन सद्भावना - अनुराधा गोरे



या पुस्तकात लढाईला वेगळे वळण देणाऱ्या अती दुर्गम, कठीण, दुर्धर, धोकादायक स्थितीतही केवळ आपल्या लक्ष्याप्रती पोचण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या परमवीरचक्र विजेत्यांच्या कथा आहेत. तशीच ऑपरेशन सद्भावनेची माहिती. एकीकडे युद्ध तर दुसरीकडे शांतता, सद्भावनेचे प्रयत्न एकत्र करण्यामागे आणखी एक हेतू आहे. आंतकवाद्यांविरोधात, देशद्रोह्यांच्या विरोधात जशी आर्मी कारवाई करते अगदी तशीच ऑपरेशन सद्भावना अंतर्गत असंख्य कल्याणकारी योजना राबवते.

मूल्य ३५० रु. सवलतीत २१० रु.




### प्रिय रामू... - योगीराज बागूल

बाबासाहेब आईसाहेबांना पत्र लिहिताना 'प्रिय रामू' अशी सुरुवात करत. आईसाहेब हे व्यक्तिमत्त्व सोशिक आणि सालस तितकेच भव्य होते. त्यांचे जीवन, कष्ट, खाल्लेल्या खस्ता, हालअपेष्टा, गरिबीशी दिलेली झुंज या सर्व बाबींची गुंफण तसेच बाबासाहेबांच्या उच्च शिक्षणासाठीच्या धडपडीचा, समाजकार्यारंभाचा, त्यांच्या वेगवेगळ्या पातळ्यांवरील लढ्यांचा हा पट मांडणे क्रमप्राप्त ठरते. बाबासाहेबांचे कार्य, उभयतांच्या संसारातील-आयुष्यातील गरिबी आणि अडीअडचणींशी दिलेले संघर्ष, आईसाहेबांची बाबासाहेबांबद्दलची काळजी, त्यांना दिलेली खंबीर साथ या सर्व गोष्टी हातात हात घालून चालणाऱ्या आहेत.

मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.

### ती एक परी - संपादन : शरयू घाडी



कणकवलीसारख्या छोट्याशा गावात जाऊन शरयू घाडी अनिताच्या कुटुंबियांबरोबर ४-५ दिवस राहिल्या आणि त्यांनी अनिता बरोबर असणाऱ्या सर्व व्यक्तींच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. आपल्या समर्थ लेखणीतून समर्पक भाषेत त्यांचे अनुभव 'ती एक परी' या पुस्तकात मांडले आहेत. शरयू घाडी यांनी आपल्या प्रामाणिक समर्थ लेखनातून संवेदनशीलपणे त्यांनी अनिताची कथा उभी केली आहे.

मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.



### पदोपदी जाणवलेले ईश्वराचे अस्तित्व - सुधा वासुदेव देसाई

ईश्वर मानणारे आस्तिक असतात, तसे त्याच्यावर श्रद्धा नसणारे नास्तिक असतात. प्रत्येकजण आपले तर्कशास्त्र लढवून सफाईदार विचार भांडण्यास मोकळा जो आपापल्या जागी बरोबर वाटतो. दोघेही आपल्या श्रद्धेवर ठाम. लेखिका सुधा देसाई यांना त्यांच्या खाजगी आयुष्यात आलेले अनुभव, अवती-भवती पाहिलेल्या, जवळच्या लोकांच्या बाबतीत घडलेल्या घटनांतून त्यांना आलेले अनुभव, पण जरा निराळे असे शब्दबद्ध केले आहेत.

मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.

### मुंबई ब्रिटिशांची होती तेव्हा... - माधव शिरवळकर



पारतंत्र्याची काळी बाजू, इंग्रजांचे जुलूम आणि दडपशाही आपण पाठ्यपुस्तकात घोटून घोटून शिकलो. पण सुदैवाने, ब्रिटिशांच्या त्या सत्ताकाळाला वर उल्लेखिलेली विधायक बाजूही होती. इतिहासाने नोंदवलेल्या त्या विधायक बाजूचे काही स्फूर्तिदायक आणि उद्बोधक असे कंगोरे ह्या पुस्तकात आले आहे. सर्व आदर्श लोपलेल्या काळातील भारतीय तरुणाईने, विस्मृतीत गेलेल्या ब्रिटिश काळातल्या त्या विधायक कर्तृत्वाकडे मागे वळून पाहण्याची, आणि त्यातून चांगले ते उचलण्याची आज नितांत गरज आहे. या पुस्तकाने गतकाळाकडे विधायक कटाक्ष टाकला आहे.

मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.

# आपल्या हृदयाची काळजी घ्या, विलंब टाळा!



तुम्ही जर **मधुमेह, रक्तदाब, लठ्ठपणा आदी विकारांनी त्रस्त** असाल किंवा आपल्यामध्ये **हृदयविकाराची खालील लक्षणं** दिसत असतील जसे की



अचानक बेशुध्दी, चक्कर येणे



धाप लागणे



रोजचे काम करताना छातीत वेदना होण



पावले तसेच पायांवर सूज

## सादर करीत आहोत कार्डिओ असिस्ट चेकअप प्रोग्रॅम

**कार्डिओ असिस्ट चेकअप प्रोग्रॅममध्ये समाविष्ट आहे कम्प्युटराईज्ड स्ट्रेस ई.सी.जी., ब्लडप्रेशर, ई.सी.जी., आर बी एस (रँडम ब्लड शुगर), एस पी ओ 2, बी एम आय, तुमच्या हृदयाची वास्तविक स्थिती जाणून घेण्यासाठी व आमच्या तज्ज्ञ डॉक्टरांबरोबर सल्ला मसलत करुन उपचार निश्चित करण्यासाठी.**

Madhavbaug SAVE MY HEART FIGHT AGAINST HEART ATTACK!

~~₹2450~~

फक्त

**₹750**

* ऑफर मर्यादित कालावधिसाठी वैध आहे.

• मुंबई • पुणे • नाशिक • अहमदनगर • जळगाव • औरंगाबाद • लातूर • परभणी • नांदेड • नागपूर • वर्धा • अमरावती • अकोला • चंद्रपूर • यवतमाळ • सोलापूर • सातारा • सांगली • कोल्हापूर • रत्नागिरी • चिपळूण • कणकवली • कुडाळ • भद्रावती • बेळगाव • मडगाव • पणजी • इंदौर

नाव नोंदणी आवश्यक,
अधिक माहितीसाठी आजच मिस कॉल द्या
**022-33494950**

माधवबाग™

'हृदयस्पर्शी माधवबाग' हे पुस्तक माधवबागच्या सर्व क्लिनिक्समध्ये उपलब्ध त्यासाठी आजच पैसे भरुन नोंदणी करा.
मिस्डकॉल नं. **022-67715442**

/madhavbaug.heartcare   YouTube /Madhavbaug   www.madhavbaug.org

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.
Postal Registration No. MCW/310/2016 -2018
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, बुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.